लोकलेखा समिती

(२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१६-२०१७ च्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालामधील वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाशी संबंधित (परिच्छेद क्रमांक ३.२ व ३.१२), नगरविकास विभागाशी संबंधित (परिच्छेद क्रमांक ३.५, ३.६ व ३.१४) आणि महसूल व वन (महसूल) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्रमांक ३.१०) यावरील

अठ्ठावन्नावा अहवाल

सत्यमेव जयते

(हा अहवाल विधानसभा / विधानपरिषद सभागृहास दिनांक जून/जुलै, २०१९ रोजी सादर करण्यात आला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई/नागपूर.
जून/जुलै, २०१९

लोकलेखा समिती

(२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१६-२०१७ च्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालामधील वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाशी संबंधित (परिच्छेद क्रमांक ३.२ व ३.१२), नगरविकास विभागाशी संबंधित (परिच्छेद क्रमांक ३.५, ३.६ व ३.१४) आणि महसूल व वन (महसूल) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्रमांक ३.१०) यावरील

अठ्ठावन्नावा अहवाल

लोकलेखा समिती
२०१७-२०१८

समिती प्रमुख

१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य

२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

३) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

४) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

५) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.

६) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

७) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

* ८) श्री. योगेश सागर, वि.स.स.

९) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.

** १०) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

१० अ) ॲड. पराग अळवणी, वि.स.स.

११) श्री. संजय केळकर, वि.स.स.

*** १२) श्री. सुरेश ऊर्फ बाळुभाऊ धानोरकर, वि.स.स.

१३) श्री. अजय चौधरी, वि.स.स.

१४) श्री. शंभुराज देसाई, वि.स.स.

१५) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.

१६) श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स.

१७) प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स.

१८) श्री. दिलीप वळसे-पाटील, वि.स.स.

१९) श्री. जयंत पाटील, वि.स.स.

२०) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

**** २१) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

२२) श्री. रविंद्र फाटक, वि.प.स.

***** २३) श्री. हेमंत टकले, वि.प.स.

२३अ) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

****** २४) श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स.

२५) श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.

******* २६) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

निमंत्रित

******** २७) श्री. प्रसाद लाड,वि.प.स.

********* २८) श्री. रामदास आंबटकर, वि.प.स.

सदरहू समिती दिनांक २४ ऑगस्ट, २०१७ रोजी विधानसभा व दिनांक ६ सप्टेंबर, २०१७ रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे गठीत करण्यात आली.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्री. जितेंद्र भोळे, सचिव (का.).
(२) श्री. यु. के. चव्हाण, सचिव (EM).
(३) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.
(४) श्री. अ.चां.कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.
(५) श्री. सो. न. सानप, अवर सचिव.
(६) श्री. विनोद राठोड, कक्ष अधिकारी.
(७) श्री. रवींद्र म. मेस्त्री, कक्ष अधिकारी.

*** श्री. योगेश सागर, वि.स.स. यांचा दिनांक १६ जून, २०१९ रोजी राज्यमंत्री म्हणून मंत्रीमंडळात समावेश झाल्याने सदर जागा रिक्त आहे.**

**** श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स. यांनी आपल्या समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवर ॲड. पराग अळवणी, वि.स.स. यांची मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक १४ फेब्रुवारी, २०१९ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

***** श्री. सुरेश उर्फ बाळू धानोरकर, वि.स.स. यांनी दिनांक २२ मार्च, २०१९ रोजी आपल्या सदस्य पदाचा राजीनामा दिल्यामुळे सदर जागा रिक्त आहे.**

****** श्री. विजय उर्फ भाई गिरकर, वि.प.स यांची दिनांक २७ जुलै, २०१८ रोजी विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर मा. सभापती, विधानपरिषद यांनी श्री. विजय उर्फ भाई गिरकर, वि.प.स यांची पुन्हा दिनांक ५ सप्टेंबर, २०१८ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

******* श्री. हेमंत टकले, वि.प.स. यांनी आपल्या समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवर श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांची मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

******** श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांची दिनांक २७ जुलै, २०१८ रोजी विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे सदर जागा रिक्त झाली.**

********* श्री. जयंत पाटील, वि.प.स. यांची मा. सभापती, विधानपरिषद यांनी निमंत्रित समिती सदस्य म्हणून दिनांक ६ सप्टेंबर, २०१७ रोजी नामनियुक्ती केली होती. दिनांक २७ जुलै, २०१८ रोजी विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे त्यांची निमंत्रित समिती सदस्यत्वाची नियुक्ती संपुष्टात आली होती. ते विधानपरिषद सदस्य म्हणून पुन्हा निवडून आल्यामुळे मा. सभापती, विधानपरिषद यांनी श्री. जयंत पाटील, वि.प.स. यांची दिनांक ५ सप्टेंबर, २०१८ रोजी समिती सदस्य म्हणून रिक्त जागेवर नामनियुक्ती केली.**

********** श्री. प्रसाद लाड, वि.प.स. यांची मा.सभापती, विधानपरिषद यांनी दिनांक १ मार्च, २०१९ रोजी "विशेष निमंत्रित" समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

*********** श्री. रामदास आंबटकर, वि.प.स. यांची मा.सभापती, विधानपरिषद यांनी दिनांक २ मे, २०१९ रोजी "विशेष निमंत्रित" समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

प्रस्तावना

मी, लोकलेखा समितीचा समिती प्रमुख, समितीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरुन भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१६-२०१७ च्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवाल यावर विचार करून लोकलेखा समितीचा अठ्ठावन्नावा अहवाल सादर करीत आहे.

समितीने दिनांक २७ डिसेंबर, २०१८, १६ जानेवारी, २०१९, १२ व १४ फेब्रुवारी, २०१९, ७ मार्च, २०१९ व ४ जून, २०१९ रोजी प्रधान सचिव, नगरविकास विभाग, सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग व अपर मुख्य सचिव, महसूल व वन (महसूल) विभाग आणि इतर विभागीय प्रतिनिधी यांची साक्ष विधानभवन, मुंबई येथे घेण्यात आली.

प्रधान महालेखाकार, लेखापरीक्षा-एक महाराष्ट्र, मुंबई व महालेखाकार लेखापरीक्षा-दोन, महाराष्ट्र, नागपूर हे समितीच्या निमंत्रणावरुन बैठकींना उपस्थित होते. त्यांनी समितीला केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांची अत्यंत आभारी आहे.

तसेच प्रधान सचिव, वित्त विभाग (लेखा व कोषागारे) यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला दिलेल्या सहकार्याबद्दल आणि संबंधित विभागाच्या सचिवांनी समितीसमोर साक्ष देऊन समितीला सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांचे देखील आभारी आहे.

समितीच्या बैठकीच्या कामकाजाचे कार्यवृत्त स्वतंत्ररित्या ठेवण्यात आले असून तो अहवालाचा भाग आहे. बैठकीच्या कामकाजाच्या अनुषंगाने विभागाकडून प्राप्त झालेली आश्वासित माहिती व परिपत्रके परिशिष्ट "अ" मध्ये देण्यात आलेली आहेत. समितीच्या झालेल्या बैठकांचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्ट "ब" मध्ये देण्यात आलेले आहे.

समितीने दिनांक १९ जून, २०१९ रोजीच्या बैठकीत वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये, नगरविकास, महसूल व वन (महसूल) विभागासंदर्भात तयार केलेला प्रारुप अहवाल विचारात घेतला व त्यातील शिफारशीवर सुधारणा सुचवून प्रारुप अहवालाला मान्यता दिली.

विधान भवन,
मुंबई/नागपूर.
दिनांक : १९ जून, २०१९

गोपालदास अग्रवाल,
समिती प्रमुख,
लोकलेखा समिती.

अनुक्रमणिका

अ. क्र. (१)	विभाग व तपशील (२)	पृष्ठ क्रमांक (३)
	प्रस्तावना	पाच
(१)	**वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग**	**१**
	(परिच्छेद क्रमांक ३.२)	**१**
	(परिच्छेद क्रमांक ३.१२)	**४२**
(२)	**नगरविकास विभाग**	**५१**
	(परिच्छेद क्रमांक ३.५)	**५१**
	(परिच्छेद क्रमांक ३.६)	**७१**
	(परिच्छेद क्रमांक ३.१४)	**७९**
(३)	**महसूल व वन (महसूल) विभाग**	**८५**
	(परिच्छेद क्रमांक ३.१०)	**८५**

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग

३.२ प्रधानमंत्री स्थास्थ सुरक्षा योजनांतर्गत शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचे दर्जा वाढीकरण

१.१ भारताचे नियंत्रक व महालेखा परिक्षक यांनी सन २०१६-१७ च्या सामान्य सामाजिक क्षेत्र अहवाल खालीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले आहेत.

अ क्र	परिच्छेद क्रमांक	परिच्छेद	वैद्यकीय शिक्षण आणि औषधी द्रव्ये विभागाचे अभिप्राय
१	३.२.२.१	नियोजन : <u>शासकिय वैद्यकिय महाविद्यालयांची निवड :</u> प्रधानमंत्री स्वास्थ सुरक्षा योजनेचे उदिष्ट साध्य करण्याच्या हेतूने राज्य शासनाने परवडण्याजोगे विश्वासनिय असे तृतीय दर्जाचे आरोग्य निगा आणि गुणवत्तापुर्ण वैद्यकिय शिक्षण यांच्या उपलब्धते मधील विसंगती ओळखणे आवश्यक होते. विद्यमान वैद्यकिय महाविद्यालयांचे दर्जावाढीकरण आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्रालय, भारत सरकार यांच्या अध्यक्षतेखालील प्रकल्प व्यवस्थापन समितीव्दारे मंजूर प्रस्तावांतर्गत करावयाचे होते. प्रस्ताव अंतिम करण्यापुर्वी व्यक्तीगत संस्था , सुविधा आणि आवश्यकता यांच्यातील फरक (गॅप) याबाबतचे विश्लेषण ही करावयाचे होते. ज्यात अस्तित्वातील आणि आवश्यक असलेल्या सुविधामधील फरकाचे विश्लेषणही करावयाचे होते. असे निर्दशनास आले की वैद्यकिय शिक्षण आणि औषधी द्रव्ये विभाग / वैद्यकिय शिक्षण संशोधन संचालनालयाव्दारे व्यक्तीगत संस्था, सुविधा यांच्यातील फरकाचे विश्लेषण करण्यात आले नाही.	राज्य शासनाचे १४ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे व १९ संलग्नित रुग्णालयांमध्ये अत्याधुनिक शैक्षणिक सुविधा, दर्जेदारपण माफक रुग्णसेवा व या संस्था आंतरराष्ट्रीय दर्जाच्या करण्याच्या उदेदशाने त्यांचे श्रेणीवर्धन करण्याकरिता सविस्तर आराखडा तयार करण्यासाठी तसेच केंद्र शासनाने प्रधानमंत्री स्वास्थ्य सुरक्षा योजने अंतर्गत ग्रॅन्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर ज.जी.समूह रुग्णालय या संस्थेच्या वर्धिकरणाचा केंद्र शासनाला पाठविलेल्या प्रस्तावाची छाननी करुन प्रस्तावामध्ये केंद्र शासनाच्या योजने बाबतची मार्गदर्शक तत्वे, विभागातील सद्य परिस्थिती तसेच या संस्थेमधील सुविधांचे पुनरुक्ती न होणे व आंतरराष्ट्रीय दर्जा देण्याचा उदेश विचारात घेऊन प्रस्तावात आवश्यक ते बदल करण्यासाठी शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, क्र.एमआयएस-२००७/प्र.क्र.२२८/०७/प्रशासन-२, दिनांक ०६ मे, २००८ अन्वये हॉसमॅक प्राईव्हेट इंडिया लिमिटेड, मुंबई यांची तज्ञ सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. त्यानुसार संबंधित सल्लागार समितीने संस्थेने सादर केलेल्या प्रस्तावाची छाननी करुन तशा आशयाचा अहवाल सादर केला होता. ही बाब पहाता याविषयी सुविधा व आवश्यकता यांच्यातील फरक याबाबतचे विश्लेषण केल्याचे दिसून येते. तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे विविध विभागाच्या तज्ञ समितीने संस्थामधील सोयी सुविधा, उपलब्धता व त्यावेळेची गरज या बाबींचा आढावा / उहापोह करुन तशा आशयाचा प्रस्ताव केंद्र शासनास सादर केला होता. नागपूर व मुंबई ही राज्यातील दोन प्रमुख शहरे आहेत. सदर शहरांचे भूभाग व भौगोलीक दृष्टया वैद्यकिय सेवेची गरज भागविता सदर ठिकाणी प्रवासाच्या सोयी

		त्याऐवजी संबंधित अधिष्ठातांव्दारे वैद्यकिय शिक्षण आणि औषधी द्रव्ये विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात आले. वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने प्रस्ताव आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार कडे सादर केले. मुंबई आणि नागपूर वैद्यकिय महाविद्यालयांना अनुक्रमे ११५.९५ कोटी आणि रु १४२.६० कोटी प्राप्त झाले व त्यांनी अनुक्रमे रु १०८.३० कोटी आणि रु १३५.५२ कोटी खर्च केले. लेखा परिक्षणाच्या उत्तरादाखल वैद्यकिय शिक्षण आणि संशोधन संचालनालयाने नमूद केले (सप्टेबर २०१७) की दर्जावाढीसाठी मंजूर झालेल्या कोणत्याही शासकिय वैद्यकिय महाविद्यालयाचे फरक विश्लेषण करण्यात आले नाही. फरक विश्लेषण न केल्यामुळे स्वस्त / विश्वसनिय स्वास्थ सेवेच्या उपलब्धतेमधील क्षेत्रीय विसंगती दूर करण्याचे या योजनेचे मुख्य उदिदष्ट साध्य झाले नाही	उपलब्ध असून या दोन्ही ठिकाणांची निवड ही विचारांती करण्यात आली होती. नागपूर व मुंबई येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालये ही अतिविशेषोपचार विभागांच्या श्रेणीवर्धनासाठी योग्य त्या सोयी सुविधा असलेल्या संस्था आहेत. सदर संस्थांच्या पंतप्रधान स्वास्थ सुरक्षा योजने अंतर्गत श्रेणीवर्धन करुन या संस्थांचा एम्स दिल्ली या प्रतिथयश संस्थेशी समतुल्य संस्था निर्माण करणे यास्तव या ठिकाणांची निवड करण्यात आली. सदर प्रकल्प कार्यान्वीत केल्यामुळे केवळ नागपूर विदर्भातच नव्हे तर तेलंगणा, आंध्र, छत्तीसगड, मधप्रदेश, नाशिक, कोंकण व गुजराथचा काही भाग येथील लोकांनासुध्दा उच्च् दर्जाच्या वैद्यकिय सेवा उपलब्ध झाल्या. त्यामुळे क्षेत्रीय विसंगती दूर करण्याचे उद्दिष्ट साध्य झाले नाही असे म्हणणे उचित होणार नाही.
३	३.२.२.२	योजनेचे कार्यान्वयन	निरंक
		योजनेनुसार शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या दर्जावाढीसाठी अतिविशेषत: ब्लॉक्स ट्रॉमा केअर सेंटर्स नर्सिग कॉलेज बाह्य रुग्ण विभाग उभारणे आणि वैद्यकीय साधन सामुग्रीचे प्रापण याद्वारे विद्यमान विभागांचे बळकटीकरण करणे अभिप्रेत होते. शासकीय वैद्यकीय महाविद्यालये मुंबई दर्जा वाढीचा प्रस्ताव टप्पा १ अंतर्गत रुपये १२० कोटी किमतीवर मे	

		२००८ मध्ये आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर च्या दर्जा वाढीचा प्रस्ताव टप्पा -२ अंतर्गत रूपये १५० किमतीवर ऑगस्ट २००९ मध्ये प्रकल्प व्यवस्थापन समितीद्वारे मंजूर करण्यात आला.	
४	३.२.२.३	साधनसामग्रीचे प्रापण : प्रधानमंत्री स्वास्थ सुरक्षा योजनेंतर्गत साधन सामग्रीच्या प्रापणाचे खालील दोन प्रवर्गात विलग्नीकरण करण्यात आले. i) कमी वापर आणि असामान्य उपकरणे (रु ३० लाखापेक्षा कमी किमतीची) संबंधित शासकिय वैद्यकिय महाविद्यालय / संस्था यांनी खरेदी करावयाची होती. निविदा काढणे, खरेदी करणे आणि त्याची उभारणी हे पुर्णत: शासकिय वैद्यकिय महाविद्यालय / संस्था यांचेकडे सोपविले होते. ii) जास्त वापर आणि सामान्य उपकरणे (रु. ३० लाखापेक्षा जास्त किमतीची) एच एल एल लाइफ्फ केअर लिमीटेड (एचएलएल) व्दारे खरेदी करावयाची होती. एचएलएलची भूमिका निवीदा प्रक्रिया अंतिम करणे आणि पुरवठयाची अधिसुचना जारी करणे इथपर्यंत मर्यादित होती. बाकी कार्ये जसे मागणीचा आदेश	

देणे, निरीक्षण पोचवणी, संच मांडणी, उभारणी, वार्षीक देखभाल कंत्राट / व्यापक वार्षीक देखभाल कंत्राट याची जबाबदारी वैद्यकिय महाविद्यालय /संस्था यांची होती. लेखा परिक्षा निष्कर्ष पुढील परिच्छेदात चर्चिले आहेत.

साधनसामग्रीचे प्रापण न करणे

शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, मुंबईने जुलै २००८ मध्ये सविस्तर प्रापण कार्य योजना सादर केली आणि २००७-०८ व २००९-१० दरम्यान रु ९५.९५ कोटी रु चा केंद्रीय निधी प्राप्त केला. तसेच शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, नागपूर ने २०१०-११ ते २०१६-१७ दरम्यान रु १११.५३ कोटी चा केंद्रीय निधी प्राप्त केला. साधनसामग्रीच्या प्रापणाची प्रत्यक्ष आणि वित्तीय प्रगती खाली तक्ता ३.२.१ मधे दर्शविली आहे.

शा.वै.म	लक्ष		साध्य	
	प्रत्यक्ष	वित्तिय	प्रत्यक्ष	वित्तिय
मुंबई	४४८	९६.९५	२९९ (६७%)	९०.५६ (९३%)
नागपूर	२८८	१२५.००	१८१(६३%)	१०४.४५ (८४%)

प्रधानमंत्री स्वास्थ सुरक्षा योजने अंतर्गत टप्पा क्र.१ मध्ये ग्रॅन्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर ज.जी.समूह रुग्णालय, मुंबई तसेच टप्पा क्र.२ मध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर या संस्थांची निवड करण्यात आली होती. सदरचा प्रकल्प अनुक्रमे सन २००७-२००८मध्ये व २०१०-२०११ या कालावधीत कार्यान्वित झाला आहे.

१. ग्रॅन्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर ज.जी.समूह रुग्णालय, मुंबई यांना संस्था स्तरावरुन करावयाच्या यंत्र खरेदीकरिता केंद्र शासनामार्फत रु. २४.९५ एवढा निधी सन २००८ मध्ये प्राप्त झाला. संस्थेने प्रस्तावित केलेल्या यंत्रसामुग्रीची यादी सन २००६ च्या बाजार भावानुसार तयार करण्यात आली. परंतु प्रत्यक्षात खरेदी प्रक्रिया सन २००९ मध्ये करण्यात आल्याने अनेक ठिकाणी खरेदीची किंमत ही प्रस्तावित किंमतीपेक्षा जास्त होती ही बाब खरी आहे. प्रस्ताव सादरीकरण व प्रत्यक्ष खरेदी यामध्ये न्यायालयीन प्रकरणामुळे विलंब झाला. (पीआयएल.डब्ल्यूपी-४६९१/२००६ उमेश दयाशंकर चौबे विरुध्द भारत सरकार व इतर, उच्च् न्यायालय नागपूर बेंच) सदर कालावधीत उपकरणांच्या बाजार भावामध्ये वाढ झाली. हे वास्तव असले तरी यंत्रांची खरेदी ही विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन निविदेच्या माध्यमातून न्यूनतम ठरणाऱ्या कंपनीकडून शासन/ संचालनालय/ संस्था स्तरावरुन करण्यात आली.

२. रुपये २४.९५ कोटी व्यतिरिक्त उर्वरित यंत्र सामुग्रीची खरेदी थेट एच.एल.एल (

एकूण	७३६	२२१.९५	४८० (६५%)	१९५.०१ (८८%)

वरील तक्त्यावरुन असे निदशनास येते की रु ४०.३८ कोटी अंदाजित रक्कम असलेल्या उर्वरित २५६ उपकरणांच्या प्रापणासाठी शासकिय वैद्यकिय महाविद्यालयांजवळ फक्त रु २६.९३ कोटी बाकी राहीले. पुढे असेही निर्दशनास आले की २३७ प्रकरणात खरेदीची किंमत साधनसामग्रीच्या मंजूर किंमतीपेक्षा जास्त होती. तसेच प्रापणाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार कोणत्याही परिस्थितीत खरेदीची किंमत त्यासाठी निर्धारित केलेल्या रकमेपेक्षा जास्त असावयास नको होती आणि कोणत्याही उपकरणाची खरेदी किंमत निर्धारित किंमतीपेक्षा जास्त असली तर त्याचा भार राज्य शासनाने / संबंधीत संस्थेने सोसावयास पाहीजे. शासनाने कोणतेही उत्तर दिले नाही. (नोव्हेंबर २०१७)

केंद्र सरकार) मार्फत करण्यात आली असून सदर यंत्रे प्राप्त झाल्यानंतर ती कार्यान्वित करण्याची जबाबदारी संस्थेची होती. सदरची खरेदी एच.एल.एल मार्फत करण्यात आल्यामुळे सदर यंत्रांच्या खरेदीमधील वाढीव किंमतीची माहिती संबधित संस्थेस अवगत करण्यात आलेली नाही.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर करीता प्रधानमंत्री स्वास्थ्य सुरक्षा योजनेअंतर्गत निधी प्राप्त होण्यासाठीची प्रस्ताव सन २००८ मध्ये सादर करण्यात आला. त्यामध्ये एकुण २४७ यंत्रासामुग्री पैकी राज्य शासनाने खरेदी करावयाच्या ८९ यंत्रासामुग्रीं व एचएलएल ने खरेदी करावयाच्या १५८ यंत्रासामुग्रींचा समावेश होता. सदर प्रस्तावास केंद्र शासनाने सन २०१० मध्ये मंजुरी प्रदान केली व त्याकरीताचा पहिला हप्ता रुपये ४० कोटी संस्थेस प्रदान करण्यात आला. त्यानुसार सदर खरेदी करीता शासनाने शासन आदेश दिनांक १४ फेब्रुवारी, २०११ अन्वये रुपये ३०.७७ कोटी इतक्या खरेदीस प्रशासकीय मान्यता दिली. तद्नंतर दुसऱ्या हप्याची रक्कम रुपये ४० कोटी सन २०११ मध्ये प्राप्त झाले. सदर रकमेतुन करावयाच्या खरेदीकरीता शासनाने दिनांक ०२ जुलै, २०११ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केली.

संस्थेने प्रस्तावित केलेला प्रस्ताव सन २००८ मध्ये सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावामध्ये मागणी केलेल्या यंत्रासमुग्रीची किंमत त्यावेळच्या बाजारभावानुसार होती. सदरची वस्तुस्थिती विचारात घेता प्रस्तावित यंत्रसामुग्री व प्रत्यक्ष खरेदी केल्याचा कालावधी यामध्ये तीन वर्षाचा काळ उलटुन गेल्याने वैद्यकीय क्षेत्रातील विकसित झालेले नवनवीन तत्रज्ञान यामुळे यंत्रासामुग्री खरेदीच्या किमतीत वाढ झाल्याची बाबत खरी आहे. संस्थेने उक्त खरेदी विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन निविदेच्या माध्यमातून न्युनतम ठरेलेल्या कंपनीकडून केलेली असुन, ती रुग्णसेवेकरीता कार्यान्वित आहे.

		प्रापणामधील नियमबाहयता एचएलएल व्दारे जारी करण्यात आलेलया पुरवठयाच्या अधिसुचनेतील अटीनुसार संबंधीत शासकिय वैद्यकिय महाविद्यालय पुरवठादारासोबत करारनामा पत्र निष्पादीत करणे, कंत्राटाच्या एकूण किंमतीच्या १० टक्के एवढी रक्कम कार्य निषादन सुरक्षा ठेव म्हणून प्राप्त करणे, आणि वॉरंटी कालावधी संपल्यानंतर पाच वर्षासाठी व्यापक वार्षीक देखभाल करार निष्पादीत करणे यासाठी जबाबदार असतात. राज्य स्तरीय खरेदीच्या बाबतीत शासकिय वैद्यकिय महाविद्यालयांनी कंत्राटाचे योग्य रित्या निष्पादन करण्यासाठी एक करारनामा निष्पादीत करावा, उपकरणाच्या एकूण किमतीच्या तीन टक्के इतकी सुरक्षा ठेव तीन वर्षासाठी /वॉरंटी संपेपर्यंत जमा करावी,उपकरणाच्या एकूण किमतीच्या पाच टक्के इतकी रक्क्कम १० वर्षासाठी वैध असलेली कार्य निष्पादन गॅरंटी म्हणून घ्यावी आणि वॉरंटी कालावधी संपल्यानंतर आठ वर्षासाठीचा व्यापक वार्षीक देखभाल करार निष्पादीत करावा. उपकरणाचा पुरवठा उशीराने करण्यासाठी पुरवठादाराच्या देयकातून कंत्राट किमतीच्या ०.५ टक्के जास्तीत जास्त उपकरणाच्या एकूण किमतीच्या १० टक्के इतक्या रकमेची नुकसान भरपाई म्हणून कपात करावी.	नागपूर : राज्य शासन यंत्रणे मार्फत खरेदी करण्यात आलेल्या यंत्रसामुग्री बाबत सुरक्षा ठेव घेणे, वार्षीक देखभाल करार करणे इत्यादी बाबी करण्यात आलेल्या आहेत. परंतु एचएलएल व्दारे खरेदी करण्यात आलेल्या उपकरणांच्या बाबतीत तसे करण्यात आले नाही. एचएलएल मार्फत खरेदी करण्यात आलेली अनेक उपकरणे आजही हमी कालावधीत आहेत. त्यांचा हमी कालावधी संपल्यानंतर पुरवठादारासोबत व्यापक वार्षीक देखभाल करार केला जाईल. विलंबाने पुरवठा व प्रस्थापित झालेल्या यंत्रसामुग्रीच्या अनुषंगाने संबधित पुरवठादाराकडून रुपये ७७.५० लक्ष दंड वसुली करण्यात आलेली आहे. **मुंबई :** याविषयी एच.एल.एल मार्फत खरेदी करण्यात आलेल्या उपकरणांची करारनामा पत्रे, सुरक्षा ठेव इत्यादी कागदपत्रे त्यांनी खरेदी केली असल्यामुळे त्यांच्या मार्फत जमा करुन घेण्यात आलेली आहेत. दि. २९ सप्टेबर २०१७ रोजी एचएलएल कंपनीने दिलेल्या पत्रानुसार करारनामा पत्र, सुरक्षा ठेव इत्यादी कागदपत्रे ही त्यांच्याकडे उपलब्ध आहेत. संस्था स्तरावर खरेदी करण्यात आलेल्या उपकरणांची करारनामा पत्र, सुरक्षा ठेव इत्यादी कागदपत्रे ग्रॅन्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर ज.जी.समूह रुग्णालयाकडे उपलब्ध आहेत. अतएंव पुरवठादारांना १३.३२ कोटीचा लाभ पोहचविला आहे ही बाब वस्तुस्थितीस धरुन नाही. संस्थास्तरावर पुरवठा आदेश दिलेल्या यंत्रसामुग्रीच्या अनुषंगाने विहीत कालावधीत यंत्रसामुग्री पुरवठा न करणाऱ्या पुरवठादारांकडून याविषयी सुमारे रु. ५.२४ लक्ष एवढी दंड वसुली करण्यात आली आहे. ग्रॅन्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई संस्थास्तरावर झालेल्या उपकरणांच्या खरेदीत बाबतीत संस्थेमार्फत आवश्यक ते कंत्राट करारनामा, सुरक्षा ठेव, इ.कागदपत्रे घेण्यात आलेली आहेत. एच.एल.एल. कंपनीने खरेदी प्रक्रिया राबवून पुरवठा आदेश निर्गमित केलेल्या उपकरणांच्या अनुषंगाने आवश्यक ते कंत्राट करारनामा, सुरक्षा ठेव, इ.कागदपत्रे संबंधित कंपनीनेच घेतलेली आहे.

		असे निदर्शनास आले की शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, मुंबईने आणि शासकिय वैद्यकिय महाविद्यालय नागपूर ने पुरवठादारासोबत कोणताही कंत्राट करारनामा निष्पादीत केला नाही, आणि एचएलएल मार्फत पुरवठादाराकडून केलेल्या खरेदीसाठी कोणतीही कार्य निषादन सुरक्षा ठेव जमा केली नाही. त्यामुळे पुरवठादाराला १३३.१९ कोटी रकमेच्या २४२ उपकरणांवर न घेण्यात आलेल्या कार्य निष्पादन सुरक्षा ठेवीच्या स्वरुपात रु १३.३२ कोटीचा लाभ देण्यात आला. तसेच एचएलएल मार्फत करण्यात आलेल्या खरेदीसाठी कोणत्याही शासकिय वैद्यकिय महाविद्यालयाव्दारे वॉरंटी कालावधी संपल्यानंतरही उपकरणाच्या समाधानकारक कार्याची खातरजमा करण्यासाठी व्यापक वार्षीक देखभाल कंत्राट करारनामे निष्पादीत करण्यात आले नाही. उत्तरादाखल शासकिय वैद्यकिय महाविद्यालय नागपूरने नमूद केले (ऑगष्ट २०१७) की कार्य निष्पादन सुरक्षा ठेव प्राप्ती आणी व्यापक वार्षीक देखभाल कंत्राट करण्याची जबाबदारी एचएलएलची होती. तसेच शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, मुंबईने वस्तुस्थिती मान्य केली आणि नमूद केले (सप्टेबर २०१७) की एचएलएल व्दारे खरेदी करण्यात आल्यामुळे कंत्राट करारनामा आणि कार्य निषापदन बँक गॅरंटी शासकिय वैद्यकिय महाविद्यालय,	एच.एल.एल तसेच संस्थास्तरावरुन खरेदी करण्यात आलेल्या आवश्यकतेनुसार यंत्रसामुग्रीच्या बाबतीत हमी कालावधी संपल्यानंतर देखभाल दुरुस्तीचे करार करण्यात आले होते.

		मुंबईव्दारे घेण्यात आली नाही. उत्तर समर्थनीय नाही कारण ते प्रापण विषयक सुचनांच्या प्रावधानाविरुध्द आहे.	
		कार्यान्वयनाविना असलेले उपकरण प्रापण मार्गदर्शक सुचनानुसार उपकरणाचे वितरण अशा पध्दतीने नियोजीत करावयास पाहीजे की कोणतेही उपकरण जागा / सुसज्ज परिसर पाहीजे असल्यामुळे विनावापर पडून राहावयास नको. शासकिय वैद्यकिय महाविद्यालय नागपूर व मुंबई मध्ये एप्रिल २०१५ ते ऑगष्ट २०१६ दरम्यान रु ९८ लाख किंमतीत खरेदी केलेल्या पाच उपकरणांची स्थापत्य आणि विद्युत कामासाठी आणी इतर वैधानिक संमती पाहीजे असल्यामुळे संच मांडणी करता आली नाही. याशिवाय दोन शासकिय वैद्यकिय महाविद्यालयांमधे रु ८.२२ कोटी किंमतीची ३१ उपकरणे सॉफ्टवेअरच्या समस्या, सहायभूत उपकरण / सुविधा नसल्यामुळे आणी त्रृटी उदभवल्यामुळे विना कार्यन्वयन पडून राहिल्याचे आढळले.	नागपूर : सदर परिच्छेदाबाबत नागपूर संस्थेने लेखा परिक्षणाच्या वेळी प्रस्थापित न करण्यात आलेली उपकरणे खालील प्रमाणे नमूद केलेली आहे. Name of the equipment / Cost of the equipment / Date of purchase order / Date of receipt of equipment Bio-s fety cabinet / 239525 / 02-11-2015 / 19-01-2016 Apheresis Machine / 1312500 / 27-01-2015 / 10-04-20 5 Automatic chapatti making machine / 1121250 / 25-04-2016 / 10 08-2016 5 (Fire) Pedestal Lamp with UPS / 1551522 / 15-02-2016 / 02-05-2016 बायो सेफ्टी कॅबीनेट हे यंत्र लहान बांधकाम न झाल्यामुळे प्रस्थापित झाले नव्हते. ते २७.०७.१७ रोजी प्रस्थापित करण्यात आले. • ५ पेडेस्ट्रल लॅम्प शल्यक्रियागृहातील मोडयुलर ओटी कार्यान्वीत झाल्यानंतर

प्रस्थापित करण्यात आले.

- ॲटोमॅटीक चपाती मेकींग मशीन जानेवारी २०१७ मधे प्रस्थापित करण्यात आली. परंतु ती केवळ १५ दिवसच चालली व बंद पडली. २ वर्षाच्या कालावधीत ती ९० दिवसच चालली. या संदर्भात सुरक्षा ठेव जप्त करण्याची प्रक्रिया होत आहे.
- अफेरेसीस मशीन ही विकृतीशास्त्र विभागासाठी खरेदी करण्यात आली. प्रस्थापित करण्यासाठी १०० चौ.फू. चे काचेचे बांधकाम आवश्यक आहे व ते सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात येत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने सदर काम केल्यानंतर अन्न व औषध प्रशासन विभागकडून आवश्यक परवानगी आल्यानंतर यंत्र प्रस्थापित करण्यात येईल.

त्याचप्रमाणे खालील १३ उपकरणे कार्यान्वित नव्हती

Name of the equipment	Cost	Date of receipt of instrument	Dt/- of not working
Pulse Oximeter	22 00	--	09-06-2017
ENG Machine	790000	---	20-09-2014
ENT T eatment Unit with Patient Chair with work station	2136420	--	10-02-2017
Automated Labout	98600	--	20-04-2017

Table		
Apnea Monitor compatible with probe	106110	--	--
Pediatric Ventilator	1755000	---	June 2016
Syringe infusion Pump/Infusion Pump	330410	---	Jan 2017
Ventilator (Paed/Adult)	1755000	---	---
Mass Spectroscopy Triple Quadrapole LC/MS/MS system	26502278	21-03-2013	May 2015
CO2 Fractional Laser	1315000	9-5-12	18-08-2013 to 30-12-2015
Semi Automated Multiple Blood grouping & cross matching system	1608750	12-03-2012	5-04-2013
Refrigerator-20 deg.C(With	189945	13-04-2015	13-03-2017

boxes to store sample)		
VNG Machine	790000	28-09-2012	28-09-2012

यापैकी व्हीएनजी मशीन २०१५ पासून बंद होते. ते ४ आक्टोबर २०१८ मधे दुरुस्त करण्यात आले व त्यातून रुग्णसेवा देण्यात येत आहेत.

इएनटी ट्रिटमेंट युनीट १०.०२.१७ पासून बंद होते. ते १ सप्टेबर २०१८ ला दुरुस्त करुन उपयोगात आले आहे.

पल्स ऑक्सीमिटर बंद असल्याचे उरोरोग विभाग प्रमुखाने १ सप्टेबर २०१७ रोजी पुरवठादाराला कळविले आहे. परंतु पुरवठादाराकडून अजून उत्तर नाही. पाठपुरावा करुनही पुरवठादाराकडून दुरुस्ती न झाल्यामुळे नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

ॲडल्ट / पिडिॲट्रीक व्हेंटीलेटर हे लेखा परिक्षणाच्या वेळी नादुरुस्त होते. हे उपकरण वारंटी मधे होते. पुरवठादाराला संपर्क करुन ते दुरुस्त करुन घेण्यात आले व आता वापरात आहे.

सेमी ॲटोमॅटीक मल्टीपल ब्लडग्रुप ग्रुपींग व क्रॉस मॅचींग हे यंत्र नादुरुस्त नव्हते, तर त्यासाठी लागणारी किट उपलब्ध नसल्यामुळे कार्यान्वित नव्हते. किटस मिळविण्यासाठी आवश्यक प्रक्रिया सुरु आहे. किटस मिळाल्यावर उपकरणाच्या सेवा सुरु होतील.

सीओटू फ्रक्शनल लेसर हे यंत्र ऑगष्ट २०१३ ते डिसेंबर २०१५ या काळात बंद होते. त्यानंतर ते मे २०१८ पासून स्कॅनर व डिस्प्ले बोर्ड बंद पडल्यामुळे बंद आहे.

मास स्पेक्टोस्कोपी ट्रीपल कॉड्रापोल सिस्टीम हे यंत्र किटस नसल्यामुळे बंद होते. २२.०८.१७ रोजी किटस उपलब्ध झाल्यानंतर रुग्णसेवा सुरु करण्यात आल्या. १५ मार्च २०१८ ला उपकरणाची वारंटी संपली आहे. पुरवठादार खरेदी किमतीच्या ५ टक्के दराने

			व्यापक वार्षीक देखभाल करार करण्यास तयार नाही. त्याबददल त्याचेशी बोलणी सुरु असून लवकरच आवश्यक कार्यवाही केली जाईल. ॲटोमेटेड लेबर टेबल, अप्नीया मॉनीटर काम्पॅटीबल वीथ प्रोब, पीडिॲट्रीक व्हेंटीलेटर, सिरींज इनफ्युजन पंप, रेफ्रिजरेटर ही उपकरणे प्रस्थापित करण्यात आली असून ती कार्यान्वीत आहेत. इएनजी मशीनचा उल्लेख लेखा परिक्षणामधे आहे. परंतु हे यंत्र खरेदी करण्यात आले नाही. **मुंबई** I I) ग्रॅन्ट शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व सर ज.जी.समुह रुग्णालय, मुंबई या संस्थेत **१७** नादुरुस्त यंत्रापैकी ०७ यंत्रे दुरुस्त होवून रुग्णसेवेकडून कार्यान्वित आहेत. उर्वरित १० यंत्रांपैकी ०२ यंत्रांच्या दुरुस्तीचे काम सुरु आहे. ०४ यंत्रांच्या दुरुस्तीसाठी पुरवठादार प्रतिसाद देत नाही. त्यासंबंधी संस्था स्तरावर पाठपुरावा व कारवाईची प्रक्रिया चालू आहे. यापैकी ०३ यंत्रांच्या दुरुस्तीची किंमत यंत्राच्या मूळ खरेदीच्या किंमतीच्या २५ टक्के पेक्षा अधिक असल्याने दुरुस्ती करणे व्यवहार्य नाही. तथापि बंद असलेल्या उपकरणांच्या बाबतीत पर्यायी उपकरणाद्वारे रुग्णांचे उपचार करण्यात येत आहेत. याअनुषंगाने रुग्ण सेवेमध्ये कसलीही बाधा आलेली नाही. ०१ यंत्र विहीत कार्यपध्दती अवलंबून निर्लेखित करण्यात आले आहे.
	३.२.२.४	**<u>स्थापत्य कामे :</u>** शासकिय वैद्यकिय महाविद्यालय मुंबईने रु २० कोटी च्या १६ मंजूर बांधकाम कार्यपैकी रु १० कोटी मंजूर किमत असलेले प्रशासकिय इमारतीच्या बांधकामाचे कार्य हाती घेतले. आरोग्य व कुटुबकल्याण मंत्रालय भारत सरकार आदेशा (सप्टेबर २००६) नुसार प्रकल्प समंत्रकाचे काम आणी दर्जावाढीचे काम हॉस्पीटल	शावैम मुंबई येथील बांधकामाच्या अनुषंगाने प्रशासकीय इमारतीच्या कामाबाबत राज्य सार्वजनिक बांधकाम विभागाने तांत्रीक मान्यता मिळण्याच्या आधीच निविदा नोटीस जारी केली (मे २००९) आणि बृहन्मुंबई महानगर पालिकेकडून ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त होण्याआधीच कार्यादेश ही जारी केला हे खरे आहे. तथापि प्रत्यक्ष कामाची सुरुवात हे बृहनमुंबई महानगर पालिकेकडून ना हरकत प्रमाणपत्र मिळाल्यानंतरच सुरु करण्यात आले होते. याबाबत हेरीटेज समितीने केलेल्या सुचनांमुळे कामाचा आराखडा व संरेखन

		सव्हिसेस कन्सल्टंसी कार्पोरेशन लिमीटेड मार्फत करावयाचे होते. तथापी शासकिय वैद्यकिय महाविद्यालय मुंबईने हे काम हॉस्पीटल सव्हिसेस कन्सल्टंसी कार्पोरेशन लिमीटेड मार्फत न करवता सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करवून घेतले. राज्य सार्वजनिक बांधकाम विभागाने तांत्रीक मान्यता मिळण्याच्या आधीच निवीदा नोटीस जारी केली (मे २००९) आणि बृहनमुंबई महानगर पालिकेकडून ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त होण्याआधीच काम तातडीने करावयाचे असल्याचे कारण देउन कार्यादेशही जारी केला, ज्यामुळे ना हरकत प्रमाणपत्राशी संबंधीत अटींचे अनुपालन करण्यासाठी कामाच्या व्यप्तीत बदल करावे लागले. परिणामी रु २.४३ कोटी रकमेच्या अतिरीक्त बाबींचे निष्पादन करावे लागले आणि निविदेतील ०.९० कोटीचे परिमाणही वाढले. उत्तरादाखल शासकिय वैद्यकिय महाविद्यालय मुंबईने वस्तुस्थितीची पुष्टी केली आणि नमूद केले (मे २०१७) की कामाचा आराखडा व संरेखन हेरीटेज समितीने केलेल्या शिफारसीमुळे बदलावे लागल्यामुळे आणि कार्यस्थळाच्या परिस्थितीनुसार इमारतीचे अभिमुख बदलावे लागल्यामुळे कामात विलंब झाला. पुढे असेही निदर्शनास आले की प्रधानमंत्री स्वास्थ सुरक्षा योजनेअंतर्गत प्रस्तावीत असेलेली ११.१५ कोटी अंदाजीत किमतीची	बदलावे लागल्यामुळे आणि कार्यस्थळाच्या परिस्थितीनुसार इमारतीचे अभिमुख बदलावे लागल्यामुळे कामाच्या किंमतीमध्ये वाढ झालेली होती. या योजने अंतर्गतची उर्वरित १४ बांधकामापैकी बहुतांश बांधकामे नंतरच्या कालावधीत राज्य शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या निधीतून पूर्ण करण्यात आलेली आहेत. सदर बांधकामा अभावी कोणतीही रुग्णसेवा प्रभावित झाली नव्हती. या काळातच सायन रुग्णालय मुंबई येथे ट्रॉमा केअर सेंटर मान्य करण्यात आले. त्यामुळे नवी दिल्ली येथे आरोग्य व कुटुंब कल्याण विभागासोबतच्या चर्चेमधे एकाच शहरात दोन ट्रॉमा केकर सेंटरची आवश्यकता नाही असा विचार समोर आल्यामुळे जे जे रुग्णालयात ट्रॉमा केअर सेंटरचा विचार करण्यात आला नाही. तथापि जे.जे.रुग्णालयात शस्त्रक्रिया व अस्थिव्यंग विभाग यामध्ये ट्रामा रुग्णांच्या उपचारासाठी आवश्यक सोयी सुविधा व उपकरणे या योजने अंतर्गत उपलब्ध करुन दिली आहेत. त्यामुळे अपघात रुग्णांच्या सर्व प्रकाराच्या उपचारांची सोय जे.जे.रुग्णालयामध्ये उपलब्ध झालेली आहे. **नागपूर** शासकिय वैद्यकिय महाविद्यालय नागपूर येथे ६ बांधकामे होती. त्यापैकी २ रदद करण्यात आली. सदर बांधकामे अन्य आर्थिक स्त्रोताकडून करुन घेण्यात आली. सदर बांधकामे करण्यास खालील बाबींमुळे विलंब झाला होता. १. ट्रॉमा केअर सेंटरची ची जागा बदलणे. २. तांत्रीक समितीने सुचविल्यानुसार ट्रॉमा सेंटरच्या आराखडयामधे बदल करणे ३. महानगर पालिकेकडून जागेवर असलेली झाडे तोडण्यासाठी नगरपालिकेकडून परवानगी मिळण्यास विलंब लागणे ४. बांधकाम सुरु करण्यास उशिर झाल्यामुळे किंमतीत फरक होणे व पुन्हा ५. प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याची आवश्यकता. सद्यस्थितीत 3 वार्डांचे सुपर स्पेशालीटी रुग्णालयातील बांधकाम वगळता उर्वरित सर्व

		दर्जावाढीची चौदा कामे शासकिय वैद्यकिय महाविद्यालय मुंबई द्वारे आर्थिक अडचणी असल्यामुळे निष्पादीत करण्यात आली नव्हती. शासकिय वैद्यकिय महाविद्यालयाने ट्रॉमा केअर सेंटरचे सुध्दा बांधकाम केले नाही. कारण बहुउददेशिय इमारतीचे काम रु १७.७३ कोटी खर्चून करण्यात आले , ज्याचा पुर्ण खर्च प्रधानमंत्री स्वास्थ सुरक्षा योजना निधीतूनच करण्यात आला. त्यामुळे शासकिय वैद्यकिय महाविद्यालय मुंबईकडे ११.१५ कोटी किमतीची उर्वरित कामे करण्यासाठी केवळ रु २.२७ कोटी शिल्लक राहले . शासकिय वैद्यकिय महाविद्यालय मुंबईने नमूद केले (सप्टेबर २०१७) की निधी उपलब्ध नसल्यामुळे बाकीची कामे निष्पादीत करता आली नाही. तसेच शासकिय वैद्यकिय महाविद्यालय नागपूर वैद्यकिय शिक्षण आणि औषधी द्रव्ये विभागाने सहा कामे मंजूर केली (जानेवारी २०११) जी फेब्रुवारी २०१२ पर्यंत पुर्ण करावयाची होती . यापैकी दोन कामे रदद करण्यात आली कांरण ती काम दुस-या निधी स्त्रोतातून निष्पादीत करण्यात आली होती. ट्रामा केअर सेंटर आणि तीन नवीन वार्डाचे बांधकाम अशी दोन कामे अनुक्रमे जून २०१४ आणी नोव्हेंबर २०१५ मधे २८ महीने ते ४३ महिन्याच्या विलंबाने करण्यात आले. तीन आयसीसीयु वार्डाचे बांधकाम आणि तीन वार्डाचे बांधकाम अशी उर्वरित दोन कामे जुलै २०१७	बांधकामे पुर्ण झाली आहेत. तीन वॉर्डचे काम जुले २०१९ पर्यंत पुर्ण होईल. ट्रॉमा केअर सेंटर सुरु झालेले असून त्याचा फायदा गरजू गरीब लोकांना मिळत आहे. तसेच संस्थेत आलेल्या विविध उपकरणांमुळे लोकांना त्याचा फायदा मिळत आहे. त्यामुळे लोकांना सुविधा देण्याचे साध्य पुर्ण झाले नाही असे म्हणणे उचीत नाही.

		पर्यंत प्रगतीत होती. निष्पादनातील विलंब मुख्यत: तपशीलवार अंदाजपत्रके तयार करण्यात झालेल्या १५ ते ६६ महिन्यांच्या विलंबामुळे झाला. अशा प्रकारे पाच वर्षाचा कालावधी लोटल्यानंतरही सामान्य लोकांना सुधारीत निगा सुविधा पुरविण्याचे अपेक्षीत उददीष्य २०१२-१३ पासून असाध्य राहीले.	
	३.२.२.५	किरकोळ निरीक्षणे : प्रधानमंत्री स्वस्थ सुरक्षा योजनेच्या प्रापण मार्गदर्शक सुचनांमध्ये विनिर्दिष्ट केले आहे की, उपकरणांचे प्रापण संस्थेने मंजूर केलेल्या सुचीनुसार भारत सरकार तज्ञांच्या मदतीने करावयास पाहीजे आणि मंजूर किंमतीपेक्षा जास्त खर्च झाल्यास तो खर्च राज्याने /शासकिय वैद्यकिय महाविद्यालयांनी सोसावयास पाहीजे. याशिवाय दुस-या एखाद्या कामासाठी निधी वळता करावयास नको. दस्ताऐवजाच्या पडताळणीत असे आढळले की, i) शासकिय वैद्यकिय महाविद्यालय मुंबई आणि नागपूर ने रु ९.५८ कोटी किमतीची १५५ उपकरणे खरेदी केली, जी मंजूर उपकरणांच्या सूचीमधे समाविष्ट नव्हती आणी टप्पा -१ व टप्पा २ दरम्यान उपकरणांच्या खरेदीवर करण्यात आलेला रु ५५.२५ कोटीचा जादा खर्च शासकिय वैद्यकिय महाविद्यालय मुंबई आणी नागपूर	नागपूर प्रधानमंत्री स्वास्थ सुरक्षा योजनेअंतर्गत मिळालेला निधी हा प्रस्तावित केलेल्या व मान्यता प्राप्त यादीतील उपकरणांच्याच खरेदीवर केला आहे. लेखा परिक्षकांनी २१ उपकरणांची यादी दिलेली आहे. त्यात संबंधीत विभाग निहाय व्हेटेड /मान्यताप्राप्त यादीमधे समाविष्ट नसल्याचा उल्लेख आहे. परंतु नमूद उपकरणांच्या केवळ नावांमधे फरक आहे

Name of instrument	Department	Page No and Sr.No of Approved List	Name of the instrument mentioned in the approved list
Complete Monitoring System for ICU	Medicine	Department has not purchased this equipment	
Apheresis Machine	Pathology	Not mention	Not mentioned
Color Doppler Echo with 3D/USG machine with 4D altrasound and color Doppler	Trauma Care Centre	Trauma Care Centre Page No. 30, Sr.No. 247	Doppler Ultra sonography Machine (color Doppler echo) portable
Electrosurgical Unit	Orthopaedic	Orthopaedic Page No.26 Sr.No. 85	Radio frequency Cautery
Electrosurgical Unit	Plastic	Plastic	Vorilac Cautery

ने राज्य /शासकिय वैद्यकिय महाविद्यालयाच्या निधीतून न करता प्रधानमंत्री स्वास्थ सुरक्षा योजना निधीतून करण्यात आला.

ii) रु ३३.७४ लाख रक्कम शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, मुंबईच्या प्रधानमंत्री स्वास्थ सुरक्षा योजना खात्यातून ऑक्टोबर २०१० मधे सर जे जे रुग्णालयाच्या बँक खात्यात भरण्यात आली परंतु या खर्चित रकमेची कोणतीही प्रमाणके / दस्तावेज लेखापरीक्षेस सादर करण्यात आले नाही.

iii) शासकिय वैद्यकिय महाविद्यालय नागपूर ने प्रधानमंत्री स्वास्थ सुरक्षा योजनेच्या केंद्र हिश्श्याची प्रधानमंत्री स्वास्थ सुरक्षा योजना रोकडवही स्वतंत्र ठेवली आणि राज्य हिश्श्याचे स्थापत्य बांधकामासाठी मिळालेले रु. ३१.०७ कोटी प्रधानमंत्री सुरक्षा योजनेच्या रोकडवही मध्ये न ठेवता महाविद्यालयाच्या रोकड वही मधे ठेवले जे नियमबाहय होते.

	Surgery	Surgery Page No.28 Sr.No. 154	Machine with all attachment
Laprotomy Set	Surgery	Super Speciality Hosp. Page No.36 Sr.No. 43	Laprotomy sets
Intraoperative/Neuro monitoring system	Medicine	Department has not purchased this equipment	
Ventilator Paediatric/Infant/Neonates	Paediatric	Paediatric Department Page No. 27 Sr. No. 116,117	Neonatal Ventilator/Paediatric Ventilator
Battery Operated Drills	Orthopaedic	Orthopaedic Department Page No. 26,Sr.No. 83	Power Instrument-Drill and Saw etc.,
Fowler Beds Motorized	Trauma Care	Trauma Care Page No,30 Sr. No. 252	Motorised Beds
Mattresses for Fowler Beds	Trauma Care	Trauma Care Page No,30 Sr. No. 252	Motorised Beds
Ultrasound cutting and Coagulation Device	Surgery	Surgery Page No. 30 Sr.No. 180	Ultrasonic Knife.
C-Arm	Surgery	Trauma Care Page No,30 Sr.	C-Arm

		No. 254	
C-Arm 3D/CT for Ortho	Ortho	Trauma Care Page No,30 Sr. No. 254	C-Arm
Advance Laproscoy System	Surgery	Surgery Page No. 30 Sr.No. 181	Laprascope with HD,Medical Grade Monitor with (2 sets) and Hand instrument Sets (3 sets) etc.,
Multipara Monitor/ ICU Monitor	Nurosurgery	Super speciality Hospital Page No. 35 Sr. No. 28	Multipara Monitor
Cautery Machine with Vessel Sealing	Urology	Super speciality Hospital Page No. 35 Sr. No. 6	Under Water Diathermy Machine (Valilab force-FOR)
Xenon Light Source for Video Bronchoscope	Pulmonary Medicine	Pulmomary Medicine Page No. 23 Sr. No. 16	Video Bronchoscope
Random Access High fully Throughpur automated chemistry analyzer	Biochemistry SSH	Super speciality Hospital Page No. 35 Sr. No. 7	Fully Automatic Biochemistry Analyser
Biosafety Cabinet	Microbiology	Microbiology Department Page No. 24	Biosafety Cabinet Hood

		Sr. No. 48 and Page No. 18 Sr. No. 21	
Video Endoscope	Gastrology Department	Super speciality Hospital Page No. 36 Sr. No. 39	Video Endoscope.

केवळ अफेरेसीस मशीन नावाचे एक १३,१२,५०० रु किंमतीचे एक अत्यावश्यक यंत्र एचएलएल कडून खरेदी करण्यात आले त्याचे नांव मान्यताप्राप्त यादीमधे नाही. परंतु सदर यंत्र विभागाकरीता आवश्यक असल्या कांरणाने ते घेण्यात आले. उर्वरित सर्व यंत्रामधे नावाचा फरक आहे, व ती प्रमाणीत यादीतीलच आहेत.

II) मुंबई : पेंटाक्युलर मायक्रोस्कोप हा पीएमएसएसवाय अंतर्गत ३३.७४ लक्ष प्रत्यक्षात खरेदी किंमत रु ३३.५५ लक्ष इतक्या रक्कमेस खरेदी करण्यात आला होता. लेटर ऑफ क्रेडीट दि. ३०.१०.१० व बील ऑफ एक्सचेंज हे संस्थेकडे उपलब्ध आहे. सदरची कागदपत्रे लेखापरिक्षणाच्या वेळी संबधित संस्थेमार्फत लेखा पथकाच्या निदर्शनास आणण्याचे अनावधानाने राहून गेले होते.

III) राज्य हिश्श्याचे स्थापत्य बांधकामासाठी मिळालेले रु ३३.०७ कोटी प्रधानमंत्री स्वास्थ सुरक्षा योजनेच्या रोकडवहीमधे न ठेवता महाविद्यालयाच्या रोकडवही मध्ये ठेवले हे खरे आहे. कारण राज्य शासनाकडून महाविद्यालयाच्या लेखाशिर्षा खाली निधी आला होता. राज्याकडून निधी प्राप्त होताच तो सार्वजनिक बांधकाम खात्याकडे पाठविण्यात येतो त्यामुळे उक्त कामाकरीता स्वतंत्र लेखाशिर्ष घेण्यात आले नव्हते.

	३.२.३	निष्कर्ष : प्रधानमंत्री स्वास्थ सुरक्षा योजनेअंतर्गत शासकिय वैद्यकिय महाविद्यालय (मुंबई व नागपूर) यांचा दर्जावाढ या संबंधतील लेखा परिक्षणात असे निदर्शनास आले की तृतीय दर्जाच्या स्वास्थ काळजीवाहक विद्यमान सुविधा आणी भविष्यातील गरजा याच्या मधील अंतराचे विश्लेषण करण्यात आले नाही. शासकिय वैद्यकिय महाविद्यालयाचा दर्जावाढ कार्यक्रम नियोजनानुसार राबविण्यात आला नाही. आणि अवाढव्य विलंब, स्थापत्य कामाचे निष्पादन न होणे आणी जागा पाहीजे असल्यामुळे उपकरणांचे प्रापण आणि संच मांडणी न होण्याची प्रकरणे आढळली. रूपय ९.१७ कोटीच्या उपकरणांची आवश्यक स्थापत्य /विद्युत कामे न झाल्यामुळे सुविधा / सहायक उपकरणे /सॉफवेअर नसल्याममुळे संचमाडणी झाली नव्हती ते कार्यान्वयनाविना पडून राहिले होते. कंत्राट करारनामच्या निष्पादनाशी संबंधीत अटींचे पालन न झाल्यामुळे आणि कार्य निष्पादन सुरक्षा ठेव जमा न केल्यामुळे उपकरणांच्या पुरवठादारांना गैरवाजवी लाभ देण्यात आले.	प्रस्तुत विषयी सदर योजनेसाठी तत्कालीन सुविधा व भविष्यातील गरजा यांचे विश्लेषण करण्यातच आले नाही असे म्हणणे संयुक्तीक ठरणार नाही. करण व नमूद केल्यानुसार मुंबई येथील संस्थेसाठीच्या फरक व आवश्यकतेबाबतचे विश्लेषण करण्याबाबत हॉस मॅक प्रा.लि कंपनीची नियुक्ती करण्यांत आली होती. तसेच नागपूर संस्थेसाठी संबंधित संस्थेच्या अधिष्ठाता व सर्व विभाग प्रमुखांनी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केला होता. याविषयी वैद्यकिय शिक्षण विभागाने केंद्र शासनास सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने वरिष्ठ स्थारावरील सक्षम अधिकाऱ्यांनी संबंधित संस्थेस प्रत्यक्ष भेट देऊन राज्य शासनाच्या सादर केलेल्या प्रस्तावाची खातर जमा करुन आवश्यकते बदल करुन सदर संस्थांच्या श्रेणीवर्धन प्रस्तावास मान्यता दिलेली आहे. सदर कार्यक्रमात या विभागासह अन्य विभागाच्या यंत्रणा या योजनेतंर्गत कार्यरत असल्यामुळे काही बाबतीत तांत्रिक अडचणी व अपरिहार्य बाबीमुळे काही विलंब झालेला आहे, तथापी या योजनेअंतर्गत अपेक्षीत उदिष्टानुसार रुग्णोपचार सेवासुविधा सद्यस्थितीत संबधित रुग्णालयामध्ये सुरु झाल्या आहेत व त्याचा लाभ सर्व स्तरावरील रुगणांना मिळत आहे. यंत्र सामुग्रीच्या अनुषंगाने आवश्यकती सुरक्षा ठेव व अन्यबाबीबाबत खरेदी प्रक्रिया राबविणाऱ्या अभिकरणाने कार्यवाही केलेली आहे. त्यामुळे उपकरण पुरवठादारांना कोणताही गैरवाजवी लाभ देण्यात आलेला नाही.

(प्रकाश सुरवसे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

२.१ उपरोक्त परिच्छेदा संदर्भात अधिक माहीती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक ४ जून २०१९ रोजी वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभागाच्या सचिवांची साक्ष घेतली.

साक्ष :-

परिच्छेद क्रमांक ३.२ : प्रधानमंत्री स्वास्थ सुरक्षा योजनेंतर्गत शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचे दर्जा वाढीकरण.

३.२.२.१ नियोजन

३.२.२.२ योजना कार्यान्वयन

३.२.२.३ साधन सामग्रीचे प्रापण

यामधील शेवटचे कनक्ल्युझन पहावे. यामध्ये असे नमूद केले आहे की,. क्षेत्रीय दर्जाच्या स्वास्थ काळजी वाहक, विद्यमान सुविधा आणि भविष्यातील गरजा यांच्यामधील अंतराचे विश्लेषण करण्यात आले नाही. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांच्या दर्जावाढ कार्यक्रम नियोजनानुसार राबविण्यात आला नाही आणि अवाढव्यविलंब स्थापत्य कामाचे निस्कासन न होणे आणि जागा पाहिजे असल्यामुळे उपकराणांचे प्रापण आणि संच मांडणी न होण्याची प्रकरणे आढळून आली. ९.१७ कोटी रूपयांच्या उपकरणांची आवश्यक स्थापत्य, विद्युत कामे न झाल्यामुळे, सॉप्टवेअर नसल्यामुळे संच मान्यता झाली नव्हती. हे विनाकारण पडून राहिले होते आणि कंत्राट करारनामाच्या निष्पादनाशी संबंधीत अटीचे पालन न झाल्यामुळे आणि कार्य निष्पादन सुरक्षा ठेव जमा न केल्यामुळे उपकरणांच्या पुरवठादारांना गैरवाजवी लाभ देण्यात आले. असे पॅरामध्ये स्पष्ट नमूद करण्यात आलेले आहे. या विषयावर समितीने अभ्यास केलेला आहे. याबाबत विभागाचे भविष्यातील नियोजन काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, समितीने आताच सांगितल्याप्रमाणे ऑडीटमध्ये पॅरा काढलेला आहे. महालेखाकारांचा पहिला मुद्दा गॅप ॲनालिसेस केले नव्हते, असा आहे. याबाबत विभागाचे असे म्हणणे आहे की, गॅप ॲनालिसेस केले होते. याकरिता हॉसमॅक प्राईव्हेट इंडिया लिमिटेड,मुंबई या कंपनीला जीएमसी मुंबईकरिता नियुक्त केले होते. जीएमसी नागपूरकरिता कमीटी ऑफ एक्सपर्टला नियुक्त केले होते. कमीटी ऑफ एक्सपर्टने सविस्तर अभ्यास करून प्रोजेक्ट रिपोर्ट दिलेला आहे. हा रिपोर्ट दोन्ही समितीचा आहे. समितीची परवानगी असेल तर सदरहू रिपोर्ट समितीला सादर करतो.असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

पीएमसी आणि नियुक्त केलेल्या समिती या दोघांचा रिपोर्ट आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाने स्थापन केलेल्या समितीमध्ये एम्स रूग्णालयातील ट्रॉमा केअर सेंटरचे चेअरमेन होते. तसेच समितीमध्ये आणखी टॉप लेव्हलवरील तज्ञ डॉक्टर होते. त्यामुळे विभागाने गॅप ॲनालिसेस केले होते, असे विभागीय सचिवांनी समितीच्या निदर्शनास आणून दिले. यामध्ये त्यावेळी मोठा अडथळा निर्माण झाला होता. तो अडथळा असा की, नागपूर जीएमसीला का घेतले नाही, अशा स्वरूपाची उच्च न्यायालयात केस दाखल झाली होती. असे विभागीय सचिवांनी सांगितले. नागपूर जीएमसीला तर यामध्ये घेतलेले आहे. असे समितीने निदर्शनास आणले असता,प्रथम जीएमसी मुंबई ला घेण्यात आले होते. परंतु उच्च न्यायालयात केस दाखल झाल्यानंतर नागपूर जीएमसीला घेण्यात आले.ही कोर्ट ऑर्डर २००९ मध्ये प्रोनाऊन्स झाली. रीटपीटीशन डिस्पोझ झाली.त्यानंतर, नागपूर जीएमसीला घेण्यात आले. या सर्व बाबी झाल्यानंतर कॉस्ट ओव्हर रन झाली.या परिच्छेदामध्ये मुद्दा आलेला आहे की, काही उपकरणे घेतली नाहीत आणि काही फंड मॅचिंग देऊ शकलो नाही. हे मुद्दे कॉस्ट ओव्हर रन मुळे झालेले आहेत. आता किती उपकरणे घ्यावयाची आहेत, ते ऑडीटमध्ये निदर्शनास आले आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने हे नवीन क्लिअरीफिकेशन दिले काय ? असा प्रश्न समितीने केला असता,कॉस्ट एक्सलेशनमुळे गॅप झाली. एवढ्या कालावधीमध्ये त्याची पूर्णत: लिस्टिंग झालेली आहे. लिस्टिंग केल्यानंतर उपकरणे घेण्यात आलेली आहेत. आता काही उपकरणे घेण्याचे बाकी आहे, परंतु ते आता चालू वर्षाच्या डीपीडीसी आणि राज्य शासनाच्या बजेटमध्ये तरतूद करून येणाऱ्या वित्तीय वर्षामध्ये भरून घेण्यात येईल. असे विभागीय सचिवांनी सांगितले. यासंदर्भातील निधी २००९, २०१० व २०११ मध्ये आलेला आहे. आता २०१९-२०२० चालू आहे.असे समितीने निदर्शनास आणले असता, अत्यंत कॉम्प्लेक्स बाबी आहेत. सर जे.जे. रूग्णालय मोठे रूग्णालय आहे. १२ हजारचा स्क्वेअर फुट आहेतसेच जीएमसी नागपूर हे एका वेळेला आशिया खंडातील सर्वात मोठे रूग्णालय होते. ही रूग्णालये मोठी होती. परंतु न्यायालयात केस दाखल झाल्यामुळे प्लॅनिंगमध्ये अडचणी आल्या किंवा प्लॅनिंग वेगळे झाले. घेण्यात न आलेल्या उपकरणांची सूची तयार करण्यात आलेली आहे. आता खरेदीची प्रक्रिया सुरू झालेली आहे. बहुतांश उपकरणे ऑलरेडी घेतलेली आहेत. अजून साधारणत: १० कोटी रूपयांची उपकरणे घेणे बाकी आहे. ही रक्कम देखील शिल्लक आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

मुंबईमध्ये ६ कोटी रूपयांपेक्षा जास्त निधी शिल्लक आहे. नागपूरमध्ये १९ कोटी ५५ लाख रूपये शिल्लक आहेत, असे समितीने निदर्शनास आणले असता,आता ही आकडेवारी बदललेली आहे. ऑडीट झाल्यानंतर काही उपकरणांची खरेदी करण्यात आल्यामुळे रक्कम कमी झालेली आहे. नवीनतम आकडेवारी ८.६५ कोटी रूपये पीएमएसएसवायची आहे आणि राज्य सरकारचा कोटा १.३ कोटी रूपये आहे. अशा प्रकारे ९.९५ कोटी रूपये जीएमसी मुंबईमध्ये शिल्लक आहे. या निधीतून या वित्तीय वर्षात खरेदी प्रक्रिया पूर्ण करून हा प्रकल्प पूर्ण करण्यात येईल, असे विभागीय सचिवांनी सांगितले. म्हणजेच हा प्रकल्प पूर्ण करण्यास १० वर्षे लागली. या काळात ऑपरेटसची किंमत दुप्पट झाली. निधी मिळाल्यानंतर देखील विभागाने खरेदी केलेली नाही, असे समितीने निदर्शनास आणले असता,यामधील ५ वर्षे कोर्ट केसमध्ये गेलेली आहेत. असे विभागीय सचिवांनी सांगितले. सन २०१० मध्ये पैसे मिळालेले आहेत. ५ वर्षे कोर्ट केसमध्ये कसे गेले ? विभागाने तारीख दिली होती. जीएमसी मुंबई करिता निधी मिळाला, नागपूर करिता मिळाला नाही व त्यामुळे संबंधित लोक कोर्टात गेले आणि कोर्टात निर्णय झाला. त्यानंतर विभागाने पैसे दिले. परंतु, १० वर्षांपुर्वी निधी मिळालेला असतानाही विभागाने पैसे खर्च केलेले नाहीत, तसेच राज्याच्या हिस्स्याचे पैसे दिले नाही. Escalated cost will be borne by the State Government, you have not spent a single penny. यानुसार, आलेला निधी खर्च केलेला नाही आणि यादीप्रमाणे पूर्णपणे अॅप्रेटस केलेले नाही. असे विभागीय सचिवांनी सांगितले असता, ६३ टक्के, ६७ टक्के.... अॅप्रॉक्झीमेटली ७० टक्केच्या खाली टारगेट अचिव्ह आहे. त्यामुळे यादृष्टीने विभागाचे अपयश दिसून येते असे समितीने निदर्शनास आणले असता,९.९५ कोटी रूपयांची उपकरणे जीएमसी मुंबई करिता खरेदी करावयाची आहेत आणि ९.१३ कोटी रूपयांची उपकरणे जीएमसी नागपूर करिता खरेदी करावयाची आहेत. ३० लाख रूपयांपेक्षा जास्त रकमेची खरेदी एचएलएलने केलेली आहेत आणि ३० लाख रूपयांपेक्षा कमी रकमेची खरेदी आपण केलेली आहेत. एचएलएलकडे जीएमसी मुंबईचे ३.४ कोटी रूपये आणि जीएमसी नागपूरचे ५.७५ कोटी रूपये आहेत व त्या पैशातून खरेदी करावयाची आहे. त्यांच्या खरेदी प्रक्रियेकरिता त्यांच्यासोबत पाठपुरावा चालू आहे. त्यांना पत्र देखील दिलेले आहे. तसेच ही वस्तुस्थिती आहे की, राज्य शासनाच्या स्तरावर, अधिष्ठातांच्या स्तरावर करावयाची खरेदी झाली नाही. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समितीचा मुद्दा वेगळा आहे, विभागाने १० उपकरणे घेण्याचा निर्णय घेतला. यामध्ये ७० टक्के टारगेट साध्य झालेले आहे. इतर ३० टक्के हेतू किंवा टार्गेट साध्य करायचे आहे. विभागाकडे असलेल्या साधारणत: ९-१० कोटी रूपयांमध्ये साध्य होणार नाही. इतर उपकरणे खरेदीच्या इन्फ्लेटेड कॉस्टकरिता वेगळे नियोजन केले जात नाही, तोपर्यंत हा प्रोजेक्ट पूर्ण होणार नाही. आलेले पैसे आणि विभागाचे शेअरिंगचे पैसे धरून सांगत आहात.परंतु, त्याची वेगळी यादी तयार केली आणि एकूण २२० कोटी रूपयांच्या कामांमध्ये अशी कामे करणार आहे किंवा केली जाणार आहे. ही कामे साधारणत: ९-१० कोटी रूपयांपमध्ये पूर्ण होईल काय ? अशी विचारणा समितीने केली असता, जीएमसी नागपूर येथे २८८ इक्विपमेंट्स खरेदी करायची होती. त्यापैकी लहान इक्विपमेंट्सची संख्या ७८ आहे. याकरिता ९.१३ कोटी रूपयांचा निधी आज रोजी उपलब्ध आहे. म्हणजे १२५ कोटी रूपयांच्या प्रोजेक्टपैकी ९.१३ कोटी रूपये खर्च करायचा शिल्लक आहे. जीएमसी मुंबईमध्ये आतापर्यंत जी प्रोक्युअरमेंट करायची आहे, त्यामध्ये एचएलएल कडून ८ आणि राज्य शासनाकडून ४६ अशी ५४ इक्विपमेंट प्रोक्युअर करायची आहेत. राज्य शासनाचे इक्विपमेंट जास्त असून ते छोटे आहेत. एकूण ९.९५ कोटी रूपये याकरिता लागणार आहे. म्हणजेच एकूण १९ कोटी रूपयांची इक्विपमेंट खरेदी करणे बाकी आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले. ही इक्विपमेंट कोणकोणत्या रूग्णालयांकरिता आहे ? असा प्रश्न समितीने केला असता, ही इक्विपमेंट जे.जे रूग्णालयाकरिता आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

मुंबई शहरामध्ये शासनामार्फत पेरीफेरल आणि मेन अशी एकूण किती रूग्णालये चालतात ? असा प्रश्न समितीने केला असता, वैद्यकीय शिक्षण विभागापुरता विचार केला तर ग्रँट मेडीकल कॉलेज आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले. प्रधानमंत्री स्वास्थ्य योजनेंतर्गत २००८-२००९ मध्ये मुंबईकरिता ९६ कोटी रूपये मिळाले होते आणि नागपूर करिता १२५ कोटी रूपये मिळाले होते. ही रक्कम १० वर्षे झाली तरी खर्च झालेली नाही. Obviously, the cost of of the equipments is raised in last १० years. विभागाला १८-१९ कोटी रूपये लागतात व प्रधानमंत्री स्वास्थ्य योजनेच्या निधीतील ही रक्कम विभागाकडे शिल्लक आहे काय ? असे नसेल तर विभागाच्या फंडातून ही रक्कम देऊन ही बाब पूर्ण करणार आहे काय ? तसेच या १० वर्षांमध्ये भाव वाढलेले असेल, त्यामुळे ही १९ कोटी रूपयांची रक्कम पुरेशी आहे काय ? किंवा विभाग त्यामध्ये काही बाबी रद्द करणार काय ? किंवा काही उपकरणे कॅन्सल करणार आहे काय ? आणि आवश्यक असलेली उपकरणे खरेदी करणार काय ? मेडीकल इक्विपमेंटचे अपग्रेडेशन मोठ्या प्रमाणात होत असते. १० वर्षांपूर्वी विभागाने जे इक्विपमेंट्स मागविले होते ते त्यावेळी १० वर्षे जुने असतील. म्हणजे आपण आज तीच उपकरणे खरेदी करणार असाल तर ती २० ते २५ वर्षे जुने असणार आहेत. आपण एवढी जुनी इक्विपमेंट्स मागविणार आहात काय ? हा देखील महत्त्वाचा मुद्दा आहे. १० वर्षे खरेदी का केली नाही ? हा पहिला महत्त्वाचा प्रश्न आहे. निधीची तरतूद केल्यानंतर खरेदी न करण्याचे कारण काय आहे ? कोणत्या वाटाघाटी कमी पडल्या होत्या ? कोणत्या लेव्हलवर वाटाघाटी झाल्या नव्हत्या ? या हॉलमध्ये बसलेल्या लोकांना खाजगी रूग्णालयामध्ये एखादी सर्जरी करायला कोणतीही

अडचण नाही. परंतु गोरगरीब लोकांना, मोलमजुरी करणाऱ्यांना अडचण आहेत व शासन हा निधी त्यांच्यासाठीच खर्च करीत आहे. त्या लोकांना आपण काय उत्तर देणार आहोत ? आपण गोरगरीब जनतेला १० वर्षे सेवा का पुरविली नाही ? संबंधित जबाबदार अधिकाऱ्याला शोधावे, याची कारणे सांगावी. सदरचे कारण समितीला पटले पाहिजे की, या कारणामुळे खरेदी होऊ शकली नाही. नाहीतर संबंधिताला शिक्षा करण्यात यावी.अशी सूचना समितीने केली असता, पूर्वी जीएमसी मुंबईला निधी मंजूर झाला होता. नागपूर जीएमसीला निधी दिला नसल्यामुळे किंवा मंजूर झाला नसल्यामुळे हे प्रकरण उच्च न्यायालयात गेले होते. असे विभागीय सचिवांनी सांगितले. That has been settled within a year. What is the problem? बऱ्याच वर्षांपासून पैसे आले होते. जीएमसी मुंबई करिता ९६ कोटी रूपये मंजूर झाले होते. त्यावेळी जीएमसी नागपूरला निधी का दिला नाही, म्हणून कोणीतरी पीआयएल दाखल केली. त्यामुळे एका वर्षानंतर राज्य सरकारने जीएमसी नागपूरला देखील निधी दिला. म्हणजे २०१०-२०११ पर्यंत दोन्हीही ठिकाणी निधी मिळाला होता. शासनामध्ये न्यायालयाच्या नावाने खूप काही चालते. जीएमसी मुंबईकरिता निधी वाटप करण्यात आला, परंतु, जीएमसी नागपूरला निधी दिला नसल्यामुळे उच्च न्यायालयात नागपूरच्या व्यक्तीने पीआयएल दाखल केली. तेव्हा जीएमसी नागपूरला निधी मिळेपर्यंत जीएमसी मुंबईला निधी वाटप करण्याची प्रक्रिया थांबवावी किंवा सदरचे पैसे खर्च करू नये, असे उच्च न्यायालयाने सांगितले होते काय ? यासंदर्भात विभागाला अधिकार आहेत. याबाबत न्यायालयाला अधिकार नाहीत. असे मत समितीने व्यक्त केले असता, प्रथम जीएमसी मुंबई करिता निधी मंजूर झाला. त्यानंतर नागपूर बेंच ऑफ बॉम्बे हाय कोर्टमध्ये केस दाखल झाली आणि हे प्रकरण ३ वर्षे चालले. याबाबत माननीय उच्च न्यायालयाने जो पर्यंत जीएमसी नागपूर चा समावेश होणार नाही तोपर्यंत जीएमसी मुंबईचे हे ठरविले जाणार नाही, तोपर्यंत या प्रकरणाला स्थगिती दिली होती. त्यानंतर केंद्र सरकारने जीएमसी नागपूरलाही या योजनेमध्ये अप्रुव्ह केले आणि राज्य सरकारनेही नागपूर जीएमसीला त्यांचा हिस्सा देण्याचे मान्य केले. त्यामुळे ही पिटीशन डीसपोज ऑफ झाली. असे विभागीय सचिवांनी सांगितले. याचा निकाल केव्हा आला ? असा प्रश्न समितीने केला असता, हा निकाल दिनांक ९ सप्टेंबर, २००९ रोजी आला. जीएमसी मुंबईमध्ये ही प्रक्रिया सुरू झाली. त्यावेळी ४४८ यंत्रसामुग्री घ्यावयाची होती. ३० लाख रुपयांवरील किंमत असल्यास केंद्र शासनाची अशी अट होती की, एचएलएल यांच्या कडून खरेदी करावी. अशा प्रकारे ७१ कोटी रुपयांची खरेदी एचएलएलच्या पातळीवर करावयाची होती. २५ कोटी रुपयांची खरेदी राज्य शासन पातळीवर करावयाची होती. ४४८ पैकी ३९४ उपकरणांची खरेदी केली. ऑडीटचे दोन मुद्दे आहेत. एचएलएलकडे जे पैसे आहेत त्यानुसार ते खरेदी करीत करून त्यांच्याकडे शासन पाठपुरावा करीत आहे. जीएमसी, मुंबईकरिता पीएमएसएसवाय करिता ८.६५ कोटी रुपये व १.३० कोटी रुपये अतिरिक्त बजेटमधून यांना द्यावे लागतील. अशा प्रकारे ५४ सामुग्रींची खरेदी करण्याकरिता ९.९५ कोटी रुपयांची आवश्यकता आहे. या वित्तीय वर्षात खरेदी करण्याकरिता पाठपुरावा सुरू असून त्या संबंधीची सूचना संबंधित डीन व डायरेक्टर ऑफ मेडीकल एज्युकेशन यांना शासनामार्फत देण्यात आली आहे. नागपूर मेडीकल कॉलेजकरिता ३८८ सामुग्री खरेदी करावयाच्या होत्या. १८१ यंत्रसामुग्रीची खरेदी केली असून ७८ यंत्रसामुग्रीची खरेदी करावयाची आहे. काही यंत्रसामुग्रीची गरज नाही तर काही डबल झालेले आहेत असा निर्णय नंतर घेण्यात आला. असे विभागीय सचिवांनी समितीला अवगत केले.

याचा अर्थ विभागाने आधी तयार केलेली यादी योग्य नव्हती असे समितीने गृहीत धरायचे काय ? कालानुसार गोष्टींची गरज वाढणार असून ती कमी होणार नाही. असे मत समितीने व्यक्त केले असता, एफएलएसएस मशीन घेतली तर त्याच प्रकारच्या दुसऱ्या मशीनची आवश्यकता नाही असा नंतर निर्णय घेण्यात आला. अशा प्रकारचे काही बदल नंतरच्या कालावधीत झालेले आहेत. आता ७८ यंत्रसामुग्री घ्यावयाच्या होती. एचएलएल यांना त्याकरिता ५.१७ कोटी रुपये दिले असून त्यांची खरेदी प्रक्रिया सुरू आहे. ०.२३ कोटी रुपये जीएमसीच्या फंडात आहेत. राज्य शासनाने आपल्या बजेटमधून, डीपीडीसी मधून चालू वर्षात ९.१३ कोटी रुपये देण्याची गरज आहे. हा निधी मिळाल्यास निधीची गरज पूर्ण होणार आहे. यामुळे ७८ यंत्रसामुग्री खरेदी करता येईल अशा प्रकारे डीन नागपूर मेडीकल कॉलेज, यांचा विभागाकडे रिपोर्ट आहे. हा रिपोर्ट समितीकडे सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सन २००९ मध्ये कोर्टाचा निर्णय आला, त्याचा कोठेही उल्लेख या अहवालात केलेला नाही. नागपूरचे पैसे येईपर्यंत मुंबईच्या निधीला स्थगिती दिली हे समितीने सत्य मानायचे, कारण सचिव महोदय रेकॉर्डवर सांगत आहेत. सन २००९ नंतर खरेदी झाली, आपले उद्दिष्ट ६७ टक्के साध्य झाले ते कोणत्या तारखेपर्यंत झाले ? ही खरेदी कधी सुरू केली ? तसेच नागपूरचे उद्दिष्ट ६३ टक्के साध्य झाले असे दाखवले आहे, ती खरेदी कधी केली गेली, तसेच शेवटची खरेदी कधी केली ? अशी विचारणा समितीने केली असता, परिच्छेद क्र. ३.२.२.३ साधनसामुग्रीचे प्रापण न करणे या खुलाशामध्ये असे नमूद केले आहे की, मा.उच्च न्यायालय नागपूर येथे प्रकरण प्रलंबित होते. (पीआयएल डब्ल्यूपी ४६९१/२००६ उमेश दयाशंकर चौबे विरुध्द भारत सरकार व इतर उच्च न्यायालय नागपूर बेंच) हा खुलासा ऑडीटला दिलेला आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले. हे कारण सांगून या विलंबाला विभाग टाळू शकत नाही. कोर्ट प्रोसेस सन २००८ ते २००९ या कालावधीत होती. असे समितीने निदर्शनास आणले असता, सन २००६ मध्ये कोर्ट केस सुरू झाली व सन २००९ मध्ये ऑर्डर देण्यात आली. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सन २००९ मध्ये निर्णय झाल्यानंतर खरेदी कधी केली व शेवटची खरेदी कधी केली ? ऑडिट पॅरा आल्यानंतर खरेदी केलेली नाही, त्या पूर्वीच खरेदी केलेली आहे असे आपण सांगू शकता काय ? असा प्रश्न समितीने केला असता, शासकीय महाविद्यालय, नागपूरला सन २००८ मध्ये सांगितले होते की, सन २००८ मध्ये केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठवावा. त्यानुसार, त्यांनी तो पाठवला व माहे ऑगस्ट २००९ मध्ये योजना मंजूर झाली. पिटीशन सप्टेंबर २००९ मध्ये डिस्पोज ऑफ झाले. या नंतर यंत्रसामुग्रीची यादी केंद्र शासनाकडे पाठवली. त्यांनी दि. २६.४.२०१० रोजी मंजुरी दिली व त्या नंतर १४.२.२०११ मध्ये राज्य शासनाकडून ॲडमिनिस्ट्रेटीव्ह ॲप्रुव्हल देण्यात आले. दि. ३ फेब्रुवारी, २०१० रोजी पहिला हप्ता ४० कोटी रुपयांचा आला. राज्य शासनाची पहिली खरेदी सन २०११ पासून सुरू झाली. राज्य शासनाची खरेदी २०११ ते २०१३ या कालावधीत झाली. एचएलएल यांनी सन २०१३ मध्ये खरेदी सुरू केली. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सन २०११ मध्ये निधी आला, ३० लाख रुपयांपेक्षा कमी यंत्रसामुग्रीची खरेदी प्रक्रिया राज्य शासनाने सुरू केली. सन २०१३ पासून एचएलएल यांनी खरेदी सुरू केली व ३० लाख रुपयांपेक्षा अधिक रकमेची खरेदी करण्याची अनुमती दिली. ही खरेदी अद्याप सुरूच आहे. नागपूर करिता ९ कोटी व मुंबई करिता १ कोटी रुपयांच्या संदर्भात आपण आश्वस्त केले आहे. हा संपूर्ण इश्यू सोडवण्याकरिता या वर्षी हा निधी शासनाकडून दिला गेला पाहिजे. अद्याप ९.१७ कोटी रुपयांची यंत्रसामुग्री जागा नसल्यामुळे किंवा कन्स्ट्रक्शन न केल्यामुळे, वीज जोडणी नसणे इ. कारणांमुळे तशीच ठेवलेली आहे. याची सद्य:स्थिती काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, या संबंधी ऑडिट रिप्लाय दिलेला आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.दोन्ही कॉलेजकरिता जी यंत्रसामुग्री खरेदी केली ती ऑपरेशनमध्ये आहे की नाही ? असा प्रश्न समितीने केला असता,जीएमसी, नागपूर येथे सीओटू लेझर मशीन सुरू नाही ते रिप्लेस केले असून त्या मशिनरीची दुरुस्तीचा खर्च मूळ खर्चाच्या २५ टक्क्यांपेक्षा अधिक होता. असे विभागीय सचिवांनी सांगितले. सिव्हिल कन्स्ट्रकशन, वीज जोडणी इ. गोष्टी न केल्यामुळे मशिनरी कार्यान्वित झालेली नाही यामुळे आजच्या दिवशी ही मशिनरी आऊटडेटेड झाली. असे समितीने निदर्शनास आणले असता, जीएमसी नागपूर येथील एफएलएसएस मशीनची इन्स्टॉलेशन प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. त्याचे सिव्हिल कन्स्ट्रक्शन झाले नव्हते. ते काम आता प्रगतीपथावर असून पूर्ण करण्यात येईल. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

चपाती मशीन १५ दिवसातच बंद पडले असे समितीने निदर्शनास आणले असता,ऑडिटच्या वेळी ते बंद होते, असे विभागीय सचिवांनी सांगितले. परफॉर्मन्स गॅरंटीचे पैसे ठेवले नाही असा महालेखापालांचा आक्षेप आहे. तसेच एएमसी अनेक ठिकाणी केलेली नाही, या बाबत खुलासा करावा. असे समितीने निदेश दिले असता, ३० लाख रुपयांच्या वरील खरेदी एचएलएल यांनी केलेली आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले. जी मशीनरी बंद आहे त्याची परफॉर्मन्स गॅरंटी आपल्याकडे आहे काय , असल्यास त्यांच्याकडे क्लेम केला पाहिजे, असे मत समितीने व्यक्त केले असता, The Department is saying that the Performance Security is right now with the HLL because they procured the equipment. However, as per guidelines, the security should be with the Institute. The problem now is many of the equipments are non functional and they cannot get Maintenance Contract. It is mentioned in the MOU between the Government of India and the GMC or the Institute. Had the Performance Security been with the GMC or the Institute it would have been easier for them to maintain the equipments. असे प्रधान महालेखाकार यांनी समितीच्या निदर्शनास आणले. In fact, we would argue to the contrary. This is the Medical Department. Medical Department is not expert in procurement.असे विभागीय सचिवांनी सांगितले.

The point of the Accountant General is that the Performance Guarantee should be taken by the Institute. Not only Performance Guarantee but Annual Maintenance Contract also should be taken by the Institute or GMC. ३० लाख रुपये से ज्यादा की मशीन यदि हमने खरीदी की या ३० लाख रुपये की बड़ी मशीन उनको खरीदने को दिया, तो मशीन बिगड़ने के बाद आप यह नहीं कह सकते कि इसे दिल्ली भेज दीजिए! दिल्ली वालों से इसकी रिपोर्ट मंगाईए, वे आकर कहेंगे कि हमें मशीन चेक करने दीजिए कि मशीन सही है या नहीं? इसलिए ये सारी जिम्मेदारी इन्स्टीट्युशन को दी है! ये जो गाइडलाइन दी है वह सही है! यामध्ये मंजुरीची अट होती. परफॉर्मन्स गॅरंटी घेतली पाहिजे, एएमसी कॉंट्रॅक्ट घेतले पाहिजे. नंतरच्या सर्व्हिसिंगचे देखील कॉंट्रॅक्ट घेतले पाहिजे. यामध्ये उणिवा आहेत असे महालेखापाल यांचे म्हणणे आहे. असे समितीने निदर्शनास आणले असता, महालेखापालांच्या परिच्छेदामध्ये असे म्हणणे आहे की, परफॉर्मन्स गॅरंटी घेतलेली नाही त्यामुळे कंत्राटदाराला अनड्यु बेनिफिट मिळाला. आता एजींचा वेगळा पॉईंट आहे. मूळ परिच्छेद असा आहे की, परफॉर्मन्स गॅरंटी घेतलेली नाही. यामुळे ८ ते १० कोटी रुपयांचे नुकसान आहे. याचे उत्तर दिलेले आहे. परफॉर्मन्स गॅरंटी एचएलएल यांनी घेतलेली आहे. यामुळे कोणत्याही कंत्राटदाराला अनडयु बेनिफिट देण्यात आलेले नाही. ३० लाख रुपयांपेक्षा कमी रकमेच्या खरेदी बाबत संबंधित संस्थेने परफॉर्मन्स गॅरंटी घेतली आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

महालेखापाल कोणत्या आधारावर परफॉर्मन्स गॅरंटी घेतली नाही असे म्हणत आहेत ? असा प्रश्न समितीने केला असता, विभागाकडे एचएलएल यांचे पत्र असून ते समितीला सादर करण्यात येईल. दोन्ही वैद्यकीय महाविद्यालयांकडे परफॉर्मन्स गॅरंटी आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले. एक्झिट कॉन्फरन्समध्ये हे सांगितले नाही. तसेच या परफॉर्मन्स गॅरंटीचा लाभ आपण घेतलेला नाही. जर, त्यानुसार विभागाने क्लेम केले नाही तर, त्याचा काय उपयोग आहे? या बाबत खुलासा करावा.असे निदेश समितीने दिले असता, बेनिफिट ऑफ परफॉर्मन्स गॅरंटी हा मुद्दा ऑडिटमध्ये नसून तो एजींनी आता उपस्थित केलेला आहे. या संबंधी आम्ही आता रिप्लाय देत आहोत. हे मेडीकल क्षेत्र आहे. एचएलल यांचे स्पेशियलायझेशन विशेष यंत्रसामुग्रीच्या खरेदीमध्ये आहे. त्यानुसार त्यांनी खरेदी केलेली आहे. ऑर्डर करणारे व यंत्रसामुग्रीची डिलीव्हरी देणारी कंपनी यांच्यामध्ये कॉंट्रॅक्ट होते. हे कंत्राट एचएलएल व कॉंट्रॅक्टर यांच्यामध्ये झालेले आहे. यामुळे परफॉर्मन्स गॅरंटीची अंमलबजावणी ज्यांनी कॉंट्रॅक्ट दिले त्यांच्याकडूनच जास्त चांगल्या प्रकारे होऊ शकते. सर्व ठिकाणी जे कॉंट्रॅक्ट देतात त्यांच्याचकडे परफॉर्मन्स गॅरंटी असते, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

परफॉर्मन्स गॅरंटी कोणाकडे आहे हा मुद्दा नाही. त्याचा वापर आवश्यकतेनुसार झाला पाहिजे असा मुद्दा आहे. असे समितीने मत व्यक्त केले असता, कॉंट्रॅक्ट ब्रिच झाल्यास, ज्यांनी कॉंट्रॅक्ट एक्झिक्युट केला त्यांच्यावर ॲक्शन घेतली जाते. ज्यांनी ऑर्डर दिली त्यांच्याकडून कॉंट्रॅक्ट एक्झिक्युशन केले जाते. एचएलएल यांनी कॉंट्रॅक्ट एक्झिक्युट केलेला आहे. जे कॉंट्रॅक्ट एक्झिक्युट करतात त्यांच्याचकडे परफॉर्मन्स गॅरंटी असते. वैद्यकीय शिक्षण विभागाला ज्या ठिकाणी अडचण येईल तेथे त्यांनी एचएलएल यांना सांगावे. त्यांनी सांगितल्यानंतर एचएलएल यांनी त्यानुसार कार्यवाही केलेली आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले. परफॉर्मन्स गॅरंटीचे काय ? असा प्रश्न समितीने केला असता, ३० लक्ष रुपयांपेक्षा कमी किंमत असलेल्या मशिनकरिता परफॉर्मन्स गॅरंटी घेतलेली आहे. अनडयु बेनिफिट कोठेही दिलेले नाही त्याचे एक्झिक्युशन नियमानुसार केले जाईल. असे विभागीय सचिवांनी सांगितले. एएमसी कोण करते ? असा प्रश्न समितीने केला असता, एएमसीमध्ये वॉरंटी पिरीयड असतो. हा कालावधी संपल्यानंतर संबंधित युजर इन्स्टिटयुशन एएमसी एक्झिक्युट करते. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

ही एएमसी पूर्वीपासून केलेली आहे काय ? आता पॅरा आला म्हणून केलेली असेल तर तसे योग्य नाही. एएमसी करिता बजेट कोठून येते ? त्यासाठी अनेकदा बजेट नसते. जे बजेट असते ते फारच कमी असते. असे मत समितीने व्यक्त केले असता, जीएमसी मुंबई व नागपूर येथे एकूण २०२ उपकरणांची एएमसी करायची होती. त्यापैकी ८७ ची वॉरंटी होती, ७०ची सीएमसी व एएमसी एक्झिक्युट झाली, १५ अंडर प्रोसेस आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

राज्य शासन विविध उपकरणांची खरेदी करीत असते. राज्य शासन अनेक वेळा केंद्र शासनाकडून आर्थिक मदत न घेता सुद्धा मोठी उपकरणे खरेदी करते. त्या कंपन्यांबरोबर त्याचा एएमसी इन्बिल्ट असतो. आता हे प्रोसेसमध्ये इनबिल्ट एएमसी घेतात किंवा नाही याची समितीला माहिती नाही. कारण, नंतर तो माणूस भेटावयास येत नाही. मशिनची लाईफ १० वर्षे असेल तर १० वर्षाचा एएमसी कॉन्ट्रॅक्ट केला जातो. विभागाने जी खरेदी केली त्यामध्ये वॉरंटी कॉस्ट होती आणि and performance guarantee was with the HLL. विभागीय स्तरावर त्याचा योग्य वापर होत नाही, असे महालेखाकारांचे ऑब्झर्वेशन आहे. महालेखाकारांचे असे म्हणणे आहे की, Performance Guarantee was with the purchaser, i.e. HLL, the consignee, i.e. GMC, is unable to enforce Perfomance Guarantee..... त्यांनी उदाहरण दिलेले आहे. Pulse Oximeter Vendor informed on so and so date that no response received. त्यांच्याकडून रिस्पॉन्स मिळाला नाही. Because you were not holding Performance Guarantee. Performance is held by HLL. परफॉर्मन्स गॅरंटी नेहमी विभागाच्या नावे असली पाहिजे आणि ते विभागानेच ऑपरेट केले पाहिजे. विभागाने एएमसीचा मुद्दा गांभीर्याने घ्यावा. नवीन खरेदी करण्यापेक्षा एएमसी केले तर ती उपकरणे उपयोगात सुद्धा येतील आणि नवीन खरेदी करावयाची म्हटले तर दोन-दोन वर्षे उपकरणे मिळत नाहीत. म्हणून एएमसीसाठी आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध झालाच पाहिजे, अशी विभागाची भूमिका असली पाहिजे.आपण अर्थसंकल्पात निधीची तरतूद करतो. मेडिकल कॉलेजकरिता ॲन्युअल मेंटेनन्स कॉन्ट्रॅक्टचे हेड वेगळे असते. आपण जी महाविद्यालये व रुग्णालये चालवितो त्यांच्याकडून एएमसीसाठी निधीची किती मागणी करण्यात येते आणि आपण त्यासाठी किती निधी उपलब्ध करून देतो याबाबतची माहिती आता विभागाकडे उपलब्ध नसेल. परंतु, विभागाने या संदर्भातील मागील ५ वर्षातील माहिती समितीला उपलब्ध करून द्यावी. शासन कोट्यवधी रुपयांची यंत्रसामुग्री खरेदी करते. छोटे बांधकाम केले नाही म्हणून मशिनरी पडून आहे, असा पॅरा आहे. आपण मशिनरी येणार असल्यामुळे बांधकाम करून घेतो. मशिनरी येण्यापूर्वीच बांधकाम व्हावयास पाहिजे होते. परंतु, ते केले गेले नाही, त्यासाठी कोण जबाबदार आहे, त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात येणार आहे ? रुग्णांसाठी, विद्यार्थ्यांसाठी कोट्यवधी रुपयांची यंत्रसामुग्री खरेदी करण्यात येते. परंतु, त्याचा उपयोग होत नसेल तर त्यासाठी कोण जबाबदार आहे ? विभागाने या संदर्भात जबाबदारी निश्चित केली तर भविष्यात अधिकारी असे करणार नाहीत ? महालेखाकार पॅरा काढतात, समिती त्यावर चर्चा करते. विभागाने संबंधितावर जबाबदारी निश्चित केली पाहिजे. अशी सूचना समितीने केली.

विभागाने दिनांक २७ जानेवारी, २०१५ रोजी १३,१२,५००/- रुपये खर्च करून Apheresis Machine खरेदी केली. विभागाने उत्तर दिले की, as on today it is not working. ७ लाख ९० हजार रुपये खर्च करून VNG Machine खरेदी करण्यात आली आहे. ती मशिन दिनांक २८ सप्टेंबर, २०१२ पासून सुरू नाही. तसेच, २ लाख ६५ हजार रुपये खर्च करून Mass Spectroscopy Triple Quadrapole LC/MS/MS system खरेदी करण्यात आली आहे. या मशिनचा वापर कशासाठी केला जातो ? अशी विचारणा समितीने केली असता,फार्माकॉलॉजी डिपार्टमेंटकडून ही मशीन खरेदी करण्यात येते. आपण रुग्णांना औषधे देतो. रुग्णांच्या शरीरातील औषधांची मात्रा तपासण्यासाठी सदर मशिनचा उपयोग केला जातो. शरीरात औषधांची लेव्हल एस्टीमेट करण्यासाठी त्याचा वापर केला जातो. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. एक मशीन आहे का दोन मशिन्स आहेत ? असा प्रश्न समितीने केला असता, एकच मशीन आहे.असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. ती मशीन सव्वादोन वर्षांपासून बंद आहे. असे समितीने निदर्शनास आणले असता, अगोदर किट्स दिले होते. त्यामुळे दोन वर्षे मशीन सुरू होती. अगोदर जे किट्स दिले होते ते संपल्यानंतर किट्स सप्लाय करण्यात आले नव्हते. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. किट्स म्हणजे सदर मशिनसाठी लागणारे मटेरिअल काय ? अशी विचारणा समितीने केली असता,विभागीय प्रतीनिधींनी होकारार्थी उत्तर दिले ते मटेरिअल खरेदी करण्याचा अधिकार केंद्र शासनाच्या एजन्सीकडे आहे काय ? तसेच यामध्ये संबंधित अधिकाऱ्यांनी निष्काळजीपणा केलेला आहे. समिती समोर येऊन अधिष्ठाता उत्तर देतात की, मशीन बरोबर जे मटेरिअल पुरविण्यात आले ते दोन वर्षे चालले, तो पर्यंत मशीन सुरू होती. परंतु, मटेरिअल संपल्यानंतर मटेरिअल खरेदी केले गेले नाही. त्यामुळे मशीन बंद आहे. सदर मशीन मे, २०१५ मध्ये बंद पडली. त्यानंतर ती मशीन केव्हा सुरू करण्यात आली ? अशी विचारणा समितीने केली असता, आता मशीन कार्यान्वित होईल. असे विभागीय प्रतिनिधिंनी सांगितले. म्हणजे अद्याप मशीन सुरू झालेली नाही. शासनाने पैसे खर्च करून सुद्धा रुग्णांना त्याचा लाभ मिळत नाही. रुग्णांना औषधे दिल्यानंतर त्या औषधांचा शरीरावर कोणता परीणाम होतो हे तपासण्यासाठी एका रुग्णाकरिता लागणाऱ्या किट्सची किंमत किती आहे ?अशी समितीने विचारणा केली असता, विभागाने आताआदेश दिलेले आहेत.एका रुग्णासाठी किती खर्च येतो हे आता सांगता येणार नाही. परंतु, रुग्णसेवा एका वर्षाकरिता १० लाख रुपये उपलब्ध करून देते. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

शरीरामध्ये टॉक्सिन्स किती आहेत, रुग्णांना औषधे दिल्यानंतर त्या औषधांचा रुग्णाच्या शरीरावर कोणता परिणाम होतो हे तपासण्यासाठी एका वर्षाला १० लाख रुपये लागतात. रुग्णालयातील बाहयरुग्ण आणि आंतररुग्णांची संख्या किती आहे ? सदर मशीन कोठे बसविण्यात आले आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपूर येथे मशीन बसविण्यात आले आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. रुग्णालयातील आंतररुग्णांची संख्या किती आहे ? केवळ १० लाख रुपयांसाठी मशीन बंद आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी शासनाकडे किट्स खरेदी करण्यासाठी १० लाख रुपयांची मागणी केली असेल तर त्यांनी समितीला तसे पत्र दाखवावे. संबंधित अधिकाऱ्यांनी शासनाकडे १० लाख रुपयांची मागणी केली असेल आणि शासनाने ते उपलब्ध करून दिले नसतील तर शासनाच्या अधिकाऱ्यावर कारवाई करावी आणि शासनाकडे तशी मागणी करण्यात आली नसेल तर रुग्णालयातील अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात यावी. सन २०१५ पासून किट्स नसल्यामुळे मशीन बंद आहे. ज्या अधिकाऱ्यांनी किट्स उपलब्ध करून घेण्यासाठी प्रयत्न केले नाहीत त्यांच्यावर कारवाई झालीच पाहिजे. आता नवीन डीन आल्यामुळे त्यांनी मागणी केली असेल. परंतु, तत्कालीन अधिकाऱ्याने मागणी केली नसेल तर त्याला जबाबदार धरलेच पाहिजे. आजची परिस्थिती बघून त्यांनी मागणी केली असेल. परंतु, मागील ४ वर्षापासून मशीन बंद आहे. परंतु, एखाद्या रुग्णाला औषध दिल्यानंतर त्या औषधांचा त्याच्या शरीरावर काय परिणाम होतो, त्या औषधांची मात्रा कशा प्रकारे वाढते याची माहिती घेतल्याशिवाय तुम्ही उपचार कसे काय करु शकता ?ENG Machine सुद्धा बंद आहे ? रुग्णांना दिलेल्या औषधांचा शरीरामध्ये ॲडव्हर्स इफेक्ट निर्माण होते आणि त्याचा ॲडव्हर्स इफेक्ट निर्माण होणार नाही याची विभागाला माहिती असली पाहिजे यासाठी त्या मशिनचा रिसर्च झाला असेल. अगोदर मशीन नसेल त्यावेळी सुद्धा ट्रिटमेंट झालीच असेल. असे मत समितीने व्यक्त केले असता,ही मशीन प्रत्येक रुग्णासाठी लागत नाही. स्पेसिफिक केसेसमध्ये या मशिनचा वापर केला जाते. असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

हेमेटॉलॉजी, कॅन्सरच्या रुग्णांचे निदान करण्यासाठी किंवा अशा रुग्णांना दिलेल्या औषधांचा त्यांचा शरीरावर कोणता परिणाम होतो यासाठी त्या मशिनचा उपयोग होत असेल. असे मत समितीने व्यक्त केले असता, खूपच कमी रुग्णांच्या तपासणीसाठी या मशिनचा उपयोग केला जातो. असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले. विभागाने २ कोटी रुपये खर्च करून मशीन खरेदी केली आहे. ती मशीन कार्यान्वित असलीच पाहिजे. या मशिनचा किती रुग्णांच्या तपासणीसाठी वापर केला जातो, हा भाग वेगळा आहे. The reason given that for want of kit it is not functioning, is not a proper reason. विभागाने समितीला नॉन ऑपरेटिंग मशिन्सची यादी दिलेली आहे. त्या मशिन्स ऑपरेटिंग न होण्यासाठी कोण जबाबदार आहे, विभागाने परफॉर्मन्स गॅरंटीचा वेळेवर उपयोग केलेला नाही. कारण एकच मशीन नाही, अनेक मशिन्स आहेत. जी मशिनरी बंद आहे त्या संदर्भात

संबंधितावर जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी. संबंधित अधिकारी सेवानिवृत्त झाले असतील तर त्यांच्यावर कारवाई करावी. विभागाने कोणत्याही अधिकाऱ्याला पाठीशी घालू नये. एका वर्षासाठी केवळ १० लाख रुपये लागतात आणि त्यासाठी मशीन बंद आहे. ज्यावेळी मशीन खरेदी करण्यात आली त्यावेळी मशीन बरोबर किट्स मिळाले असतील. परंतु, ते किट्स संपल्यानंतर नवीन किट्स मागविण्यात आलेले नाहीत. यासाठी कोण जबाबदार आहे ? सन २०१३ मध्ये मशीन खरेदी करण्यात आली आहे. विभागाने सांगितले की, ३० लाख रुपयांपेक्षा जास्त किंमतीची मशीन असेल तर एचएलएलकडून खरेदी केली जाते. सदर मशीन सन २०१५ मध्ये बंद पडलेली आहे. किट्स संपल्यानंतर मशीन बंद पडलेली आहे. ज्या अधिकाऱ्यांमुळे मशिन्स नॉन ऑपरेशन आहेत, काही मशिनरी दुरुस्त करण्याच्या आवाक्या बाहेरच्या असतील तर,समिती ते समजू शकते. मग ज्या कारणासाठी मशीन खरेदी केलेली आहे त्या कारणासाठी त्या मशिनचा उपयोग झाला पाहिजे ही विभागाची जबाबदारी नाही काय आणि कोणाचीच जबाबदारी नसेल तर हे सर्व प्रायव्हेट सेक्टरकडे द्यावे. लोक काम करण्यासाठी तयार आहेत. Pulse Oximeter, ENG Machine अशा अनेक मशिन्स नॉन ऑपरेशनल आहेत. असे समितीने निदर्शनास आणले असता,As per current status, most of these machines are working. असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

Because of ४-५years gap, responsibility should be fixed and action should be taken against the concerned officials.वर्षासाठी केवळ १० लाख रुपयांची खरेदी करावयाची आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी विभागाकडे किट्स खरेदी करण्यासाठी १० लाख रुपयांची मागणी केली नसेल तर, तो अधिकारी जबाबदार राहील, त्यांनी मागणी करून सुद्धा विभागाने निधी दिला नसेल तर, विभाग जबाबदार राहील आणि वित्त विभागाने ती मागणी थांबविली असेल तर, वित्त विभाग जबाबदार राहील. आपण कोणावर तरी जबाबदारी निश्चित केली पाहिजे. कारण, हा लोकांच्या जीवन मरणाचा प्रश्न आहे. ती मागणी कोणी थांबविली हे समितीला कळले पाहिजे. विभागाने जबाबदारी निश्चित करून समितीला एका आठवड्याच्या आत माहिती सादर करावी. कारण, समितीला या अधिवेशनात अहवाल सादर करावयाचा आहे. समिती या संदर्भात शिफारस करेल. तसेच, मुंबई संदर्भातील शेवटच्या परिच्छेदामध्ये नमूद केले आहे की, मुंबई येथे ४ यंत्रांच्या दुरुस्तीसाठी पुरवठादार प्रतिसाद देत नाही. परफॉर्मन्स गॅरंटी असताना सुद्धा वेळेवर केले नाही. ३ यंत्रांच्या दुरुस्तीची किंमत मूळ किंमतीपेक्षा जास्त असल्यामुळे ते करणे योग्य नाही, हे समिती समजू शकते. परंतु, ४ यंत्रांच्या दुरुस्तीसाठी पुरवठादार रिप्लायच देत नाही. संबंधित अधिकाऱ्यांनी परफॉर्मन्स गॅरंटीचा वेळेवर उपयोग केलेला नाही. आता ते ऑऊटडेटेड ठेवावे असे म्हणतात. लेखी उत्तरामध्ये म्हटले आहे की, they are not replying. ३ यंत्रांच्या दुरुस्तीची किंमत यंत्राच्या मूळ खरेदी किंमतीच्या २५ टक्क्यापेक्षा जास्त असल्यामुळे दुरुस्ती करणे व्यवहार्य नाही. आता नवीन मशीन खरेदी करावयाची म्हटली तर, आज त्या मशिनच्या किंमतीमध्ये तीन पटीने वाढ झालेली आहे. म्हणून मशिन्स दुरुस्त करण्यासाठी मूळ खरेदी किंमतीच्या २५ टक्क्यापेक्षा अधिक खर्च येत असला, तरी, त्या मशिन्स दुरुस्त करून वापरात आणल्या पाहिजेत. विभागाने सांगितलेला ३ मशिन्सच्या दुरुस्तीचा मुद्दा समितीच्या लक्षात आलेला आहे. परंतु, संबंधित अधिकाऱ्यांनी ४ मशिनबाबत देखील माहिती द्यावी. परफॉर्मन्स गॅरंटीचा वेळेवर उपयोग करण्यात आलेला नाही. ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर ज.जी.समुह रुग्णालय, मुंबई संस्थेत १७ नादुरुस्त यंत्रापैकी ७ यंत्रे दुरुस्त होऊन रुग्णसेवेकडून कार्यान्वित आहेत. उर्वरित १० यंत्रांपैकी २ यंत्रांच्या दुरुस्तीचे काम सुरू आहे. ही कोणती मशिनरी आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाने ४ मशिन्स संदर्भात कंपनीकडे पत्र व्यवहार केला होता. ज्यावेळी ऑडिट झाले त्यावेळी कंपनीकडून उत्तर येणे बाकी होते. त्यामुळे ऑडिटच्या वेळी तसे उत्तर देण्यात आले होते. त्यानंतर कंपनीच्या लोकांनी येऊन मशिन्सची पाहणी केली करून उत्तर दिले आहे. त्या ४ मशिन्स कन्डेम झालेल्या आहेत. जे खरेदी धोरण आहे ते २०१८ मध्ये रिव्हाईज झाले आहे. पूर्वीचे धोरण १९९२ मधील आहे. विभाग त्या धोरणानुसार खरेदी करतो. त्यामध्ये जे नॉर्म्स आहेत त्याचे विभागाला पालन करावे लागते. असे विभागीय सचिवांनी सांगितले. मेन्टेनन्स किंवा रिपेअरिंगचे अधिकार अधिष्ठाता स्तरावर देता आले तर ते द्यावेत. अशी समितीने सूचना केली.

परिच्छेद क्रमांक ३.२.२.४ स्थापत्य कामे :

सदरहू परिच्छेदाअंतर्गत १६ कामांपैकी एका प्रशासकीय इमारतीचे बांधकाम पूर्ण केलेले आहे. १४ कामे उर्वरित योजनेंतर्गत पूर्ण करून घेतली आहेत.नियोजनात एकूण १६कामे होती. त्यापैकी एक काम १७.५७ कोटी रुपयांमध्ये पूर्ण केलेले आहे. राज्य शासनाने उर्वरित १४ कामे उपलब्ध करून दिलेल्या निधीतून पूर्ण केली आहेत. एक काम शिल्लक आहे आणि ते कोणते आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, सायन हॉस्पिटलासाठी ट्रॉमा केअर मंजुर झालेले आहे. त्यामुळे हे काम करण्याची आवश्यकता नाही. यासंदर्भात केंद्र शासनाबरोबर चर्चा झालेली आहे. ते काम करायचे नाही असा निर्णय झालेला आहे. सिव्हिल इलेक्ट्रीकलची कामे झालेली आहेत. यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने ॲथॉटिकेशन पत्र दिलेले आहे. ते सादर केलेले आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

नागपूरमधील ६ कामांपैकी २ कामे रद्द करण्याची कारणे काय आहेत ? असा प्रश्न समितीने केला असता, दोन कामे ही दुसऱ्या फायनांशिअल ग्रॅन्टमार्फत करण्यात आलेली आहेत. या निधीतून ते काम न करता दुसऱ्या निधीतून केलेले आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले. मुंबई शहरात अनेक रुग्णालये असून, काही रुग्णालयाच्या भोवती खूप मोठी जागा आहे. मुंबई शहरात नियोजबध्द रुग्णालय उभारण्यासाठी एकत्रित विचार करण्याची आवश्यकता आहे. मेडीकल क्षेत्रात कामे करणाऱ्या लोकांना ४ एफएसआय दिला जातो. मुंबई शहरात एखादे तरी सुसज्य अत्याधुनिक शासकीय रुग्णालये उभारण्याच्या दृष्टीकोनातून विचार करण्याची आवश्यकता आहे. मुंबई शहरातून मोठ्या प्रमाणावर टॅक्सच्या माध्यमातून शासनाच्या तिजोरीत पैसा जमा होतो. मुंबई शहरात धारावी झोपडपट्टी आणि गणपत पाटील नगर झोपडपट्टी आहे. मुंबई शहरातील ५० टक्के लोक झोपडपट्टीत राहतात आणि उर्वरित ५० टक्के मध्यमवर्गीय लोक चाळीमध्ये ३०० फुटाच्या घरामध्ये राहतात, अशा लोकांना सरकारच्या माध्यमातून कोणत्या सुविधा दिल्या जातात असा माझा प्रश्न आहे. मुंबई शहरात ४ एफएसआय वापरुन सुसज्य, अत्याधुनिक स्वरुपाचे रुग्णालय शासनाने बांधले पाहिजे. अशा प्रकारचे मुंबई शहरात सुसज्य, अत्याधुनिक स्वरुपाचे रुग्णालय बांधण्यासाठी प्लॅनिंग करणारी एजन्सीची नियुक्ती केली पाहिजे. अशी सूचना समितीने केली.

परिच्छेद क्रमांक ३.२.२.५ किरकोळ निरीक्षणे

सदरहू परिच्छेदाच्या अनुषंगाने विभागाने जे उत्तर दिलेले आहे, ते समाधानकारक आहे. अफरेसीस मशीन बंद आहे. ही मशीन अत्यावश्यक असल्यामुळे खरेदी केली आणि ती सद्य:स्थितीत बंद आहे. असे समितीने निदर्शनास आणले असता, सार्वजनिक बांधकाम विभागाला बांधकामात थोडेसे कॉम्प्लिकिशन होते. FDA बरोबर बैठक झालेली आहे. आवश्यक ती मंजुरी मिळालेली आहे, त्यामुळे ते काम आता सुरू झालेले आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

ट्रॉमा सेंटरला खूप ओपीडी असते. यासंदर्भात विभागाने मुंबई शहरासाठी ड्राफ्ट केलेला आहे. समितीने नागपूर येथील ट्रॉमा सेंट्रलला भेट दिलेली आहे. त्यासंदर्भातील अहवाल तयार केलेला आहे. अहवालात शिफारशी केलेल्या आहेत. त्यावेळी सचिवांनी आणि डीनने समितीसमोर अनेक आश्वासने दिली होती. परंतु, समितीच्या माहितीनुसार संपूर्ण कामे झालेली नाहीत. आश्वासनांची पूर्तता झालेली नाही. ट्रॉमा केअर सेंटर हे १२५ कोटी रुपयांच्या योजनेंतर्गत झालेला आहे. समितीने अभ्यास दौऱ्याच्या वेळी सूचना केलेल्या आहेत, त्यावेळी अधिकाऱ्यांनी सूचनांची अंमलबजावणी केली जाईल असे मान्य केलेले असून, ते या आर्थिक वर्षात पूर्ण करावे, अशी समितीची अपेक्षा आहे. दोन वर्षे झालेली आहेत. तसेच आणखी ज्या काही उणीवा आहेत, त्या या आर्थिक वर्षात दूर करण्यासाठी नियोजन करून तरतुद करावी अशी समितीने सूचना केली.

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात प्राप्त झालेली माहिती लोक लेखा समिती कक्षात उपलब्ध आहे.

अभिप्राय व शिफारशी :-

परिच्छेद क्रमांक ३.२ "प्रधानमंत्री स्वास्थ्य सुरक्षा योजनेंतर्गत शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचे दर्जावाढीकरण"

परिच्छेद क्रमांक ३.२.२.१ "नियोजन - शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांची निवड"

अभिप्राय

३.१ प्रधानमंत्री स्वास्थ्य सुरक्षा योजनेचे उद्दिष्ट साध्य करण्याच्या हेतूने राज्य शासनाने परवडण्याजोगे / विश्वसनिय असे तृतीय दर्जाचे आरोग्य निगा आणि गुणवत्तापुर्ण वैद्यकीय शिक्षण यांच्या उपलब्धतेमधील विसंगती ओळखणे आवश्यक होते. विद्यमान वैद्यकीय महाविद्यालयांचे दर्जावाढीकरण आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्रालय, भारत सरकार यांच्या अध्यक्षतेखालील प्रकल्प व्यवस्थापन समितीव्दारे मंजूर प्रस्तावांतर्गत करावयाचे होते. प्रस्ताव अंतिम करण्यापुर्वी व्यक्तीगत संस्था, सुविधा आणि आवश्यकता यांच्यातील फरक (गॅप) याबाबतचे विश्लेषण ही करावयाचे होते. ज्यात अस्तित्वातील आणि आवश्यक असलेल्या सुविधामधील फरकाचे विश्लेषणही करावयाचे होते. परंतु वैद्यकीय शिक्षण आणि औषधी द्रव्ये विभाग/वैद्यकीय शिक्षण संशोधन संचालनालयाव्दारे व्यक्तीगत, संस्था, सुविधा यांच्यातील फरकाचे विश्लेषण करण्यात आले नाही. त्याऐवजी संबंधित अधिष्ठातांव्दारे वैद्यकीय शिक्षण आणि औषधी द्रव्ये विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात आले. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने प्रस्ताव आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार कडे सादर केले. मुंबई आणि नागपूर वैद्यकीय महाविद्यालयांना अनुक्रमे रु.११५.९५ कोटी आणि रु.१४२.६० कोटी प्राप्त झाले व त्यांनी अनुक्रमे रु.१०८.३० कोटी आणि रु.१३५.५२ कोटी खर्च केले. दर्जावाढीसाठी मंजूर झालेल्या कोणत्याही शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे फरक विश्लेषण न केल्यामुळे स्वस्त / विश्वसनिय स्वास्थ्य सेवेच्या उपलब्धतेमधील क्षेत्रीय विसंगती दूर करण्याचे या योजनेचे मुख्य उद्दिष्ट साध्य झाले नाही असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

समितीने यासंदर्भात विस्तृत छाननी केली असता महालेखाकारांनी नोंदविलेले आक्षेप विभागीय प्रतिनिधींनी असहमत करीत सुविधांमधील फरकांचे विश्लेषण (Gap Analysis) करण्यात आले असून मुंबईसाठी हॉस्मॅप या कंपनीची नियुक्ती केली होती. तर जीएमसी, नागपूर करीता तज्ञांची समिती नियुक्त केली होती. या तज्ञ समितीने सविस्तर अभ्यास करून प्रकल्प अहवाल सादर केलेला आहे.

शिफारस

३.२ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांची निवड करताना रुग्णालयांना आवश्यक सुविधांचे फरक विश्लेषण (Gap Analysis) करण्यात आले नाही असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे सदरहू परिच्छेदात नमूद केले आहेत. राज्य शासनाचे १४ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे व १९ संलग्नित रुग्णालयांमध्ये अत्याधुनिक शैक्षणिक सुविधा, दर्जेदारपणे माफक रुग्णसेवा व या संस्था आंतरराष्ट्रीय दर्जाच्या करण्याच्या उद्देशाने त्यांचे श्रेणीवर्धन करण्याकरिता सविस्तर आराखडा तयार करण्यासाठी तसेच केंद्र शासनाने प्रधानमंत्री स्वास्थ्य सुरक्षा योजनेअंतर्गत ग्रॅन्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर ज.जी.समूह रुग्णालय या संस्थेच्या वर्धिकरणाबाबत केंद्र शासनाला पाठविलेल्या प्रस्तावाची छाननी करून प्रस्तावामध्ये केंद्र शासनाच्या योजनेबाबतची मार्गदर्शक तत्वे, विभागातील सद्य:परिस्थिती तसेच या संस्थेमधील सुविधांचे पुनरुक्ती न होणे व आंतरराष्ट्रीय दर्जा देण्याचा उद्देश विचारात घेऊन प्रस्तावात आवश्यक ते बदल करण्यासाठी हॉसमॅक प्राईव्हेट इंडिया लिमिटेड, मुंबई यांची तज्ञ सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. त्यानुसार संबंधित सल्लागार समितीने संस्थेने सादर केलेल्या प्रस्तावाची छाननी करून तशा आशयाचा अहवाल सादर केला होता. ही बाब पहाता याविषयी सुविधा व आवश्यकता यांच्यातील फरक याबाबतचे विश्लेषण केल्याचे दिसून येते. तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे विविध विभागाच्या तज्ञ समितीने संस्थामधील सोयी सुविधा, उपलब्धता व त्यावेळेची गरज या बाबींचा आढावा / उहापोह करून तशा आशयाचा प्रस्ताव केंद्र शासनास सादर केला होता असे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर विदीत केले.

नागपूर व मुंबई ही राज्याची राजधानीची शहरे आहेत. सदर शहरांचे भूभाग व भौगोलिकदृष्टया वैद्यकीय सेवेची गरज पाहता सदर ठिकाणी प्रवासाच्या सोयी उपलब्ध असून या दोन्ही ठिकाणांची निवड ही विचारांती जनहित याचिकेनंतर नागपूरची पण निवड करण्यात आली होती. नागपूर व मुंबई येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालये ही

अतिविशेषोपचार विभागांच्या श्रेणीवर्धनासाठी योग्य त्या सोयी सुविधा असलेल्या संस्था आहेत. सदर संस्थांचा पंतप्रधान स्वास्थ्य सुरक्षा योजनेअंतर्गत श्रेणीवर्धन करून या संस्थांचा "एम्स" दिल्ली या प्रतिथयश संस्थेशी समतुल्य संस्था निर्माण करणे यास्तव या ठिकाणांची निवड करण्यात आली.

सदर प्रकल्प कार्यान्वित केल्यामुळे केवळ नागपूर, विदर्भातच नव्हे तर तेलंगणा, आंध्र, छत्तीसगड, मध्यप्रदेश, नाशिक, कोंकण व गुजरातचा काही भाग येथील लोकांनासुध्दा उच्च दर्जाच्या वैद्यकीय सेवा उपलब्ध झाल्या असेही विभागाने समितीसमोर विदीत केले. मुंबईतील सर ज.जी.समुह रुग्णालय व नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय ही अत्यंत महत्वाची रुग्णालये असून या रुग्णालयांमध्ये येणाऱ्या रुग्णांची संख्या पाहता या ठिकाणी अधिकाधीक अद्ययावत सुविधा प्राप्त होणेसाठी केंद्र व राज्य शासनाच्या स्तरावरुन अधिकाधीक निधी प्राप्त होत असेल तर त्याचा निश्चितच लाभ रुग्णांनाच होणारा आहे व तशी या रुग्णालयांची गरजही आहे. त्यामुळे या रुग्णालयांना निधी का देण्यात आला याबाबत समितीस कोणतेही आक्षेप नाहीत. फक्त फरक विश्लेषण (Gap Analysis) करताना राज्यातील अन्य रुग्णालये श्रेणीवर्धनासाठी विहित निकष पुर्ण करून निधीसाठी पात्र होत असतील तर त्यांना डावलले जाऊ नये व त्या रुग्णालयांचा देखील गुणवत्तापूर्वक विचार होणे आवश्यक आहे असे समितीचे स्पष्ट मत आहे. राज्यात सर्वच शासकीय रुग्णालयांमधून प्राप्त होणाऱ्या सुविधा लक्षात घेता त्यास वेळोवेळी निधीची व अद्ययावत यंत्रसामुग्रीची आवश्यकता असते. जेणेकरून या रुग्णालयांकडून अत्याधुनिक शैक्षणिक सुविधा, दर्जेदार माफक रुग्णसेवा व संस्था आंतरराष्ट्रीय दर्जाच्या करण्याच्यादृष्टीने सहाय्यभूत ठरते. त्याअनुषंगाने राज्यातील रुग्णालयांची निवड करताना विहित मार्गदर्शक तत्वांचे कुठेही उल्लंघन होऊ नये व जास्तीत जास्त रुग्णालयांना या योजनेचा लाभ मिळावा यादृष्टीने शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी व अशा आक्षेपांची भविष्यात पुनरावृत्ती टाळावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक ३.२.२.२ "योजनेचे कार्यान्वयन"

परिच्छेद क्रमांक ३.२.२.३ "साधनसामग्रीचे प्रापण"

१) साधनसामग्रीचे प्रापण न करणे

अभिप्राय

३.३ शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, मुंबईने जुलै २००८ मध्ये सविस्तर प्रापण कार्य योजना सादर केली आणि २००७-०८ व २००९-१० दरम्यान रु.९५.९५ कोटी रु चा केंद्रीय निधी प्राप्त केला. तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर ने २०१०-११ ते २०१६-१७ दरम्यान रु.१११.५३ कोटी चा केंद्रीय निधी प्राप्त केला. साधनसामग्रीच्या प्रापणाची प्रत्यक्ष आणि वित्तीय प्रगती पाहता रु.४०.३८ कोटी अंदाजित रक्कम असलेल्या उर्वरित २५६ उपकरणांच्या प्रापणासाठी शासकीय वैद्यकिय महाविद्यालयांजवळ फक्त रु.२६.९३ कोटी बाकी राहीले. तसेच २३७ प्रकरणात खरेदीची किंमत साधनसामग्रीच्या मंजूर किंमतीपेक्षा जास्त होती. तसेच प्रापणाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार कोणत्याही परिस्थितीत खरेदीची किंमत त्यासाठी निर्धारित केलेल्या रकमेपेक्षा जास्त असावयास नको होती आणि कोणत्याही उपकरणाची खरेदी किंमत निर्धारित किंमतीपेक्षा जास्त असली तर त्याचा भार राज्य शासनाने/ संबंधीत संस्थेने सोसावयास पाहीजे असे आक्षेप महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदात नमूद केले आहेत.

प्रधानमंत्री स्वास्थ्य सुरक्षा योजने अंतर्गत टप्पा क्र.१ मध्ये ग्रॅन्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर ज.जी.समूह रुग्णालय, मुंबई तसेच टप्पा क्र.२ मध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर या संस्थांची निवड करण्यात आली होती. सदरचा प्रकल्प अनुक्रमे सन २००७-२००८ मध्ये व सन २०१०-२०११ या कालावधीत कार्यान्वित झाला आहे.

ग्रॅन्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर ज.जी.समूह रुग्णालय, मुंबई यांना संस्था स्तरावरुन करावयाच्या यंत्र खरेदीकरिता केंद्र शासनामार्फत रु.२४.९५ एवढा निधी सन २००८ मध्ये प्राप्त झाला. संस्थेने प्रस्तावित केलेल्या यंत्रसामुग्रीची यादी सन २००६ च्या बाजार भावानुसार तयार करण्यात आली. परंतु प्रत्यक्षात खरेदी प्रक्रिया सन २००९ मध्ये करण्यात आल्याने अनेक ठिकाणी खरेदीची किंमत ही प्रस्तावित किंमतीपेक्षा जास्त होती. प्रस्ताव सादरीकरण व प्रत्यक्ष खरेदी यामध्ये न्यायालयीन प्रकरणामुळे विलंब झाला. सदर कालावधीत उपकरणांच्या बाजार भावामध्ये वाढ झाली. तसेच रु.२४.९५ कोटी व्यतिरिक्त उर्वरित यंत्र सामुग्रीची खरेदी थेट एच.एल.एल (केंद्र सरकार) मार्फत करण्यात आली असून सदर यंत्रे प्राप्त झाल्यानंतर ती कार्यान्वित करण्याची जबाबदारी संस्थेची होती. सदरची खरेदी एच.एल.एल मार्फत करण्यात आल्यामुळे सदर यंत्रांच्या खरेदीमधील वाढीव किंमतीची माहिती संबधित संस्थेस अवगत करण्यात आलेली नाही असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

त्याचप्रमाणे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर करीता प्रधानमंत्री स्वास्थ्य सुरक्षा योजनेअंतर्गत निधी प्राप्त होण्यासाठीचा प्रस्ताव सन २००८ मध्ये सादर करण्यात आला. त्यामध्ये एकुण २४७ यंत्रासामुग्री पैकी राज्य शासनाने खरेदी करावयाच्या ८९ यंत्रसामुग्री व एचएलएल ने खरेदी करावयाच्या १५८ यंत्रसामुर्ग्रींचा समावेश होता. सदर प्रस्तावास केंद्र शासनाने सन २०१० मध्ये मंजुरी प्रदान केली व त्याकरीताचा पहिला हप्ता रु.४० कोटी संस्थेस प्रदान करण्यात आला. त्यानुसार सदर खरेदी करीता शासनाने रु.३०.७७ कोटी इतक्या खरेदीस प्रशासकीय मान्यता दिली. तद्नंतर दुसऱ्या हप्याची रक्कम रु.४० कोटी सन २०११ मध्ये प्राप्त झाले. सदर रकमेतुन करावयाच्या खरेदीकरीता शासनाने प्रशासकीय मान्यता प्रदान केली.संस्थेने सन २००८ मध्ये प्रस्तावित केलेल्या यंत्रसामुग्रीची किंमत त्यावेळच्या बाजारभावानुसार होती. परंतु प्रत्यक्ष खरेदी न्यायालयीन याचिकेमुळे तीन वर्षानंतरझाल्यामुळे तसेचनवनवीन तंत्रज्ञान यामुळे यंत्रसामुग्रीच्या किंमतीत वाढ झाली असे विभागाने समितीसमोर विदीत केले.

शिफारस

३.४ सदरहू परिच्छेदात साधनसामुग्रीचे प्रापण न करणे यासंदर्भात आक्षेप नोंदविलेले आहेत. योजनेनुसार शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या दर्जावाढीसाठी अतिविशेषत: ब्लॉक्स, ट्रॉमा केअर सेंटर्स, नर्सिंग कॉलेज, बाह्य रुग्ण विभाग उभारणे आणि वैद्यकीय साधन सामुग्रीचे प्रापण याद्वारे विद्यमान विभागांचे बळकटीकरण करणे अभिप्रेत होते. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई दर्जावाढीचा प्रस्ताव टप्पा १ अंतर्गत रु.१२० कोटी किंमतीवर मे,२००८ मध्ये आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूरच्या दर्जावाढीचा प्रस्ताव टप्पा-२ अंतर्गत रु. १५० कोटी किंमतीवर ऑगस्ट,२००९ मध्ये प्रकल्प व्यवस्थापन समितीद्वारे मंजूर करण्यात आला.

प्रधानमंत्री स्वास्थ्य सुरक्षा योजनेंतर्गत साधन सामुग्रीच्या प्रापणाचे खालील दोन प्रवर्गात विलग्नीकरण करण्यात आले. कमी वापर आणि असामान्य उपकरणे (रु.३० लाखांपेक्षा कमी किंमतीची) संबंधित शासकिय वैद्यकिय महाविद्यालय / संस्था यांनी खरेदी करावयाची होती. निविदा काढणे, खरेदी करणे आणि त्याची उभारणी हे पुर्णत: शासकीय वैद्यकिय महाविद्यालय / संस्था यांचेकडे सोपविले होते. तसेच जास्त वापर आणि सामान्य उपकरणे (रु.३० लाखांपेक्षा जास्त किंमतीची) एच एल एल लाइफ केअर लिमीटेड (एचएलएल) व्दारे खरेदी करावयाची होती. एचएलएलची भूमिका निविदा प्रक्रिया अंतिम करणे आणि पुरवठ्याची अधिसुचना जारी करणे इथपर्यंत मर्यादित होती. बाकी कार्ये जसे मागणीचा आदेश देणे, संच मांडणी, उभारणी, वार्षिक देखभाल कंत्राट / व्यापक वार्षिक देखभाल कंत्राट याची जबाबदारी वैद्यकिय महाविद्यालय /संस्था यांची होती. परंतु ती खरेदी वेळेत न झाल्यामुळे यंत्रसामुग्रीच्या किंमतीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली.

त्यावेळी ग्रॅन्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबईला निधी देण्यात आला, परंतु शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर यांना निधी न दिल्यामुळे यासंदर्भात मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाकडे याचिका दाखल करण्यात आली होती. या याचिकेवर सन २००९ मध्ये निर्णय झाला व नागपूर, जीएमसीला देखील रु.१२५ कोटी मंजूर करण्यात आले. या न्यायालयीन प्रक्रियेला लागलेल्या कालावधीमुळे प्रस्तावित उपकरणांची खरेदी वेळेवर करता आली नाही व त्यांच्या किंमतीत देखील वाढ झाली. परिणामी प्राप्त निधीमधून निश्चित करण्यात आलेल्या संख्येने उपकरणांची खरेदी होवू शकली नाही ही वस्तुस्थिती असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर मान्य केले. समितीने यासंदर्भात आक्षेप नोंदवित न्यायालयाचा निर्णय सन २००९ मध्ये प्राप्त झालेला असतानाही सन २०१९ पर्यंत ही खरेदी प्रक्रिया पुर्ण होवू नये ही देखील अयोग्य बाब आहे. आता बहुतांश उपकरणे खरेदी केलेली आहेत व साधारणत: रु.१० कोटीची उपकरणे घेणे बाकी आहे. सद्य:स्थितीत प्रधानमंत्री स्वास्थ्य सुरक्षा योजनेतील रु.८.६५ कोटी निधी शिल्लक असून राज्य शासनाच्या हिश्श्याचे रु.१.३० कोटी शिल्लक आहे. अशाप्रकारे रु.९.९५ कोटी मुंबईमध्ये शिल्लक असून या निधीतून या वित्तीय वर्षात खरेदी प्रक्रिया पुर्ण करून हा प्रकल्प पुर्ण करण्यात येईल. तसेच नागपूरसाठी रु.९.१३ कोटीची उपकरणे खरेदी करावयाची आहेत. एचएलएलकडे जीएमसी, मुंबईचे रु.३.४० कोटी व जीएमसी,नागपूरचे रु.५.७५ कोटी जमा आहेत व त्यांच्याकडील खरेदी प्रक्रियेकरीता पाठपुरावा सुरू असल्याचे समितीस सांगण्यात आले. तसेच यात काही फरकाची रक्कम कमी पडल्यास ती रक्कम राज्य शासनाद्वारे दिली जाईल असेही समितीस विभागीय

प्रतिनिधींनी आश्वासित केले. समितीने यासंदर्भात पुन्हा आक्षेपित केले की, हा विलंब केवळ न्यायालयीन प्रक्रियेमुळे लागलेला नसुन केंद्राकडून निधी प्राप्त झाल्या नंतरही राज्य शासनाच्या हिश्श्याची रक्कम न दिल्यामुळेदेखील हा विलंब झालेला आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झालेला असताना व राज्यात वैद्यकीय सुविधांची तातडी व निकड लक्षात घेता उपकरणांमध्ये वाढ झालेल्या फरकाच्या किंमतीची जबाबदारी राज्य शासनाने उचलण्यास कोणतीही हरकत नव्हती. पण कोणत्याही परिस्थितीत तातडीने हे काम पुर्ण करून केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या निधीचा विनियोग वेळेत शासनाने करणे आवश्यक होते.

वास्तविकत: केंद्राकडून प्राप्त निधी विहित वेळेत खर्च करण्याच्या अनुषंगाने राज्यस्तरावर येणाऱ्या अडचणींवर मात करून प्रसंगी राज्य शासनाच्या स्तरावरुन त्यासाठी आवश्यक तो निर्णय घेवून वाढीव किंमतीची जबाबदारी राज्य शासनाने स्विकारुन या कामाचे योग्यरित्या नियोजन केले असते, तर आतापर्यंत ही कामे पुर्ण झाली असती. जीएमसी, नागपूर येथे २८८ उपकरणे खरेदी करावयाची होती, त्यापैकी लहान उपकरणांची संख्या ७८ असून त्याकरिता एकूण रु.१२५ कोटींपैकी रु.९.१३ कोटी शिल्लक आहेत. तसेच जीएमसी, मुंबईसाठी ही प्रक्रिया करावयाची असून त्यामध्ये एचएलएल कडून ८ व राज्य शासनाकडून ४६ अशी ५४ उपकरणे खरेदी करावयाची आहेत. रु.७१ कोटीची खरेदी एचएलएलच्या पातळीवर तर रु.२५ कोटीची खरेदी राज्य शासनाच्या पातळीवर करावयाची होती. ४४८ पैकी ३९४ उपकरणांची खरेदी करण्यात आली. मुंबईकरिता आता ५४ उपकरणांची खरेदी करण्याकरिता शिल्लक रकमेव्यतिरिक्त रु.९.९५ कोटींची आवश्यकता आहे. तसेच जीएमसी, नागपूरकरिता ३८८ उपकरणे खरेदी करावयाची होती त्यातील १८१ उपकरणे खरेदी केली असून ७१ उपकरणांची खरेदी करावयाची आहे. ज्यासाठी एचएलएल यांना रु.५.७१ कोटी दिले असून खरेदी प्रक्रिया सुरू आहे व रु.२३ लाख जीएमसीच्या निधीत जमा आहेत. राज्य शासनाने त्यांच्या अंदाजपत्रकातून वा जिल्हा नियोजन समितीमधून रु.९.१३ कोटी निधी दिल्यास ही ७८ उपकरणे खरेदी करता येतील असेही विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले.

विभागाने समितीसमोर विदित केलेली वस्तुस्थिती काहीही असली तरीही याचा अंतिमत: विचार केल्यास तब्बल १० वर्षे केंद्राकडून प्राप्त झालेली रक्कम खर्च होवू शकली नाही ही अतिशय गंभीर बाब आहे. राज्यातील आरोग्य सुविधेसाठी मोठ्या प्रमाणात केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झाल्यानंतरही राज्य शासनाच्या स्तरावरुन तो वेळेत खर्च करून उद्दिष्टपूर्ती करण्याच्यादृष्टीने नियोजनाचा अत्यंत अभाव असल्याचे समितीला दिसून आले. प्रधानमंत्री स्वास्थ्य सुरक्षा योजनेव्यतिरिक्त ज्या काही रकमेची आवश्यकता विभागास लागणार आहे त्याची व्यवस्था शासनाने त्यांच्या अंदाजपत्रकातून किंवा जिल्हा नियोजन समितीमधून हा निधी वेळेत प्राप्त करून ही कामे करून घेणे आतापर्यंत शक्य व आवश्यक होते. आता शासनाने या निधीची तातडीने तरतूद करून किंवा जिल्हा नियोजन समितीमधून निधी मिळवून ही कामे कालबध्द पध्दतीने पुर्ण करावीत व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

२) प्रापणामधील नियमबाह्यता

अभिप्राय

३.५ एचएलएल व्दारे जारी करण्यात आलेल्या पुरवठयाच्या अधिसुचनेतील अटीनुसार संबंधीत शासकीय वैद्यकिय महाविद्यालयाने पुरवठादारासोबत करारनामा पत्र निष्पादीत करणे, कंत्राटाच्या एकूण किंमतीच्या १० टक्के एवढी रक्कम कार्य निष्पादन सुरक्षा ठेव म्हणून प्राप्त करणेआणि वॉरंटी कालावधी संपल्यानंतर पाच वर्षासाठी व्यापक वार्षिक देखभाल करार निष्पादीत करणे यासाठी जबाबदार असतात. राज्य स्तरीय खरेदीच्या बाबतीत शासकीय वैद्यकिय महाविद्यालयांनी कंत्राटाचे योग्यरित्या निष्पादन करण्यासाठी एक करारनामा निष्पादीत करावा, उपकरणाच्या एकूण किंमतीच्या तीन टक्के इतकी सुरक्षा ठेव तीन वर्षासाठी /वॉरंटी संपेपर्यंत जमा करावी,उपकरणाच्या एकूण किंमतीच्या पाच टक्के इतकी रक्क्कम १० वर्षासाठी वैध असलेली कार्य निष्पादन गॅरंटी म्हणून घ्यावी आणि वॉरंटी कालावधी संपल्यानंतर आठ वर्षासाठीचा व्यापक वार्षीक देखभाल करार निष्पादीत करावा. उपकरणाचा पुरवठा उशीराने करण्यासाठी पुरवठादाराच्या देयकातून कंत्राट किंमतीच्या ०.५ टक्के जास्तीत जास्त उपकरणाच्या एकूण किंमतीच्या १० टक्के इतक्या रकमेची नुकसान भरपाई म्हणून कपात करावी.

परंतु शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबईने आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपूर ने पुरवठादारासोबत कोणताही कंत्राट करारनामा निष्पादीत केला नाही, आणि एचएलएल मार्फत पुरवठादाराकडून केलेल्या खरेदीसाठी कोणतीही कार्य निष्पादन सुरक्षा ठेव जमा केली नाही. त्यामुळे पुरवठादाराला रु.१३३.१९ कोटी रकमेच्या २४२ उपकरणांवर न घेण्यात आलेल्या कार्य निष्पादन सुरक्षा ठेवीच्या स्वरुपात रु.१३.३२ कोटीचा लाभ देण्यात आला. तसेच एचएलएल मार्फत करण्यात आलेल्या खरेदीसाठी कोणत्याही शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाव्दारे वॉरंटी कालावधीसंपल्यानंतरही उपकरणाच्या समाधानकारक कार्याची खातरजमा करण्यासाठी व्यापक वार्षीक देखभाल कंत्राट करारनामे निष्पादीत करण्यात आले नाही असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

नागपूरमध्ये राज्य शासन यंत्रणेमार्फत खरेदी करण्यात आलेल्या यंत्रसामुग्री बाबत सुरक्षा ठेव घेणे, वार्षिक देखभाल करार करणे इत्यादी बाबी करण्यात आलेल्या आहेत. परंतु एचएलएल व्दारे खरेदी करण्यात आलेल्या उपकरणांच्या बाबतीत तसे करण्यात आले नाही. एचएलएल मार्फत खरेदी करण्यात आलेली अनेक उपकरणे आजही हमी कालावधीत आहेत. त्यांचा हमी कालावधी संपल्यानंतर पुरवठादारासोबत व्यापक वार्षिक देखभाल करार केला जाईल. विलंबाने पुरवठा व प्रस्थापित झालेल्या यंत्रसामुग्रीच्या अनुषंगाने संबधित पुरवठादाराकडून रु.७७.५० लक्ष दंड वसुली करण्यात आलेली आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

तसेच मुंबईमध्ये एच.एल.एल मार्फत खरेदी करण्यात आलेल्या उपकरणांचे करारनामा पत्रे, सुरक्षा ठेव इत्यादी कागदपत्रे त्यांनी खरेदी केली असल्यामुळे त्यांच्या मार्फत जमा करून घेण्यात आलेली असून त्यांचेकडे ती उपलब्ध आहेत. संस्था स्तरावर खरेदी करण्यात आलेल्या उपकरणांची करारनामा पत्र, सुरक्षा ठेव इत्यादी कागदपत्रे ग्रॅन्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर ज.जी.समूह रुग्णालयाकडे उपलब्ध आहेत. संस्थास्तरावर पुरवठा आदेश दिलेल्या यंत्रसामुग्रीच्या अनुषंगाने विहीत कालावधीत यंत्रसामुग्री पुरवठा न करणाऱ्या पुरवठादारांकडून सुमारे रु.५.२४ लक्ष एवढी दंड वसुली करण्यात आली आहे असेही विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले. पण वार्षिक देखभाल दुरुस्तीचे करार निधीअभावी करण्यात आले नाहीत.

शिफारस

३.६ सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी "प्रापणातील नियमबाह्यता" यासंदर्भात आक्षेप नोंदविले असून मुंबई व नागपूर रुग्णालयाने पुरवठारासोबत कंत्राट करारनामा निष्पादित न करणे, कार्य निष्पादन सुरक्षा ठेव जमा न करणे, उपकरणांची व्यापक वार्षिक देखभाल कंत्राट करारनामे निष्पादित न करणे इत्यादी आक्षेप महालेखाकारांनी नोंदविले आहेत. समितीने यासंदर्भात विस्तृत छाननी केली असता कोट्यावधी रुपयांच्या उपकरणांची खरेदी करतेवेळी विभागाने कागदोपत्री प्रक्रिया योग्यरितीने पुर्ण करणे आवश्यक आहे. त्यात विशेषत: करारनामे, सुरक्षा ठेव, वार्षिक देखभाल दुरुस्ती इत्यादी बाबी अत्यंत महत्वाच्या असून याकडे दुर्लक्ष झाल्यास कोट्यावधी रुपयांच्या उपकरणांची खरेदी निष्फळ तर ठरतेच शिवाय गरजू व गरीब रुग्णांना याचा लाभ देखील होत नाही. अत: विभागाने भविष्यात अशाप्रकारच्या पुर्ततेची पुर्ण खबरदारी घ्यावी. ज्या उपकरणांची वॉरंटी संपलेली आहे त्यासाठी वार्षिक देखभाल दुरुस्ती करारान्वये या उपकरणांची देखभाल करण्यात यावी. तसेच कंत्राट करारनामे निष्पादित करण्यात यावेत, कार्य निष्पादन सुरक्षा ठेव जमा करण्यात यावी व कोणत्याही परिस्थितीत उपकरणांचा वार्षिक देखभाल करार करून दुरुस्तीत खंड पडू नये याची पुर्ण खबरदारी विभागाने घ्यावी. त्यासाठी आवश्यक त्या निधीची तरतूद देखील शासनाकडून करण्यात यावी. तसेच परफॉर्मन्स गॅरंटी संदर्भातील कागदपत्रे त्या त्या संबंधित संस्थेकडे सुरक्षितरित्या ठेवण्यात यावे व भविष्यात अशा आक्षेपांची पुनरावृत्ती टाळावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३)कार्यान्वयनाविना असलेले उपकरण

अभिप्राय

३.७ प्रापण मार्गदर्शक सुचनानुसार उपकरणाचे वितरण अशा पध्दतीने नियोजीत करावयास पाहीजे की कोणतेही उपकरण जागा / सुसज्ज परिसर पाहीजे असल्यामुळे विनावापर पडून राहावयास नको.शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपूर व मुंबई मध्ये एप्रिल,२०१५ ते ऑगस्ट,२०१६ दरम्यान रु.९८ लाख किंमतीत खरेदी केलेल्या पाच उपकरणांची स्थापत्य आणि विद्युत कामासाठी

आणी इतर वैधानिक संमती पाहीजे असल्यामुळे संच मांडणी करता आली नाही. याशिवाय दोन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमधे रु ८.२२ कोटी किंमतीची ३१ उपकरणे सॉफ्टवेअरच्या समस्या, सहाय्यभूत उपकरण / सुविधा नसल्यामुळे आणी त्रृटी उद्‌भवल्यामुळे विना कार्यन्वयन पडून राहिल्याचे आढळले असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

नागपूरयेथेॲटोमॅटीक चपाती मेकींग मशीन मात्र २ वर्षाच्या कालावधीत ती ९० दिवसच चालली, ती आता सुरू करण्यात आली आहे. अफेरेसीस मशीनसाठीआवश्यक असलेले काचेचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागाने केल्यानंतर व अन्न व औषध प्रशासन विभागाकडून आवश्यक परवानगी आल्यानंतर यंत्र प्रस्थापित करण्यात येईल व हे काम प्रगतीपथावर आहे. त्याचप्रमाणे १३ उपकरणे कार्यान्वित नव्हती. त्यापैकी व्हीएनजी मशीन २०१५ पासून बंद होते, ते दि.४ आक्टोबर २०१८ रोजीदुरुस्त करण्यात आले. इएनटी ट्रिटमेंट युनीट दि.१०.०२.१७ पासून बंद होते, ते दि.१ सप्टेबर २०१८ रोजी दुरुस्त करून उपयोगात आले आहे.पल्स ऑक्सीमिटर बंद असल्याचे विभाग प्रमुखाने दि.१ सप्टेबर २०१७ रोजी पुरवठादाराला कळविले. परंतु पुरवठादाराकडून दुरुस्ती न झाल्यामुळे नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल. ॲडल्ट/पिडिॲट्रीक व्हेंटीलेटर हे लेखा परिक्षणाच्या वेळी नादुरुस्त होते. हे उपकरण वॉरंटी मध्ये होते. पुरवठादाराला संपर्क करून ते दुरुस्त करून घेण्यात आले व आता वापरात आहे. सेमी ॲटोमॅटीक मल्टीपल ब्लडग्रुप ग्रुपींग व क्रॉस मॅचींग हे यंत्र नादुरुस्त नव्हते, तर त्यासाठी लागणारी किट उपलब्ध नसल्यामुळे कार्यान्वित नव्हते. किटस मिळविण्यासाठी आवश्यक प्रक्रिया सुरू आहे. सीओटू फ्रक्शनल लेसर हे यंत्र ऑगस्ट २०१३ ते डिसेंबर २०१५ या काळात बंद होते. त्यानंतर ते मे २०१८ पासून स्कॅनर व डिस्प्ले बोर्ड बंद पडल्यामुळे बंद आहे. मास स्पेक्टोस्कोपी ट्रीपल कॉड्रापोल सिस्टीम हे यंत्र किटस नसल्यामुळे बंद होते. २२.०८.१७ रोजी किटस उपलब्ध झाल्यानंतर रुग्णसेवा सुरू करण्यात आल्या. १५ मार्च, २०१८ ला उपकरणाची वारंटी संपली आहे. पुरवठादार खरेदी किमतीच्या ५ टक्के दराने व्यापक वार्षीक देखभाल करार करण्यास तयार नाही. त्याबददल त्याचेशी बोलणी सुरू असून लवकरच आवश्यक कार्यवाही केली जाईल. उर्वरित उपकरणे प्रस्थापित करण्यात आली असून ती कार्यान्वित आहेत अशी माहिती समितीस देण्यात आली.

तसेच मुंबईबाबत ग्रॅन्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर ज.जी.समुह रुग्णालय, मुंबई या संस्थेत १७ नादुरुस्त यंत्रापैकी ०७ यंत्रे दुरुस्त होवून रुग्णसेवेकडून कार्यान्वित आहेत. उर्वरित १० यंत्रांपैकी ०२ यंत्रांच्या दुरुस्तीचे काम सुरू आहे. ०४ यंत्रांच्या दुरुस्तीसाठी पुरवठादार प्रतिसाद देत नाही. त्यासंबंधी संस्था स्तरावर पाठपुरावा व कारवाईची प्रक्रिया चालू आहे. यापैकी ०३ यंत्रांच्या दुरुस्तीची किंमत यंत्राच्या मूळ खरेदीच्या किंमतीच्या २५ टक्के पेक्षा अधिक असल्याने दुरुस्ती करणे व्यवहार्य नाही. याअनुषंगाने ०३ यंत्रे विहीत कार्यपध्दती अवलंबून निर्लेखित करण्यात आले असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

शिफारस

३.८ दि. १५ ऑगस्ट २००३ रोजी प्रधानमंत्री स्वास्थ्य सुरक्षा योजनेची सुरूवात करण्यात आली. ज्याचा उद्देश देशातील विभिन्न राज्यांमध्ये विशेष सुविधा सेवा प्रदान करून स्वस्त स्वास्थ्य रुग्णालये/वैद्यकीय महाविद्यालये यांच्या उपलब्धतेमधील विसंगती दूर करणे आणि भारताच्या मागासलेल्या राज्यांमध्ये वैद्यकीय शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी सुविधांचा विस्तार करणे आहे. या कार्यक्रमासाठी केंद्र शासनाद्वारे एकाच वेळी आणि राज्य शासनाद्वारे विभागणी तत्वावर निधी पुरविण्यात आला. प्रधानमंत्री स्वास्थ्य सुरक्षा योजनेच्या टप्पा-I अंतर्गत मंजूर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचे दर्जावाढीकरण मार्च, २०११ पर्यंत पूर्ण करावयाचे होते. टप्पा-II अंतर्गत ते फेब्रुवारी,२०१२ पर्यंत पूर्ण करावयाचे होते. प्रधानमंत्री स्वास्थ्य सुरक्षा योजनांतर्गत दर्जावाढीसाठी निर्धारीत केलेल्या सहा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांपैकी मुंबई आणि नागपूर या दोन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांच्या संबंधित दस्तावेजांची पडताळणी करण्यात आली. प्रधानमंत्री स्वास्थ्य सुरक्षा योजनेंतर्गत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (मुंबई आणि नागपूर) यांच्या दर्जावाढ यासंबंधातील लेखापरीक्षणात निदर्शनास आले की, तृतीय दर्जाच्या स्वास्थ्य काळजीवाहक विद्यमान सुविधा आणि भविष्यातील गरजा यांच्यामधील अंतराचे विश्लेषण करण्यात आले नाही. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचा दर्जावाढ कार्यक्रम नियोजनानुसार राबविण्यात आला नाही आणि अवाढव्य विलंब, स्थापत्य कामांचे निष्पादन न होणे आणि जागांची उपलब्धता नसल्यामुळे उपकरणांचे प्रापण आणि संचमांडणी न होण्याची प्रकरणे आढळली. रु.९.१७ कोटीच्या उपकरणांची आवश्यक स्थापत्य/विद्युत कामे न झाल्यामुळे, सुविधा/सहायक उपकरणे/सॉफ्टवेअर इत्यादी

नसल्यामुळे संचमांडणी झाली नव्हती ते कार्यान्वयनाविना पडून राहिले होते. कंत्राट करारनाम्याच्या निष्पादनाशी संबंधित अटींचे पालन न झाल्यामुळे आणि कार्य निष्पादन सुरक्षा ठेव जमा न केल्यामुळे उपकरणांच्या पुरवठारांना गैरवाजवी लाभ देण्यात आला असे गंभीर आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

सदरहू परिच्छेदांतर्गत कार्यान्वयनाविना असलेले उपकरण यासंदर्भात आक्षेप नोंदविण्यात आले असून प्रधानमंत्री स्वास्थ्य सुरक्षा योजनेंतर्गत इतक्या मोठ्या प्रमाणात प्राप्त निधी वेळेत खर्च करणे व त्याअंतर्गत लाखो रुपयांची यंत्रसामुग्री व उपकरणे खरेदी करणे, परंतु ही यंत्रे सुरू करणेसाठी वा बसविणेसाठी आवश्यक असलेल्या व्यवस्था वेळेत तयार न करणे, ही बाब निश्चितच गंभीर आहे. तसेच घेण्यात आलेली कित्येक यंत्रसामुग्री व उपकरणे ही बंद असून त्याचा कोणताही उपयोग गरजू रुग्णांना होत नाही. अनेक उपकरणांच्या दुरुस्तीचा खर्चच जास्त असल्यामुळे त्यांचे निर्लेखन करण्यात आले आहे.

सदरहू परिच्छेदामध्ये यंत्रसामुग्री व उपकरणे प्रथम मागविण्यात येतात, परंतु त्यासाठी लागणारे बांधकाम, स्थापत्य कामे वा विद्युत जोडणीची कामे ही त्या पध्दतीने वाकालमर्यादेतपुर्ण केली जात नसल्यामुळे अशी उपकरणे विनावापर अमर्याद कालावधीसाठी पडून राहतात. वास्तविक विभागाने उपकरणांचा पुरवठा होण्याअगोदरच त्यासाठी आवश्यक असलेले बांधकाम करून घेणे आवश्यक आहे. परंतु या प्रकरणी तसे केले गेले नाही. तसेच रु.७.९० लाख खर्च करून व्हीएनजी मशिन खरेदी करण्यात आली. परंतु सन २०१२ पासून ती सुरू नाही. तसेच रु.२.६५ लाख खर्च करून Mass Spectroscopy Triple Quadrapole LC/MS/MS System खरेदी करण्यात आली. परंतु त्यासाठी आवश्यक असलेल्या किटस् चा पुरवठा न केल्यामुळे ते मशिन देखील बंद आहे. लाखो रुपयांची ही मशिने घेतल्यानंतर त्यासाठी आवश्यक असणारी किटस् खरेदी न केल्यामुळे ही मशिने बंद राहणे ही तर अधिकच गंभीर बाब आहे. सन २०१५ पासून आजतागायत हे मशिन बंद आहे. परिणामी इतका निधी खर्च करून देखील या उपकरणाचा लाभ गोरगरीब व गरजू जनतेला मिळत नाही. एखादे उपकरण मागविल्यास त्यासाठी आवश्यक असणाऱ्या अनुषंगिक सर्वच बाबींचे नियोजन व पुरवठा विभागाने उपकरणाच्या योग्य चलनासाठी करणे आवश्यक असताना त्याकडे विभागाचे दुर्लक्ष होते. परिणामी उपकरणांची उपयोगिता कमी होते. या बाबी निश्चितच गंभीर आहेत. केवळ किटस् नसल्यामुळे उपकरण सन २०१५ पासून वापराविना पडून आहे, या प्रकरणी जबाबदार व्यक्तींवर तात्काळ कारवाई करण्यात यावी. तसेच काही यंत्रासंदर्भात परफॉर्मन्स गॅरंटीचा वेळेवर उपयोग न केल्यामुळे ही यंत्रे बंद असल्यामुळे त्यासंबंधित अधिकाऱ्यांवर देखील विभागाने कारवाई करावी व भविष्यात अशा आक्षेपांची पुनरावृत्ती टाळावी. तसेच उपकरणांची देखभाल दुरुस्तीसंदर्भातील प्रशासकीय व वित्तीय अधिकार अधिष्ठाता स्तरावर देण्याबाबतच्या पर्यायाचा देखील विभागाने सकारात्मक विचार करावा व भविष्यात अशा आक्षेपांची पुनरावृत्ती टाळावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक ३.२.२.४ "स्थापत्य कामे"

अभिप्राय

३.९ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मुंबईने रु.२० कोटीच्या १६ मंजूर बांधकाम कार्यापैकी रु.१० कोटी मंजूर किंमत असलेले प्रशासकिय इमारतीच्या बांधकामाचे कार्य हाती घेतले. केंद्र शासनाच्या आदेशानुसार (सप्टेंबर,२००६) प्रकल्प समंत्रकाचे काम आणी दर्जावाढीचे काम हॉस्पीटल सर्व्हीसेस कन्सल्टंसी कार्पोरेशन लिमीटेड मार्फत करावयाचे होते. तथापी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मुंबईने हे काम हॉस्पीटल सर्व्हीसेस कन्सल्टंसी कार्पोरेशन लिमीटेड मार्फत न करवता सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करवून घेतले. राज्य सार्वजनिक बांधकाम विभागाने तांत्रीक मान्यता मिळण्याच्या आधीच निविदा नोटीस जारी केली (मे २००९) आणि बृहन्मुंबई महानगर पालिकेकडून ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त होण्याआधीच काम तातडीने करावयाचे असल्याचे कारण देऊन कार्यादेशही जारी केला, ज्यामुळे ना हरकत प्रमाणपत्राशी संबंधीत अटींचे अनुपालन करण्यासाठी कामाच्या व्याप्तीत बदल करावे लागले. परिणामी रु.२.४३ कोटी रकमेच्या अतिरीक्त बाबींचे निष्पादन करावे लागले आणि निविदेतील रु.०.९० कोटीचे परिमाणही वाढले. तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर वैद्यकिय शिक्षण आणि औषधी द्रव्ये विभागाने सहा कामे मंजूर केली (जानेवारी,२०११) जी फेब्रुवारी,२०१२ पर्यंत पुर्ण करावयाची होती. यापैकी दोन कामे रद्द करण्यात आली कारण ती कामे दुस-या निधी स्त्रोतातून निष्पादीत करण्यात आली होती. ट्रामा केअर सेंटर आणि तीन नवीन वार्डाचे बांधकाम अशी दोन कामे

२८ महीने ते ४३ महिन्याच्या विलंबाने करण्यात आले. तीन आयसीसीयुचे आणि तीन वार्डाचे बांधकाम अशी उर्वरित दोन कामे जुलै,२०१७ पर्यंत प्रगतीत होती. निष्पादनातील विलंब मुख्यत: तपशीलवार अंदाजपत्रके तयार करण्यात झालेल्या १५ ते ६६ महिन्यांच्या विलंबामुळे झाला. अशा प्रकारे पाच वर्षाचा कालावधी लोटल्यानंतरही सामान्य लोकांना सुधारीत सुविधा पुरविण्याचे अपेक्षित उद्दिष्टसन २०१२-१३ पासून असाध्य राहीले असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

तसेच प्रधानमंत्री स्वास्थ्य सुरक्षा योजनेंतर्गत प्रस्तावित असलेली रु.११.१५ कोटी अंदाजित किंमतीची दर्जावाढीची चौदा कामे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई द्वारे आर्थिक अडचणी असल्यामुळे निष्पादित करण्यात आली नव्हती. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबईने ट्रामा केअर सेंटरचे बांधकाम सुद्धा केले नाही कारण बहुउद्देशीय इमारतीचे काम रु.१७.७३ कोटी खर्चून करण्यात आले. ज्याचा पूर्ण खर्च प्रधानमंत्री स्वास्थ्य सुरक्षा योजना निधीतूनच करण्यात आला. यामुळे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई कडे रु.११.१५ कोटी किंमतीची उर्वरित १४ कामे करण्यासाठी केवळ रु.२.२७ कोटी शिल्लक राहिले.

तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर, वैद्यकीय शिक्षण आणि औषधी द्रव्ये विभागाने सहा कामे मंजूर केली (जानेवारी २०११) जी फेब्रुवारी,२०१२ पर्यंत पूर्ण करावयाची होती. यापैकी दोन कामे रद्द करण्यात आली कारण ती कामे दुसऱ्या निधी स्त्रोतातून निष्पादित करण्यात आली होती. ट्रामा केअर सेंटर आणि तीन नविन वार्डाचे बांधकाम अशा दोन कामांचा आराखडा व संरेखन हेरीटेज समितीने केलेल्या शिफारशीमुळे बदलावे लागल्यामुळे आणि कार्यस्थळाच्या परिस्थितीनुसार इमारतीचे अभिमुख बदलावे लागल्यामुळे कामात विलंब झाला. तसेच प्रधानमंत्री स्वास्थ्य सुरक्षा योजनेअंतर्गत प्रस्तावीत असलेली रु.११.१५ कोटी अंदाजीत किमतीची दर्जावाढीची चौदा कामे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मुंबईद्वारे आर्थिक अडचणी असल्यामुळे निष्पादीत करण्यात आली नव्हती. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबईने ट्रॉमा केअर सेंटरचे सुध्दा बांधकाम केले नाही. कारण बहुउद्देशिय इमारतीचे काम रु. १७.७३ कोटी खर्चून करण्यात आले, ज्याचा पुर्ण खर्च प्रधानमंत्री स्वास्थ्य सुरक्षा योजना निधीतूनच करण्यात आला. त्यामुळे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबईकडे रु.११.१५ कोटी किमतीची उर्वरित कामे करण्यासाठी केवळ रु.२.२७ कोटी शिल्लक राहीले. त्यामुळे निधी उपलब्ध नसल्यामुळे बाकीची कामे निष्पादीत करता आली नाही. तसेच या काळातच सायन रुग्णालय मुंबई येथे ट्रॉमा केअर सेंटर मान्य करण्यात आले. त्यामुळे नवी दिल्ली येथे आरोग्य व कुटुंब कल्याण विभागासोबतच्या चर्चेमधे एकाच शहरात दोन ट्रॉमा केअर सेंटरची आवश्यकता नाही असा विचार समोर आल्यामुळे जे.जे. रुग्णालयात ट्रॉमा केअर सेंटरचा विचार करण्यात आला नाही. तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथे ६ बांधकामे होती. त्यापैकी २ रदद करण्यात आली. सदर बांधकामे अन्य आर्थिक स्त्रोताकडून करून घेण्यात आली व उर्वरीत कामे ट्रॉमा केअर सेंटरची ची जागा बदलणे, तांत्रीक समितीने सुचविल्यानुसार ट्रॉमा सेंटरच्या आराखडयामधे बदल करणे, महानगर पालिकेकडून जागेवर असलेली झाडे तोडण्यासाठी नगरपालिकेकडून परवानगी मिळण्यास विलंब लागणे, बांधकाम सुरू करण्यास उशिर झाल्यामुळे किंमतीत फरक होणे व पुन्हा प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याची आवश्यकता इत्यादी कारणास्तव विलंब झाला. सद्य:स्थितीत ३ वार्डाचे सुपर स्पेशालीटी रुग्णालयातील बांधकाम वगळता उर्वरित सर्व बांधकामे पुर्ण झाली आहेत. तीन वॉर्डचे काम जुलै २०१९ पर्यंत पुर्ण होईल असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

शिफारस

३.१० शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये करावयाच्या स्थापत्य कामांबाबत महालेखाकारांनी सदरहू आक्षेप नोंदविलेले असून ही कामे वेळेत पुर्ण न झाल्यामुळे कामात विलंब झाला. परिणामी सामान्य लोकांना सुधारीत स्वास्थ्य निगा सुविधा पुरविण्याचे अपेक्षित उद्दिष्ट अमर्याद कालावधीकरिता असाध्य राहिले. सदरहू परिच्छेदाअंतर्गत मुंबईतील १६ कामांपैकी एका इमारतीचे बांधकाम पुर्ण झाले असून १४ कामे अन्य योजनेंतर्गत पुर्ण करून घेतलेली आहेत. तसेच सायन रुग्णालयासाठी ट्रामा केअर सेंटर मंजूर झाल्यामुळे हे काम करायचे नाही अशी केंद्र शासनाबरोबर चर्चा करून निर्णय झालेला आहे. वास्तविकत: सायन येथील ट्रामा केअर सेंटर नागपूर येथील ट्रामा केंअर सेंटरच्या तुलनेत खूपच लहान व फारच कमी क्षमतेचे असतानाही मुंबई ट्रामा केअर सेंटर रद्द करणे हे खूपच अव्यवहार्य व दुर्देवी होते असे समितीचे स्पष्ट मत आहे. तसेच स्थापत्य व विद्युतची कामे झालेली आहेत. तसेच नागपूर येथील ६ कामांपैकी २ कामे अन्य निधीतून करण्यात आलेली असल्यामुळे ती यातून वगळण्यात आल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. समितीच्या अनेकदा असे निदर्शनास येते की, उपकरण वा यंत्रसामुग्रीचा पुरवठा आधी होतो व यंत्रे वा उपकरणे बसविण्यासाठी आवश्यक असलेली स्थापत्य व विद्युत जोडणीची कामे त्यानंतर हाती घेण्यात येतात. परिणामी पुरवठा झालेल्या

उपकरणांचा वापर विहित वेळेत सुरू होवू शकत नाही. बांधकामास विलंब झाल्यास व उपकरणे विनावापर पडून राहिल्यास त्यामध्ये बिघाड होणे अथवा त्याचा वॉरंटीचा कालावधी कमी होणे किंवा संपणे अशा अनेक बाबी घडतात. या अडचणी टाळण्यासाठी यंत्रसामुग्रीचा पुरवठा व ती बसविण्यासाठी करावयाचे स्थापत्य वा विद्युत जोडणीची कामे ही समांतर व नियोजनबध्दरित्या व कालबध्द पध्दतीने करण्यात यावीत, जेणेकरून उपकरणांचा पुरवठा झाल्याबरोबरच ती यंत्रे तातडीने कार्यान्वित करणे विभागाला शक्य होईल. यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाशी योग्य ते समन्वय वेळोवेळी ठेवून कालबध्द पध्दतीने ही कामे पुर्ण करून घेण्यात यावी. तसेच भविष्यात अशा आक्षेपांची पुनरावृत्ती विभागाने टाळावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.११ (२) मुंबई सारख्या शहरातील लोकसंख्या, आजाराचे प्रमाण व गरीब व गरजू रुग्णांची वाढती संख्या पाहता तसेच मुंबईत बाहेरुन येणाऱ्या रुग्णांचे वाढते प्रमाण पाहता मुंबईत अस्तित्वात असलेली रुग्णालये आधुनिक व सुसज्ज वैद्यकीय सेवा देण्यास अपूरी पडत आहेत. अशा पार्श्वभूमीवर शासनाने अधिकच्या सवलती देवून शहरात एक सुसज्ज व अत्याधुनिक रुग्णालय बांधण्याच्यादृष्टीने प्रयत्न करावेत. तसेच राज्यात अशा सर्व रुग्णालयाच्या बांधकामाचे नियोजन करण्यासाठी प्लॅनिंग एजन्सीची नियुक्ती करणेबाबतच्या पर्यायाचा देखील शासनाने सकारात्मक विचार करावा व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक ३.२.२.५ "किरकोळ निरीक्षणे"

अभिप्राय

३.१२ प्रधानमंत्री स्वास्थ्य सुरक्षा योजनेच्या प्रापण मार्गदर्शक सुचनांमध्ये विनिर्दिष्ट केले आहे की, उपकरणांचे प्रापण संस्थेने मंजूर केलेल्या सुचीनुसार भारत सरकार तज्ञांच्या मदतीने करावयास पाहीजे आणि मंजूर किंमतीपेक्षा जास्त खर्च झाल्यास तो खर्च राज्याने / शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांनी सोसावयास पाहीजे. याशिवाय दुस-या एखाद्या कामासाठी निधी वळता करावयास नको. परंतु शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मुंबई आणि नागपूर ने रु.९.५८ कोटी किमतीची १५५ उपकरणे खरेदी केली, जी मंजूर उपकरणांच्या सूचीमधे समाविष्ट नव्हती आणी टप्पा -१ व टप्पा २ दरम्यान उपकरणांच्या खरेदीवर करण्यात आलेला रु.५५.२५ कोटीचा जादा खर्च शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मुंबई आणी नागपूर ने राज्य / शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या निधीतून न करता प्रधानमंत्री स्वास्थ्य सुरक्षा योजना निधीतून करण्यात आला.

तसेच रु.३३.७४ लाख रक्कम शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबईच्या प्रधानमंत्री स्वास्थ्य सुरक्षा योजना खात्यातून ऑक्टोबर,२०१० मध्ये सर जे.जे. रुग्णालयाच्या बँक खात्यात भरण्यात आली परंतु या खर्चित रकमेची कोणतीही प्रमाणके / दस्तावेज लेखापरीक्षेस सादर करण्यात आले नाही. तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपूर ने प्रधानमंत्री स्वास्थ्य सुरक्षा योजनेच्या केंद्र हिश्श्याची प्रधानमंत्री स्वास्थ्य सुरक्षा योजना रोकडवही स्वतंत्र ठेवली आणि राज्य हिश्श्याचे स्थापत्य बांधकामासाठी मिळालेले रु.३१.०७ कोटी प्रधानमंत्री सुरक्षा योजनेच्या रोकडवहीमध्ये न ठेवता महाविद्यालयाच्या रोकडवहीमध्ये ठेवले जे नियमबाह्य होते असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

शिफारस

३.१३ महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदांतर्गत प्रधानमंत्री स्वास्थ्य सुरक्षा योजनेंतर्गत काही किरकोळ निरीक्षणे नोंदवून प्रशासकीय व वित्तीय स्वरुपाच्या अनियमितता संदर्भात आक्षेप नोंदविलेले आहेत. यासंदर्भात नागपूर येथे प्रधानमंत्री स्वास्थ्य सुरक्षा योजनेअंतर्गत मिळालेला निधी हा प्रस्तावित केलेल्या व मान्यता प्राप्त यादीतील उपकरणांच्याच खरेदीवर केला असून लेखापरिक्षकांनी दिलेल्या २१ उपकरणांच्या यादीत संबंधीत विभाग निहाय व्हेटेड /मान्यताप्राप्त यादीमधे समाविष्ट नसल्याचा उल्लेख आहे. परंतु नमूद उपकरणांच्या केवळ नावांमधे फरक आहे. केवळ अफेरेसीस मशीन नावाचे रु.१३,१२,५००/- किंमतीचे एक अत्यावश्यक यंत्र एचएलएल कडून खरेदी करण्यात आले त्याचे नांव मान्यताप्राप्त यादीमधे नाही. परंतु सदर यंत्र विभागाकरीता आवश्यक असल्या कारणाने ते घेण्यात आले. उर्वरित सर्व यंत्रामधे नावाचा फरक आहेव ती प्रमाणित यादीतीलच आहेत.

तसेच मुंबई येथे पेंटाक्युलर मायक्रोस्कोप हा प्रधानमंत्री स्वास्थ्य सुरक्षा योजनेंतर्गत रु.३३.७४ लक्ष प्रत्यक्षात खरेदी किंमत रु.३३.५५ लक्ष इतक्या रक्कमेस खरेदी करण्यात आला होता. लेटर ऑफ क्रेडीट दि.३०.१०.२०१० व बील ऑफ एक्सचेंज हे संस्थेकडे उपलब्ध आहे. सदरची कागदपत्रे लेखापरिक्षणाच्या वेळी संबंधित संस्थेमार्फत लेखा पथकाच्या निदर्शनास आणण्याचे अनावधानाने राहून गेले होते. तसेच राज्य शासनाच्या हिश्श्याचे स्थापत्य बांधकामासाठी मिळालेले रु.३३.०७ कोटी प्रधानमंत्री स्वास्थ्य सुरक्षा योजनेच्या रोकडवहीमध्ये न ठेवता महाविद्यालयाच्या रोकडवहीमध्ये ठेवले हे खरे आहे. कारण राज्य शासनाकडून महाविद्यालयाच्या लेखाशिर्षाखाली निधी आला होता. राज्य शासनाकडून निधी प्राप्त होताच तो सार्वजनिक बांधकाम खात्याकडे पाठविण्यात येतो त्यामुळे उक्त कामाकरीता स्वतंत्र लेखाशिर्ष घेण्यात आले नव्हते असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी समितीस केला.

महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदात नोंदविलेले आक्षेप हे जरी किरकोळ स्वरुपाचे असले तरी निश्चितच गंभीर आहेत. योजनेची अंमलबजावणी करताना प्रशासकीय व वित्तीय स्वरुपाच्या नियमांचे यथायोग्य पालन करणे अधिकाऱ्यांवर बंधनकारक असताना अनेकदा याकडे दुर्लक्ष होते. परिणामी वित्तीय नियमांचे उल्लंघन झाल्यामुळे या बाबी आर्थिक शिस्तीला धरुन राहात नाहीत. इतकेच नव्हेतर महालेखाकारांनी आक्षेप नोंदविल्यानंतर ते अंतिम करण्याअगोदर त्याची पडताळणी करण्याकरिता विभागाकडे पाठविण्यात येतात. अनेकदा हे आक्षेप अंतिम होण्याअगोदर विभागाला त्यांचे म्हणणे मांडण्याची व कागदपत्रे सादर करण्याची पुर्ण संधी उपलब्ध असते. परंतु वेळ असतानाही विभागाच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांकडून याकडे दुर्लक्ष करण्यात येते. परिणामी हे आक्षेप अंतिम करण्यात येतात व लोकलेखा समितीकडे छाननीसाठी प्राप्त होतात. विभागाने महालेखाकारांचे आक्षेप अंतिम होण्याअगोदर या आक्षेपांचे निराकरण करण्यासाठी पुर्ण प्रयत्न करावेत, जेणेकरून आक्षेपांची संख्या कमी करण्यास निश्चितच मदत होईल. तसेच आर्थिक व्यवहारासंदर्भातील कागदपत्रे व रोकडवह्या विहित वित्तीय नियमानुसार ठेवणे व निधीच्या खर्चाच्या ताळमेळाचे विवरणपत्र (Reconciliation) विभागाने नियमितरित्या व वेळेत करावे व अशा आक्षेपांची पुनरावृत्ती भविष्यात टाळावी अशी समितीची शिफारस आहे.

३.१४ (२) या योजनेंतर्गत नागपूर येथील ट्रामा केअर सेंटरची पाहणी समितीने दि.९ मे, २०१८ रोजी केली असता तेथे अनेक उणिवा व त्रुटी समितीच्या निदर्शनास आल्या होत्या. त्याअनुषंगाने समितीने शिफारशींच्या माध्यमातून अनेक महत्वाच्या सूचना आपल्या अहवाल क्रमांक ४१ (दि.१७ जुलै, २०१८) मध्ये केली व त्याच्या अनुपालनावर देखील समितीने चर्चा केली, परंतु त्यात अद्यापही पुर्ण पुर्तता व कारवाई झालेली नाही, ही निश्चितच खेदाची बाब आहे. समितीने केलेल्या शिफारशींवर विभागाने गांभीर्याने कारवाई करणे आवश्यक व अभिप्रेत आहे. अत: विभागाने या शिफारशींवर तातडीने कारवाई करून व आश्वासनाची पुर्तता करून केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग

४.१ भारताचे नियंत्रक व महालेखा परिक्षक यांनी सन २०१६-१७ या वर्षाच्या सामान्य सामाजिक क्षेत्र अहवालात खालीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले आहेत.

वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग	
३.१२ आरोग्य क्षेत्रातील सार्वजनिक खाजगीकरण भागीदारी व्यवस्थेतील अभिकरणाला अदेय फायदा	
सार्वजनिक खाजगी भागीदारी व्यवस्थेअंतर्गत सीटी स्कॅन सेवांसाठी अभिकरणाकडून देय असलेली रक्कम वसूल करण्यात अधिक्षक, जी.टी. रुग्णालय अपयशी ठरल्यामुळे ₹२.५३ कोटी भाडे वसुली केली गेली नाही, याशिवाय कायदेशीर करार न करता शासकीय मालमत्ता खाजगी अभिकरणाने अवैधरित्या ताब्यात ठेवली.	
महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण आणि औषधी द्रव्ये विभागाने मॅग्नेटिक रेझोनन्स इमेजिंग (एमआरआय) आणि कंम्प्युटराईज्ड टोमोग्राफी (सीटी) स्कॅन यंत्र वापरण्यासाठी बाह्य स्त्रोताद्वारे कार्यान्वित करण्याचे आणि या यंत्राद्यारे तयार केलेले रोगनिदान अहवाल, जे अभिकरण शासनाला सर्वाधिक मासिक शुल्क देईल त्यांना देण्याची संमती (सप्टेंबर २००९) दिली आणि याबाबत एक करार कार्यान्वित करण्यासाठी अधिक्षक, गोकुळदास तेजपाल (जी.टी.) रुग्णालय, मुंबई यांना प्राधिकृत केले. तद्नुसार, अधिक्षक, गोकुळदास तेजपाल रुग्णालय यांनी फर्स्ट केअर प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई (अभिकरण) यांचेशी, दोन्ही सेवा कार्यरत करण्यासाठी हवाली केल्याच्या तारखेपासुन तीन वर्षांसाठी सार्वजनिक खाजगी भागीदारी अंतर्गत करार केला (सप्टेंबर २००९). एमआरआय मशीन आणि सीटी स्कॅन यंत्र, अभिकरणाला अनुक्रमे दिनांक १ डिसेंबर २०१० आणि ५ मार्च २०१२ ला वापरण्यासाठी हवाली केले गेले. कराराच्या खंड १५ मध्ये विहित केल्यानुसार, तीन महिन्यांच्या चाचणी आणि प्रशिक्षण कालावधी नंतर वापर सुरु केल्याच्या तारखेपासुन	विभागाच्या नियंत्रणाखालील गोकुळदास तेजपाल रुग्णालयात गरजू व गरीब रुग्णांसाठी एमआरआय व सीटी स्कॅन चाचण्यांची सुविधा निर्माण होण्यासाठी केंद्र शासनाच्या ओएनजीसी कंपनीने एमआरआय व सीटी स्कॅन ही यंत्रसामुग्री प्रस्थापित केली होती. सदर यंत्रसामुग्री चालविण्यासाठी निविदा प्रक्रियेद्वारे निवडण्यात आलेल्या मे. फर्स्ट हेल्थ केअर या कंपनीशी सामंजस्य करार करणेसाठी शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, क्रमांक जीटीएच-२००९/ ८६७/प्रशासन-१ (विकाअ), दिनांक २४.०९.२००९ अन्वये अधिक्षक, गोकुळदास तेजपाल रुग्णालय, मुंबई यांना याविषयी करार करण्यास प्राधिकृत करण्यात आले होते. सदर विषयीच्या करारानुसार कामकाजाच्या दिवशी संबंधित सेवा पुरवठादारांने २० सीटी स्कॅन चाचण्या (२ तातडीच्या प्रकरणांसह) आणि १० एमआरआय चाचणीची शासकीय रुग्ण प्रति दिन तपासणेबाबतची तरतूद आहे. सदर सामंजस्य करारात सीटी स्कॅन व एमआरआय या प्रति यंत्रसाठी रु. ४,०१,५०२/- प्रति माह इतके मासिक भाडे ठरविण्यात आलेले आहे. याविषयी एमआरआय यंत्रसामुग्रीचा सेवा पुरवठा कालावधी दिनांक ०१.१२.२०१० ते ०१.१२.२०१३ असा होता. तर सीटी स्कॅन यंत्रसामुग्रीचा सेवा पुरवठा कालावधी दिनांक

अभिकरण प्रत्येक यंत्राच्या भाड्यापोटी मासिक ₹ ४.०२ लाख अदा करणार होते.

अधिक्षक, गोकुळदास तेजपाल रुग्णालय मुंबई यांचेकडील दस्तऐवजांची तपासणी (फेब्रुवारी २०१७) आणि त्यांचेकडून मागविलेल्या (जून २०१७) अधिक माहितीवरुन असे आढळून आले की, जरी अभिकरण एमआरआय यंत्राचे मासिक भाडे नियमीतपणे देत होते तरी, सीटीस्कॅन यंत्राचे मासिक भाडे ते वापरण्यासाठी घेतल्यापासून म्हणजे ५ मार्च २०१२ पासून दिलेले नव्हते. खाजगी रुग्ण हे शासकीय रुग्ण म्हणून पाठविले जात असल्यामुळे व शासकीय आणि खाजगी दरात खूप तफावत असल्यामुळे सीटी स्कॅन प्रकल्प हा व्यवहार्य नाही अशी हरकत अभिकरणाने घेतली. अभिकरणाने सार्वजनिक खाजगीकरण भागीदारी कराराच्या खंड २० नुसार हा प्रकल्प व्यवहार्य आणि यशस्वी होण्यासाठी दोन्ही पक्षांना मान्य होईल असा उपाय काढण्याची वैद्यकीय शिक्षण आणि औषधीद्रव्ये विभागाला विनंती (फेब्रुवारी २०१२) सुध्दा केली होती.

रुग्णालयाने २०१२-१४ कालावधीसाठी सादर केलेल्या माहितीनुसार, ऑगस्ट, २०१४ पर्यंत अनुक्रमे १३,५७० आणि २,०६२ खाजगी रुग्णांचे अभिकरणाने एमआरआय आणि सीटीस्कॅन केले होते ज्यासाठी ₹ ४.३८ कोटी शुल्क गोळा केले होते त्या उपरांत भाड्यापोटी ₹२.६५ कोटी देय होते. जरी अभिकरणाने सिटी स्कॅन यंत्राच्या भाडे न भरण्याची बाब वैद्यकीय शिक्षण आणि औषधीद्रव्ये विभाग आणि संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन (डीएमईआर) महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या निदर्शनास (जानेवारी २०१६) आणून देखील, अधिक्षक यांनी अभिक ०५.०३.२०१२ ते ०५.०३.२०१५ असा होता.

याविषयी सदर करारांतर्गत सुरू करण्यात आलेला सीटी स्कॅन सेवा प्रकल्प अव्यवहार्य ठरत असल्याने याविषयी सामंजस्य करारातील कलम क्रमांक २० नुसार दोन्ही पक्षकाराच्या सामंजस्याने सदर प्रकल्प व्यवहार्य व यशस्वी होण्यासाठी निर्णय घेणेबाबत संबंधित पुरवठादाराने विनंती केली होती. तथापि याबाबत त्यावेळी उचित कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही. प्रस्तुत विषयी संबंधित सेवा पुरवठादाराने सीटी स्कॅन यंत्रसामुग्रीचे भाडे थकविल्याबाबत तत्कालीन सचिव वैद्यकीय शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २०.०४.२०१८ रोजी झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने सदर विषयी दिनांक २१.०४.२०१८ रोजी रुग्णालय प्रशासनाने संबंधित सेवा पुरवठादारास सीटी स्कॅन यंत्रसामुग्रीचे थकीत भाडे अदा करण्याबाबत कळविले.

शासनाच्या सदर पत्राच्या अनुषंगाने सेवा पुरवठादाराने दिनांक ०४.०५.२०१८ रोजी रुग्णालय प्रशासनाकडे सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, सामंजस्य करारानुसार शासनाने प्रतिमाह ५२० शासकीय रुग्ण पाठविणे अपेक्षित असताना (एप्रिल, २०१८ पर्यंत ३९,५२०) सेवापुरवठादाराने आता पर्यंत फक्त ३०,०३० इतके सीटी स्कॅन रुग्ण चाचणी केलेली आहे. याविषयी शासन शासकीय रुग्णांचा नेमूण दिलेला कोटा सेवा पुरवठादाराकडे पाठवू शकले नसल्याने सेवा पुरवठादार खाजगी रुग्णांना सीटी स्कॅन चाचण्यासाठी आकर्षित करू शकला नाही. याविषयी सेवापुरवठादाराने त्याच्या निवेदनात सदर सीटी स्कॅन केंद्र चालविण्यासाठी त्यांना प्रतिमाह रुपये ५,२६,००० इतका खर्च येतो.तथापि सदर सेंटरचे उत्पन्न रूपये ४,५०,००० इतके आहे. सबब ही बाब पहाता

रणाच्या तोट्याच्या दाव्याची सत्यता पडताळणी व सार्वजनिक-खाजगीकरण भागीदारीच्या कराराच्या शर्तीनुसार देय असलेल्या भाड्याच्या वसुलीसाठी कोणतीही कारवाई केली नव्हती. तसेच अभिकरणाने भाड्याची रक्कम विलंबाने दिल्यास किंवा दिलीच नसल्यास त्याबाबत दंडाची तरतूद केली नव्हती.

सार्वजनिक खाजगीकरण भागीदारी करारातील खंड १९ नुसार अभिकरणाला तीन महिन्यांची नोटीस देऊन सार्वजनिक खाजगीकरण भागीदारी करार संपुष्टात आणण्यासाठी कुठल्याही कारवाईला सुरुवात केली नव्हती.

तसेच, एमआरआय मशीनचा करार १ डिसेंबर २०१३ ला आणि सीटी स्कॅन यंत्राचा करार ५ मार्च २०१५ ला संपलेला असतांनाही, सार्वजनिक खाजगीकरण भागीदारी च्या कराराची कायदेशीर अंमलबजावणी न करता ती तशीची पुढे ठेवली गेली होती.

अधिक्षक, गोकुळदास तेजपाल रुग्णालय यांनी उत्तरात सांगितले (फेब्रुवारी २०१७ आणि जून २०१७) की भाडे भरण्यास विलंब झाल्यास अथवा भाडे न भरल्यास दंडासंदर्भात करारनाम्यात कोणतेही कलम नव्हते आणि भाडे भरण्यास अभिकरणाची इच्छा नसल्याबाबत संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांना कळविण्यात आले होते. त्याचप्रमाणे, रुग्णांना ह्या सेवा पुरविण्याची आवश्यकता लक्षात घेऊन करारनाम्याची कालमर्यादा समाप्त होऊन देखील अभिकरणास मशीन चालवण्यास परवानगी दिली होती. आणि तसेच, करारनाम्याचे नुतनीकरण करण्याची कार्यवाही शासन स्तरावर करावयाची होती.

सदर पीपीपी तत्वावरील योजनेमुळे झालेल्या उपयोगांचा विचार करून कंपनीच्या निवेदनाचा सहानुभूतीपूर्वक विचार व्हावा, असे विनंती संबधित सेवा पुरवठादाराने केलेली आहे.

उपरोक्त वस्तुस्थितीच्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, संबधित सेवा सेवापुरवठादाराने एमआरआय यंत्रसामुग्रीचे भाडे नियमितपणे अदा केलेले आहे. यावरून सदर प्रकल्प हा व्यवहार्य असल्याचे दिसून येत आहे. सदर विषयीच्या करारातील तरतूद क्रमांक ३ (ब) अन्वये संबधित एजन्सीला शासकीय रुग्ण वगळता अन्य रुग्णांकडून घ्यावयाचे शुल्क ठरविण्याचा अधिकार देण्यात आला होता. सबब सेवा पुरवठादाराने याबाबत सीटी स्कॅन प्रकल्प तोट्यात चालत असेल तर सदर तरतूदीनुसार सीटी स्कॅन यंत्रसामुग्री प्रकल्प व्यवहार्यरित्या चालण्यासाठी त्याचवेळी उचित कार्यवाही करणे अपेक्षित होते. सदर प्रकल्प एखादा सेवा पुरवठादार इतकी वर्षे तोट्यात चालवत आहे, ही बाब विश्वसनीय वाटत नाही. सदर प्रकल्पाची व्यवहार्यतेचे अंशत: मुल्यमापन करणेबाबतची सेवापुरवठादाराची कृती स्किकारार्ह नाही. सदर बाबी पहाता,संबधित सेवा पुरवठादाराने सीटी स्कॅन यंत्रसामुग्रीचे प्रतिमाह भाडे थकबाकी अदा करणे आवश्यक आहे. याविषयी सेवा पुरवठादाराकडून थकलेले भाडे वसुल करण्यासाठी वसुली (रिकव्हरी) संदर्भातील प्रचलित महसुली वा अन्य उचित नियमाप्रमाणे आवश्यक उपयायोजना करण्यात येतील.

सदर विषयी करार करण्यास संबधित रुग्णालयाच्या अधिक्षकास प्राधिकृत करण्यात आले होते. तथापी याविषयी सदर विषयी करण्यात आलेल्या कराराचे पुनर्विलोकन करून याविषयी सेवा पुरवठादाराकडून थकीत भाडे वसुल करणे संदर्भात कोणतीही कार्यवाही केलेली नाही. सबब

अशाप्रकारे, सार्वजनिक खाजगीकरण भागीदारी व्यवस्थेअंतर्गत सीटीस्कॅन सेवांसाठी अभिकरणाकडून देय असलेली रककम वसूल करण्यात अधिक्षक, गोकुळदास तेजपाल रुग्णालय अपयशी ठरल्यामुळे ₹ २.५३ कोटीची वसुली केली गेली नव्हती, याशिवाय कायदेशीर करार न करता शासकीय मालमत्ता अवैधरित्या खाजगी अभिकरणाच्या ताब्यात ठेवली ही वस्तुस्थिती कायम राहते.	याविषयीसदर प्रकरणी सखोल चौकशी करण्यासाठी व संबधितांवर जवाबदारी निश्चित करण्यासाठी चौकशी समिती नेमण्यात येईल. सदर विषयी असेही नमूद करण्यात येते की, जी.टी. रुग्णालयातील सीटी स्कॅन यंत्रसामुग्री चालविण्यासाठी नवीन सेवापुरवठादाराची विहीत कार्यपध्दतीनुसार नेमणूक करणेबाबतचा प्रस्तावावर कार्यवाही सुरू आहे.

(प्रकाश सुरवसे)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

५.१ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात अधिक माहीती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक १२ फेब्रुवारी व ७ मार्च २०१९ रोजी वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभागाच्या सचिांची साक्ष घेतली.

साक्ष :-

परिच्छेद क्रमांक ३.१२ - आरोग्य क्षेत्रातील सार्वजनिक खाजगीकरण भागीदारी व्यवस्थेतील अभिकरणाला अदेय फायदा

विभागाने सन २०१२ पासून सी.टी. स्कॅनचे पैसे वापरले नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. अधिक्षक गोकुलदास तेजपाल (जी.टी.) रुग्णालय, मुंबई याबाबतची सद्य:स्थिती सांगावी, असे समितीने निदेश दिले असता, अधिक्षक, गोकुळदास तेजपाल रुग्णालय यांनी फर्स्ट केअर प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई (अभिकरण) यांचेशी, महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण आणि औषधी द्रव्ये विभागाने मॅग्नेटिक रेझोनन्स इमेजिंग (एमआरआय) आणि कॅम्प्युटराईज्ड टोमोग्राफी (सीटी) स्कॅन यंत्र वापरण्यासाठी बाह्य स्त्रोताद्वारे कार्यान्वित करण्याचे आणि या यंत्राद्वारे तयार केलेले रोगनिदान अहवाल, दोन्ही सेवा कार्यरत करण्यासाठी हवाली केल्याच्या तारखेपासून तीन वर्षासाठी सार्वजनिक खाजगी भागीदारी अंतर्गत करार केला (संप्टेंबर २००९). यामध्ये दोन गोष्टी आहेत. त्यातील पहिली म्हणजे सन २०१५ मध्ये ॲग्रिमेंट संपुष्टात आलेले आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

एम.आर.आय.चे ॲग्रिमेंट सन २०१३ मध्ये संपुष्टात आले त्यानंतर तेच ॲग्रिमेंट पुढे सुरू आहे काय ? असा प्रश्न समितीने केला असता विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली.

Without any contract? How they are running it? असा प्रश्न समितीने केला असता,Without futher extension of the contract. तो एक मुद्दा आहे. दुसरा मुद्दा असा आहे की, सी.टी. स्कॅन मशिनमध्ये त्यांनी सरकारला देय असलेला हिस्सा दिला नाही. त्यांनी असे सबमिशन केले आहे की, हे आम्हाला प्रॉफिटेबल नाही म्हणून आम्ही त्याचे पैसे देऊ शकत नाही. त्याला जर ते प्रॉफिटेबल नसते तर, why is he operating it, हा प्रश्नच आहे, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

But what are we doing? We are simply sitting and observing! विभागाचे लोक त्या हॉस्पिटलमध्ये काय म्हणून होते ? असा प्रश्न समितीने केला असता, ते ॲग्रिमेंट मेडिकल सुपरिडेंटने केलेले आहे. या केसमध्ये विभाग संबंधितांवर कारवाई करणार आहे, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

विभागाने दिलेल्या माहितीमध्ये असे नमूद केले आहे की, 'आमच्या लोकांनी दुर्लक्ष केले'. You yourself are confessing, असे समितीने निदर्शनास आणले असता, विभागाने ते मान्य केले आहे तसेच विभाग आता ते ॲग्रिमेंट संपुष्टात आणत आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाला सन २०१९ पर्यंतचे एम.आर.आय.चे पूर्ण पैसे मिळाले आहेत काय ? असा प्रश्न समितीने केला असता विभागीय सचिवांनी होकारार्थी उत्तर दिले.

सन २०१२ पासून सी.टी. स्कॅन मशिन सुरू झाली तिचे पैसे मिळाले काय ? अशी विचारणा समितीने केली असता, सी.टी. स्कॅन मशिनचे पैसे मिळालेले नाहीत. त्यामुळे एकतर विभागास ॲग्रिमेंट संपुष्टात आणावे लागेल. दुसरे म्हणजे जे पैसे त्यांनी दिले नाहीत, त्यांची रिकव्हरी करावी लागेल, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

How you can recover after year २०१५? You have Agreement only upto year २०१५. You cannot claim it from the vendor because you do not have Agreement. शिवाय करारनामा नसताना सुध्दा सन २०१३ पासून आजतागायत एमआरआय मशीन सुरू आहे, सन २०१२ पासून विना पेमेंट सिटी स्कॅन मशीन सुरू आहे. असे असताना वरिष्ठांपासून ते कनिष्ठ अधिकारी हे सर्वच जण गप्प आहेत. विभाग त्या कंपनीला दूर करीत नाही आणि नवीन निविदा सुध्दा काढत नाही. या संपूर्ण प्रकरणी विभागाने कोणाकोणास जबाबदार धरले ? विभागाने चौकशी समिती स्थापन केली आहे. आता आपण सांगत आहात की, डयू कोर्समध्ये वसुली करणार आहोत. विभाग ही वसुली नेमकी कोणत्या माध्यमातून करणार ? कोट्यवधी रुपयांचे रेव्हेन्यू रिकव्हरी सर्टीफिकेट असताना त्यातील एक रुपया सुध्दा वसूल होत नाही. कारण वसुलीच्या विरोधात लोक उच्च न्यायालयात जातात. वास्तविक पाहता संबंधित कंपनीने विहित कालावधीत पैसे दिले नव्हते तर लगेच तिला दूर करावयास पाहिजे होते. तसेच दुसरी बाब अशी की, पूर्वी त्या कंपनीने जे निवेदन सादर केले होते त्यावर विभागाने कोणताही निर्णय घेतला नाही. याला वरिष्ठांपासून कनिष्ठांपर्यंत सर्व अधिकारी जबाबदार आहेत. एवढ्या महत्त्वाच्या मुद्याला थातूरमातूर उत्तर देणे समितीला कदापि चालणार नाही, असे मत समितीने व्यक्त केले असता, ही वस्तुस्थिती आहे की, त्या कंपनीचा करार संपुष्टात आलेला असताना सुध्दा त्यांच्याकडून आजपर्यंत काम सुरू आहे. तसेच ही सुध्दा वस्तुस्थिती आहे की, त्यांनी विभागाला कोणतेही पेमेंट केलेले नाही.

या बाबी विभाग नाकारत नाही. या प्रकरणी संबंधितांवर जबाबदारी निश्चित करावी लागेल. यातील पहिली बाब अशी की, सर्वप्रथम त्या कराराला संपुष्टात आणावे लागेल. दुसरी बाब अशी की, लोकांना वैद्यकीय सेवा मिळावी म्हणून नवीन ईओवाय काढत आहोत. या बाबतची फाईल माननीय मंत्री यांच्याकडे मान्यतेसाठी सादर केलेली आहे. तिसरी बाब अशी की, या प्रकारास कंपनी आणि विभागाचे लोक जबाबदार असून, त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करावी लागेल. तसेच चौथी बाब अशी की, जी रक्कम वसूल करणे आवश्यक आहे त्यासाठी सिव्हील कोर्टात याचिका दाखल करावी लागेल किंवा जिल्हाधिकारी यांच्याद्वारे रेव्हेन्यू रिकव्हरी सर्टीफिकेटच्या माध्यमातून वसुली करावी लागेल. ही संपूर्ण प्रक्रिया कशी करावी यासाठी चौकशी समिती घटित करण्याचा विभागाचा विचार होता, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

अशाच प्रकारे इतर शासकीय रुग्णालयात आऊट सोर्सिंगद्वारे काम दिले आहे काय ? असा प्रश्न समितीने केला असता, आऊट सोर्सिंगचे हे एकच उदाहरण आहे. आपल्याकडे काही इक्वीपमेंट असे आहेत की ते विभाग स्वत:च्या निधीतून उभारु शकतो. परंतु काही ठिकाणी निधीची अडचण असते. त्यामुळे ज्या ठिकाणी निधीची तफावत आहे त्या तफावतीला आऊट सोर्सिंगच्या माध्यमातून भरुन काढावे असे इनप्रिंसीपल डिसीजन झालेले आहे. या बाबत इओआय काढलेला आहे. या बाबतचे धोरण तयार करण्यात येत आहे. संपूर्ण प्रक्रिया झाल्यानंतर हे काम आऊट सोर्सिंगच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. सद्य:स्थितीत जी.टी.हॉस्पीटल या एकाच ठिकाणी आऊट सोर्सिंगच्या माध्यमातून उक्त मशीनच्या माध्यमातून वैद्यकीय सेवा देण्याचे काम सुरू आहे, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

वास्तविक पाहता महानगरपालिकेच्या रुग्णालयांनी अनेक ठिकाणी आऊट सोर्सिंग केले आहे. आऊट सोर्सिंग हे निविदा प्रक्रिया वा इतर तदानुषंगिक बाबींची पूर्तता करून केल्या जातात. या संदर्भातील प्रक्रिया झाल्यानंतर संस्थेची निवड केली जाते. विभागाला सुध्दा आऊट सोर्सिंग करावयाचे झाल्यास विशिष्ट प्रक्रिया राबवावी लागेल. जोपर्यंत विभाग या संदर्भातील धोरण निश्चित करीत नाही, नियम तयार करीत नाही तोपर्यंत पुढील कार्यवाही होणार नाही. एकंदरीत समितीचे असे म्हणणे आहे की, ही सर्व विभागाची 'संगनमत' आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता, यात संगनमत आहे असे नाही, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

जर यामध्ये संगनमत नसेल तर त्या संस्थेला आतापर्यंत काढून का टाकले नाही ? त्या संस्थेने सांगितले की, त्यांना हे काम परवडत नाही. परंतु विभागाने त्यांनी केलेल्या मागणीचा विचार न करता, त्यांना ७-७ वर्षे काम करु दिले. त्यातल्या त्यात २०१५ नंतर त्यांच्यासोबत करार करण्यात न आल्यामुळे विभाग त्यांच्याकडून वसुली सुध्दा करु शकत नाही. विभागाने त्यांच्याकडून २०१५ पर्यंतचे पैसे न घेता त्यांचे काम सुरू ठेवले, असे समितीने निदर्शनास आणले असता, २०१५ पासून २०१९ पर्यंत एमआरआयचे सर्व पैसे त्यांनी जमा केलेले आहेत, असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

या ठिकाणी एमआरआयचा मुद्दाच नाही. मुळात एमआरआयचा करार २०१३ मध्येच संपलेला आहे, असे समितीने मत व्यक्त केले असता, विभागाकडे पुरेसे मनुष्यबळ नसल्यामुळे या कंपनीकडून वैद्यकीय सेवा सुरू ठेवावी लागली. जर ही सेवा बंद केली असती तर रुग्णांचे खूप हाल झाले असते. जे.जे.रुग्णालयाच्या एका एमआरआय मशीनवर खूप भार आहे. त्यामुळेच जी.टी. रुग्णालयाच्या माध्यमातून एमआरआयची सेवा द्यावी लागली, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समितीला एमआरआयच्या बाबतीत काहीच म्हणायचे नाही. एमआरआय मशीन सुरू आहे आणि वसुली सुरू आहे या बाबत समितीला समाधान आहे. परंतु समिती केवळ सिटी स्कॅनच्या बाबतीत विचारत आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता, समितीने जे सांगितले ती वस्तुस्थिती आहे. २०१५ मध्ये हा करार संपुष्टात आला. त्या कंपनीने पैसे दिले नाहीत ही सुध्दा वस्तुस्थिती आहे. सिटी स्कॅन मशीन चालविण्याचा विभागाचा एकच उद्देश असा आहे की, जे.जे. रुग्णालयात केवळ एकच सिटी स्कॅन मशीन आहे. त्यामुळे त्याला कॉम्पेन्सेट करण्यासाठी जी.टी.रुग्णालयाची मशीन चालविणे गरजेचे होते. या कंपनीकडे शासनाची प्रकरणे आणि काही खाजगी प्रकरणे येतात. अतिरिक्त वैद्यकीय सेवा उपलब्ध होती म्हणून त्या कंपनीचे काम सुरू ठेवले. ही वस्तुस्थिती आहे की, २०१५ मध्ये करार संपुष्टात आला. २०१५ पूर्वीच नवीन निविदा काढावयास हवी होती. परंतु लेखा परीक्षणाच्या वेळी ही बाब निदर्शनास आली आहे. चौकशी समितीच्या माध्यमातून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून, लवकरात लवकर नवीन निविदा काढून नवीन कार्यपध्दतीनुसार वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच सन्माननीय समिती सदस्यांनी सांगितल्यानुसार या संदर्भात पारदर्शक धोरण तयार करण्यात येईल.

कामा रुग्णालय, सेंट जॉर्जेस रुग्णालय आणि जी.टी.रुग्णालय अशी तीन रुग्णालये एका भागात आहेत. कामा रुग्णालय आणि सेंट जॉर्जेस रुग्णालयात त्यावेळी सिटी स्कॅनची सोय नव्हती. त्यामुळे रुग्णांच्या सोईसाठी नाईलाजामुळे ही सेवा पुढे सुरू ठेवावी लागली. रुग्णालयाच्या बाबतीत प्रत्येक गोष्ट नियमाने चालविणे शक्य नाही, असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

समितीचे हेच म्हणणे आहे की, विभागाने स्वत: ही सेवा द्यावी. विभाग संबंधित व्यक्ती बरोबर ४ लाख रुपये रेंटचा करार करते. त्या कंपनीचा मशीन चालविण्याचा खर्च ५ लाख २६ हजार रुपये असल्याचे त्यांनी सांगितले. या ५ लाख २६ हजार रुपयामध्ये रेंटचा समावेश होता की नाही ? अशी विचारले समितीने केली असता, जेव्हा करार झाला तेव्हा सर्वस्वी त्यांची जबाबदारी होती. त्यामुळे त्या व्यक्तीची अशी जी विधाने आहेत ती योग्य नाहीत, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सदर सेंटरचे उत्पन्न रुपये ४.५ लाख आहे. ५ लाख २६ हजार रुपयामध्ये ४ लाख रुपये रेंट समाविष्ट आहे. मुळात त्यांचे उत्पन्न ४.५ लाख रुपये आहे. विभागाने ४ लाख रुपये रेंट न घेता ३ लाख रुपये रेंट घ्यावयास पाहिजे होते. परंतु विभागाने त्यांना तसेच सोडून दिले. शिवाय रुग्णालयाचे अधीक्षक यांनी काहीच कार्यवाही केली नाही. मार्च, २०१२ पासून ते मार्च, २०१९ पर्यंत करार केला नाही. आजही त्या कंपनीला काढण्याची प्रक्रिया सुरू करणार आहोत, असेच विभाग सांगत आहे. या बाबतची कार्यवाही अजून एक-दोन वर्षे चालेल. आजची साक्ष झाल्यानंतर समिती वारंवार या बाबत विभागाला विचारणा करणार नाही. समितीने गेल्या सात वर्षाचा हिशेब केला असता ती रक्कम ३ कोटी ३६ लाख रुपये येते. समितीला वाटते विभागाने त्या व्यक्तीला रिईव्हयाल्युएट करावे, त्यांचे काय देणे-घेणे आहे ते बघावे. शेवटी विभागाच्या पदरात काही तरी पडले पाहिजे. नाही तर विभागाने आपले टेक्नीशियन ठेवावेत. गोंदियासारख्या ठिकाणी टेक्नीशियन मिळतात, मग मुंबईत का मिळत नाहीत ? जो प्रकार घडलेला आहे तो विभागाने मान्य केलेला आहे. जर ही कंपनी काम सोडत असेल तर त्यापूर्वी विभागाने पर्यायी व्यवस्था करणे गरजेचे आहे. कारण रुग्णांना या सेवेची आवश्यकता आहे. विभागाला मान्य आहे की, यात चूक झालेली आहे. याला कोण जबाबदार आहे ही बाब वेगळी आहे. परंतु विभागाने कोणालाही डिफेंड करता कामा नये. रुग्णांना गरज असल्यामुळे ही सेवा सुरू ठेवली असे सांगता कामा नये. मुंबईसारख्या ठिकाणी टेक्नीशियन मिळत नाहीत असे म्हटले तर ते हास्यास्पद होईल. मला वाटते विभागाने पर्यायी व्यवस्था करून या कंपनीकडून वसुली करून त्या कंपनीला काढून टाकावयास पाहिजे. विभागाने या अनुषंगाने कारवाई करावयास पाहिजे, अशी सूचना समितीने केली असता, तातडीने करार संपुष्टात आणण्यात येईल, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समितीचे मत आहे की, रुग्णालयाच्या अधीक्षकावर तातडीने कारवाई करावी. त्या अधीक्षकला निलंबितच केले पाहिजे. नाही तर चौकशी समिती घटित करून त्यात पाच वर्षाचा वेळ वाया घालविला जाईल. दुसरा मुद्दा असा की, आरआरसीच्या माध्यमातून पैसे वसूल होणार नाहीत. विभागाने तातडीने नवीन निविदा काढून अगोदरच्या कंपनीकडून मशीन ताब्यात घ्यावी. तसेच त्या निविदा प्रक्रियेतून अगोदरच्या कंपनीला काळ्या यादीत टाकावे, तसेच जोपर्यंत पर्यायी व्यवस्था होत नाही तोपर्यंत ही कारवाई करता कामा नये, असे विभागीय सचिवांनी आश्वासित केले. अशी सूचना समितीने केली असता, या कराराला तातडीने संपुष्टात आणण्यात येईल. तसेच या कंपनीला नवीन निविदा प्रक्रियेत प्रवेश बंद करण्यात येईल. तसेच पर्यायी व्यवस्था करून सदरहू मशीन चालविण्यात येईल. यापुढील काळात आऊट सोर्सिंगच्या बाबतीत योग्य पध्दत वा धोरण तयार करून संस्थेला काम देण्यात येईल,

या प्रकरणी आपण संबंधितांवर कोणती कारवाई केली ? २०१५ पासून विभागाने नवीन करार केला नाही. २०१२ पासून वसुली केली नाही. २०१८ मध्ये कंपनी सांगते की, त्यांना परवडत नसल्यामुळे रेट कमी करावेत. ती कंपनी ५ लाख २६ हजार रुपयांचा एकूण खर्च दाखवित आहे. ती कंपनी पूर्वी विभागाकडे आली असती तर विभागाने तिला कन्सीडर केले असते. त्यानुसार विभागाने दर कमी-जास्त केले असते. आता त्या कंपनीला सुध्दा ३ कोटी ३६ लाख रुपये देता येणार नाहीत. समितीला वाटते आरआरसीचा काहीच उपयोग होणार नाही. मुंबईमध्ये आता एवढे ट्रस्ट आहेत की, ते अशी कामे करण्यासाठी पुढे येतील. मुंबई महानगरपालिकेचे कांदिवली येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर शताब्दी रुग्णालय आहे. या रुग्णालयाने अनेक कामे आऊट सोर्सिंगद्वारे सुरू केली आहेत. अनेक लोक त्यासाठी निविदा भरतात. परंतु विभाग मात्र सात वर्षात यासाठी काही प्रयत्नही करीत नाही किंवा दुसरी व्यक्तीही शोधत नाही. हे अत्यंत चुकीचे आहे.

या सर्व प्रकरणी जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांना वाचविणारे विभागाचे संपूर्ण उत्तर आहे असा समितीचा समज आहे. विभागीय सचिव या ठिकाणी गोलगोल उत्तरे देत आहेत. समितीची अपेक्षा आहे की, ज्या कंपनीने पैसे न भरल्यामुळे तिला तातडीने रद्दबातल करावयास पाहिजे होते. तसेच विभागाने २०१५ मध्ये करार करून घ्यावयास पाहिजे होता. २०१३ मध्ये एमआरआय मशीनची सेवा देण्याबाबचा करार केला असता तर त्याच्या दरात अजून वाढ झाली असती. विभाग २०१० च्या दराने त्या कंपनीकडून पैसे घेत आहे. ती कंपनी २०१० चे दर आकारते की ते दर आता वाढले आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता, दर हे शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार बदलले आहेत, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

२०१० मध्ये जे दर होते ते दर विभागाने वाढवून दिले. याच धर्तीवर त्या कंपनीला सुध्दा दर वाढवून द्यावयास पाहिजे होते. विभाग त्या कंपनीकडून २०१५ नंतर वसुली करु शकणार नाही, कारण विभागाने त्या कंपनीसोबत करारच केलेला नाही. यामध्ये जे पैसे बुडणार आहेत त्याला कोण जबाबदार आहे ते सुध्दा निश्चित करावे. केवळ चौकशी समिती घटित करण्यासंदर्भात थातूरमातूर उत्तर देता कामा नये. हा परिच्छेद प्रलंबित ठेवण्यात येत आहे. या विषयी दि.७ मार्च, २०१९ रोजी साक्ष घेण्यात येईल, असे समितीने निदेश दिले.

जी.टी.रुग्णालयाच्या अधीक्षकांनी संचालक, एमएईआर यांना कळविले होते की, "Unwillingness of the Agency to pay the rate."त्यांनी आम्हाला असे उत्तर दिले की, "Further action to renew the Agreement had to be taken at Government level." डीएएमईआर आणि शासन स्तरावर हा विषय त्यांच्या नजरेस आणून दिला होता. त्यावेळी या विषयी कार्यवाही व्हावयास पाहिजे होती. तसेच करार नसताना वैद्यकीय सेवा पुरविली जात आहे. वास्तविक पाहता ही सेवा पुरविताना कोणत्यातरी प्रकारचे कायदेशीर दस्तऐवज विभागाकडे असलेच पाहिजे. उदाहरणार्थ आज एखाद्याने पेमेंट केले आणि एक वर्षानंतर सुध्दा त्याच दराने पेमेंट केले तरी their is time value of money म्हणून यामध्ये पेनल्टी क्लॉज सुध्दा असावयास पाहिजे. वेळेत पेमेंट करण्याबाबतचा क्लॉज असणे आवश्यक होता. परंतु तोही या ठिकाणी नव्हता. भविष्यकाळात विभागाचे जे करार होतील त्या ठिकाणी पेनल्टी क्लॉज असणे आवश्यक आहे, असे प्रधान महालेखाकार यांनी मत व्यक्त केले.

विभागाला हे मान्य आहे. कारण time value of money बाबत पेनल्टी असायलाच पाहिजे. कंत्राटदाराकडून वेगवेगळ्या प्रकारचा भंग झाला असेल तर त्यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या पेनल्टीज असावयास पाहिजेत. परंतु यामध्ये अधीक्षक, जी.टी.रुग्णालय हे कराराच्या नूतनीकरणाचा पाठपुरावा करण्यासाठी अधिकृत नाहीत. त्यांनी केवळ एक अहवाल पाठविला होता की, त्या कंपनीला कमी दरात सेवा देणे परवडत नाही. या विषयी विभागाच्या सचिवांकडे बैठक झाली होती. पण शासनाने ते मान्य केले नाही. जेव्हा कराराचा कालावधी संपतो तेव्हा तो करार संपुष्टात आणावयास पाहिजे होता. परंतु ती कार्यवाही झाली नाही. त्यामुळे विभागाची सूचना हीच होती की, चौकशी समितीने संबंधितांवर जबाबदारी निश्चित करावी, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

विभागास जी काही कार्यवाही करावयाची असेल ती १५ दिवसात करावी. पुढील साक्षीच्या वेळी आपण कारवाई संदर्भातील माहिती सादर करावी. या विषयी काय कारवाई केली एवढेच विभागाने पुढील साक्षीच्या वेळी सादर करावे. विभागाने त्या व्यक्तीकडून रेंट न घेता सेवा सुरू ठेवली. तसेच तीन वर्षानंतर करार केला नाही. अजूनही एमआरआयचे पूर्वीचेच रेट आहेत. रुग्णांकडून पूर्वी ८०० रुपये घेण्यात येत होते ते आता २५०० रुपये आकारण्यात येत आहेत. शिवाय कोणताही करार न करता त्या व्यक्तीला मशीन देऊन टाकली. त्या कंपनीकडून २०१३ ते २०१९ पर्यंत कराराविना काम सुरू आहे. ती व्यक्ती रुग्णांना दुप्पट रक्कम आकारते आणि विभाग मात्र त्या व्यक्तीकडून जुनेच दर घेत आहे. मला वाटते कमी रक्कम आकारण्यामध्ये विभाग समाधानी दिसतो, असे समितीने मत व्यक्त केले.

दिनांक १२ फेब्रुवारी,२०१९ रोजीच्या बैठकीमध्ये समितीने जी सूचना दिली होती त्याप्रमाणे संबंधित ठेकेदारांना एम.आर.आय. मशिन चालविण्यात आलेला ठेका रद्द करण्यात करितादिलेला आहे. तसेच त्या एमआरआय सेंटरचा ताबा सरकारकडे घेण्यात आला आहे. त्यानंतर सिटी आणि एम.आर.आय. मशिन चालविण्यासाठी स्टाफची जाहीरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्या मशिन आता सरकारमार्फत चालविण्यात येत आहेत. त्याला पुनश्चनिवीदा काढण्यासाठी कागदपत्रे तयार होऊन माननीय मंत्र्यांकडे अंतिम मान्यतेसाठी दिली आहेत. त्यानंतर लगेच निवीदा प्रसिद्ध होतील. ठेकेदारांकडची रक्कम वसूल करण्यासाठी त्यांना नोटीस बजावण्यात आलेली आहे. अशाप्रकारची कारवाई झालेली आहे. त्या ठिकाणी आपण पुरवित असलेली सेवा शासकीय यंत्रणेमार्फत राबवित आहोत, असे विभागीय सचिवांनी समितीला अवगत केले.

सन २०१२ पासून ज्या लोकांनी यामध्ये हलगर्जीपणा केला आणि विभागाला वसुलीच्या कामावर लावले, तसेच काहीही न करता कोणतेही निर्णय घेतले नाही सन २०१८ मध्ये महालेखाकरांचा परिच्छेद आल्यानंतर विभाग जागा होऊन ज्या ज्या लोकांवर जबाबदारी होती त्या लोकांवर विभागाने जबाबदारी निश्चित केली आहे काय ? असा प्रश्न समितीने केला असता, सन २०१२ पासून योजना झाल्यापासून जेवढे वैद्यकीय अधिक्षक होते आणि डॉ. ए.पी. चौधरी, डॉ. जी.टी. संगपाळ, डॉ. डी. आर, कुलकर्णी, डॉ. मुकुंद तायडे आणि डॉ. संतोष गिते या सर्व वैद्यकीय अधिक्षकांना डी.एम.ई.आर.ने नोटीस बजावलेली आहे. या नोटीसचे उत्तर आल्यानंतर त्यांच्यावर विभागीय कारवाई करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वास्त केले.

सन २०१५ नंतर सुद्धा करार करण्यात आला नाही. सन २०१३ मध्ये एम.आर.आय.चा करार संपली, सन २०१५ मध्ये सिटिस्कॅनचा करार संपला त्यानंतर कोणीही करार करण्याची दखल घेतली नाही. त्यानंतरच्या कालखंडात विभागाने या लोकांना समाविष्ट केले आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय प्रतिनिधींनी होकारार्थी उत्तर दिले तसेच करार संपूष्टात आल्यानंतर सदरहू भाग शासनाच्या अवगत का करण्यात आले नाही. करार संपूष्टात आल्यानंतर पुनश्च करार रद्द करून नवीन करार करण्यात आले नाही. करारानुसार सिटी स्कॅन, एम.आर.आय. यंत्रणेची भाडेवसुली करण्यात आलेली नाही. उक्त कराराच्या अनुषंगाने भाडेवसुली न झाल्यामुळे शासनाचे अतोनात नुकसान झालेले आहे. त्यामुळे या संदर्भात जबाबदारी का धरण्यात येऊ नये, सिटी स्कॅन मशिन, एम.आर.आय. मशिन या जागांचे भाडे पण आहे. सन २०१५ साली करार संपल्यानंतर सन २०१५-१८ या तीन वर्षाच्या जागेचे भाडे तरी किमान वसूल व्हायला पाहिजे होते, हा एक मुद्दा आहे, असे विभागीय प्रतिनिधींने समितीस अवगत केले.

सन २०१३ मध्ये एम.आर.आय.चे दर वाढले आणि ४ लाख रुपये प्रमाणे भाडे दिले सिटीस्कॅनसाठी सुरूवातीपासून आजपर्यंत एकही रुपया दिला नाही. हा सर्व हलगर्जीपणा त्या रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिक्षक यांनी केला. ही सर्व आर्थिक जबाबदारी त्या लोकांवर निश्चित करून ज्यांच्यावर होती त्या लोकांनी आपली जबाबदारी पार पाडली नाही. तर शासन हे सर्व पैसे त्यांच्याकडून वसूल करणार काय ? असा प्रश्न समितीने केली असता, सर्व संबंधितांना नोटीस देण्यात आली आहे, उत्तर आल्यानंतर त्याचा अभ्यास करून शासन नियमानुसार कारवाई करेल, असे विभागीय प्रतिनिधींने सांगितले.

पैसे वसुल झाले पाहिजे असे समितीचे म्हणणे आहे. ते पैसे देतील असे समितीला वाटत नाही. विभाग जे टेंडर काढणार आहे त्यामध्ये एम.आर.आय.चे ४ लाख रुपयांच्याऐवजी ८ लाख रुपये मिळतील, असे समितीचे मत आहे. कारण सन २०१० मध्ये एम.आर.आय. व सिटीस्कॅनचे जे रेट होते त्यापेक्षा जास्तीचे रेट आता सुरू झाले आहेत. टेक्निशियन मिळत नाही म्हणून आपण असे केले हे विभागाने मागच्यावेळीबैठकित सांगितले. ते उत्तर काही योग्य नव्हते. कारण मुंबईमध्ये प्रत्येक रेडिओलॉजिस्ट यायला तयार असतो. पण ग्रामीण क्षेत्रामध्ये त्यांना येणे शक्य नाही. त्यामुळे जाणूनबुजून संगनमताने अधिकाऱ्यांनी हे सर्व केलेले आहे. त्याबद्दल डी.एम.ई.आर.सुद्धा कुठेतरी जबाबदार आहे. कारण डी.एम.ई.आर. हे सर्व बघणारच नाही, असे नव्हते.

त्यामध्ये एक चांगली गोष्ट केली व ती म्हणजे विभागाने मशीन व जागा ताब्यामध्ये घेऊन विभागाच्या कर्मचाऱ्यांमार्फत सेवा देण्यास सुरूवात केली. परंतु त्याचबरोबर दुसऱ्या बाजुला आपण केलेली कारवाई ही केवळ औपचारिकता वाटत आहे.असे समितीने मत व्यक्त केले असता, विभागाने यामध्ये आवश्यक असलेल्या तीन गोष्टी केल्या आहेत. पहिली म्हणजे जागा ताब्यात घेऊन सर्व्हिसेस सुरू केल्या. दुसरी गोष्ट म्हणजे व्हेंडरकडून रकमेच्या वसुलीसाठी त्यांना नोटिस देण्यात आली आहे. त्यासाठी त्यांना एक महिन्याचा वेळ दिला आहे. जर त्यांनी पैसे भरले नाहीत तर विभाग रेव्हेन्यू रिकव्हरी सर्टिफिकेट करु शकतो. त्यांचे प्रॉपर्टी डिटेल्स विभागा आहेत. त्यामुळे विभाग जिल्हाधिकारी यांच्याकडे आर.आर.सी. करु शकतो किंवा या प्रकरणी सिव्हिल दावा देखील दाखल करु शकतो. परंतु प्रॉपर्टी डिटेल्स असल्यामुळे आर.आर.सी. करणे जास्त योग्य राहील, असे मत आहे. संबंधितांकडून उत्तर आल्यानंतर याबाबतचा निर्णय आपणास घेता येईल. अधिकाऱ्यांना देखील प्रचलित पध्दतीनुसार नोटिसा देण्यात आल्या असून त्यांचे उत्तर आल्यानंतर सविस्तर चार्जेस फ्रेम करण्यात येतील व दोषींवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल. म्हणजेच लोकांना सर्व्हिसेस देणे सुरू आहे, त्याचबरोबर अधिकाऱ्यांवरही कारवाईची प्रक्रिया सुरू आहे व वसुलीबाबतची कार्यवाही देखील सुरू झालेली आहे, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

अभिप्राय व शिफारशी :-

परिच्छेद क्रमांक ३.१२ "आरोग्य क्षेत्रातील सार्वजनिक खाजगीकरण भागीदारी व्यवस्थेतील अभिकरणाला अदेय फायदा"

अभिप्राय

६.१ वैद्यकीय शिक्षण आणि औषधी द्रव्ये विभागाने मॅग्नेटिक रेझोनन्स इमेजिंग (एमआरआय) आणि कंम्प्युटराईज्ड टोमोग्राफी (सीटी) स्कॅन यंत्र वापरण्यासाठी बाह्य स्त्रोताद्वारे कार्यान्वित करण्याचे आणि या यंत्राद्वारे तयार केलेले रोगनिदान अहवाल, जे अभिकरण शासनाला सर्वाधिक मासिक शुल्क देईल त्यांना देण्याची संमती (सप्टेंबर २००९) दिली. त्यानुसार अधिक्षक, गोकुळदास तेजपाल रुग्णालय यांनी फर्स्ट केअर प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई (अभिकरण) यांचेशी, दोन्ही सेवा कार्यरत करण्यासाठी हवाली केल्याच्या तारखेपासुन तीन वर्षांसाठी सार्वजनिक खाजगी भागीदारी अंतर्गत करार केला (सप्टेंबर २००९). एमआरआय मशीन आणि सीटी स्कॅन यंत्र, अभिकरणाला अनुक्रमे दिनांक १ डिसेंबर,२०१० आणि ५ मार्च,२०१२ ला वापरण्यासाठी हवाली केले गेले. कराराच्या खंड १५ मध्ये विहित केल्यानुसारवापर सुरू केल्याच्या तारखेपासुन अभिकरण प्रत्येक यंत्राच्या भाड्यापोटी मासिक रु.४.०२ लाख अदा करणार होते. परंतु जरी अभिकरण एमआरआय यंत्राचे मासिक भाडे नियमीतपणे देत होते तरी, सीटीस्कॅन यंत्राचे मासिक भाडे ते वापरण्यासाठी घेतल्यापासून म्हणजे ५ मार्च,२०१२ पासून दिलेले नव्हते. खाजगी रुग्ण हे शासकीय रुग्ण म्हणून पाठविले जात असल्यामुळे व शासकीय आणि खाजगी दरात खूप तफावत असल्यामुळे सीटी स्कॅन प्रकल्प हा व्यवहार्य नाही अशी हरकत अभिकरणाने घेतली. अभिकरणाने सार्वजनिक खाजगीकरण भागीदारी कराराच्या खंड २० नुसार हा प्रकल्प व्यवहार्य आणि यशस्वी होण्यासाठी दोन्ही पक्षांना मान्य होईल असा उपाय काढण्याची वैद्यकीय शिक्षण आणि औषधीद्रव्ये विभागाला विनंती (फेब्रुवारी २०१२) सुध्दा केली होती.

अभिकरणाने माहे ऑगस्ट,२०१४ पर्यंत अनुक्रमे १३,५७० आणि २,०६२ खाजगी रुग्णांचे एमआरआय आणि सीटीस्कॅन केले होते ज्यासाठी रु.४.३८ कोटी शुल्क गोळा केले होते त्या उपरांत भाड्यापोटी रु. २.६५ कोटी देय होते, जरी अभिकरणाने सिटीस्कॅन यंत्राच्या भाडे न भरण्याची बाब वैद्यकीय शिक्षण आणि औषधीद्रव्ये विभाग आणि संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन (डीएमईआर) यांच्या निदर्शनास (जानेवारी,२०१६) आणून देखील, अधिक्षक यांनी अभिकरणाच्या तोट्याच्या दाव्याची सत्यता पडताळणी व सार्वजनिक-खाजगीकरण भागीदारीच्या कराराच्या शर्तीनुसार देय असलेल्या भाड्याच्या वसुलीसाठी कोणतीही कारवाई केली नव्हती. तसेच अभिकरणाने भाड्याची रक्कम विलंबाने दिल्यास किंवा दिलीच नसल्यास त्याबाबत दंडाची तरतूद केली नव्हती. तसेच सार्वजनिक खाजगीकरण भागीदारी करारातील खंड १९ नुसार अभिकरणाला तीन महिन्यांची नोटीस देऊन सार्वजनिक खाजगीकरण भागीदारी करार संपुष्टात आणण्यासाठी कुठल्याही कारवाईला सुरूवात केली नव्हती.तसेचएमआरआय मशीनचा करार दि.१ डिसेंबर,२०१३ ला आणि सीटी स्कॅन यंत्राचा करार दि.५ मार्च,२०१५ ला संपलेला असतांनाही, सार्वजनिक खाजगीकरण भागीदारी च्या कराराची कायदेशीर अंमलबजावणी न करता ती तशीची पुढे ठेवली गेली होती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

भाडे भरण्यास विलंब झाल्यास अथवा भाडे न भरल्यास दंडासंदर्भात करारनाम्यात कोणतेही कलम नव्हते आणि भाडे भरण्यास अभिकरणाची इच्छा नसल्याबाबत संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांना कळविण्यात आले होते. त्याचप्रमाणे, रुग्णांना ह्या सेवा पुरविण्याची आवश्यकता लक्षात घेऊन करारनाम्याची कालमर्यादा समाप्त होऊन देखील अभिकरणास मशीन चालवण्यास परवानगी दिली होती व करारनाम्याचे नुतनीकरण करण्याची कार्यवाही शासन स्तरावर करावयाची होती असा खुलासा अधिक्षक, जी.टी. रुग्णालय यांनी केला.

परंतु सार्वजनिक खाजगीकरण भागीदारी व्यवस्थेअंतर्गत सीटी स्कॅन सेवांसाठी अभिकरणाकडून देय असलेली रक्कम वसूल करण्यात अधिक्षक, गोकुळदास तेजपाल रुग्णालय अपयशी ठरल्यामुळे रु. २.६५ कोटीची वसुली केली गेली नव्हती, याशिवाय कायदेशीर करार न करता शासकीय मालमत्ता अवैधरित्या खाजगी अभिकरणाच्या ताब्यात ठेवली ही वस्तुस्थिती कायम राहते.

विभागाच्या नियंत्रणाखालील गोकुळदास तेजपाल रुग्णालयात गरजू व गरीब रुग्णांसाठी एमआरआय व सीटी स्कॅन चाचण्यांची सुविधा निर्माण होण्यासाठी एमआरआय व सीटी स्कॅन ही यंत्रसामुग्री प्रस्थापित केली होती व सदर यंत्रसामुग्री चालविण्यासाठी मे.फर्स्ट हेल्थ केअर या कंपनीशी सामंजस्य करार करून सदर सामंजस्य करारात सीटी स्कॅन व एमआरआय या प्रति यंत्रासाठी रु. ४,०१,५०२/- प्रति माह इतके मासिक भाडे ठरविण्यात आले होते.

परंतु सीटी स्कॅन सेवा प्रकल्प अव्यवहार्य ठरत असल्याने दोन्ही पक्षकाराच्या सामंजस्याने सदर प्रकल्प व्यवहार्य व यशस्वी होण्यासाठी निर्णय घेणेबाबत संबंधित पुरवठादाराने विभागाला केलेल्या विनंतीवर तसेच शासन शासकीय रुग्णांचा नेमून दिलेला कोटा सेवा पुरवठादाराकडे पाठवू शकले नसल्याने सेवा पुरवठादार खाजगी रुग्णांना सीटी स्कॅन चाचण्यासाठी आकर्षित करू शकला नाही. याउपर सदर सीटी स्कॅन केंद्र चालविण्यासाठी त्यांना प्रतिमाह रु.५,२६,०००/- इतका खर्च येतो.तथापि सदर सेंटरचे उत्पन्न रू.४,५०,०००/- इतके आहे. सबब ही बाब पहाता सदर पीपीपी तत्वावरील योजनेमुळे झालेल्या उपयोगांचा विचार करून कंपनीच्या निवेदनाचा सहानुभूतीपूर्वक विचार व्हावा अशी विनंती संबधित सेवा पुरवठादाराने केली असता यावर कोणतीही उचित कार्यवाही करण्यात आली नाही.

परंतुसंबंधित सेवा सेवापुरवठादाराने एमआरआय यंत्रसामुग्रीचे भाडे मात्र नियमितपणे अदा केलेले आहे. सदर विषयीच्या करारातील तरतूद क्रमांक ३ (ब) अन्वये संबधित एजन्सीला शासकीय रुग्ण वगळता अन्य रुग्णांकडून घ्यावयाचे शुल्क ठरविण्याचा अधिकार देण्यात आला होता. सबब सेवा पुरवठादाराने याबाबत सीटी स्कॅन प्रकल्प तोट्यात चालत असेल तर सदर तरतूदीनुसार सीटी स्कॅन यंत्रसामुग्री प्रकल्प व्यवहार्यरित्या चालण्यासाठी त्याचवेळी उचित कार्यवाही करणे अपेक्षित होते. सदर बाबी पहाता,संबधित सेवा पुरवठादाराने सीटी स्कॅन यंत्रसामुग्रीचे प्रतिमाह भाडे थकबाकी अदा करणे आवश्यक आहे. याविषयी सेवा पुरवठादाराकडून थकलेले भाडे वसुल करण्यासाठी वसुली (रिकव्हरी) संदर्भातील प्रचलित महसुली वा अन्य उचित नियमाप्रमाणे आवश्यक उपयायोजना करण्यात येतील असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले. साक्षीदरम्यान सदर दोन्ही मशिन्स अभिकर्त्याच्या ताब्यात होत्या. सीटी स्कॅनसाठीची देय भाडे रक्कम न भरता तसेच दोन्ही मशिनची (MRI & CT Scan) कराराची मुदत संपून ४ ते ५ वर्षे उलटून गेल्यानंतरही कोणताही करार व भाड्याचा पुनर्विचार वा रकमेचे पुनर्निधारण न करता अभिकर्त्याद्वारे या मशिन्सचा वापर सुरूच राहिला ही निश्चितच गंभीर बाब आहे.

शिफारस

६.२ सार्वजनिक खाजगी भागीदारी व्यवस्थेअंतर्गत सीटी स्कॅन सेवांसाठी सेवा पुरवठादाराकडून देय असलेली रक्कम वसूल करण्यात अधिक्षक, जी.टी. रुग्णालय अपयशी ठरल्यामुळे रु.२.५३ कोटी भाडे वसुली केली गेली नाही, याशिवाय कायदेशीर करार न करता शासकीय मालमत्ता खाजगी सेवापुरवठादाराने अवैधरित्या ताब्यात ठेवली असे आक्षेप महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदात नमूद केले आहेत.

गोकुळदास तेजपाल रुग्णालयात गरजू व गरीब रुग्णांसाठी एमआरआय व सीटी स्कॅन चाचण्यांची सुविधा मिळणेकरिता एमआरआय व सीटी स्कॅन यंत्र वापरण्यासाठी बाह्यस्त्रोताद्वारे कार्यान्वित करून त्यासाठी फर्स्ट केअर प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई यांचेशी सार्वजनिक खाजगी भागीदारीअंतर्गत करार केला व ही यंत्रे वापरण्यास त्या सेवापुरवठादाराच्या हवाली केले. या प्रत्येक यंत्राच्या भाड्यापोटी रु.४.०२ लक्ष इतके मासिक भाडे ठरविण्यात आले होते. परंतु सदरहू कंपनी एमआरआय यंत्राचे मासिक भाडे नियमित देत होते, परंतु सीटी स्कॅन यंत्राचे मासिक भाडे सुरूवातीपासूनच दिलेले नाही. त्याचप्रमाणे सीटी स्कॅन प्रकल्प हा व्यवहार्य नसल्यामुळे कराराच्या खंड २० नुसार हा प्रकल्प व्यवहार्य व यशस्वी होण्यासाठी दोन्ही पक्षांना मान्य होईल असा उपाय काढण्याची वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाला फेब्रुवारी, २०१२ मध्ये विनंती केली. परंतु त्यावर विभागाने सेवापुरवठादाराच्या तोट्याच्या दाव्याची सत्यता पडताळणी व सार्वजनिक खाजगीकरण भागीदाराच्या कराराच्या शर्तीनुसार देय असलेल्या भाड्याच्या वसुलीसाठी कोणतीही कार्यवाही केली नव्हती किंवा करार संपुष्टात आणण्यासाठी कोणतीही कार्यवाही केली नाही. इतकेच नव्हेतर सेवापुरवठादाराच्या भाड्याची रक्कम विलंबाने दिल्यास किंवा दिलीच नसल्यास दंड आकारण्याची कोणतीही तरतूद करारनाम्यात करण्यात आली नव्हती. अशाप्रकारे कोणताही निर्णय न घेतल्यामुळे सीटी स्कॅन मशिनचा वापर सेवापुरवठादाराद्वारे भाडे दिल्याशिवाय सुरूच राहिला. याहीउपर एमआरआय मशिनचा करार दि.१ डिसेंबर,२०१३ व सीटी स्कॅन यंत्राचा करार दि.५ मार्च,२०१५ ला संपलेला असतानाही सार्वजनिक खाजगीकरण भागीदारी कराराची कायदेशीर अंमलबजावणी न करता ती तशीच पुढे ठेवली गेली. भाड्याची रक्कम पुनर्निधारण मुदत संपल्यानंतरही करण्यात आली नाही. परिणामी सीटी स्कॅनच्या भाड्यापोटी रु.२.५३ कोटी वसुली प्रलंबित राहिली. याशिवाय कायदेशीर करार न करता शासकीय मालमत्ता खाजगी सेवापुरवठादाराने अवैधरित्या ताब्यात ठेवली. जी.टी.रुग्णालयाच्या आजुबाजूच्या परिसरात असलेल्या सेंट जॉर्ज रुग्णालय व कामा रुग्णालयात देखील अशी सुविधा उपलब्ध नव्हती. शासकीय रुग्णालयामध्ये गरीब व गरजू रुग्णांचा असलेला वाढता कल, त्याठिकाणी एमआरआय व सीटी स्कॅन मशिनचा मोठ्या प्रमाणात होत असलेला वापर व आवश्यकता लक्षात घेता वैद्यकीय शिक्षण विभागाने या दोन्ही मशिन खरेदी केल्या. परंतु ते वापरण्यासाठी शासकीय स्तरावर येणाऱ्या प्रशासकीय अडचणी व रिक्त पदांची

संख्या पाहता खाजगी सेवा पुरवठादाराकडून ही यंत्रे चालविण्याचा निर्णय घेण्यामागील हेतू व उद्देश हा निश्चितच चांगला होता. याबाबत समितीचे कोणतेही दुमत नाही. रुग्णांना विनाविलंब या सुविधा प्राप्त होण्यासाठी अपवादात्मक परिस्थितीत प्रायोगिक तत्वावर असे निर्णय घेणे काही ठिकाणी आवश्यक ठरते. परंतु त्याची अंमलबजावणी करताना विभागाने व रुग्णालय प्रशासनाने करारातील अटी शर्तींची अंमलबजावणी व त्याअनुषंगाने सेवा पुरवठादार संस्थांकडून शासनाला प्राप्त होणारी रक्कम याबाबत काटेकोर अंमलबजावणी करणे आवश्यक असताना त्याकडे निश्चितच दुर्लक्ष झालेले आहे. याशिवाय सेवापुरवठादाराने विभागाकडे नोंदविलेल्या आक्षेपांची कोणतीही दखल न घेता वा त्याची सत्यता पडताळून न पाहता या बाबी शासनस्तरावर अमर्याद कालावधीकरिता निर्णयाविना प्रलंबित ठेवल्यामुळे अप्रत्यक्षरित्या याचा पुर्ण फायदा त्या सेवा पुरवठादार संस्थेला झाला ही निश्चितच गंभीर बाब आहे. या संस्थेसोबत झालेला करार संपुष्टात आल्यानंतरही त्याच सेवा पुरवठादाराद्वारे या मशिन अमर्याद कालावधीकरिता वापरात राहिल्या, ही बाब निश्चितच अयोग्य व असमर्थनीय आहे. उपरोक्त वस्तुस्थिती व विभागाच्या स्तरावरुन या प्रकरणी झालेले दुर्लक्ष व विलंब विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर मान्यच केले. सीटी स्कॅन मशिनच्या भाड्यापोटीची रक्कम वसुली करून हा करार संपुष्टात आणण्यासंदर्भातील निर्णय आता घेणे आवश्यक असल्याचेही विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर मान्य केले व या प्रकरणी चौकशी समिती स्थापन करण्यात आली असून यासंदर्भात जबाबदारी निश्चित करण्याचे काम सुरू असल्याचेही समितीसमोर सांगण्यात आले. तसेच जी.टी. रुग्णालयासारख्या मोक्याच्या ठिकाणी असलेल्या रुग्णालयात येणाऱ्या शासकीय व खाजगी रुग्णांची संख्या पाहता सदरहू सेवा पुरवठादार सीटी स्कॅन संदर्भात तोट्यात असल्याचे म्हणणे मान्य करण्यायोग्य नाही व याची छाननी वा सत्यता पडताळणी देखील विभागाने विहित वेळेत केली नाही. याहीउपर या व्यवहारात होणाऱ्या फायदा वा तोट्याची जबाबदारी पुरवठादार कंपनीचीच होती व विभागाने करारानुसार ही रक्कम वसुल करणे अभिप्रेत होते. सेवा पुरवठादाराद्वारे देण्यात येणाऱ्या सेवांमध्ये खंड पडल्यास त्याचा थेट परिणाम रुग्णांना सोसावा लागणार असल्यामुळे विभागाद्वारे कालबध्द पध्दतीने ही कार्यवाही झाली नाही व प्रकरण शासनस्तरावर निर्णयार्थ विचारात ठेवण्यात आले. जवळच्या सेंट जॉर्ज रुग्णालय व कामा रुग्णालयामध्ये देखील या सुविधा उपलब्ध नसल्यामुळे रुग्णांच्या सोईसाठी नाईलाजास्तव ही सेवा पुढे सुरू ठेवावी लागली व या मागील हेतू जरी सेवा बंद होवू नये व या सेवा रुग्णांना अविरत प्राप्त होत राहाव्यात ही देखील वस्तुस्थिती असली तरीही शासनस्तरावर या बाबींवर वेळेत निर्णय होणे आवश्यक होते असे समितीचे स्पष्ट मत आहे. जर सीटी स्कॅन मशिनचे उत्पन्न भाड्याच्या रकमेपोटी निश्चित केलेल्या रकमेपेक्षा कमी होते तर विभागाने यासंदर्भात या सर्व बाबींची पडताळणी व छाननी करून सेवा पुरवठादार संस्थेसोबत चर्चा व समन्वय ठेवून वेळेत निष्कर्षाप्रत व निर्णयाप्रत येणे आवश्यक होते. तसेच करार संपण्याअगोदरच यासंदर्भातील नविन निविदा काढण्याची कार्यवाही विभागाने करणे आवश्यक होते. परंतु या प्रकरणी काहीच न करणे निश्चितच समर्थनीय नाही. इतकेच नव्हेतर सेवा पुरवठादार संस्थेने वेळेत रकमेचे प्रदान केले नाही तर त्यांचेवर दंड आकारण्याची तरतूद देखील करारामध्ये समाविष्ट करण्यात आली नव्हती ही देखील कायदेशीरदृष्ट्या निश्चितच अयोग्य बाब आहे. अशा परिस्थितीत भाड्यापोटीच्या रकमेचे प्रदान करण्याची कोणतीही घाई निश्चितच अशा संस्थांना राहणार नाही. शासनाने त्यांना प्राप्त होणाऱ्या महसूलाबाबत तांत्रिक व कायदेशीरदृष्ट्या सजग राहिले पाहिजे असे समितीचे स्पष्ट मत आहे.

आता विभागाने संबंधित सेवा पुरवठादार संस्थेसोबत असलेला करार रद्द करण्याची कार्यवाही सुरू केली असून एमआरआय व सीटी स्कॅन सेंटरचा ताबा शासनाकडे घेण्यात आलेला असून त्या मशिन आता विभागामार्फत चालविण्यात येत असून पुन:श्च निविदा काढण्याची बाब अंतिम मान्यतेकरिता मा.मंत्री महोदयांकडे प्रस्तावित करण्यात आली आहे. तसेच सदरहु सेवा पुरवठादार संस्थेकडून थकीत रक्कम वसुल करण्यासंदर्भात त्यांना नोटीस बजाविण्यात आलेली आहे व या प्रकरणी संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांना देखील नोटीस देण्यात आली असून त्यांचे उत्तर प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार कारवाई करण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस आश्वासित केले. अत: या सेवा पुरवठादार संस्थेकडून संपुर्ण रक्कम वसुल करण्यात यावी व ही रक्कम नियमितरित्या वसुल न झाल्यास महसूली वसुली (Revenue Recovery) म्हणून वसुल करण्यात यावी. सदरहु सेवा पुरवठादार संस्थेस काळया यादीत समाविष्ट करण्यात यावे व या प्रकरणी मागविण्यात येणाऱ्या पुनर्निविदेत सहभागी होण्यास या सेवा पुरवठादार संस्थेस परावृत्त करण्यात यावे. तसेच करार संपुष्टात आल्यापासून ते मशिन ताब्यात घेईपर्यंतच्या कालावधीतील वसुलीसंदर्भातील रकमेची देखील निश्चिती करून ती वसुल करण्यात यावी. ही रक्कम निश्चिती करताना एमआरआय व सीटीस्कॅनचे वेळोवेळी वाढलेले दर देखील विचारात घेऊनच ही रक्कम निश्चिती करावी व संपुर्ण रक्कम वसुल करण्यात यावी. तसेच या मशिनच्या भविष्यातील वापरासंदर्भात योग्य तो निर्णय शासनस्तरावरुन घेण्यात यावा व या

प्रकरणी संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्याबाबत विभागीय प्रतिनिधींनी आश्वासित केल्याप्रमाणे थकीत रकमेच्या वसुलीकडे दुर्लक्ष केलेल्या व चुकीचे करारनामे तयार करणाऱ्या संबंधित जबाबदार अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी. तसेच भविष्यात बाह्यस्त्रोतीकरणाद्वारे (Out Sourcing) अशाप्रकारची कार्यवाही करून राबवावयाच्या विशिष्ट प्रक्रियेसंदर्भात नियम व धोरण निश्चित करण्यात यावे व अशा व्यवहारांमध्ये करावयाच्या करारात शासन हिताच्या सर्वच अटींचा स्पष्टपणे समावेश करण्यात यावा व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

नगरविकास विभाग

७.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१६-१७ या वर्षाच्या सामान्य सामाजिक क्षेत्र अहवालात महालेखापालांनी खालीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले आहेत.

परि.क्र.	स्पष्टीकरणात्मक ज्ञापने	प्राधिकरणाचे अभिप्राय	शासनाचे अभिप्राय
३.५	**खाजगी विकासकाला अदेय फायदा** **मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी खाजगी विकासकाने भाडेपट्टाकरार व अधिमूल्य शर्तींचे उल्लंघन करीत बांधकामास केलेल्या विलंबाबद्दल ₹ ४२८ कोटींचे अतिरिक्त अधिमूल्य व त्यावरील व्याज वसूल केले नाही.** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने उच्चतम बोलीदार मे. रिलायन्स इंडस्ट्रीज लि. (प्राप्तकर्ता) ला बांद्रा-कुर्ला संकुलातील जी ब्लॉकमधील १०,१८३.१८ चौ.मी. चा भूखंड क्र. सी-६६ ८० वर्षांच्या भाडेतत्वावर दिला (डिसेंबर २००७). प्राधिकरणाने प्राप्तकर्त्याबरोबर केलेल्या भाडेपट्टाकरारानुसार (१५ जूलै, २००८) भूखंडावर बहुमजली वाहनतळ व व्यापारी संकुल यासाठी ३,००,५०१ चौ. मी. चे अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र होते आणि एकूण भाडयाचे अधिमूल्य ₹ ३,००,५०१ प्रति चौ.मी. प्रमाणे ₹ ९१८.०३ कोटी होते. संकुल बांधकामाचा एकूण कालावधी १४ जूले, २०१२ पर्यंत म्हणजेच एकूण चार वर्षांचा होता. परंतू, बांधकामास झालेल्या विलंबासाठी भाडे अधिमूल्याच्या विहित दरानुसार अतिरिक्त अधिमूल्याचे प्रदान करुन म्हणजेच बांधकामाच्या तीन वर्षांपर्यंतच्या विलंबाला १० टक्के प्रतिवर्ष	(१) वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "इ" व "जी" ब्लॉकमधील जमीन प्राधिकरणाच्या मालकीची असून प्राधिकरण या जमिनीचे वाटप मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण जमीन विल्हेवाट अधिनियम-१९७७ अंतर्गत अधिमूल्य आकारुन ८० वर्षांसाठी भूखंड भाडेपट्टयाने वाटप करीत असते. -(२) सदर अधिनियमानुसार भाडेपट्टा केल्यापासून ४ वर्षाच्या कालावधीत भाडेपट्टेदाराने भूखंडावरील बांधकाम पूर्ण करणे अपेक्षित असून सदर ४ वर्षाच्या कालावधीत (भाडेपट्टेदाराच्या आवाक्याबाहेरील कारणास्तव) बांधकाम पूर्ण न झाल्यास अशा वेळी महानगर आयुक्त अतिरिक्त अधिमूल्य आकारुन या कालावधीत वाढ देऊ शकतात. (३) प्राधिकरणाच्या वांद्रे-कुर्ला संकुलातील भाडेपट्टेदारांनी प्राधिकरणास बांधकाम पूर्णत्वाचा कालावधी ४ वरुन ६ वर्ष एवढा वाढवून मिळावा अशी विनंती केली होती. त्याबाबत प्राधिकरणाने दिनांक २६/०८/२०१५ रोजीच्या १३८ व्या बैठकीत निर्णय घेतला आहे की, याबाबत सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त	भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक याच्या सन २०१६-१७ या वर्षाच्या सामान्य व सामाजिक क्षेत्र अहवालातील सदर परिच्छेदाच्या अनुषंगाने मा. प्रधान सचिव यांची दि. २७.१२.२०१८ रोजी साक्ष झाली आहे. सदर साक्षीच्यावेळी मा. लोकलेखा समितीने सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. २६५४/२०१७ मध्ये दिनांक १२ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या निर्णयामुळे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास भूखंडाच्या भाडेपट्टेदाराकडून येणे असलेली थकबाकी व त्यानुषंगाने दंड वसुल न करता आल्याने प्राधिकरणाच्या महसूल वसूल होत नसल्यामुळे शासनाचे

आणि तीन वर्षांपुढे १.५ टक्के प्रतिवर्ष याप्रमणे महानगर आयुक्त सदर कालावधी वाढवून देऊ शकतात. अतिरिक्त अधिमूल्य प्रदान न केल्यास १४ टक्के (भाडेपट्टा कराराचा खंड २ ई) दंडनीय व्याज होऊ शकते.

महानगर आयुक्त मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अभिलेख तपासणीत (मार्च २०१७) आढळून आले की भाडेपट्टाकरारात नमूद केलेल्या विहित कालावधीत काम पूर्ण झाले नव्हते. प्राधिकरणाने प्राप्तकर्त्याला भाडेकराराप्रमाणे देय रक्कम व्याजासहित प्रदान करण्याबाबत नोटीस (ऑगस्ट २०१४) बजावली. जर ते ₹ ३१२.९८ कोटींची अतिरिक्त अधिमूल्यांची व्याजासहित थकबाकी जून, २०१४ पर्यंत भरण्यास अपयशी ठरल्यास, प्राधिकरण, आरंभ प्रमाणपत्र (कमेन्समेंट सर्टिफिकेट) रद्द करेल आणि पुढे भाडेनिश्चितती करेल आणि मालमत्ता ताब्यात घेईल व देय रक्कमेची वसूली जमीन महसूलाच्या थकबाकीप्रमाणे करेल. परंतू रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड ने दावा (सप्टेंबर २०१४) केला की भूखंडाच्या सीमारेषा ठरविण्यात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने विलंब केल्यामुळे उल्लेखिलेली वसूली देय नाही आणि भूखंडालगतच्या रस्त्याचे सध्या असलेल्या ३० मीटर वरुन ३९ मीटर पर्यंत रुंदीकरण होणार होते. प्राधिकरणाने त्यांच्यामुळे बांधकाम सुरु करण्यास विलंब झाल्याचा प्राप्तकर्त्याचा दावा फेटाळला (नोव्हेंबर २०१४) आणि ते बांधकामाच्या विलंबासाठी अतिरिक्त अधिमूल्य भरण्यास बाधित होते असे कळविले त्यानंतर प्राप्तकर्त्याने केलेल्या अर्धवट बांधकामाकरीता अंशत: भोगवटा प्रमाणपत्र जारी करण्याची विनंती (मे २०१५) केली. एकूण न्यायाधीश किंवा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश यांची एक सदस्यीय समिती नेमून त्यांचा अहवाल घ्यावा. असा अहवाल प्राधिकरणाने घेतला असून तो प्राधिकरणाच्या बैठकीसमोर सादर केला जाईल व प्राधिकरणाच्या मान्यतेनुसार उर्वरीत अधिमूल्याची वसूली केली जाईल.

(४) महानगर आयुक्त यांना प्राधिकरणास येणे असणारी सर्व रक्कम वसूल करण्याचे अधिकार असून या अधिकारांचा वापर करुन तसेच प्राधिकरणास प्राप्त अधिमूल्याच्या प्रमाणात विषयांकित प्रकरणी सी-६६ या भूखंडासाठी अंशत: भोगवटा प्रमाणपत्र दिनांक २९/०५/२०१५, दिनांक २१/१२/२०१५ व दिनांक २३/०२/२०१७ रोजी दिले आहे.

(५) तरी देखिल भाडेपट्टेदाराने बांधकाम पूर्णत्वाच्या वाढीव कालावधीचे अधिमूल्य न भरल्यामुळे प्राधिकरणाने दिनांक १२/०९/२०१७ रोजी भूखंडाचा ताबा परत घेण्याबद्दल भाडेपट्टेदाराविरोधात व इतर भाडेपट्टेदारांविरोधात नोटीस देखिल बजावली आहे.

(६) प्राधिकरणाच्या दिनांक १२/०९/२०१७ रोजीच्या नोटीसच्या विरोधात विषयांकीत भूखंडाच्या भाडेपट्टेदाराने मा. उच्च न्यायालयात (W.P.(L) No. २६५४/२०१७) दावा सादर केला आहे.

(७) विषयांकित भूखंडाच्या भाडेपट्टादारांव्यतिरिक्त इतर भाडेपट्टेदारांनी देखिल (ज्यांना प्राधिकरणाने अशीच नोटीस दिली आहे) अशाच प्रकरणात मा. उच्च न्यायालयात दावा सादर केला आहे. त्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाने दिनांक मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याची बाब साक्षीच्या वेळी निदर्शनास आणली आहे. याबाबत मा. लोकलेखा समितीने मा. उच्च न्यायालयाच्या सदर आदेशाच्या विरोधात पुनर्विलोकन याचिका किंवा विशेष अनुमती याचिका दाखल करण्याचे निर्देश दिले आहे. तसेच यापुढे सदर भूखंडाच्या अनुषंगाने मे. रिलायन्स इंडस्ट्रीस लि. यांना आरंभ प्रमाणपत्र (CC) व भोगवटा प्रमाणपत्र (OC) न देण्याचे निर्देश दिले आहे.

सदर प्रकरणी लोकलेखा समितीने दिलेल्या निर्देशानुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत पुढील कार्यवाही होणे आवश्यक आहे. याबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास दिनांक ०१.०१.२०१९ रोजीच्या पत्रान्वये सूचना देण्यात आल्या आहेत.

सदर परिच्छेदाच्या अनुषंगाने महालेखाकार कार्यालयाकडून प्राप्त

३०,५५० चौ.मी. बांधीव क्षेत्रापैकी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने १६,१३१.५४ चौ.मी. साठी अंशत: भोगवटा प्रमाणपत्र जारी केले आणि उरलेल्या १४,४१८.४६ चौ. मी. बांधीव क्षेत्रासाठी अनुक्रमे २९ मे २०१५ व २१ डिसेंबर २०१५ रोजी अंशत: भोगवटा प्रमाणपत्रे जारी केली. परंतू बांधकाम पूर्ण करण्यास झालेल्या तीन वर्ष व एक महिना इतक्या झालेल्या विलंबाकरीता आवश्यक अतिरिक्त अधिमूल्य ₹ २७३.५६ कोटी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने आजपर्यंत (जूलै २०१७) वसूल केले नव्हते. शिवाय जूलै २०१७ पर्यंत न भरलेल्या अतिरिक्त अधिमूल्यावर १४ टक्के व्याजाने म्हणजेच ₹१५४.४५ कोटी सुद्धा वसूल करावयाचे होते. हयामुळे प्राप्तकर्त्याला अदेय फायदा झाला.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी त्यांच्या उत्तरात असे सांगितले (मार्च २०१७) की अंशत: भोगवटा प्रमाणपत्र जारी करण्यात आले आहे व उर्वरीत भागाचा ताबा घ्यायचा बाकी होता. गरज पडल्यास, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला बांधीव परिसरात ज्याची किंमत भाडेपट्टाधारकाकडून प्रलंबित असलेल्या देय किंमतीच्या तुलनेत जास्त आहे. पुन:प्रवेश करता येईल. प्रलंबित एकूण देय रकमेची वसूली झाल्यानंतरच पूर्ण इमारतीसाठी भोगवटा प्रमाणपत्र जारी करण्यात येईल.

तरी देखिल वास्तविकता हीच आहे की देय रक्कमेची वसूली न करताच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी बांधीव क्षेत्रासाठी भोगवटा प्रमाणपत्र जारी केल्यानंतर जवळजवळ दोन वर्षांचा कालावधी लोटल्यानंतर देखिल, वसूल न करण्याच्या १२/१२/२०१७ (**जोडपत्र-१ अ**), दिनांक १७/०१/२०१८ (**जोडपत्र-१ ब**) व दिनांक ३१/०१/२०१८ (**जोडपत्र-१ क**) रोजीच्या अंतरीम आदेशानुसार या प्राधिकरणाने या कंपन्यांच्या उर्वरीत परवानग्या उर्वरीत थकबाकी अधिमूल्य वसूलीचा आग्रह न धरता, कार्यवाही करावी असे आदेश दिले आहेत. सबब, हे प्रकरण न्यायप्रविष्ट असून मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(८) त्या अनुषंगाने प्राधिकरणाने दिनांक ०९/०२/२०१८ रोजी विषयांकीत भूखंडाच्या भाडेपट्टादाराला प्राधिकरणास प्राप्त अधिमूल्याच्या प्रमाणात अंशत: भोगवटा प्रमाणपत्र दिले आहे.

(९) वर नमुद केलेल्या परिच्छेद (३), (५), (६) व (७) प्रमाणे विषयांकीत प्रकरणी प्रथम भोगवटा प्रमाणपत्र (अंशत:) जारी केल्यानंतर जवळजवळ दोन वर्षाच्या कालावधीमध्ये पुढील कार्यवाही सुरु आहे.

वळोवेळी ऑडीट डिपार्टमेंटला असे देखिल कळवले आहे की, गरज पडल्यास, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला बांधीव परिसरात ज्याची किंमत भाडेपट्टाधारकाकडून प्रलंबित असलेल्या देय किंमतीच्या तुलनेत जास्त आहे. पुन:प्रवेश करता येईल.

ऑडीट डिपार्टमेंटने ऑगस्ट, २०१७ मध्ये जो प्रश्न राज्य शासनास पाठविला होता तो राज्य शासनाने या प्राधिकरणाकडे पाठविला होता. सदर प्रश्नास प्राधिकरणाने दिनांक २०/११/२०१७ (**जोडपत्र-२**) रोजी आपले उत्तर ऑडीट डिपार्टमेंटला पाठविले होते व त्याची प्रत नगरविकास विभागास पाठविली होती. सबब, ऑडीट डिपार्टमेंटच्या प्रश्नाचे उत्तर प्रलंबीत नाही.

झालेला अभिप्राय खलील प्रमाणे आहे. .

Copy of writ petition no 2051 of 2017 may be furnished to PAC.

As per the lease deed signed by MMRDA and Reliance industries Ltd., additional premium was to be recovered for delay beyond four years in construction

It may be explained to PAC as to why the additional premium could not be recovered between July, 2012 and September 2017 and waited till the writ petition is filed in the High Court on 12th September, 2017

It was in the interest of the MMRDA to recover the additional premium before giving part OC.

प्रधान महालेखाकार यांच्या उपरोक्त अभिप्रायावर खुलासा सादर करण्याबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास या विभागाच्या दि. 15.01.2019 च्या पत्रान्वये यांना कळविण्यात आले होते. त्यानुषंगाने प्राधिकरणाने सादर केलेला खुलासा सोबत जोडण्यात येत आहे (परि.

	कारणाबाबत उत्तरात काहीच उल्लेख नव्हता. अनुषंगाने असे दिसून आले की धोरणात्मक निर्णयानुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी इतर प्राप्तकर्त्याकडून भाडेपट्टाकरारातील नियोजित कालावधीपेक्षा बांधकामास विलंब झाल्यास नियमितपणे संपूर्ण अतिरीक्त अधिमूल्य (व्याजासहित) वसूल केले होते. तसे मे. जेट एअरवेज (इंडिया) लि. (प्लॉट सी-६८ ₹ २२५.१९ कोटी), ऑईल अँड नॅचरल गॅस कमिशन (प्लॉट सी-६९ अ, ६९ ब ₹ १०२.४३ कोटी) आणि इतर विविध राष्ट्रीयकृत बँका/शासकीय संस्था. म्हणून याबाबतीत प्राधिकरणाने प्राप्तकर्त्यांवर दाखविलेल्या अदेय फायद्याचे स्पष्टीकरण होत नाही. ही बाब ऑगस्ट २०१७ मध्ये राज्य शासनाला संदर्भित करण्यात आली. त्यांचे उत्तर नोव्हेंबर, २०१७ पर्यंत प्रतिक्षित आहे.	या प्राधिकरणाच्या वरील माहितीच्या अनुषंगाने व मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार विषयांकित प्रकरणी पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे. सबब, परिक्षण अहवालातील मुद्दे वगळावेत अशी ऑडीट डिपार्टमेंटला विनंती आहे.	क्र.अ). कृपया प्राधिकरणाचा खुलासा मान्य करण्यात यावा.

कक्ष अधिकारी
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

साक्ष :-

परिच्छेद क्रमांक ३.५ :खाजगी विकासकाला अदेय फायदा

८.१ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात अधिक माहीती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक २७ डिसेंबर २०१८, दिनांक १४ फेब्रुवारी व ४ जून २०१९ रोजी नगर विकास विभागाच्या सचिवांची साक्ष घेतली.

या विषयासंदर्भात लोकलेखा समितीने २६ वा अहवाल सभागृहामध्ये सादर केलेला आहे. त्या अहवालामध्ये रिलायन्सच्या केस संदर्भात सूचना दिल्या होत्या व समितीने २ शिफारशी केल्या होत्या, असे समितीने निदर्शनास आणले असता, समितीचे म्हणणे अगदी योग्य आहे. सदरहू दोन्ही शिफारशी लोकलेखा समितीच्या २६ व्या अहवालातील पृष्ठ क्रमांक ४७८ वर दिलेल्या आहेत. तसेच ४८१ वर वेगळा विषय आहे. या दोन्ही विषयाबाबत समितीला सविस्तर माहिती सादर करण्यात येत आहे.

दिनांक ११ ऑगस्ट, २०१७ च्या २६ व्या अहवालातील पहिली शिफारस अशी होती की, यामध्ये प्राधिकरणाने वेळकाढू धोरण न राबविता तातडीने वसुलीची कार्यवाही करावी. त्याप्रमाणे दिनांक १२ सप्टेंबर, २०१७ रोजी लॅण्ड रिझम्पशनची नोटीस दिली होती. तसेच संबंधितांस यापुढे कोणतेही परमीशन देणार नाही, असे त्यांना सांगण्यात आले होते. तसेच जमीन परत घेण्यात येईल, अशी नोटीस देण्यात आली होती, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने त्यांना दोन वेळेस ऑक्युपेशन सर्टिफिकेट दिले होते, असे समितीने निदर्शनास आणले असता, त्यांना प्रथम पार्ट ओसी दिली होती आणि ते फायनल ओसी पर्यंत आलेले नव्हते, त्यावेळी विभागाने त्यांना या नोटीस दिल्या, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने त्यांना सेकंड ओसी देखील दिली होती, असे समितीने निदर्शनास आणले असता, दोन्ही नोटीस पूर्वीच दिलेल्या आहेत, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

यापैकी एक नोटीस मे, २०१५ मध्ये दिली होती आणि दुसरी नोटीस डिसेंबर, २०१५ मध्ये दिली होती, असे समितीने निदर्शनास आणले असता, या दोन्ही नोटीस पूर्वीच दिलेल्या आहेत. यानंतर विभागाला साक्ष झाली होती. सदरहू साक्षीमध्ये विभागाने समितीला आश्वासन दिले होते व समितीने त्यानुसार शिफारस देखील केली होती. त्यानुसार विभागाने पुढील कार्यवाही केली. तथापि ते उच्च न्यायालयात गेल्यानंतर असे सांगण्यात आले की, पीटीशनरचे ॲप्लीकेशन in accordance with law करा. "But shall not insist upon the demand of amount." पैशासाठी आग्रह न धरता त्यांना सर्व परवानग्या नियमानुसार द्याव्या, अशी उच्च न्यायालयाची ऑर्डर आहे, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

शासनाच्या रिकव्हरीचे काय ? ही फार मोठी रक्कम आहे, असे समितीने सूचित केले असता, रिकव्हरीचा विषय उच्च न्यायालयामध्ये प्रलंबित आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सदरहू रिलायन्स कंपनी उच्च न्यायालयात केव्हा गेली ? असा प्रश्न समितीने केला असता, विभागाची नोटीस प्राप्त झाल्यावर ते उच्च न्यायालयात गेले होते, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

यापूर्वी पैसे वसूल न करता त्यांना Pre-occupation certificate for the building on Plot NoC-६६दिनांक २९.०५.२०१५ रोजी पहिली नोटीस दिली व त्यानंतर दिनांक २१.१२.२०१५ रोजी दुसरी नोटीस दिली होती. नोटीस दिल्यानंतर दिनांक २३ फेब्रुवारी, २०१७ रोजी ओसी दिली. ही माहिती विभागाने दिलेल्या रिप्लायमध्येच आहे. "Pre-occupation Certificate for the building on Plot No.C-६६ on २९.०५.२०१५, २१.१२.२०१५ and २३.०२.२०१७ in proportion with payment received." उच्च न्यायालयाचे आदेश नसताना २३ फेब्रुवारी, २०१७ रोजी ओसी देण्याचे काय कारण होते ? लोकलेखा समितीने सांगेपर्यंत ही बाब विभागाच्या लक्षात आली नाही. However, after that also you are issuing OC. इंग्रजी भाषेतील रिप्लायबूक मधील पान क्रमांक २ मधील दुसरी ओळ पहावी, असे समितीने निदर्शनास आणले असता, ऑगस्ट २०१७ पूर्वीचे सर्व विषय समितीमध्ये एकदा चर्चेला येऊन गेलेले आहेत. त्यानंतर समितीची साक्ष झाली होती व त्यानंतर समितीचा अहवाल तयार झाला. अहवाल आल्यानंतर साक्षीमध्ये विभागाने समितीला दिलेले आश्वासन आणि समितीची शिफारस, या दोन्हीच्या अनुषंगाने विभागाने ऑगस्ट महिन्यानंतर लगेच सप्टेंबर २०१७ मध्ये वसुलीची कार्यवाही सुरू केली होती. परंतु कंपनी उच्च न्यायालयात गेली व त्याला उच्च न्यायालयाने स्टे दिला. जून-जुलै, २०१७ च्या पूर्वीचे मुद्दे या पूर्वी झालेल्या साक्षीमध्ये मांडलेले आहेत. सदरहू साक्षीमध्ये विभागाने समितीला आश्वासन दिले होते व त्या आश्वासनाप्रमाणे समितीने शिफारस केली होती व विभागाने केलेल्या शिफारशीनुसार आम्ही ही कार्यवाही केलेली आहे, असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

विभागाने आपल्या रिप्लायमध्ये असे म्हटलेले आहे की, "Audit Department's question is not pending." महालेखापाल कार्यलयाची ऑडीटची पोझीशन अशी आहे की, विभागाने ऑडीटला रिप्लाय दिला म्हणजे तो ऑडीट पॅरा सेटल झाला असे नाही. या प्रकरणात लीज प्रीमीयम आहे व तो रिकव्हर झालेला नाही. It will remain pending at our side till it is recovered. दुसरी बाब अशी की, विभागाने पार्ट ओसी डिसेंबर २०१५ मध्ये दिलेल्या आहेत. हा मुद्दा जुलै २०१२ नंतरचा आहे. त्यांना ऑगस्ट २०१४ मध्ये नोटीस दिली होती आणि त्यानंतर पार्ट ओसी दिली. पार्ट ओसी दिली नसती आणि पेमेंटवर इनशिष्ट केले असते तर कदाचित ते पेमेंट मिळू शकले असते.

आता तिसरा असा आहे. सन २०१५ मध्ये विभागाने रिप्लायमध्ये मेंशन केलेले आहे की, "It was decided to appoint one man committee of Retired Judge to look into the matter." येथे लीज डीडच्या टर्म्स ॲण्ड कंडिशन अगदी क्लिअर आहेत. असे असताना तेथे रिटायर्ड जजेसची कमिटी अपॉईंट करण्याची आवश्यकता नाही, असे प्रधान महालेखाकार यांनी समितीस अवगत केले.

प्रधान महालेखाकारांनी उपस्थित केलेल्या पहिल्या मुद्याबाबत सांगू इच्छितो की, आम्ही विभाग म्हणून असे म्हणतो की, रिकव्हरीची प्रक्रिया विभागाने सुरू केली. त्यांना रिझम्पशनची नोटीस दिली. त्यानंतर ते उच्च न्यायालयात गेले व उच्च न्यायालयाचा स्टे आला. उच्च न्यायालयाचा जो निर्णय होईल, तो लागू असल्यामुळे ऑडीट पॅरा ड्राफ्ट करावा. समितीने मान्य केले नाही तर ते होणार नाही. त्याबद्दल विभागाचे काही म्हणणे नाही. परंतु विभागाने आपली भूमिका समितीसमोर स्पष्ट केली.दुसरा मुद्दा २०१५ मधील आहे. याबाबत पूर्वीच सांगितले की, these are issues which are already been discussed in this Public Accounts Committee. त्याची उत्तरे त्या त्या वेळी दिलेली आहेत. त्यामुळे आता त्याबद्दल पुन्हा काय बोलणार आहे. तिसरा मुद्दा वन मॅन कमीटीचा आहे. याबाबत मागील साक्षीच्या वेळी तपशीलवार चर्चा केली होती. प्राधिकरणाच्या अधिकार क्षेत्रामध्ये..प्राधिकरणाचे अध्यक्ष माननीय मुख्यमंत्री आहेत. त्यांनी त्यांच्या अधिकार क्षेत्रामध्ये या सर्व विषयावर काही सल्ला देण्यासाठी उच्च न्यायालय/सर्वोच्च न्यायालयातील सेवानिवृत्त जजची समिती नेमावी, असा निर्णय घेतला होता. त्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही...it is not for the Department then to question why the committee was set-up? असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

समिती स्थापन झाल्यानंतर त्यांनी काही सूचना दिलेल्या आहे काय ? असा प्रश्न समितीने केला असता, या विषयावर विभागाने मागील साक्षीच्यावेळी तपशिलवार माहिती दिली होती, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

यातून एकच बाब पुढे येते की, जोपर्यंत लोकलेखा समितीने विभागाला सूचना दिल्या नाही, तोपर्यंत एमएमआरडीए शांत होते. हा विषय साधारणत: ५०० कोटी रूपयांचा आहे ? MMRDA has not taken any action. आता उच्च न्यायालयाचा स्टे मिळाला असून विभाग पुन्हा शांत बसला आहेत. समितीला रीट पीटीशनची प्रत सादर करण्यात यावी. What action has been taken after this step? याचे कारण असे की, या बाबीला जवळपास सव्वा वर्षे झालेले आहेत. वसुली देखील ५०० कोटी रूपयांपेक्षा अधिकची आहे. तरी देखील एमएमआरडीएच्या अधिकाऱ्यांनी ही बाब गांभीर्याने घेतलेली नाही व दिसून येत नाही. एकतर सुरूवातीला त्यांना ते वाटप करण्यात आले. जोपर्यंत लोकलेखा समितीने स्ट्राँग रिकमंडेशन केले नाही, तोपर्यंत आपण कोणतीही कार्यवाही केलेली नाही. त्यानंतर उच्च न्यायालयाच्या स्टे ची बाब पुढे केली जात आहे. The Department should depute Special Counsel to resolve this issue. विभागाच्या मॅन्डेटरी असलेल्या नियमांचे व निकषांचे पालन करूनच दंड आकारण्यात आलेला आहे. तसेच विभागाने जेट एअरवेज, ओएनजीसी कडून दंड वसूल केलेला आहे. परंतु यांच्याबाबत तसे झालेले नाही. यांना सर्व क्लिअरन्स देण्यात आले. आता त्यांनी त्यावर स्टे आणलेला आहे. स्टे असल्यामुळे विभाग शांत बसलेला आहात. What step have you taken? Have you appointed any Special Counsel, have you tried for vacating the stay, whether have you gone for appeal in the Supreme Court? यासंदर्भातील शेवटची सुनावणी केव्हा होती ? अशी विचारणा समितीने केले असता, यामध्ये दोन मुद्दे आहेत. समितीच्या सुचनेप्रमाणे रीट पीटीशनची प्रत व उच्च न्यायालयाच्या सर्व आदेशांच्या ऑर्डर्स, तसेच विभागाच्या बाजूने स्पेशन कॉन्सील आणि महालेखाकार हे स्वत: ॲपीअर होते.., यासंदर्भातील सर्व सविस्तर माहिती समितीला सादर करण्यात येईल.तसेच शेवटच्या सुनावणीचा व इतर सर्व तपशील समितीला सादर करण्यात येईल.

ॲक्शन टेकन रिपोर्टमध्ये २ शिफारशी होत्या. पहिली शिफारस रिकव्हरीची शिफारस होती व त्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली, त्याची माहिती विभागाने आताच दिलेली आहे.दुसरी शिफारस अशी होती की, एमएमआरडीएने एक सिस्टिम करावी की, ज्यामुळे यासंदर्भातील सर्व बाबी लोकांच्या लक्षात येतील. त्यानुसार त्यांनी बिल्डिंग स्वॉफ्टवेअर तयार केलेले आहे व

त्यांच्या एसआरएसमध्ये या तरतुदींचा अंतर्भाव केलेला आहे. जसे की, कमेन्समेंट सर्टिफिकेट दिल्यापासून ठराविक वेळेमध्ये कंम्पलीशन सर्टिफिकेट आणि ऑक्युपेशन सर्टिफिकेट मिळाले नाही तर त्याचा अलर्ट आणि नोटीस आपोआप जनरेट व्हावी. अशा प्रोव्हीजन्स एसआरएसमध्ये (सिस्टिममध्ये) अंतर्भूत आहेत, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

शासनाचे ५०० कोटी रूपये त्यांच्याकडे अडकलेले आहेत. याबाबत एमएमआरडीएने गांभीर्य दाखविले पाहिजे. समितीने मागितलेली माहिती सादर करावी. परंतु या पूर्ण केसमध्ये समितीने केलेल्या शिफारशीनंतर मीडीयामध्ये बरीच चर्चा झालेली आहे.प्राधिकरणाने संबंधितांना सन २०१४ मध्ये नोटीसा दिल्या होत्या. त्यानंतर त्यांना नियमित करण्यात आले. नोटीसा देऊन त्यांचा दावा फेटाळला. तरीही त्यांना सन २०१५ मध्ये भोगवटा प्रमाणपत्र कसे दिले ? सन २०१५ मध्ये २ नोटीस दिल्या आणि सन २०१७ मध्ये १ नोटीस दिली व फेब्रुवारी, २०१७ मध्ये ओसी देखील दिली.सर्व माहीत असूनही ऑक्युपेशन सर्टिफिकेट कोणी दिले होते व त्याला कोण जबाबदार आहे ?यासंदर्भातील जबाबदारीबाबत मागील साक्षीमध्ये चर्चा उपस्थित केली होती. शेवटी पैसे वसूल झाले पाहिजे. अहवाल सभागृहाला सादर करण्यापूर्वीच विभागाने सर्व परवानग्या दिल्या तसेच महालेखाकारांच्या पॅरावर साक्षी सुरू असताना सर्व मान्यता दिल्या दिनांक २३ फेब्रुवारी, २०१७ रोजी ओसी दिली होती व तेव्हा महालेखाकार यांच्या परिच्छेदावर लोकलेखा समितीची साक्ष सुरू होती. याबाबत लोकलेखा समितीने कमीतकमी १५ ते २० बैठका घेतल्या. लोकलेखा समितीमध्ये दिनांक ४ मे, २०१६ पासून या परिच्छेदावरील साक्ष सुरू झाली होती. त्यानंतर समितीने ऑगस्ट, २०१७ मध्ये अहवाल सादर केला. समितीने केवळ या विषयावर १५ ते २० बैठका घेतल्या. असे असताना विभागाने सर्व मान्यता दिल्याआहेत. इमारत बांधलेली आहे. विधिमंडळाच्या महत्त्वाच्या असलेल्या लोकलेखा समितीमध्ये साक्ष किंवा चर्चा चालू असताना विभागाने त्यांना शेवटची ओसी द्यायला नको होती. परंतु विभागाने त्यांना ओसी दिलेली आहे व मला या बाबीचे समितीला खूप आश्चर्य वाटत आहे.

यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांवर वरिष्ठ अधिकाऱ्यांनीच जबाबदारी निश्चित करून पुढील कार्यवाही करावी व पैसे वसूल करावे. जोपर्यंत अधिकारी मनावर घेत नाही, तोपर्यंत पैसे वसूल होणार नाही. विभागाने त्यांना ओसी दिली असेल तर त्यांना कन्सर्न ऑथॉरिटीने नो-ड्युस सर्टिफिकेट दिले असेल. कन्सर्न ऑथॉरिटीच्या नो-ड्युस सर्टिफिकेटशिवाय ओसी होत नाही, असे समितीने निदर्शनास आणले असता, विभागाला ओसी द्यायचीच नव्हती. विभागाने त्यांना रिझम्पशनचीच नोटीस दिली होती. परंतु आता उच्च न्यायालयानेच विभागाला आदेश, दिले असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

सदर निकाल उच्च न्यायालयाच्या सिंगल बेंचचा आहे की संयुक्त बेंचचा आहे ? असा प्रश्न समितीने केला असता, न्या. कुलकर्णी यांच्या कोर्टाने सदर आदेश दिलेले आहेत, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने याबाबत रिव्हयू पिटीशन दाखल करणार आहात की सर्वोच्च न्यायालयामध्ये जाणार आहात ? कारण माननीय उच्च न्यायालय जर अशा प्रकारचा आदेश देत असेल तर विभाग सर्वोच्च न्यायालयामध्ये गेले पाहिजे.After directives of High Court what permissions have you given to them? अशी विचारणा समितीने केली असता, माननीय उच्च न्यायालयाच्या आदेशापूर्वी विभागाने सर्व परवानग्या दिल्या असे नाही. विभागाने दोन पार्ट ओ.सी. दिल्या होत्या, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

हा विषय केवळ रिलायन्स इंडस्ट्रीजपुरता नसून संपूर्ण 'जी ब्लॉकचा' आहे. विभागाने यामध्ये जी रिकव्हरी क्लेम केली आहे ती अमाउंट मोठी दिसते याचे कारण यांचा एरिया मोठा आहे. अशा प्रकारच्या रिकव्हरीज दुसऱ्यांकडून देखील केल्या आहेत काय ?इतरांकडून जर रिकव्हरीज केल्या आहेत तर यांचेकडूनच का नाही ? हे जावई आहेत का? जी ब्लॉकमधील इतरांकडून रिकव्हरी केली असेल तर यांचेकडूनही केली पाहिजे. कोर्ट म्हणजे या देशाचे मालक नाही. संसदेने केलेल्या कायद्यांच्या आधारे कोर्ट चालते. नियमाला कसे वाकवायचे हे न्यायालयाला कळत असेल तर ते समितीलाही कळते. हे रेकॉर्डवर घेऊन न्यायालयाला दाखवावे की, लोकलेखा समिती ठाम भूमिका घेत आहेत. न्यायालायाला विरोधात जर कन्टेम्प्ट फाईल करायचा असेल तर करु द्या. परंतु हे काय आहे की, जी ब्लॉकमधील इतर लोक पैसे भरतात व केवळ रिलायन्स इंडस्ट्रीजला पैसे भरण्यास सांगितल्यानंतर ते न्यायालयामध्ये जातात व न्यायालय सांगते की त्यांना ओ.सी. द्या. जी ब्लॉकमधील इतर लोकांनी पैसे भरले असताना पैसे न भरणारी रिलायन्स इंडस्ट्री कोण आहे ? याबाबत अधिक माहिती द्यावी. कारण लोकलेखा समितीच्या निर्देशानुसार विभागाने दिलेल्या नोटिशीच्या विरोधात रिलायन्स कंपनी न्यायालयामध्ये गेली. न्यायालयामध्ये जाण्याअगोदरच विभागातील अधिकाऱ्यांच्या मेहरबानीने त्यांना ओ.सी. देण्यात आली होती. ना देय प्रमाणपत्र न घेताच शेवटची परवानगी फेब्रुवारी, २०१७ मध्ये देण्यात आली. लोकलेखा समितीसमोर याबाबतचा प्रस्ताव आला असतानाही विभागाने कोणतीही काळजी घेतली नाही, ही वस्तुस्थिती आहे.माननीय न्यायालयाच्या आदेशाने ओ.सी. देण्यात आले की त्याअगोदरच पार्टली ओ.सी. दिले गेले होते ? अशी विचारणा समितीने केली असता, सदर प्लॉट विकसित झाल्यानंतर त्याला वेगवेगळया वेळी टप्प्याटप्प्याने सी.सी. व ओ.सी. देण्यात आलीआहेत, असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

विभागाने टप्प्याटप्प्याने ओ.सी. दिले परंतु त्या-त्या वेळी डयूज बाकी नव्हते का ? समजा त्यांचे १० फ्लोअर आहेत. त्यापैकी विभागाने पार्टली ओ.सी. दोन किंवा तीन फ्लोअरच्या दिल्या. त्यावेळी काही डयूज बाकी होते का ? अशी विचारणा समितीने केली असता, दिनांक १५.०७.२००८ रोजी लिज डिड झाली. त्यानंतर ४ वर्षांच्या आत म्हणजे दिनांक १५.०७.२०१२ पर्यंत सदर भूखंड विकसित करणे आवश्यक होते. परंतु डिले सुरु झाला व त्यानंतर पेनाल्टी लागू होते, असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

एफ.एस.आय. वाढवून घेण्यासाठी ती कंपनी थांबली होती काय ? असा प्रश्न समितीने केला असता, विभागाने त्यांना जे बेसिक क्षेत्रफळ दिले त्याचे पूर्ण पैसे म्हणजे ९१८ कोटी रुपये कंपनीने भरले, असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

समितीला विभागाच्या मुद्दयावर आक्षेप आहे. कंपनीने बेसिक क्षेत्रफळाचे पैसे भरले व विभागाने त्यांना बांधकामाच्या परवानग्या दिल्या याचा अर्थ त्यावेळी हे प्रकरण न्यायालयामध्ये नव्हते. समितीचा प्रश्न असा आहे की, बेसिक पैसे घेतानाच उशिरा बांधकामासाठीचा दंड का वसूल केला नाही ? कारण तेव्हा हे प्रकरण न्यायालयामध्ये नव्हते. विभागाने त्यांच्याकडून प्रिन्सिपल अमाउंट घेतली. परंतु उशिरा बांधकाम सुरु केल्याबाबतचा दंड वसूल न करता बांधकामाची परवानगी का दिली ? दुसरा मुद्दा पार्टली ओ.सी. संदर्भातील आहे. ज्यावेळी विभागाने पार्टली ओ.सी. दिल्या त्यावेळी डयूज बाकी नव्हते का ? जर त्यावेळी डयूज बाकी असतील तर विभागाने ओ.सी. कशा दिल्या ? असा प्रश्न समितीने केला असता, विभागाने त्यांना पूर्ण ओ.सी. दिलेली नाही, असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

विभागाने ज्या पार्ट ओ.सी. दिल्या त्यावेळी सदर कंपनीचे कोणतेही डयूज बाकी नव्हते व त्यामुळे त्यांना पार्ट ओ.सी. देण्यात आली,सन २०१५ च्या मार्च महिन्यामध्ये पहिली, डिसेंबर महिन्यामध्ये दुसरी व २०१७ मध्ये तिसरी ओ.सी. विभागाने दिली. परंतु वसुलीबाबत सन २०१४ मध्ये नोटिस दिलेली आहे. मग सन २०१४ मधील नोटिशीच्या अनुषंगाने डयूज असताना विभागाने त्यानंतर पार्ट ओ.सी. का दिल्या ?त्यांना आता पूर्ण ओ.सी. साठी विभागाकडे येण्याची गरज नाही. कोर्टामध्ये मॅनेज करुन ते पूर्ण ओ.सी. मिळवू शकतात. त्याबाबतचे रस्ते त्यांना माहिती आहेत. एम.एम.आर.डी.ए. ने ज्या दिवशी ओ.सी. दिली त्या दिवशी शासनाचा एकही पैसे त्यांच्याकडून डयू नव्हता असा क्लिअरन्स विभागाकडे आहे का ?मार्च, २०१२ मध्ये त्यांचे २०० कोटी रुपये आले. विभागाने म्हटल्याप्रमाणे ज्यावेळी ओ.सी. दिले त्यावेळी टोटल कम्बाईन एरिया म्हणजे ॲडिशनल बिल्ट अप एरियाचे पैसे व बेसिक एरियाचे पैसे यांच्या इक्विव्हॅलेंटच होते, असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

त्यावेळी डयूज होते किंवा नव्हते, एवढे सांगा. कारण जर डयूज नसतील तर त्यांना न्यायालयामध्ये जाण्याची गरजच नव्हती. डयूज नव्हते तर विभागाने नोटिस कशाला दिली? असा प्रश्न समितीने केला असता, यामध्ये चार ते सहा वर्षांचा विलंब आहे. संपूर्ण पैसे वसूल करण्यासाठी नोटिस देण्यात आलेली आहे, असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

ॲडिशनल एफ.एस.आय. च्या प्रिमियमचे पैसे आणि उशिरा काम सुरु केल्याचा दंड या सर्वांचे पैसे विभागाने ओ.सी. दिलेल्या पोर्शनच्या बेरजेला सन २०१२ मध्ये देखील मॅच होणार नाही आणि सन २०१५ मध्ये देखील मॅच होणार नाही.सदर कंपनीकडून आपल्याला इतके कोटी रुपये येणे बाकी असल्याबाबत आपण न्यायालयास कळविले होते का ? अशी विचारणा समितीने केली असता, ॲफिडेव्हिटमध्ये तसे सांगितले होते, असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

एवढे पैसे बाकी असल्यामुळे विभाग परवानग्या देत नाही, असे प्रतिज्ञापत्रामध्ये म्हटले होते का ? असा प्रश्न समितीने केला असता विभागीय प्रतिनिधीने होकारार्थी उत्तर दिले. ती कागदपत्रे देखील समितीस सादर करावीत, असे समितीने निदेश दिले असता, यासंदर्भातील कागदपत्रांच्या प्रती समितीस सादर करण्यात येईल, असे विभागीय सचिवांनी सांगितले. हे प्रकरण न्यायालयामध्ये जाण्यापूर्वी विभागाने तीनही ओ.सी. दिलेल्या आहेत. लोकलेखा समितीने ऑगस्ट, २०१७ मध्ये यांना शिफारस केली परंतु विभागाने ऑगस्ट, २०१४ मध्ये नोटिस दिलेली होती. त्यानंतर सन २०१५ मध्ये दोन व फेब्रुवारी, २०१७ मध्ये एक ओ.सी. देण्यात आली. त्यानंतर रिलायन्स कंपनीवाले गप्प बसले होते परंतु रिकव्हरीची कारवाई करण्याबाबत लोकलेखा समितीने विभागाला आदेश दिला त्यानंतर ते न्यायालयात गेले. तोपर्यंत ते न्यायालयामध्ये गेले नव्हते. विभागाने वसुलीबाबत बजावलेल्या नोटिशीविरोधात रिलायन्स कंपनी न्यायालयामध्ये गेली आहे. सद्यस्थितीत त्यांना ओ.सी. ची आवश्यकता नाही कारण त्यांनी इमारत बांधून ओ.सी. प्राप्त करुन घेतलेली आहे, असे समितीने मत व्यक्त केले असता, त्यांना अद्यापही ओ.सी. ची आवश्यकता आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

अंतरीम आदेशाबाबत दीड-दीड वर्ष पुढाकार घेतला जात नाही. सदर प्रकरणी चार-पाचशे कोटी रुपयांची वसुली करायची आहे परंतु विभाग मात्र कार्यवाही करीत नाहीत, असे समितीने मत व्यक्त केले असता, अंतरीम आदेश आल्यानंतर दिनांक १२ डिसेंबर रोजी विभागाने न्यायालयामध्ये सबमिट केले होते. न्यायालयाच्या आदेशामध्ये म्हटलेले आहे की, "According to Learned Counsel for the Petitioner in the Writ Petition, Respondent No.१ (MMRDA) is insisting upon deposit of the amount as per the Demand Notice for processing the NOCs which have been applied by the Petitioners."

पिटिशनरने आम्हाला अर्ज केले आहेत व पैसे भरल्याशिवाय देत नाहीत हे शासनाच्या वकीलाने व न्यायालयाने रेकॉर्डवर घेतले आहे. त्यानंतर माननीय न्यायालयाने म्हटले आहे की, "Having considered the submission made by the Learned Counsel for the parties without prejudice to the rights and contentions of both the sides, we make it clear that the interim order passed earlier shall continue with further observations that Respondent No.१ (MMRDA) shall process the Petitioner's application in accordance with law but shall not insist upon the demand of amount which is in the writ petition.", असे विभागीय प्रतिनिधीने समितीस अवगत केले.

त्याला कारण काय आहे, विभागाने त्याला कधी चॅलेंज केले ? आपण वाचत असलेले आदेश किती तारखेचे आहेत ? असा प्रश्न समितीने केला असता, सदर आदेश दिनांक १२ डिसेंबर, २०१७ रोजीचे आहेत, असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले. आता डिसेंबर, २०१८ सुरु आहे. या ऑर्डरला विभागाने कुठे चॅलेंज केले आहे ? असा प्रश्न समितीने केला असता, सदर अंतरिम आदेश आल्यानंतर विभागाने १७ जानेवारी रोजी कोर्टासमोर जाण्याचा प्रयत्न केला, असा विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

विभागाने कोणत्या कोर्टासमोर जाण्याचा प्रयत्न केला ? असा समितीने प्रश्न केला असता, न्या.कोरडे व न्या.केतकर यांच्या कोर्टासमोर जाण्याचा प्रयत्न केला, असा विभागीय प्रतिनिधीने सांगितले. विभागाची याचिका सदर न्यायालयाने दाखल करुन घेतली नाही का ? असा प्रश्न समितीने केला असता, विभागोन ३१ जानेवारी रोजी पुन्हा सुनावणीसाठी प्रयत्न केले, असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

माननीय उच्च न्यायालयाने परवानगी देण्यास सांगितले होते व विभागाने पैसे मागायचे नाहीत असेही सांगितले होते. शासनाचा नियम असे सांगत आहे की, पुढील सर्व परवानग्या थांबायला पाहिजे होत्या. पैसे मागायचे नाहीत परंतु त्याचबरोबर परवानग्या देखील द्यायच्या नाहीत, असे आपला कायदा सांगतो. पैसे मागू नका परंतु कायद्याप्रमाणे कार्यवाही करा. आपला कायदा म्हणत आहे की, जोपर्यंत जुने डयूज दिले जात नाहीत तोपर्यंत पुढील कार्यवाही करायची नाही. माननीय न्यायालयाने असे सांगितले आहे की, आपण नियमाप्रमाणे व कायद्याप्रमाणे प्रोसिडिंग करा. दुसरे म्हणजे संबंधिताकडे पैसे मागू नका. त्यांना थांबविण्याचे आपल्याकडे १०० रस्ते आहेत. सध्या ते ऑक्युपेशन प्रमाणपत्र मिळाल्याशिवाय आपल्या छातीवर बसून जागा वापरत आहेत. आपण कायद्याप्रमाणे त्यांना याबाबत देखील नोटिस काढू शकता. त्यांचे संपूर्ण काम झाले आहे. ते ओ.सी. साठी येणार देखील नाहीत, असे मत समितीने व्यक्त केले असता, सुमारे ३० हजार स्क्वे. मीटरचे ओ.सी. अद्याप देणे बाकी आहेत, असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

त्यांचे काम पूर्ण झाले आहे किंवा कसे हे पाहण्यासाठी विभागाचे अधिकारी जातात का ? आपल्या अधिकाऱ्यांचे ते काम आहे. कारण आपण नियोजन प्राधिकरण आहात. ज्या ३० हजार स्क्वे. फूटचे ओ.सी. घेणे बाकी आहेत त्याचे काम कधी पूर्ण झाले आहे व सध्या त्याचा काय वापर सुरु आहे याबाबत समितीला अहवाल सादर करावा, असे समितीने निदेश दिले असता विभागाने त्यास सहमती दर्शविली. विभागाने या अगोदर सांगितल्याप्रमाणे न्यायालयातील संपूर्ण प्रोसेस, त्यामध्ये शासनाचे म्हणणे, समोरच्याचा रिप्लाय, न्यायालयाचे आदेश व इतर कार्यवाहीबाबतच्या कागदपत्रांच्या २० प्रती समितीस सादर कराव्यात, असे समितीने निदेश दिले असता विभागाने त्यास सहमती दर्शविली.

जेट एअरवेज, ओ.एन.जी.सी., राष्ट्रीयकृत बँक व इतर संस्थांकडून देखील वसुली केलेली आहे. असे असताना रिलायन्सलाच केवळ सोडण्यात आले आहे, असे समितीने निदर्शनास आणले असता, माननीय न्यायालयामध्ये विभागाने मांडलेली बाजू, त्याबाबतच्या प्रतिज्ञापत्राची प्रत व सदर भूखंड दिल्यापासून सी.सी. व ओ.सी. बाबत केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती समितीस सादर करण्यात येईल, असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

डिसेंबर, २०१७ मधील याबाबतची शेवटची सुनावणी आहे. आता डिसेंबर, २०१८ सुरु आहे. दरम्यानच्या कालावधीमध्ये न्यायालयाने एकही सुनावणी दिली नाही का ? असा प्रश्न समितीने केला असता, विभागाने सुनावणीसाठी प्रयत्न केले परंतु सुनावणी देण्यात आली नाही, असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले. विभागाने प्रयत्न करुनही न्यायालयाने सुनावणी दिली नसेल तर त्याबाबत आपण उच्च न्यायालयाच्या माननीय मुख्य न्यायाधिशांकडे का पाठपुरावा केला नाही ? असा प्रश्न समितीने केला असता, माननीय ॲडव्होकेट जनरल यांच्यामार्फत प्रयत्न सुरु आहेत, असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

उच्च न्यायालयाच्या वरती आणखी एक न्यायालय आहे. सरकारच्या चारशे-पाचशे कोटी रुपयांचा हा प्रश्न आहे. हे निदान सर्वोच्च न्यायालयाच्या निदर्शनास तरी आणून द्यावे. या प्रकरणी उच्च न्यायालयाचे आदेश व त्यानंतर सुनावणी दिली जात नसल्याचे आपण सर्वोच्च न्यायालयात मांडावे. आपण सर्वोच्च न्यायालयात जाऊन या प्रकरणाची वस्तुस्थिती सांगितली पाहिजे, असे समितीला वाटते, असे समितीने मत व्यक्त केले.

यासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक १४ फेब्रुवारी, २०१९ रोजी पुन:श्च साक्ष घेतली.

साक्षीच्या अनुषंगाने यापूर्वीच्या साक्षीमध्ये चर्चिर्लेल्या मुद्यांची माहिती थोडक्यात देण्यात यावी, असे समितीने निदेश दिले असता, मागील साक्षीच्या वेळी परिच्छेद क्रमांक ३.५ - खाजगी विकासकाला अदेय फायदा च्या अंतर्गत ४२८ कोटी रुपयांचे अतिरिक्त अधिमूल्य व त्यावरील व्याज वसूल केले नाही, यावर चर्चा झाली होती. सदरहू प्रकरणी ज्यांनी पार्ट ओ.सी. दिली त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करणे व माननीय उच्च न्यायालयातील प्रकरणी रिव्ह्यू किंवा एस.एल.पी.दाखल करण्याची सूचना मागील वेळी समितीने केली होती. उक्त प्रकरणी जबाबदारी निश्चित करण्यासंदर्भात एम.एम.आर.डी.ए. प्रशासनास विभागाने पत्र दिले होते. त्यांचा अंतिम अहवाल प्राप्त होणार आहे परंतू त्यांचे प्राथमिक मत आहे की, विकासकाने जेवढे पैसे भरले त्या मर्यादेत ओ.सी. देण्यात आलेली असल्याने, prima facie nothing wrong is committed by any officer. सदरहू प्रकरणाचा अंतिम अहवाल प्राप्त झाल्यानंतर तो समितीस सादर करण्यात येईल. माननीय उच्च न्यायालयातील प्रकरणी मॅटर सादर केले होते त्याचे फायनल हेअरींग झालेले असून उक्त दाव्या प्रकरणी न्याय निर्णय अपेक्षित आहे. त्यामुळे त्यासंदर्भात या टप्प्यावर विभागास काही कार्यवाही करणे शक्य नाही. तसेच, या विषयाशी संबंधित प्रिमिअर व इतर विषयबाबतचा दुसरा एक मुद्दा आहे. त्यासंदर्भात माननीय उच्च न्यायालयाने अंतरिम आदेश दिले होते की, "No coerceive action to be taken." म्हणजे कुठल्याही परवानग्या विदहेल्ड करु नये कारण "the matter is subjudice before us". उक्त प्रकरणी अंतिम निर्णय होत नाही तोपर्यंत एम.एम.आर.डी.ए. प्रशासनाने यापुढे कोणतीही ओ.सी. किंवा सी.सी.देऊ नये, असे पत्र देण्याचे समितीने सूचित केले होते. त्यानुसार नगर विकास विभागाने एम.एम.आर.डी.ए. प्रशासनास पत्र दिले आहे. या प्रकरणी अपिल करण्याबाबत महालेखाकार यांचा आणखी एका मुद्दा होता. उक्त माननीय उच्च न्यायालयाच्या निदेशाप्रकरणी अपिल दाखल करण्याबाबत महाभियोक्ता यांचे अभिप्राय घेण्यात आले आहेत. महाभियोक्ता यांनी कळविले आहे की, उक्त प्रकरणी माननीय उच्च न्यायालयाने अंतरिम आदेश दिलेले असल्याने रिव्ह्यू किंवा एस.एल.पी. दाखल करता येणार नाही. सदरहू प्रकरणी फायनल हेअरींग आज दिनांक १४ फेब्रुवारी, २०१९ रोजी आहे. माननीय उच्च न्यायालयाने शासनाच्या विरोधात निर्णय दिल्यास त्यावर अपिल दाखल करण्यात येईल. Today the Advocate General is not appearing, Senior Counsel is appearing on behalf of MMRDA, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

उक्त प्रकरणी नगर विकास विभागाने दिनांक १ जानेवारी, २०१९ रोजी एम.एम.आर.डी.ए. प्रशासनास पत्र पाठविले त्यास ४० दिवसांचा कालावधी झाला आहे. उक्त कालावधीत सदरहू प्रकरणी एम.एम.आर.डी.ए. प्रशासनाने कोणती कार्यवाही केली ? अशी विचारणा समितीने केली असता, माननीय न्यायालयाच्या अंतरित आदेशासंदर्भात रिव्ह्यू अथवा एस.एल.पी. दाखल करण्याकरिता महाभियोक्ता यांचे अभिप्राय घेणे एम.एम.आर.डी.ए. प्रशासनाकडून अपेक्षित होते ते त्यांनी घेतले आहेत. एम.एम.आर.डी.ए. प्रशासनाने उक्त प्रकरणी लवकरात लवकर हेअरींग घेण्याबाबत विनंती केली होती. त्यानुसार आज माननीय उच्च न्यायालयामध्ये उक्त प्रकरणाची फायनल हेअरींग ठेवण्यात आली आहे. उक्त प्रकरणी माननीय उच्च न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर त्यानुसार पुढील दिशा ठरविण्यात येईल. दुसऱ्या प्रकरणी प्रिमिअम वसूलीची नोटीस देण्यात आली आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सदरहू प्रकरणी प्रिमिअम व दंडाची वसूली करणे बाकी आहे. The case which we are referring to is plot no C-६६, alloted to Reliance Industries. यापेक्षा मोठे प्रकरण सी-६४ प्लॉटचे आहे. यामध्ये हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक वसूली करावयाची आहे. उक्त दोन्ही प्रकरणे लोकलेखा समितीच्या २६ व्या अहवालामध्ये साक्षीच्या वेळी घेण्यात आली होती. उक्त दोन्ही प्रकरणी व्याजावरील दंड १८०० ते २००० कोटी रुपये वसूली करणे शिल्लक आहे, असे समितीने निदर्शनास आणले असता, मागील साक्षीच्या वेळी दोन्हीही विषयांवर एकत्रित चर्चा करण्यात आली असून परिच्छेद क्रमांक ३.६ त्याच्याशी संबंधित असून सी-६४ प्लॉट संदर्भातील दाव्याची आज माननीय उच्च न्यायालयामध्ये फायनल हेअरींग आहे. The case regarding plot no- C-६६ has been closed for final orders, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समितीने सी-६६ संदर्भात साक्ष आयोजित केली आहे, असे मत व्यक्त केले असता, समितीने परिच्छेद क्रमांक ३.५ व ३.६ या दोन्ही प्रकरणी साक्ष आयोजित केली आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

दोन्हीही प्रकरणांची वसूलीची आकडेवारी १,८०० ते २,००० कोटी रुपयांवर पोहोचली आहे. उक्त प्रकरणी समितीने माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये कारवाईची शिफारस केल्यानंतर संबंधितांनी माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये न्यायालयात दावा दाखल केला. दुसरा मुद्दा दंड व प्रिमिअम वसूलीचा आहे. जेवढे बांधकाम करण्यात आले तेवढे प्रिमिअम वसूल करण्यात आले, अशी विभागाने माहिती दिली आहे. जेवढे बांधकाम झाले तेवढ्या बांधकामाची ओ.सी. देण्यात आली आहे.

प्रिमिअमच्या संदर्भात काही मर्यादा आहेत की नाही ? सन २००८ किंवा २०१० मध्ये ठरविण्यात आलेला प्रिमिअमचा दर आजही तसेच आहे काय ? विकासक पैसे देत नसेल तर आजच्या दराने वसूली करण्यात यावी ? विकासकाने अधिकच्या एफएसआयची परवानगी घेतली असून मूळ प्रिमिअमचे पैसे भरले नाहीत.. विकासक जेवढे बांधकाम करतो तेवढे पैसे भरुन ओ.सी.घेतो. माननीय न्यायालयाच्या आदेशानंतर विकासकास शेवटची ओ.सी. सन २०१८ मध्ये देण्यात आली आहे. सर्व नियम व कायदे बाजूला ठेवून विकासकाला त्याने जेवढे बांधकाम केले त्याचे पैसे भरल्यानंतर त्यास त्या मर्यादेत ओ.सी. देण्यात आली आहे. या प्रकरणी गांभीर्याने कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही, असे मत समितीने व्यक्त केले असता, विकासकाला बेसिक बिल्टप एरिया देण्यात आला होता त्याचे सर्व पैसे त्याने भरलेले आहेत, असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

समितीला हे सर्व प्रकरण माहित आहे. समितीने उक्त प्रकरणाचा श्रीकृष्ण कमीशनचा अहवाल वाचला आहे, इतरही माहिती घेतली आहे. श्रीकृष्ण कमीशनचा अहवाल एम.एम.आर.डी.ए.बोर्डाने मान्य केला नाही, अशी समितीच्या माहिती आहे. सदरहू प्रकरणातील प्लॉटची बेसिक रक्कम विकासकाने भरलेली आहे परंतू अधिक एफएसआय देण्यात आला आहे त्याच्या वापरानुसार पैसे भरण्यात येतात व ते एम.एम.आर.डी.ए.प्रशासनाकडून स्वीकारण्यात येतात. What are the rules in this regard? विकासकास त्यावेळच्या दराने अधिक चटई क्षेत्र वापरण्यास मान्यता दिली आहे. विकासक बांधकाम सुरु ठेवतो व ज्याप्रमाणात बांधकाम होईल त्याप्रमाणात पैसे भरणा करतो, ही बाब योग्य आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, विकासकाकडून मुद्दल रक्कम देण्यास विलंब झाला तर त्यावर व्याज आकारण्यात येते व व्याजासह मुद्दलाची रक्कम वसूल करण्यात येते, असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

विकासकाकडून जेवढे पैसे घेणे बाकी आहे त्याच्या व्याजाची रक्कम एका बाजूस ठेवली व आजचे दर एका बाजूला ठेवले तर काय फरक आढळून येईल ? अशी विचारणा समितीने केली असता, लीज डीडनुसार विलंब आकाराचा दर निश्चित करण्यात आलेला आहे. त्यानुसार व्याजावर व्याज दराने रक्कम भरणा करण्याकरिता विकासकास दिल्यानंतर विकासकाने न्यायालयामध्ये दावा दाखल केला असून त्यासंदर्भात अंतिम निर्णय न्यायालय देणार आहे. सदरहू प्रकरणी वसूली होईल, असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

माननीय न्यायालयामध्ये सर्व वसूली प्रकरणी दावा दाखल केला आहे काय ? असा प्रश्न समितीने केला असता, माननीय उच्च न्यायालयामध्ये दोन दावे दाखल करण्यात आले आहेत, असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले. माननीय उच्च न्यायालयाने दिलेले आदेश समितीला वाचून दाखवावे. माननीय न्यायालयाने दिनांक ११ जानेवारी रोजी आदेश दिले आहेत त्यामधील तिसरा मुद्दा वाचावे, असे समितीने निदेश दिले असता, "Having considered submissions made by the learned counsel for the parties, without prejudice to the rights and contentions of both the sides, we make it clear that the interim order passed earlier shall continue with further observations that Respondent No-१ shall process the petitioner's applications in accordance with law but shall not insist upon the demand of amount which is impunged in the Writ Petition.", असे मा.उच्च न्यायालयाने आदेश असल्याचे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

माननीय उच्च न्यायालयाने वसूली करु नये व विकासकाची दिलेली परवानगी थांबवू नये, असे आदेशामध्ये नमूद केले आहे काय ? माननीय न्यायालयाच्या अंतरिम आदेशावर अपिल करु शकत नाही, असे महाधिवक्ता यांचे म्हणणे आहे काय ? महसूलाच्या संदर्भात इतर विकासकाकडून वसूली केली आहे, त्यांनी न्यायालयामध्ये दावा दाखल केला नाही, इमानदारीने रक्कम भरणा केली आहे. काही प्रकरणी अधिक वसूली करण्यात आली आहे. सदरहू प्रकरणाच्या दाव्यातील ऑग्यूमेंट पूर्ण झाले आहे.आज सदरहू प्रकरणी न्यायालयामध्ये अंतिम निर्णय देण्यात येणार आहे. Instead of challenging the interim order, the final order will be challenged, if it is not in our favour असे महाधिवक्ता यांचे मत आहे, असे मत विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

माननीय न्यायालायने दिनांक १२ डिसेंबर, २०१७ रोजी आदेश दिले व आता सन २०१९ सुरु आहे. या आदेशास १४ महिन्यांचा कालावधी झाला आहे. महाधिवक्ता यांनी उक्त अंतरिम ओदशा प्रकरणी स्पेशल लिव्ह पिटीशन करु शकत नाही असा, अभिप्राय केव्हा दिले आहेत ? अंतरिम आदेशाच्या विरुध्द पिटीशन दाखल करता येत नसेल तर ते मान्य करणे किंवा अमान्य करणे ही बाब आपल्या सद्सद्विवेक बुध्दीवर आधारित राहील. महाधिवक्ता यांनी किती तारखेला अभिप्राय दिले आहेत ? असा प्रश्न समितीने केला असता, उक्त माहिती एम.एम.आर.डी.ए प्रशासनाच्या विधि विभागास विचारुन सांगण्यात येईल, असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

विभागाकडे अभिप्राय दिल्याची तारीख नाही का ?The MMRDA remained silent on the issue till it was taken up by PAC. सन २०१७ मध्ये समितीने उक्त प्रकरणी कारवाईची शिफारस केली. त्यानंतर माहे ऑगस्टमध्ये वसूली प्रकरणी नोटीस देण्यात आली. त्यापूर्वी विकासकाने अनेक ओ.सी.घेतल्या होत्या. तसेच माननीय न्यायालयाचे आदेश प्राप्त करुन विकासकाने माहे फेब्रुवारीमध्ये ओ.सी.घेतली आहे. अशा पध्दतीने विकासकाकडून भरावयाच्या पूर्ण पैशांची अडवणूक करण्यात येत आहे. विकासक प्रिमिअमची रक्कमही भरणा करीत नाही, बांधकाम करु तेव्हा पैसे भरु अशी त्यांची भूमिका आहे. समितीने सन २०१७ मध्ये कारवाईची शिफारस करण्यापूर्वी एम.एम.आर.डी.ए. प्रशासनाने विकासकावर कोणतीही कारवाई केली नाही. विकासकाला प्रिमिअम व जमिनीची रक्कम घेऊन सरसकट ओ.सी. देण्यात आली. समितीने कारवाईची शिफारस केल्यानंतर विकासकाने न्यायालयामध्ये दावा दाखल केला व स्टे प्राप्त करुन घेतला. The MMRDA remained silent and did nothing. हा विषय पुन्हा लोकलेखा समितीसमोर आला व त्याच विषयावर पुन्हा चर्चा सुरु झाली. या विषयासंदर्भातील समितीने केलेल्या कारवाईच्या शिफारशीची नोट वाचत असताना अजून दोन परिच्छेद असल्याचे दिसून आले. लोकलेखा समितीने उक्त प्रकरणी कारवाईची शिफारस केल्यानंतर त्याची मोठ्या प्रमाणात नोंद घेण्यात आली होती. उक्त शिफारशीमुळे एम.एम.आर.डी.ए.कडून १५०० ते २००० कोटी रुपयांची वसूली करण्यात येणार, अशी बातमी मिड डे व टाईम्स ऑफ इंडिया वर्तमानपत्रामध्ये बातमी छापून आली होती. या शिफारशीनंतर न्यायालयाकडून उक्त प्रकरणी स्टे मिळवण्यात आला. त्यानंतर न्यायलयाचा आदेश समितीस सादर करुन विकासकाला पुन्हा पार्ट ओ.सी.देण्यात आली. You should follow the orders of the Hon'ble Court, but you should have gone in appeal. But you did not do this. समितीला असे वाटते की, एम.एम.आर.डी. प्रशासन या प्रकरणात स्वत:हून रस घेत नाही.

समितीला वस्तुस्थिती माहीत आहे. महाधिवक्ता यांचे अभिप्राय कोणत्या तारखेला आलेले आहे ? एमएमआरडी कन्व्हेनिअंटली जे पाहिजे तसे करीत असते. असे केले तर एमएमआरडीए दिवाळखोरीला जाऊ शकते. एमएमआरडीएने कोणत्या आधारे माफी दिलेली आहे ? यामध्ये शासनाचा कोणता फायदा होणार आहे ? आवश्यकता असल्यास आणखी ओपिनियन घ्यावे, अशी समितीची एमएमआरडीएला सूचना आहे. आक्युपेशन सर्टिफिकेटमध्ये मुंबई शहरात एकसारखा डीसीआर लागू आहे. जेवढे पैसे दिले तेवढी ओसी द्यायची अशी सुविधा इतर प्लॅनिंग ॲथोरिटींना दिली जाते काय ? अशी विचारणा समितीने केली असता, यामध्ये कोणती अडचण येईल असे वाटत नाही. समजा त्यांना दोन एफएसआय परमिसेबल आहे आणि त्यापैकी त्यांनी पॉईंट फाईव्हचे पैसे भरले तर तेवढाच त्यांना एफएसआय मिळणार आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाकडून बांधकाम करण्यासाठी परवानगी दिली जाते. ओसीसंदर्भात आपल्या विभागाचे ड्यूज आहेत. I am speaking about O.C. and not about additional FSI, असा प्रश्न समितीने केला असता, त्यांच्याकडे आयओडी नाही. I.O.D. is only in Mumbai Municipal Corporation. इतर ठिकाणी डायरेक्ट सीसी आणि ओसी आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले. त्यांना सीसी दिलेली आहे. ओसीबाबत माहिती द्यावी. जेवढे पैसे दिले तेवढी ओसी दिलेली आहे. विभागाच्या ड्यूज आणि नोटिसेस किती बाकी आहेत ? अशी प्रॅक्टिस बरोबर आहे काय ? विभागाने ॲक्शन घेतली पाहिजे, अशी समितीची प्रामाणिक अपेक्षा आहे. संपूर्ण वसुली करणे हे आपल्या हातामध्ये नाही. परंतु, वसुलीबाबत विभागाची रिलॅक्सेशन देण्याची भूमिका आहे. स्टे आला म्हणून विभाग गप्प बसलेला आहे. समितीने सूचना देऊन देखील विभागाने कोणतीही ॲक्शन घेतलेली नाही. लोकलेखा समितीने शिफारशी केलेल्या असून, विभागाने त्या बाजूला सारलेल्या आहेत. समितीने सूचना दिल्यानंतर आता मार्ग काढला जात आहे. प्रिमियम न देता तुकडे तुकडे करुन ओसी दिलेली आहे. त्यानंतर तुकडे तुकडे करुन त्यांच्याकडून दंड भरला जाणार आहे. असे चालणार नाही. दोन प्लॉटची किंमत १८०० ते २००० हजार कोटी रुपयांपर्यंत पोहचलेली आहे. नमन येथील प्लॉट ४ ते १० कोटी रुपयांपर्यंत आहे. इतरांनी जास्तीचे पैसे भरलेले आहेत. याबाबतचा चार्ट समितीकडे आहे. एका विशिष्ठ बोलीदाराला आपल्याकडून विशेष सवलत दिली जात असल्याचे समितीला स्पष्टपणे दिसून येत आहे. विभागाने गेल्या १ वर्षापासून कोणतीच कार्यवाही केलेली नाही. समितीने सचिवांना सूचना केल्यानंतर पत्र पाठविलेले आहे. एका केसमध्ये ऑर्डर आहे आणि दुसऱ्या केसमध्ये सुनावणी होण्याचे बाकी आहे. ही सिंगल बेंचची ऑर्डर आहे, यासंदर्भात विभागाला डबल बेंचकडे धाव घेता आली असती. But it seems that MMRDA itself is not willing to do anything. असे मत समितीने व्यक्त केले असता, १ तारखेला अर्बन डेव्हलपेमेंट विभागाने पत्र दिलेले आहे. सदरहू पत्रामध्ये ओसी देऊ नये असे नमूद केलेले आहे. विभागाकडे सी-६४ चा प्लॉट असून, तेथे कन्व्हेंशनल सेंटर आहे. त्यांच्याकडून ओसी मिळावी म्हणून अर्ज आलेला आहे. माननीय उच्च न्यायालयाची ऑर्डर असून, त्यामध्ये "No coerceive action to be taken", असे नमूद असल्याचे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

यावर विभागाने न्यायालयात जायला पाहिजे व न्यायालयाच्या निदर्शनास आणावयास पाहिजे की इतकी वर्षे होऊनसुध्दा निर्णय होत नाही, अमुक पैसे बाकी आहेत. विभागाने दोन्ही केसेसचा उल्लेख करण्याची आवश्यकता आहे. ओसी द्यावी कसे असे पत्र घेऊन माननीय न्यायालयात आपली बाजू मांडावी. कायद्यामध्ये ओसी रिव्होक करण्याचा अधिकार आहे. समितीने देऊ नका

म्हणून सांगितलेले आहे. एवढे पैसे राहिलेले असल्यामुळे आपण न्यायालयात जाऊ शकता. आजच्या बैठकीस डॉ. करीर आणि श्री. दराडेसारखे वरिष्ठ अधिकारी उपस्थित असताना कनिष्ठ अधिकाऱ्यांनी उत्तरे देणे बरोबर आहे काय ? वास्तविक पहाता सचिवांनी समितीला उत्तर देणे अपेक्षित आहे. विभागाला लिगली अडचण असेल तर न्यायालयात जायला पाहिजे, एवढे दिवस होऊनसुध्दा निर्णय होत नाही. वारंवार त्यांना ओसी दिली जाते. लोकलेखा त्यासाठी विरोध करीत आहे. निर्णय घेऊन वसुली केली पाहिजेत. विभागाने प्रिमियमचे पैसे दिले नाही. याचबरोबर दंड देखील वसुल केला नाही. ज्यावेळी नोटीस काढली, त्यावेळी त्यांची पिटीशन काय होती ? पैसे त्यांनी भरु नये म्हणून पिटीशन दाखल केली होती काय ? पैसे न भरण्यासाठी त्यांचा एसक्यूज होता काय ? त्यांना माहिती नव्हती काय किंवा रक्कम जास्त आहे किंवा रेडीरेकनरच्या क्रॉसिंगला मॅच होत नाही, त्यांनी कोणत्या कारणास्तव पैसे भरले नाहीत ? कनिष्ठ अधिकाऱ्यांनी समितीला उत्तरे देऊ नयेत. सचिवांनी समितीला उत्तर देणे अपेक्षित आहे असे समितीने निदेश दिले.

रिलायन्सने कॉन्टेस्ट केले, ते या ग्राऊंडवर केले होते की, MMRDA had delayed the boundary demarcation of the said plot. एमएमआरडीएकडून उशिर झाला म्हणून बांधकाम करण्यास उशिर झालेला आहे. हा उशिर आमच्यामुळे झालेला नाही. पण हे एमएमआरडीएने रिजेक्ट केलेले आहे, असे प्रधान महालेखाकार यांनी समितीच्या निदर्शनास आणले. हे लेट कन्स्ट्रक्शनचे बाबत झाले. परंतु प्रिमियम बाबत काय? लेट कन्स्ट्रक्शन झालेला असून, प्रिमियम नाकारलेला असून, त्याचे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, लेट कन्स्ट्रक्शनचे आहे. बेसिकली ४ वर्षात कन्स्ट्रक्शन करायचे आणि ते केले नाही तर ॲडिशनल प्रिमियमचे दर दिलेले आहेत. ते वेळेत भरले नाही तर इंट्रेस्ट आहे. त्यामुळे हा मुद्दा ॲडिशन प्रिमियम आणि इंट्रेस्ट बद्दल आहे, असे प्रधान महालेखाकार यांनी समितीच्या निदर्शनास आणले.

ॲडिशनल प्रिमियम हे लेट कन्स्ट्रक्शनवर लागणारे व्याज आणि प्रिमियम वेगळे आहे काय ? यामध्ये ॲडिशनल एफएसआय दिलेला आहे. त्याचे प्रिमियमचे पैसे भरलेले आहेत काय ? असा प्रश्न समितीने केला असता, त्यांचे पूर्ण पैसे घेतलेले आहेत, असे विभागीय सचिवांनी सांगितले. पैसे पूर्ण घेतलेले नाहीत. जेवढा एफएसआय दिलेला आहे, तेवढा प्रिमियम घेतलेला आहे. एका कंपनीला किंवा एका विभागासाठी ४ एफएसआय दिलेला असेल आणि त्याला दीडच एफएसआय वापरावयाचा असेल तर तो दीड एफएसआयचेच पैसे भरणार आहेत. जेव्हा तो अडीच एफएसआय वापरेल तेव्हा तेवढे पैसे भरल्यानंतर त्याला मिळणार आहे. ॲडिशनल एफएसआय दिलेला असून, त्याच्या प्रिमियमपैकी त्याने किती फुटापर्यंत बांधकाम ऑलरेडी केलेले आहे ? ओरिजनल एफएसआयपेक्षा वाढीव एफएसआयचे बांधकाम किती केलेले आहे आणि वाढीव एफएसआयची रक्कम किती होती आणि त्यापैकी किती रुपये भरलेले आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता, यामध्ये दोन विषयांचा अंतर्भाव आहे. पहिला विषय हा "additional premium because of delay" असा आहे. दुसरा विषय असा आहे की, "premium for increasing the FSI to ३." याबाबतचे पैसे त्यांना ४ टप्प्यात भरायचे असून, ९०८ कोटी रुपये भरलेले आहेत, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

रक्कम किती भरावयाची होती ? असा प्रश्न समितीने केला असता, त्यांना ५ टप्प्यात २०-२० टक्के अशी रक्कम ५ वर्षात भरावयाची होती. जर टोटल मुद्दल १० टक्के झाली असेल तर आपण त्यांना पहिले २० टक्के रक्कम भरण्यासाठी सांगितले होते. त्यानंतर प्रत्येक वर्षी ५ वर्षात २०-२० टक्के अशी रक्कम भरावयाची आहे आणि त्यासाठी १० टक्के इंट्रेस्ट आहे. ही सर्व रक्कम ११८१ कोटी रुपये एवढी आहे. ११८१ कोटी रुपयांच्या अगेन्स्ट ९०८ कोटी रुपये भरले आहेत, असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

कन्स्ट्रक्शन पूर्ण झालेले आहे काय ? असा प्रश्न समितीने केला असता, सी-६६ प्लॉटमध्ये बेसिक बिल्टअप एरिया ३०,५५० स्क्वेअर मीटर होता. त्याने ३०,५५० स्क्वेअर मीटरचे पैसे भरलेले आहेत. त्यानुसार सीसी आणि ओसी दिलेली आहे. यानंतर ॲडिशनल बिल्टअप एरिया ६७ हजार स्क्वेअर मीटर दिलेला आहे. यापैकी २८ हजार २५७ स्क्वेअर मीटरची एमएमआरडीएने ओसी दिलेली नाही आणि ३८,७४२.९५ स्क्वेअर मीटरची ओसी दिलेली आहे. या माध्यमातून एमएमआरडीएला ८०९.१६ कोटी रुपये मिळाले असल्याचे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

६७ हजार स्क्वेअर मीटर त्याने कन्स्ट्रक्शन केलेले आहे ? कन्स्ट्रक्शन पूर्ण केलेले असेल तर पैसे कमी का घेतले आहे ? असा प्रश्न समितीने केला असता, ६७ हजार स्क्वेअर मीटर त्याने कन्स्ट्रक्शन केलेले आहे, असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

ॲडिशनल एफएसआय मिळाल्यानंतर त्याने बांधकाम केलेले आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधीने होकारार्थी उत्तर दिले. डिफॉल्ट पेमेंटमध्ये त्याला पेमेंट करण्यासाठी सुविधा दिलेली आहे. यामध्ये दोन सिस्टिम असतात. ५ वर्षात करावयाचे किंवा कन्स्ट्रक्शन जितके पूर्ण होईल तेवढेच आतमध्ये केले जाते. ५ वर्षाची वेळ दिली असेल, either five years or completion of the construction, whichever is earlier. असे असते. फॅसिलिटी अशीच असते, असे मत समितीने व्यक्त केले असता, सप्लिमेंटेड लिसडीड झालेली आहे. यामध्ये प्रत्येक वर्षी ५ वर्षात २०-२० टक्के अशी रक्कम भरावयाची आहे, असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

६७ हजार स्क्वेअर मीटरचा ॲडिशनल कन्स्ट्रक्शन ३० हजार मीटरपेक्षा वेगळा केलेला आहे. त्याला परमिसेबल एफएसआय मंजुर करुन शासनाने दिलेला आहे. कन्स्ट्रक्शन पूर्ण बांधून झाल्यानंतर ३८ हजार स्क्वेअर मीटरवर ओसी देण्याचे बाकी आहे, असे एमएमआरडीएचे म्हणणे आहे. कन्स्ट्रक्शन पूर्ण झालेले आहे. ते प्रिमियमशिवाय कन्स्ट्रक्शन पूर्ण करण्यासाठी सीसी का दिली ? यासाठी एमएमआरडीएने प्रत्येक वर्षी ५ वर्षात २०-२० टक्के अशी रक्कम भरण्यासाठी फॅसिलिटी दिलेली आहे. Whichever is earlier, कन्स्ट्रक्शन झाल्यानंतर पैसे भरावे लागतील. अदरवाईज ५ वर्षे असे काही तरी असायला हवे, असे मत समितीने व्यक्त केले असता, सीसीबरोबर लिंक न करता ओसीबरोबर लिंक केलेले आहे, असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

ओसी घेणारच नाही. मुंबई शहरातील २२ हजार इमारतींना ओसी मिळालेल्या नाहीत. समितीची दोन्ही सचिवांना सूचना आहे या विषयासंदर्भातील समर्पक उत्तरे समितीला पुढील बैठकीत द्यावी, अशी समितीची सूचना आहे. आज समितीच्या बैठकीत कनिष्ठ अधिकाऱ्यांना उत्तरे द्यायला लावली आहे. २ हजार कोटी रुपयांची यामध्ये अनियमितता असल्याचे दिसून येत आहे, असे समितीने मत व्यक्त केले.

दिनांक ४ जून, २०१९ रोजी समितीने पुन:श्च साक्ष घेतली. रिलायन्स कंपनीच्या नावाने सी-६४ आणि सी-६६ यासंदर्भात समितीने डायरेक्शन दिलेल्या आहेत. सी-६६ या केसमध्ये माननीय न्यायालयाचे आदेश प्राप्त झालेले आहेत. सदरहू आदेशात पूर्ण पैसे घेऊन ओसी देण्यात यावी असे नमूद केलेले आहे. तसेच दुसऱ्या केसमध्ये ६४६ कोटी रुपये भरल्यानंतर आणि बँक गॅरन्टी घेतल्यानंतर त्यांना ओसी दिलेली आहे. या प्रकरणाची सद्य:स्थिती सांगण्यात यावी असे समितीने निदेश दिले असता, पहिल्या केसमध्ये ८०० कोटी रुपये भरुन घेतले आहेत. पहिल्या केसमधील पैसे भरुन घेतले आहेत. ज्या ठिकाणी डिस्पुटेड अमाऊंट होती, अशा ठिकाणी बँक गॅरन्टी घेतलेली आहे. दुसऱ्या केसमध्ये माननीय न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे जितके पैसे भरेल, तितक्या पैशाच्या प्रर्पोशनेटनुसार ओसी देण्यास सांगितले आहे. यासंदर्भात कॅलक्युलेशन करुन दिलेले आहे. समितीने सूचित केल्यानुसार नगर विकास विभागाने दोन वेळा पत्र इश्यु केली आहेत आणि ते माननीय उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले आहे. त्यावेळी माननीय उच्च न्यायालयाने आमच्या आदेशाचे पालन करावे लागेल असे सांगितले होते. त्यानुसार पैसे भरुन घेतल्यानंतर दोन्ही केसमध्ये त्यांना पुढील परवानग्या देण्यात आलेल्या आहेत, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

रघुलीलाला पण दिलेले आहे काय ? असा प्रश्न समितीने केला असता,५३९ कोटी रुपये होते. आता करेक्शन करुन ती रक्कम ५४१ कोटी रुपये अशी आलेली आहे. त्या प्रमाणे त्यांनी असे सांगितले आहे की, पैसे भरावेत आणि रिसपॉन्डन्टनी प्रर्पोशनेट एरियानुसार ओसी द्यावी, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले. ५४१ कोटी रुपये भरुन घेतल्यानंतर ओसी दिली पाहिजे, असे मत समितलने व्यक्त केले असता, माननीय उच्च न्यायालयाच्या आदेशात असे नमूद केले आहे की, "९. In the light of above, we direct the Respondents to issue NOC in favour of the Petitioner for assignment of the balance area immediately without insisting for any payment as per Clause [४] of the interim order referred to above. We also direct the Respondents to issue OC of the proportionate area, in terms of clause [५] of the interim order within the period of one week from the date of receipt of above amount of Rs. ५४१.१६ crores." असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

टोटल किती कोटी रुपये घ्यावयाचे आहेत ? असा प्रश्न समितीने केला असता, पहिल्या प्रथम त्यांना कोणतेही पेमेंट न करता एनओसी द्यावयाची. माननीय उच्च न्यायालयाची ऑर्डर आताच वाचून दाखविलेली आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

असे असेल तर माननीय सर्वोच्च न्यायालयात अपील केले पाहिजे. या ठिकाणी प्रिसिडंट होऊ शकतो. ५४१ कोटी रुपयांचा विषय नाही. मुंबई शहरात हजारो कोटी रुपयांची विकास कामे सुरु आहेत. ते सर्वांना लागू होणार आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता, त्याला व्यवहार करण्यासाठी एनओसी द्यावी लागणार आहे. जोपर्यंत ५४१ कोटी रुपये भरत नाही, तोपर्यात त्याला ओसी द्यावयाची नाही, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

मुंबई शहरात विकास कामांमध्ये ड्युज बाकी आहेत, त्यांचे काय ? हे तर सर्वांना लागू केले पाहिजे. कायद्यानुसार माननीय उच्च न्यायालयाने ऑर्डर दिली पाहिजे, समितीने सर्वोच्च न्यायालयात अपील करावे असे निदेश दिले आहेत. कायद्याप्रमाणे माननीय न्यायालय निर्णय देणार की, माननीय न्यायालयाच्या निर्णयानुसार कायदा बदलणार या प्रश्नाचे उत्तर पहिल्या प्रथम दिले पाहिजे. खरे पहाता कायद्याप्रमाणे माननीय न्यायालयाने निर्णय देणे अभिप्रेत आहे. दिलेला निर्णय कायद्याला धरुन असेल तर तो सर्वांना लागू झाला पाहिजे. माननीय न्यायालयाने इंटर प्रिटेशन करुन दिले असेल आणि सचिवांना मान्य असेल तर तो निर्णय संपूर्ण शहरासाठी लागू केला पाहिजे. जर हे नियमाप्रमाणे आणि कायद्यानुसार नाही असे वाटत असेल तर सर्वोच्च न्यायालयात अपील केले पाहिजे. माननीय न्यायालयाने जी ऑर्डर दिलेली आहे, ती कायद्याला धरुन आहे काय ? जर आपण ऑन रेकॉर्ड होय म्हणणार

असतील तर ते सर्वांसाठी लागू होईल. जर सचिवांकडून अभिप्रेत नाही, स्पेशल केस आहे असे वाटत असेल तर अशा वेळेस सर्वोच्च न्यायालयात अपील केले पाहिजे, असे मत समितीने व्यक्त केले असता, समितीने अशा प्रकारचे डायरेक्शन्स दिलेले आहेत, म्हणून माननीय न्यायालयात रिव्हयू पिटिशन दाखल केलली आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

माननीय उच्च न्यायालयात विभागाला न्याय मिळाला नाही तर माननीय सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केले पाहिजे. समिती सन २०१७ पासून सांगत आहेत. मुंबई शहरातील जागेबद्दल अहवाल दिलेला आहे. सन २०१७ मध्ये ऑर्डर दिलेली आहे. त्यावेळी डॉ. करीर कार्यरत होते. त्यावेळी ओसी देऊ नये असे सांगितले होते. त्यानंतर माननीय उच्च न्यायालयात दावा दाखल करुन घेऊन ऑर्डर मिळवून घेतली होती. त्यानंतर तीन वेळा दुसऱ्या प्लॉटसाठी ओसी घेतली होती. ६०० कोटी रुपये घेऊन पार्टली अमाऊंट आणि पार्टली बँक गॅरन्टी घेऊन सी-६६ ला पुन्हा ओसी देण्यात आली. समितीने पत्र दिले होते. सदरहू पत्रात पुढे असे करु नये असे सांगितले होते. फेब्रुवारीत झालेल्या बैठकीनुसार ऑर्डर आहे. त्यानुसार न्याय मिळत नसेल तर सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केले पाहिजे. You are passing the time and they are getting the orders continuously, it is not fair. ओसी नसताना देखील त्याचा वापर केला जात आहे. हे एमएमआरडीएला माहीत नाही काय ? जागेचा वापर करण्यासाठी मुभा आहे अशा वेळी ओसी वापरली जाते. ऑन रेकॉर्ड पैसे घेऊन हायर बेसीसवर जागा देतात आणि त्याची ओसी नसते, असे मत समितीने व्यक्त केले असता, ओसीशिवाय इतर कोणी राहत असेल तर त्याच्या विरोधात कारवाई केली जाईल. ज्या कारणासाठी ओसी दिलेली आहे, त्यामध्ये असाईनमेंट करता येते. बाकीच्या ठिकाणी करता येत नाही. २६ एप्रिलला माननीय उच्च न्यायालयात दावा दाखल केला त्यावेळी लोकलेखा समितीचे म्हणणे काय आहे ते सांगितले होते, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

एमएमआरडीए ही प्लॅनिंग अॅथोरिटी आहे. एमएमआरडीए आणि महानगरपालिकेला एकच डीसीआर लागू आहे. हे सर्वांना लागू होईल आणि ते केलेच पाहिजे. कायद्यानुसार व्यवस्था सुरु असली पाहिजे आणि ते पाहण्याचे काम माननीय न्यायालयाचे आहे. माननीय न्यायालयाकडून कायद्यात सुधारणा सुचवू शकते. माननीय न्यायालय कायद्याच्या विरोधात निर्णय देऊ शकत नाही. कायद्यानुसार असेल तर सर्वांना लागू केले पाहिजे. कायद्याला धरुन नसेल तर अशा वेळी माननीय सर्वोच्च न्यायालयात अपील केले पाहिजे. अपील होईपर्यंत त्यांची ओसी थांबविण्याचा अधिकार शासनाला आहे. एका केसमध्ये ६५० कोटी रुपये घेऊन बँक गॅरन्टी दिली. यासंदर्भात मुख्यमंत्री महोदयांनी निर्णय घेतला असून याबाबत समितीचे काहीच म्हणणे नाही. पूर्ण पैसे घेतल्यानंतर ओसी देण्यात यावी, असे मत समितीने व्यक्त केले असता,५४१ कोटी भरुन घेतल्याशिवाय ओसी दिली जाणार नाही, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सी-६४, सी-६६ किंवा सी-५७, सी-५८ याबाबत विभागाने कोणती कारवाई केलेली आहे. जर डिस्पुट असेल तर तो आपल्या स्तरावरुन दूर केला पाहिजे. याबाबत समितीचे कोणते आक्षेप नाही, असे मत समितीने व्यक्त केले असता, पृष्ठ क्रमांक १ आणि २ वर संपूर्ण तपशील दिलेला आहे. पहिले चार जे आहेत, सी-६३ सी-६४, सी-६६ किंवा सी-५७, सी-५८ त्याचा तपशील दिलेला आहे. ५ आणि ६ चे पैसे भरुन घेतले आहेत, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

३.९९ कोटी रुपये घेण्याचे बाकी आहे.तसेच ३७.९१ कोटी रुपये वसुल करण्याचे बाकी आहे, याबाबत माहिती देण्यात यावी असे समितीने सूचित केले असता,२३ कोटी रुपयांची थकबाकी होती. त्याच्या अगेन्स्ट ३३ कोटी रुपये भरले आहेत. ती रक्कम वसुल केली जात आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

६ नंबरवर तालीम रिसर्च फाऊंडेशनचे काय आहे ? माननीय उच्च न्यायालयात त्याचा दावाच नाही, असा प्रश्न समितीन केला असता, मेट्रो पॉलिटीन कमिशनरकडे अपील दाखल केलेले आहे. The Metropolitan Commissioner will pass appropriate order on their appeal, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

इंडियन न्यूज पेपर सोसायटीचे काय आहे ? त्यांनी जागा विकलेल्या आहेत. आपल्या परवानगीशिवाय जागा विकलेल्या आहेत. पैसे न भरताच जागा विकलेल्या आहेत. इंडियन न्यूज पेपर सोसायटीने पैसे वसुल केले आहेत. एमएमआरडीएने पैसे भरले नाहीत. ही कोणती फॅसिलिटी आहे ? असा प्रश्न समितीने केला असता, त्यांना रिझम्पशनची नोटीस दिलेली आहे. चारही केसेसमध्ये रिझम्पशनच्या नोटीस दिलेल्या होत्या. तेव्हा कन्स्ट्रक्शन पिरियड ४ वर्षाचा होता. त्यापेक्षा जास्त केलेल्या पिरियडसाठी दंडात्मक कारवाईची नोटीस दिली होती. त्यांनी माननीय उच्च न्यायालयात दावा दाखल केला त्यांनी बेसिक प्लॉटचा प्रिमियम भरलेला आहे. त्याशिवाय त्यांना प्लॉट दिला जात नाही. ४ वर्षाच्या नंतर जो विलंब होतो, त्यास त्यांनी आवाहन दिलेले आहे. काही लोकांनी रक्कमेला तर काही लोकांनी इंटरेस्टला आवाहन दिलेले आहे. प्लॉट ताब्यात घेतल्यानंतर त्यामध्ये काही अडचणी होत्या.

त्यामुळे कन्स्ट्रक्शन चालू करु शकलो नाही. पर्यावरणाची मंजुरी घेऊ शकलो नाही, असे त्यांचे माननीय न्यायालयासमोर म्हणणे आहे. उच्च न्यायालयाने असे सांगितले की, "No coercive action should be taken and process the application" म्हणून ते ४ लोकांचे केले आहे. एमएमआरडीएची मॉर्गेज कन्सेन्ट असते. असाईन्मेंट कन्सेन्ट असते. लिव्ह ॲण्ड लायसन्स कन्सेन्ट असते, असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

समितीच्या माहितीनुसार त्यांना कालांतराने वाढीव चटईक्षेत्र दिलेला आहे, असे समितीने मत व्यक्त केले असता, समितीचे म्हणणे बरोबर आहे, असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले. वाढीव चटईक्षेत्र देण्यात आले त्यावेळी आपल्याकडे अधिकार होते. बेसिक एफएसआय देतेवेळी माननीय न्यायालयाची ऑर्डर लागू होती. प्लॉटच्या ॲक्चुअल एरियावर एफएसआय दिला जाणार होता. वाढीव चटईक्षेत्र देण्यात आले असून, त्यासाठी एनओसी का दिली ? असा प्रश्न समितीने केला असता, वाढीव चटईक्षेत्र देण्यात आले असून, त्यामध्ये ४ वर्षात बांधकाम करण्याची अट नव्हती, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

एनओसी दिल्यानंतर वाढीव चटईक्षेत्र वाढविले असणार आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता, प्राधिकरणाच्या धोरणानुसार बेसीक एफएसआयामध्ये करार केलेला होता. त्यासाठी ४ वर्षाचा कालावधी आहे. तो कमी प्रिमियम भरुन त्याला ४ वर्षाचा कालावधी लागू होतो, असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले. प्रोसिजर काय आहे ? आपला पैसा वसुल झाला पाहिजे. आपल्या विभागाकडून केवळ एफएसआयचे वाटप केले जाते. ९० लोकांनी पैसे भरलेले आहेत, असे समितीने निदर्शनास आणले असता, माननीय उच्च न्यायालयापुढे ते सादर केलेले आहे. उर्वरित लोकांची रिकव्हरी झालेली आहे, असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले. अजून किती अवधी लागणार आहे ? दोन वर्षापासून ऑर्डर आहे. २०१७ पासून कोणतेही रिलॅक्सेशन देऊ नये. रिलायन्सकडे १३८८ कोटी रुपये बँक गॅरन्टीचे आहेत, ते वसूल करण्यासाठी आपल्या विभागाने कोणते प्रयत्न केले आहेत. ही पेनॉल्टीची प्रिन्सीपल अमाऊंट आहे. एमएमआरडीए लोकांचे व्याज भरत आहे. २ ते ३ हजार कोटी रक्कम लोकांकडून एमएमआरडीएला प्रिन्सीपल अमाऊंट येणे आहे, असे समितीने निदर्शनास आणले असता, ही रक्कम व्याजासह आहे, असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

रु. १३८८ कोटीचे रकमेबाबत काय कार्यवाही सुरु आहे, असा प्रश्न समितीने केला असता, याबाबत रिट पिटीशन क्र.३३९५ सुरु आहे. रु. १३८८ कोटी सी- ६४ या प्रकरणाबाबत आहे. यामध्ये हायकोर्टाची नो कोअरशु ॲक्शनबाबत ऑर्डर आहे, असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

याचा निकाल तर लावला पाहिजे. एका प्रकरणात सांगितले की, रु. ५४१ कोटी घेऊन बाकीचे नंतर दया. या प्रकरणी देखील कमी जास्त करुन प्रॅक्टीकली व्हू घेऊन प्रकरण संपविण्यात यावे, अशी सूचना समितीने केला असता, याबाबत एसएलपी दाखल करीत आहोत. यातील वादाचे मुद्दे तीन आहेत. पहिला मुद्दा चार वर्षा नंतर डीले काऊंट करावयाचा की सहा वर्षानंतर करायचा. दुसरा मुद्दा कोणत्या रेटने व्याज लावण्याबाबतचा प्राधिकरणाचा ठराव व डाक्युमेंट यामध्ये फरक आहे, यामुळे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. एसबीआयचा रेट, बेस रेट धरायचा हा दुसरा वादाचा मुद्दा आहे. तिसरा मुद्दा रिलायन्स केसमध्ये त्यांना या प्रकरणी हायकोर्टाचा स्टे होता, हायकोर्टाच्या केसचा कालावधी त्यांच्यातून वजा करावा असे म्हणणे आहे. विभागाने त्यांना सांगितले हे आमच्या लेवलचे नाही, तो पर्सनल वाद होता त्यामुळे विभाग तो कन्सीडर करणार नाही. रिलायन्सबाबत ७५० कोटीपैकी मोठा भाग याबाबत आहे, Court will have to take decision. निर्णय ऑलरेडी झाला आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

हायकोर्टाने स्टे दिला होता तेव्हा म्हटले होते का स्टे पिरेडचे व्याज घ्यायचे नाही, अशी विचारणा समितीने केली असता, तसे म्हटलेले नाही. विभागाची भूमिका आहे की, प्राधिकरणाच्या मिटींगमध्येही असेच ठरले आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले. इतक्या मोठया प्रमाणावर ही रक्कम आहे त्यामुळे शासनाने निर्णयापर्यत पोहचले पाहिजे. सामोपचाराने होत असेल तर इतकी मोठी रक्कम कशाला अडकून ठेवायची जस्टीफाइड केस असेल, श्रीकृष्ण कमीशननेच्या शिफारशीला बोर्डाने बहुतेक मान्यता दिली नाही. सर्व बाबी लक्षात घ्याव्यात, पण निर्णय सर्वांसाठी ॲप्लीकेबल असावा, एकासाठी नसावा, ते मँडेटरी आहे. ही बाब सुप्रीम कोर्टात जाऊ दया. त्यांना थांबवा. डिस्पुटेड विषय नंतरचा आहे पण याला ओसी देऊ नका. पार्टली ओसी देऊ नका. निर्णयाच्या विरुध्द विभाग सुप्रीम कोर्टात गेले पाहिजे. कोर्टाला पटवून द्यावे की, हे शासनाच्या नियमात बसत नाही नाहीतर त्यामुळे चुकीचा पायंडा पडेल. नाहीतर शासनाला या सिस्टीममध्ये सर्वांना ही सुविधा दयावी लागेल ओसी द्यायची नाही हे आज समितीसमोर ठरले आहे.

सुप्रीम कोर्टात प्रकरण दाखल करुन एका आठवडयात समितीला अवगत करण्यात यावे कारण सोमवारपासून कोर्ट सुरु होणार आहे. तोपर्यत ओसी देऊ नये, विभागाने त्वरीत कार्यवाही सुरु करावी, असे समितीने निदेश दिले असता, विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली. (विभागाकडून **प्राप्त** झालेली माहिती विवरण **क्रमांक**-१ मध्ये **समाविष्ट** करण्यात आली आहे.)

अभिप्राय व शिफारशी :-

३.५ "खाजगी विकासकाला अदेय फायदा"

अभिप्राय

९.१ मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने उच्चतम बोलीदार मे. रिलायन्स इंडस्ट्रीज लि. (प्राप्तकर्ता) ला बांद्रा-कुर्ला संकुलातील जी ब्लॉकमधील १०,१८३.१८ चौ.मी.चा भूखंड क्र. सी-६६ हा ८० वर्षांच्या भाडेतत्वावर दिला (डिसेंबर २००७). प्राधिकरणाने प्राप्तकर्त्याबरोबर केलेल्या भाडेपट्टाकरारानुसार (१५जुलै, २००८) भूखंडावर बहुमजली वाहनतळ व व्यापारी संकुल यासाठी ३,००,५०१ चौ. मी. चे अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र होते आणि त्यासाठी एकूण भाड्याचे अधिमूल्य रु. ९१८.०३ कोटी होते. संकुल बांधकामाचा एकूण कालावधी चार वर्षांचा होता. परंतु बांधकामास झालेल्या विलंबासाठी भाडे अधिमूल्याच्या विहित दरानुसार अतिरिक्त अधिमूल्याचे प्रदान करुन म्हणजेच बांधकामाच्या तीन वर्षांपर्यंतच्या विलंबाला १० टक्के प्रतिवर्ष आणि तीन वर्षांपुढे १.५ टक्के प्रतिवर्ष याप्रमाणे महानगर आयुक्त सदर कालावधी वाढवून देऊ शकतात. अतिरिक्त अधिमूल्य प्रदान न केल्यास १४ टक्के (भाडेपट्टा कराराचा खंड २ ई) दंडनीय व्याज होऊ शकते. परंतु भाडेपट्टाकरारात नमूद केलेल्या विहित कालावधीत काम पूर्ण झाले नव्हते. प्राधिकरणाने प्राप्तकर्त्याला भाडेकराराप्रमाणे देय रक्कम व्याजासहित प्रदान करण्याबाबत नोटीस (ऑगस्ट २०१४) बजावली. जर ते रु.३१२.९८ कोटींची अतिरिक्त अधिमूल्यांची व्याजासहित थकबाकी जून, २०१४ पर्यंत भरण्यास अपयशी ठरल्यास, प्राधिकरण, आरंभ प्रमाणपत्र (Commencement Certificate) रद्द करेल आणि पुढे भाडेनिश्चिती करेल आणि मालमत्ता ताब्यात घेईल व देय रक्कमेची वसूली जमीन महसूलाच्या थकबाकीप्रमाणे करेल. परंतु रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड ने दावा (सप्टेंबर २०१४) केला की भूखंडाच्या सीमारेषा ठरविण्यात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने विलंब केल्यामुळे उल्लेखिलेली वसूली देय नाही आणि भूखंडालगतच्या रस्त्याचे सध्या असलेल्या ३० मीटर वरुन ३९ मीटर पर्यंत रुंदीकरण होणार होते. प्राधिकरणाने त्यांच्यामुळे बांधकाम सुरु करण्यास विलंब झाल्याचा प्राप्तकर्त्याचा दावा फेटाळला (नोव्हेंबर २०१४) आणि ते बांधकामाच्या विलंबासाठी अतिरिक्त अधिमूल्य भरण्यास बाध्य होते असे कळविले त्यानंतर प्राप्तकर्त्याने केलेल्या अर्धवट बांधकामाकरीता अंशत: भोगवटा प्रमाणपत्र जारी करण्याची विनंती (मे २०१५) केली. एकूण ३०,५५० चौ.मी. बांधीव क्षेत्रापैकी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने १६,१३१.५४ चौ.मी. साठी अंशत: भोगवटा प्रमाणपत्र जारी केले आणि उरलेल्या १४,४१८.४६ चौ. मी. बांधीव क्षेत्रासाठी अनुक्रमे २९ मे,२०१५ व २१ डिसेंबर,२०१५ रोजी अंशत: भोगवटा प्रमाणपत्रे जारी केली. परंतु बांधकाम पूर्ण करण्यास झालेल्या तीन वर्ष व एक महिना इतक्या झालेल्या विलंबाकरीता आवश्यक अतिरिक्त अधिमूल्य रु.२७३.५६ कोटी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने आजपर्यंत (जुलै २०१७) वसूल केले नव्हते. शिवाय जूलै,२०१७ पर्यंत न भरलेल्या अतिरिक्त अधिमूल्यावर १४ टक्के व्याजाने म्हणजेच रु.१५४.४५ कोटी सुद्धा वसूल करावयाचे होते. त्यामुळे प्राप्तकर्त्याला अदेय फायदा झाला असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

रिलायन्स कंपनीला अंशत: भोगवटा प्रमाणपत्र जारी करण्यात आले आहे व उर्वरीत भागाचा ताबा घ्यायचा बाकी होता. गरज पडल्यास, MMRDA ला बांधीव परिसरात ज्याची किंमत भाडेपट्टाधारकाकडून प्रलंबित असलेल्या देय किंमतीच्या तुलनेत जास्त आहे. पुन:प्रवेश करता येईल. प्रलंबित एकूण देय रकमेची वसूली झाल्यानंतरच पूर्ण इमारतीसाठी भोगवटा प्रमाणपत्र जारी करण्यात येईल असे विभागाने महालेखाकारांना सांगितले.धोरणात्मक निर्णयानुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी इतर प्राप्तकर्तेजसे मे.जेट एअरवेज (इंडिया) लि. (प्लॉट सी- ६८रु.२२५.१९ कोटी), ऑईल अँड नॅचरल गॅस कमिशन (प्लॉट सी- ६९ अ, ६९ ब रु.१०२.४३ कोटी) आणि इतर विविध राष्ट्रीयकृत बँका/शासकीय संस्था यांचेकडून भाडेपट्टाकरारातील नियोजित कालावधीपेक्षा बांधकामास विलंब झाल्यास नियमितपणे संपूर्ण अतिरीक्त अधिमूल्य (व्याजासहित) वसूल केले होते. म्हणूनच याबाबत प्राधिकरणाने प्राप्तकर्त्यावर दाखविलेल्या अदेय फायद्याचे स्पष्टीकरण होत नाही असेही महालेखाकारांनी नमूद केले.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण जमीन विल्हेवाट अधिनियम, १९७७ अंतर्गत MMRDA अधिमूल्य आकारुन ८० वर्षांसाठी भूखंड भाडेपट्टयाने वाटप करीत असतेव भाडेपट्टेदाराने भूखंडावरील बांधकाम भाडेपट्टा केल्यापासून ४ वर्षाच्या आत पूर्ण करणे अपेक्षित असून बांधकाम पूर्ण न झाल्यास अशा वेळी महानगर आयुक्त अतिरिक्त अधिमूल्य आकारुन या कालावधीत वाढ देऊ शकतात. त्याअनुषंगाने प्राधिकरणाच्या वांद्रे-कुर्ला संकुलातील भाडेपट्टेदारांनी प्राधिकरणास बांधकाम पूर्णत्वाचा कालावधी ४ वरुन ६ वर्ष एवढा वाढवून मिळावा अशी विनंती केली होती. याबाबत सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश किंवा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश यांची एक सदस्यीय समिती नेमून त्यांचा अहवाल घ्यावा असा निर्णय घेण्यात आला व त्याआधारे प्राधिकरणाच्या मान्यतेनुसार उर्वरीत अधिमूल्याची वसूली केली जाईल. सदरहू परिच्छेदात आक्षेपित रिलायन्स इन्डस्ट्रीज प्रकरणी कंपनीने (भाडेपट्टेदार) बांधकाम पूर्णत्वाच्या वाढीव कालावधीचे अधिमूल्य न भरल्यामुळे प्राधिकरणाने दि.१२/०९/२०१७ रोजी

भूखंडाचा ताबा परत घेण्याबद्दल भाडेपट्टेदाराविरोधात व इतर भाडेपट्टेदारांविरोधात नोटीस बजावली, ज्याविरुध्द रिलायन्स कंपनी तसेच इतर भाडेपट्टेदारांनी मा. उच्च न्यायालयात दावा सादर केला. ज्यात न्यायालयाच्या अंतरीम आदेशानुसार या प्राधिकरणाने या कंपन्यांच्या उर्वरीत परवानग्या उर्वरीत थकबाकी अधिमूल्य वसूलीचा आग्रह न धरता, कार्यवाही करावी असे आदेश दिले आहेत. सबब, हे प्रकरण न्यायप्रविष्ट असून मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल असे समितीस सांगण्यात आले. तसेच त्याअनुषंगाने भाडेपट्टेदाराला अंशत: भोगवटा प्रमाणपत्र दिलेले असून उपरोक्त प्रकरणी पुढील कार्यवाही सुरु असल्याचेविभागाने समितीस लेखी स्वरुपात विभागीय प्रतिनिधींनी कळविले.

शिफारस

९.२ मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी खाजगी विकासकाने भाडेपट्टाकरार व अधिमूल्य शर्तींचे उल्लंघन करीत बांधकामास केलेल्या विलंबाबद्दल रु.४२८ कोटींचे अतिरिक्त अधिमूल्य व त्यावरील व्याज वसूल केले नाही असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत व अशाप्रकारे रकमेची वसुली न करताच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी बांधीव क्षेत्रासाठी भोगवटा प्रमाणपत्र जारी केल्यानंतर जवळजवळ २ वर्षाचा कालावधी लोटल्यानंतर देखील अधिमूल्य वसुल केले नाही असे आक्षेप महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदात नोंदविलेले आहेत.

महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदात नोंदविलेले आक्षेप अतिशय गंभीर असून मुंबईसारख्या मोठ्या शहरातील मोक्याच्या ठिकाणचे मोठ मोठे भूखंड मोठ मोठ्या नामांकीत कंपन्यांना भाडेतत्वावर देताना आकारावयाचे अधिमूल्य व त्याअनुषंगाने शासनास प्राप्त होणाऱ्या अधिमूल्य स्वरुपातील महसूलाबाबत नियमानुसार वसुली न केल्यामुळे या कंपन्यांना निश्चितच अदेय फायदा झालेला आहे. पण MMRDA च्या महसूलाचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. सदरहू परिच्छेदाच्या अनुषंगाने आक्षेपित वसुलपात्र रक्कम ही थोडी नसुन हजारो कोटीची असताना शासनस्तरावरुन हे विषय अत्यंत निष्काळजीपणाने हाताळल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. शासनाच्या अधिकाऱ्यांनी शासनास प्राप्त होणाऱ्या महसूलाबाबत अत्यंत सजग व जागरुक असणे आवश्यक असताना नियमानुसार या कंपन्यांकडून अधिमूल्याची करावयाची आकारणी न करता भोगवटा प्रमाणपत्रे दिल्यामुळे तसेच या फरकाच्या रकमेच्या वसुलीसंदर्भात अनेक तांत्रिक व कायदेशीर अडचणी उद्भवून ही प्रकरणे न्यायप्रविष्ठ झाली. इतकेच नव्हेतर MMRDA च्या या सदोष कार्यपध्दतीमुळे न्यायालयात देखील या सदोष कार्यपध्दतीचा अंतिमत: फायदा या कंपन्यांना झाला व न्यायालयाचे निर्णय MMRDA च्या विरोधात गेले.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण जमीन विल्हेवाट अधिनियम, १९७७ अंतर्गत MMRDA ने त्यांच्या मालकीच्या जमीनीचे वाटप भाडेपट्टयाने करण्यासंदर्भात व त्याअनुषंगाने त्या भूखंडावर करावयाच्या बांधकामाची कालमर्यादा, ते वेळेत पुर्ण न झाल्यास आकारावयाचे अधिमूल्य या सर्व बाबतीत तरतूदी अत्यंत सुस्पष्ट असताना व त्या तरतूदींची अंमलबजावणी करणे MMRDA च्या अधिकाऱ्यांवर बंधनकारक असताना अशी आकारणी करताना आकारावयाचे अतिरिक्त अधिमूल्य, विलंब शुल्क, दंडनीय व्याज याची वसुली करण्यात आली नाही. वास्तविकत: या बाबी MMRDA च्या स्वत:हून निदर्शनास येवून ही वसुली करणे MMRDA ने क्रम:प्राप्त असताना याबाबत ही बाब महालेखाकारांनी आक्षेप नोंदवेपर्यंत MMRDA ने कोणतीही दखल स्वत:हून घेतली नाही, ही अतिशय गंभीर बाब असून MMRDA चे अंतर्गत नियोजन कमकुवत असल्याचे निदर्शक आहे. महालेखाकारांनी "भाडेपट्टीवर दिलेल्या शासकीय जमिनींचे संपादणूक लेखापरिक्षण" अंतर्गत राज्यात शासनाने व अन्य स्वायत्त प्राधिकरणांनी त्यांच्या मालकीची जमीन विविध प्रयोजनासाठी भाडेपट्टीने देताना त्यात अनेक अनियमितता वा चुका यासंदर्भात अत्यंत गंभीर आक्षेप नोंदवित एक विशेष अहवाल सभागृहास सादर केला. जो लोकलेखा समितीकडे छाननीसाठी आला. सदरहू विशेष अहवालात महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाअंतर्गत परिच्छेद क्र.६.४ मुंबई (भाडेपट्टयांचे अधिमूल्य, भाडेपट्टी इ.ची वसुली न होणे) मध्ये अत्यंत गंभीर आक्षेप महालेखाकारांनी नोंदविलेले होते. ज्यात एकूण ६ कंपन्यांबाबत (रिलायन्स इन्डस्ट्रीज लि.सह) ४ वर्षाच्या विहित कालावधीत बांधकाम पूर्ण न झाल्यामुळे आकारावयाच्या अतिरिक्त अधिमूल्याबाबत आक्षेप नोंदविलेले आहेत. तोपर्यंत शासनाने या रकमेची मागणी देखील केली नव्हती वा ती भरण्यातही आली नाही. या ६ कंपन्यांपैकी मे.रिलायन्स इन्डस्ट्रीज व मे.नमन डेव्हलपर्स लि. वगळता अन्य भाडेपट्टेधारकांनी बांधकाम पुर्ण करण्याच्या कालावधीत मुदतवाढ देण्याबाबत विनंती केली व त्या त्या कालावधीत अतिरिक्त अधिमूल्य व्याजासह भरले व त्यांना MMRDA कडून मुदतवाढ देखील देण्यात आली. उपरोक्त दोन कंपन्यांनी मात्र अधिमूल्याची रक्कम भरली नाही. अधिनियमातील तरतूदीनुसार ही रक्कम सदरहू कंपन्यांनी भरणे व MMRDA ने

वसुल करणे क्रम:प्राप्त असतानाही व अन्य कंपन्यांनी ही रक्कम भरलेली देखील असताना MMRDA ने सर्वच कंपन्यांना समान न्याय लावत रिलायन्स कंपनी, मे.नमन डेव्हलपर्स व इतर ४ कंपन्यांकडून ही रक्कम वसुल करणे बंधनकारक होते. परंतु तसे न करता MMRDA ने या इमारतींचे बांधकाम करण्यासाठी इतर शासकीय कार्यालयांकडून परवानग्या प्राप्त करुन घेण्यासाठी लागणारा कालावधी लक्षात घेता प्राधिकरणाने तेवढ्या किंवा ठराविक कालावधीकरिता अधिमूल्य आकारण्यास सुट द्यावी किंवा कसे, याबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश यांची एक सदस्यीस समिती नियुक्त करण्याचा निर्णय MMRDA ने घेतला. त्याअनुषंगाने निवृत्त न्यायाधीश श्री.श्रीकृष्ण यांची नियुक्ती केली. परंतु त्यांचा देखील अहवाल MMRDA ने मान्य केला नाही. MMRDA ने या प्रलंबित अधिमूल्याच्या रकमेची मागणी महालेखाकारांनी आक्षेप नोंदवेपर्यंत रिलायन्स इन्डस्ट्रीजकडे नोंदविलेली नव्हती. महालेखाकारांचा सदरहू विशेष अहवाल लोकलेखा समितीने साक्षीसाठी घेवून त्यातील प्रत्येक प्रकरणांची विस्तृत छाननी व तपासणी करुन अनेक महत्वपूर्ण शिफारशी शासनाला केल्या. त्यात उपरोक्त रिलायन्स इन्डस्ट्रीजसंदर्भातील विषयासंदर्भात अन्य कंपन्यांनी ही अधिमूल्याची रक्कम MMRDA कडे जमा केलेली असताना रिलायन्स इन्डस्ट्रीज व इतर ५ भूधारकांना मात्र वेगळा न्याय लावून वेळकाढूपणाचे धोरण प्राधिकरण अवलंबित असल्याचे मत नोंदविले व कायद्यातील तरतूदी सुस्पष्ट असताना त्याची अंमलबजावणी काटेकोरपणे करुन ही रक्कम तातडीने वसुल करण्यात यावी अशी शिफारस लोकलेखा समितीच्या २६ व्या अहवालाच्या माध्यमातून शासनास दि.११.०८.२०१७ रोजी केली.समितीच्या शिफारशीच्याआधारे प्राधिकरणाने दि.१२.०९.२०१७रोजी सदरहू कंपनीस जमीन परत घेण्याची नोटीस दिली व यापुढे कोणतीही परवानगी देण्यात येणार नाही असेही त्यात नमूद केले. सदरहू नोटीसीच्या विरोधात रिलायन्स इन्डस्ट्रीज लि. ने मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केली ज्यास न्यायालयाने अंतरिम स्थगिती दिली. ज्यात पैशासाठी आग्रह न धरता सर्व परवानग्या नियमानुसार द्याव्यात असे आदेश मा.उच्च न्यायालयाने दिले. MMRDA ने रिलायन्स कंपनीला दि.२९.०५.२०१५, २१.१२.२०१५ व २३.०२.२०१७ असे अंशत: भोगवटा प्रमाणपत्र देखील दिले आहेत. महालेखाकारांचे या प्रकरणी गंभीर आक्षेप प्रलंबित असताना व लोकलेखा समितीची या प्रकरणी छाननी व तपासणी सुरु झाल्यानंतर व त्यावेळी न्यायालयाचे कोणतेही आदेश अस्तित्वात नसतानाही ही थकीत रक्कम वसुल न करता MMRDA ने दि.२३.०२.२०१७ रोजी अंशत: भोगवटा प्रमाणपत्र या कंपनीला दिले, ही तर अधिकच गंभीर बाब आहे. वास्तविक थकीत रकमेची वसुली झाल्याशिवाय हे भोगवटा प्रमाणपत्र देणे अत्यंत अयोग्य होते. परंतु विभागाने त्यावेळी प्रलंबित वसुलीकडे दुर्लक्ष करुन वा त्याबाबत कोणताही आग्रह न धरता हे भोगवटा प्रमाणपत्र दिले. ज्यावर त्यावेळी लोकलेखा समितीसमोर विस्तृत चर्चा झालेली आहे. या प्रकरणांच्या माध्यमातून कोट्यावधींची रक्कम वसुलपात्र ठरत असताना MMRDA ने याकडे अत्यंत दुर्लक्ष केले व नंतर न्यायालयातील कायदेशीर कारवाईमध्ये ही प्रकरणे अडकल्यामुळे MMRDA ची संपुर्ण वसुलपात्र रक्कम अडकून पडली. समितीने MMRDA ला वेळोवेळी पत्राद्वारे कळवून सदरहू प्रकरणी अंतिम निर्णय होईपर्यंत MMRDA ने यापुढे कोणतेही आरंभ प्रमाणपत्र किंवा भागश: भोगवटा प्रमाणपत्र देवू नये. तसेच MMRDA च्या अखत्यारीतील वांद्रे-कुर्ला संकुलातील जी-ब्लॉक मधील इतर काही भूखंडासंदर्भातील देखील भागश: अथवा अंतिम भोगवटा प्रमाणपत्र देताना अशाप्रकारच्या अनियमिततेची पुनरावृत्ती होणार नाही याची दक्षता घ्यावी व तसे झाल्यास संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन वसुलीसंदर्भातील कारवाई करावी असेही MMRDA ला पत्राद्वारे कळविले. परंतु मा.उच्च न्यायालयाने दि.२७.०३.२०१९ रोजी यासंदर्भात अंतिम निर्णय दिला असून ज्यात सी-६६ या भूखंडावरील प्रिमायसेस विकण्यास ना-हरकत दाखला देणेबाबत MMRDA ला आदेशित करण्यात आले आहे. तसेच रु.५४१.१६ कोटीचा भरणा भाडेपट्टेधारकाने केल्यानंतर त्याच्या प्रमाणात भोगवटा प्रमाणपत्र देण्याचेही आदेशित केले आहे. मा.उच्च न्यायालयाच्या सदरहू आदेशानुसार MMRDA ने तात्काळ म्हणजे दि.२८.०३.२०१९ रोजी या भूखंडावरील प्रिमायसेस विकण्यास ना-हरकत दाखला देण्याची कार्यवाही केली व तातडीने या निर्णयाविरुध्द अपिल पण दाखल केले नाही. तसेच मा.उच्च न्यायालयाचे आदेश व लोकलेखा समितीने दिलेल्या सूचना एकमेकांशी सुसंगत नसल्यामुळे तसेच विषयांकीत प्रकरणी प्राधिकरणाची येणे असलेली संपुर्ण रक्कम वसुल न झाल्यामुळे या प्रकरणात मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका (SLP) दाखल करण्याबाबतची पुढील कार्यवाही प्राधिकरणामार्फत सुरु असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले. हा संपुर्ण घटनाक्रम पाहता कायद्यातील तरतूदीनुसार बांधकाम विलंबासंदर्भात वसुल करावयाच्या अधिमूल्याबाबत दोन प्रकारची विसंगत कार्यवाही MMRDA च्या स्तरावरुन झाली आहे. एकीकडे अधिकांश कंपन्यांनी या अधिमूल्याची व दंडाची संपुर्ण रक्कम MMRDA ला भरलेली आहे. तर दुसरीकडे न्यायालयाने दिलेला निर्णय हा रिलायन्स इन्डस्ट्रीजच्या बाजूने व MMRDA च्या विरोधात गेल्यामुळे थकीत रकमेची वसुली न करता रिलायन्स कंपनीला प्लॉट नं. सी-६४ करिता

अंशत: भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले. अशा परिस्थितीत दोन्ही स्तरावर अशाप्रकारे निर्णयाची विसंगत अंमलबजावणी करणे निश्चितच MMRDA ला अडचणीचे तर आहेच, परंतु अन्य कंपन्यांवर अन्यायकारक ठरणारे आहे. मा.उच्च न्यायालयाचा निर्णय मान्य केल्यास ज्या कंपन्यांनी अगोदर अधिमूल्याची रक्कम भरलेली आहे. त्यांना ती रक्कम परत करणे MMRDA ला क्रम:प्राप्त ठरेल अन्यथा रिलायन्स इन्डस्ट्रीजच्या बाजूने मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयावर मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल करुन तेथे शासनाची पुर्ण बाजू गुणवत्तापूर्वक व कायदेशीर बाबींच्याआधारे मांडून हा निर्णय MMRDA च्या बाजूने येणेकरिता प्रयत्न करणे असे दोनच पर्याय उपलब्ध आहेत व तसे करण्याचे निर्देश समितीने साक्षीदरम्यान विभागीय प्रतिनिधींना दिले. MMRDA ने जर रिलायन्स इन्डस्ट्रीजबाबत घेतलेल्या निर्णयाचे समर्थन केले तर अन्य कंपन्यांना अधिमूल्याची रक्कम परत करावी लागेल. यासाठी कोणतीही निश्चित भूमिका घेण्याची इच्छा MMRDA ची दिसत नाही. ज्यामुळे मोठ्या प्रमाणात MMRDA चे नुकसान होत आहे. तसेच सी-६४ या भूखंडासंदर्भात देखील जवळजवळ रु.१३८८.१५ कोटी इतकी थकबाकीची रक्कम रिलायन्स इन्डस्ट्रीजकडे थकीत आहे. यात अंशत: रक्कम घेवून उर्वरित बँक गॅरंटी घेवून अंशत: भोगवटा प्रमाणपत्र देण्याची विभागाने कार्यवाही करणे देखील परिपूर्ण नाही. यातूनही भविष्यात अनेक कायदेशीर अडचणी उद्भवण्याची शक्यता नाकारता येत नाही. या प्रकरणांमध्ये सर्वच कंपन्यांबाबत एकसमान निर्णय घेवून त्याची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. कोठेही निर्णयामध्ये विसंगती वा तफावत राहू नये वा काही विशिष्ट कंपन्यांनाच याचा फायदा हेऊ नये याची संपुर्ण काळजी विभागाने घेणे आवश्यक आहे. अशाप्रकारची कार्यवाही करुन ही सर्व प्रकरणे निष्कर्षाप्रत आणून जी काही नियमानुसार वसुली क्रम:प्राप्त ठरते ती विभागाने तात्काळ वसुल करण्याच्यादृष्टीने एकतर मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल करुन शासनाची योग्य, कायदेशीर व गुणवत्तापूर्वक भूमिका ज्येष्ठ व नामवंत वकीलाच्या माध्यमातून मांडावी. तसेच समांतररित्या जर आर्बीट्रेशनच्या माध्यमातून सामोपचाराने एकत्रित बसून व या प्रकरणी व्यावहारीकदृष्ट्या निष्कर्षाप्रत येता येत असेल तर तो देखील प्रयत्न विभागाने करावा. तसेच MMRDA मुळे झालेला विलंब क्षमापित करुन विलंबासाठी दोषी अधिकाऱ्यांवर MMRDA ने कारवाई करावी. तसेच भूखंड क्र. सी-६६ बाबत रु.५४१.१६ कोटी रकमेची वसुली करुन त्याआधारे ओसी देण्याच्या न्यायालयाच्या आदेशाविरुध्द सर्वोच्च न्यायालयात तात्काळ अपिल दाखल करावे व कोणत्याही परिस्थितीत पार्ट ओसी देण्यात येऊ नये व लवकरात लवकर ही प्रकरणे निकाली काढून जी काही रक्कम MMRDA ला येणे क्रम:प्राप्त आहे ती तातडीने वसुल करावी. तसेच या गंभीर प्रकरणी दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

नगरविकास विभाग

१०.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१६-१७ या वर्षाच्या सामान्य सामाजिक क्षेत्र अहवालात महालेखापालांनी खालीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले आहेत.

देय भाडेपट्टा अधिमुल्याची वसुली न करणे

परि.क्र.	स्पष्टीकरणात्मक ज्ञापने	प्राधिकरणाचे अभिप्राय	शासनाचे अभिप्राय
३.६	**देय भाडेपट्टा अधिमूल्याची वसुली न करणे** **मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने भाडेपट्टाधारकाकडून वाटप केलेल्या अतिरिक्त बांधीव क्षेत्रासाठी विहीत दरसूचीनुसार मार्च २०१७ पर्यंत देय भाडे अधिमूल्य वसूल न केल्यामुळे ₹ ८५५.५९ कोटीची वसूल झाली नाही.** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण ही दिर्घ मुदतीचे नियोजन, नविन विकास केंद्रांना चालना देणे, मोक्याच्या प्रकल्पांची अमलबजावणी आणि पायाभूत सुविधाच्या विकासाकरीता अर्थसहाय्य करणे ही कामे करते. महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने (मे २००८) बांद्रा-कुर्ला संकुल मुंबईतील जी ब्लॉक चा रहिवासी वापरासाठीचा चटई क्षेत्र निर्देशांक हा १.५ वरुन तीन वर तर व्यापारी वापरासाठी दोन वरुन चार असा बदल केला. परिणामी जो ब्लॉकमध्ये १३ लाख चौ.मी. चे अतिरिक्त बांधीव क्षेत्र प्राप्त झाले. हे बांधीव क्षेत्र एकदाच रहिवासी उपयोगासाठी व व्यापारी उपयोगासाठी शीघ्र सिद्धगणकाच्या अनुक्रमे १०० टक्के आणि १५० टक्के दराने देण्याचे प्राधिकरणाने ठरविले (ऑक्टोबर २००८). त्यानुसार मुंबई महानगर प्रदेश	१) महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने (मे २००८) बांद्रा-कुर्ला संकुल मुंबईतील जी ब्लॉक चा रहिवासी वापरासाठीचा चटई क्षेत्र निर्देशांक हा १.५ वरुन ३.०० वर तर व्यापारी वापरासाठी २.०० वरुन ४.०० असा बदल केला. २) परिणामी "जी" ब्लॉकमध्ये अतिरिक्त बांधकाम क्षेत्र उपलब्ध झाले. ३) हे बांधीव क्षेत्र रहिवासी उपयोगासाठी व व्यापारी उपयोगासाठी शीघ्र सिद्धगणकाच्या अनुक्रमे १०० टक्के आणि १५० टक्के दराने देण्याच्या योजनेस प्राधिकरणाने मान्यता दिली. ४) सदर योजनेप्रमाणे मागणी पत्राबरोबर २० टक्के अधिमूल्य भरावयाचे होते आणि उर्वरीत रक्कम १० टक्के सरळ व्याजाने वार्षिक चार हप्त्यात भरावयाची होती. वार्षिक हप्ता भरण्यास विलंब झाल्यास दंडनिय व्याज भरावयाचे होते. बांधीव क्षेत्राच्या वापराबद्दल कोणतीही कालमर्यादा नव्हती. ५) सदर योजनेप्रमाणे आजपर्यंत सुमारे ६.७२ हे. रहिवासी व ४१.०८ हे. वाणिज्य बांधकाम क्षेत्राचे वाटप प्राधिकरणाने बांद्रे-कुर्ला संकुलाच्या "जी" ब्लॉकमधील वाटपग्रहीना केले आहे. ६) सदर योजना सध्या बंद आहे. पुर्वीच वाटप झालेल्या	सदर स्पष्टीकरणात्मक ज्ञापनाच्या अनुषंगाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या कडून प्राप्त झालेल्या अभिप्रायास शासनाची सहमती दर्शवून सदर स्पष्टीकरणात्मक ज्ञापन समेत/ तपासून घेण्यासाठी (Vetting) मा. प्रधान महालेखाकार लेखापरीक्षक-१ यांच्याकडे पाठविण्यात आली असता मा. प्रधान महालेखापरिक्षक यांनी याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय दिले आहे. "This copy was not available to Audit Team during Audit. Annexure 2 may also be furnished.

विकास प्राधिकरणाने जो ब्लॉक मध्ये आधीपासून असलेल्या प्राप्तकर्त्यांना या योजनेबद्दल सूचित केले(नोव्हेंबर, २००८) सदर योजनेप्रमाणे मार्च, २००९, पूर्वी मागणी पत्राबरोबर २० टक्के अधिमूल्य भरावयाचे होते (जे मार्च २०१० पर्यंत सुधारीत केले आणि पुढे मार्च २०११ पर्यंत पुन: सुधारीत केले.) आणि उर्वरीत रक्कम १० टक्के सरळ व्याजाने वार्षिक चार हप्त्यात भरावयाची होती. वार्षिक हफ्ता भरण्यास विलंब झाल्यास १४ टक्के व्याज भरावयाचे होते. बांधीव क्षेत्राच्या वापराबद्दल कोणतीही कालमर्यादा नव्हती.

दोन प्रकरणांच्या चाचणी तपासणीत उघड झाले की,

प्रकरण -I

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मे. रिलायन्स इंडस्ट्रीज लि. ला ₹ ९८४.९० कोटीना (₹१,४७,००० प्रति चौ.मी. दराने) ६७,००० चौ.मी. इतके अतिरिक्त बांधीव क्षेत्राचे वाटप केले (मार्च २०१२). भाडे अधिमूल्याची २० टक्के रक्कम ही लगेच भरावयाची होती आणि उर्वरीत रक्कम ही चार वार्षिक हफ्त्यांमध्ये (मार्च २०१६ पर्यंत) भाडे अधिमूल्याच्या दहा टक्के सरळ व्याजाने आणि हफ्त्याची रक्कम भरण्यास विलंब झाल्यास १४ टक्के दराने दंडनीय व्याज भरावयाचे होते. त्यानुसार भाडेपट्टाधारकाने मार्च २०१६ पर्यंत ₹१,१८१.८८ कोटी (सरळ व्याजासहित) रक्कम भरणे आवश्यक होते.

असे दिसून आले की हफ्त्यांचा भरणा करण्याबाबत प्राप्तकर्त्याने वेळेचे बंधन पाळले नाही. सरळ व्याज (१० टक्के) आणि विलंबित व्याज (१४ टक्के) लक्षात घेता मार्च २०१६ पर्यंत वाटप ग्रहीतेकी बहुतांश वाटपग्रहीना अधिमूल्याची संपूर्ण रक्कम व्याजासह भरलेली आहे. परंतू काही वाटपग्रहीकडून अधिमूल्याची रक्कम येणे बाकी आहे.

प्रकरण -I

ऑडीट डिपार्टमेंटने असा दावा केला आहे की या प्राधिकरणाने सप्टेंबर, २०१७ मध्ये (बांधकाम पूर्णत्वाच्या वाढीव कालावधीची रक्कम रु. ७७०.३६ कोटीपर्यंत वाढल्यानंतर) नोटीस बनविली आहे. परंतु, या प्राधिकरणाने संबंधित प्रकरणी २२/०८/२०१४ रोजी यापूर्वीच नोटीस बजावली होती (**जोडपत्र-३**) ही नोटीस ऑडीट डिपार्टमेंटने कोणताही प्रश्न उपस्थित करण्यापूर्वीच काढली होती. सबब, याबद्दलचा ऑडीट डिपार्टमेंटचा दावा योग्य वाटत नाही.

तसेच प्राधिकरणाने दि. १२/०९/२०१७ रोजी देखिल उर्वरीत अधिमूल्याच्याबाबतीत भाडेपट्टेदारांस नोटीस बजावती आहे (**जोडपत्र-४**).

विषयांकित भाडेपट्टेदाराने ऑक्टोबर, २०१७ मध्ये रु.१००/- कोटींचा भरणा अतिरिक्त बांधकाम क्षेत्रासाठी केला आहे.

याबाबतची माहिती प्राधिकरणाने दि.२०/११/२०१७ (**जोडपत्र-२**) रोजीच्या पत्राने ऑडिट डिपार्टमेंटला दिलेली आहे.

जरी विषयांकित इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असले तरी संपूर्ण अधिमूल्य मिळाल्यानंतरच प्राधिकरणातर्फे संपूर्ण भोगवटा प्रमाणपत्र दिले जाईल.

सबब, प्राधिकरणातर्फे विषयांकित भाडेपट्टेदारास कोणतीही विशेष मदत केलेली नसून.ऑडीट पार्टीला सदर ऑडीट परा वगळण्याची विनंती करण्यात येत आ

As per the conditions of allotment of BUA premium with 10% Smple interest and delayed interest of 14% was to be recovered from Reliance Industries Ltd.

It may be stated whether dues amounting Rs 770.36 Crore have been recovered from Reliance Industries Ltd. if not the reason for the same may we furnished to PAC

The reply furnished by the Govt. is not acceptable in view of premium condition of allotment which allowed recovery of premium till March 2015 and even after more than 3 years recovery is pending

Reasons may be furnished to PAC for non-recovery of premium."

प्रधान महालेखाकार यांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या अनुषंगाने मुंबई महानगर प्रदेश विकास

प्राप्तकर्त्याने ₹ १,३३९.६० कोटी भरणे आवश्यक होते. परंतु प्राप्तकर्त्याने प्रत्यक्षात मार्च २०१६ पर्यंत केवळ ₹६९६.५४ कोटी भरले. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने अखेर एक वर्ष उलटून गेल्यावर देय रक्कम , जी ₹७७०.३६ कोटी झाली होती. तिच्या मागणीसाठी सूचना जारी केली (सप्टेंबर,२०१७)

प्रकरण –II

मे.स्टारलाईट सिस्टीम्स प्रा. लि. जे भूखंड क्र. आर १.२, आर १.३ आणि आर १.४ चे भूखंडधारक होते, यांनी सदर भूखंडावर गृहवासी वापरार्करिता ३२,००० चौ.मी. अतिरिक्त बांधीव क्षेत्र देण्याची मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे विनंती केली (मार्च २०१०). प्राधिकरणाने एकूण ₹२२९.७६ कोटीच्या भाडेपट्टा अधिमूल्यावर त्याचे वाटप केले (एप्रिल, २०१०). जे २०१० आणि २०११ च्या शीघ्र सिद्धगणकामधील जो दर जास्त असेल तो लागू होईल. हया वाटपाच्या अटीप्रमाणे ₹२९८.५६ कोटी असे सुधारित झाले. मार्च २०११ पर्यंत २० टक्के अधिमूल्य भरावयाचे होते आणि उर्वरीत वर्ष २०१२ ते २०१५ मधील प्रत्येक मार्च महिन्यात १० टक्के सरळ व्याजाने वार्षिक हफ्त्यात भरावयाचे होते. अशा रीतीने भाडेपट्टाधारकाने मार्च २०१५ पर्यंत भाडे अधिमूल्यापोटी ₹ ३५८.२७ कोटी (सरळ व्याज धरुन) भरणे आवश्यक होते.

महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या अधिलेखड तपासणीत (मार्च, २०१७) उघड झाले की भाडेपट्टाधारकाने हप्ते भरण्याच्या नियत तारखा पाळल्या नव्हत्या. सरळ व्याज (१० टक्के) आणि दंडनीय व्याज (१४ टक्के) हे घटक लक्षात घेता, मार्च २०१५ पर्यंत भाडेपट्टाधारकाने ₹४३२.९७ कोटी भरावयाचे होते. तथापि, भाडेपट्टाधारकाने मार्च

प्रकरण –II

ऑडीट डिपार्टमेंटने ऑक्टोबर, २०१७ मध्ये जो प्रश्न राज्य शासनास पाठविला होता तो राज्य शासनाने या प्राधिकरणाकडे पाठविला होता. सदर प्रश्नास प्राधिकरणाने दिनांक ०२/११/२०१७ **(जोडपत्र-५)** रोजी आपले उत्तर ऑडीट डिपार्टमेंटला पाठविले होते व त्याची प्रत नगरविकास विभागास पाठविली होती. सबब, ऑडीट डिपार्टमेंटच्या प्रश्नाचे उत्तर प्रलंबीत नाही. या प्राधिकरणाच्या दि. ०२/११/२०१७ रोजीच्या उत्तरातील ठळक मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत :-

(i) या प्राधिकरणाच्या अतिरिक्त बांधकाम क्षेत्राच्या वाटपाबद्दलच्या मंजूर योजनेनुसार अधिमूल्याचा भरणा ५ हफ्त्यांमध्ये करायचा आहे. परंतु या हफ्त्यामध्ये दिरंगाई झाल्यास दंड भरुन घेण्याबाबत तरतूद दाखल या योजनेत आहे. सबब, विषयांकित भूखंडावर वाटप केलेले ३२००० चौ.मी. अतिरिक्त बांधकाम क्षेत्राचे संपूर्ण व्याजासह अधिमूल्य वसूल झाल्यानंतरच पूर्ण बांधकामास भोगवटा प्रमाणपत्र दिले जाईल.

(ii) सध्या अंशत: भोगवटा प्रमाणपत्र देणेसाठी काढलेले प्रमाण हे फक्त बांधकाम परवानगी देणेसाठी सोपे जावे म्हणून वापरलेली पद्धत आहे.

(iii) भाडेपट्टेदाराने प्राधिकरणाच्या भूखंडावर इमारत बांधलेली आहे आणि भाडेपट्टेदाराने कोणतेही अधिमूल्य भरणे बाकी असल्यास, प्राधिकरण त्या भूखंडाचा ताबा किंवा बांधीव क्षेत्राचा ताबा घेऊ शकते.

(iv) आजपर्यंत विषयांकित भूखंडावरील इमारतीस फक्त प्राधिकरणाने कार्यवाही करणे आवश्यक आहे. तथापि, याबाबत विभागाच्या दि. १५.०१.२०१९ रोजीच्या पत्रान्वये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास खुलासा सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानुषंगाने प्राधिकरणाने सादर केलेला खुलासा सोबत जोडण्यात येत आहे (परि. क्र. अ). कृपया प्राधिकरणाचा खुलासा मान्य करण्यात यावा.

२०१५ पर्यंत केवळ ₹ ३६६.३८ कोटी भरले. शिवाय सुरुवातीला मार्च आणि म २०११ मध्य प्रदान केल्यानंतर भाडेपट्टाधारकाने हफ्ते भरण्याच्या वेळा पाळल्या नाहीत आणि २६,५०० चौ.मी. चे अतिरिक्त बांधीव क्षेत्र वापरुन मगच मागील सगळी देय रक्कम मार्च २०१५ मध्येच भरली. एकवेळ योजनेत नमूद केलेल्या वेळेनुसार अतिरिक्त ३२,००० चौ.मी. चे बांधीव क्षेत्रासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने देखिल वसूलीसाठी आग्रह धरला नाही. अनुसूचीनुसार आणि नियत वेळेत म्हणजेच मार्च २०१५ पर्यंत भाडे अधिमूल्य वसूली करण्यात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला आलेल्या अपयशाची परिणती ₹६६.५९ कोटींची (₹ ४३२.९७ कोटी - ₹ ३६६.३८ कोटी) वसुली झाली नाही. जी मार्च २०१७ पर्यंत ₹ ८५.२३ कोटी झाली.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने सांगितले की (मार्च २०१७) लाभार्थ्यांने भोगवटा प्रमाणपत्र जारी करण्याआधी एकूण २६,५०० चो.मी. च्या अतिरिक्त बांधीव क्षेत्रासाठी भाडेपट्टाधारकाने व्याजासहीत भाडे अधिमूल्य व विलंबीत व्याजाचे पूर्ण प्रदान केले होते.

उत्तर स्विकारार्ह नाही कारण भाडेपट्टाधारकाने प्रत्यक्षात वापरलेल्या बांधीव क्षेत्राचे देय भरण्याऐवजी संपूर्ण ३२,००० चौ. मी. क्षेत्रफळासाठी विहीत कालवधीत प्रदान करणे आवश्यक होते.

ही बाब ऑक्टोबर २०१७ मध्ये राज्य शासनाला संदर्भित करण्यात आली. त्यांचे उत्तर नोव्हेंबर २०१७ पर्यंत प्रतिक्षित आहे.

अंशत: भोगवटा प्रमाणपत्र दिलेले असून काही क्षेत्रास अजून भोगवटा प्रमाणपत्र दिलले नाही आणि वर (iii) मध्य नमूद केल्याप्रमाणे आवश्यकता वाटल्यास प्राधिकरण या बांधीव क्षेत्राचा ताबा घेईल ज्याची किंमत, वसूलीच्या किंमतीपेक्षा अधिक असू शकेल.

सबब, प्राधिकरण उर्वरीत क्षेत्रासाठी भोगवटा प्रमाणपत्र देणेपूर्वी भाडेपट्टेदाराकडून संपूर्ण अतिरिक्त बांधकाम क्षेत्राचे अधिमूल्य व्याजासह वसूल करणार असल्याने ऑडीट डिपार्टमेंटला सदर परिच्छेद वगळावा अशी विनंती आहे.

कक्ष अधिकारी
नगर नियोजन विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

११.१ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक २७ डिसेंबर २०१८, १४ फेब्रुवारी व ४ जून २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली.

साक्ष :-

परिच्छेद क्रमांक ३.६ - देय भाडेपट्टा अधिमूल्याची वसुली न करणे :

हा परिच्छेद सुद्धा रिलायन्स कंपनी संदर्भातील आहे. दिनांक ३ सप्टेंबर, २०१७ पर्यंत अधिमूल्याची रक्कम ७७०.३६ कोटी रुपये होती. आता त्या रकमेत आणखी वाढ होईल, असे समितीने निदर्शनास आणले असता, मध्यंतरी त्यांनी १०३ कोटी रुपयांचा भरणा केलेला आहे, असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

उर्वरित रक्कम वसूल करण्यासाठी विभागाकडे कोणती लिगल रेमेडी आहे ? असा प्रश्न समितीने केला असता, ७०३ कोटी रुपये मुद्दल आणि १०८ कोटी रुपये व्याज असे एकूण ८११ कोटी रुपये वसूल झालेले आहेत. विभागाने एकूण ६७ हजार स्क्वेअर मीटर पैकी ३८ हजार स्क्वेअर मिटरची ओसी दिलेली असून २९,५०० स्क्वेअर मिटरची ओसी द्यावयाची बाकी आहे, असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

एकूण किती रक्कम येणे बाकी आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, जवळपास ६९६ ते ७०० कोटी रुपये येणे बाकी आहेत, विकासकाची अशी मागणी आहे की, आपण ओसी देत नाही म्हणून ते प्रिमाससेसची विक्री करु शकत नाही. जे लोक त्यांच्याकडे खरेदी करण्यासाठी येतात त्यांच्याकडे पैसे आहेत. परंतु, ती रक्कम देण्यासाठी ओसी द्यावी लागते. ७०० कोटी रुपये येणे बाकी आहेत. आपल्याला वेगवेगळ्या अॅथॉरिटीमध्ये झालेल्या निर्णयाप्रमाणे व्याजाचा दर आकारावयाचा आहे. आपण १४ टक्क्यानुसार कॅलक्युलेशन केलेले आहे. परंतु, काही ठिकाणी लिज अॅग्रीमेंटमध्ये पीएलआर रेट दिलेला आहे. काही ठिकाणी पीएलआर अधिक ४ टक्के असा दर दिलेला आहे. प्रत्येक वर्षीचा दर काढून थोडी रक्कम कमी जास्त होईल. विभागाने जवळपास ३० हजार स्क्वेअर मिटरची ओसी दिलेली नाही, असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

What is the cost of ३०,०००sq.m.? असा प्रश्न समितीने केला असता, आज रेडी रेकनरचा दर १ हजार कोटी रुपये आहे, असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

रिलायन्स कंपनीचे लोक विक्री करणार नाहीत. कारण, त्यांना स्वत:साठीच जागा पाहिजे आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता, लिज प्रोव्हिजन्समध्ये दोन प्रोव्हिजन्स आहेत. We can enter into the premises. There is a provision regarding this in the lease agreement. आपल्याकडे व्याजाची सुद्धा प्रोव्हिजन आहे. आम्हाला त्यांनी दोन-तीन महिन्यांपूर्वी सांगितले की, पैसे तयार आहेत, परंतु विभागाने ओसी द्यावी. आपण ओसी दिलेली नाही. म्हणून ते पैसे भरत नाहीत, असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

पैसे तयार आहेत म्हणजे काय ? असा प्रश्न समितीने केला असता, म्हणजे त्यांचे जे प्रॉस्पेक्टीव्ह कस्टमर आहेत त्यांच्याकडे पैसे आहेत असे रिलायन्स कंपनीने सांगितले आहे. परंतु, ओसी दिलेली नसल्यामुळे ग्राहक ते विकत घेऊ इच्छित नाहीत. त्यांचे असे म्हणणे होते की, आपण ओसी द्यावी. आम्ही ताबडतोब पैसे भरतो. त्यावर विभागाने सांगितले की, आम्ही ओसी देणार नाही. कारण, ओसी दिल्यानंतर पुन्हा रिकव्हरीचे प्रश्न निर्माण होतील. आता बँक, कंपनी आणि एमएमआरडीए असे ट्राय पार्टी अॅग्रीमेंट करता येईल काय अशी चर्चा सुरु आहे. ते पैसे रिलायन्सने भरणे अपेक्षित आहेत. परंतु, अॅग्रीमेंट झाल्यानंतर त्यांच्या वतीने बँक पैसे भरु शकेल काय आणि अशा ट्राय पार्टी अॅग्रीमेंटसाठी बँक तयार होईल काय अशा दोन-तीन गोष्टींवर अभ्यास सुरु आहे. ते झाले तर हे ७०० कोटी रुपये आणि अगोदरची जी रक्कम आहे ती वसूल करता येईल, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने व्याजाच्या दराचे जे व्हॅल्युएशन आहे ते अॅडजेस्ट करावे. त्यासाठी प्रॉब्लेम नाही. परंतु, त्यानी प्रिमियमचे ड्युज आणि व्याजाची रक्कम द्यावयाची आहे. यामध्ये व्याजाच्या दरात सेटलमेंट होईल. परंतु, प्रिमियमच्या ड्युजमध्ये सेटलमेंट होणार नाही, असे मत समितीने व्यक्त केले असता, प्रिमियमची रक्कम फिक्स आहे. कारण, जेवढा एफएसआय घेतला तेवढा प्रिमियम आहे आणि ती रक्कम भरली नाही म्हणून त्या रकमेवरील व्याज या रकमा फिक्स आहेत. त्यांना ती रक्कम भरावी लागेल. त्याशिवाय विभाग ओसी देत नाही, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समितीचा माहितीनुसार मोठ्या प्लॉटसाठी जास्त प्रिमियम लागेल. कारण, आपण ते रेडी रेकनरची कॉस्ट इन्क्ल्युड करुन मोजमाप करीत आहोत. परंतु, एमएमआरडीएने बीकेसीच्या प्रिमाययसेसमध्ये अमूक क्षेत्रापेक्षा मोठा प्लॉट असेल तर त्यासाठी प्रिमियम दर आकारणी अधिकची करावयाची आहे. एमएमआरडीएने अशा प्रकारे कोणाकडून अधिक प्रिमियम दर आकारणी केलेली आहे काय ? असा प्रश्न समितीने केला असता, विभाग अॅथॉरिटीच्या निर्णयाचे पालन करतो. तो प्लॉट १०१८३ स्क्वेअर

मीटर आहे. आपण ॲथॉरिटीच्या निर्णयाप्रमाणे कमर्शिअलसाठी त्या दिवसाच्या रेडी रेकनरच्या १५० पट घेतो, असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

ती जागा किती वर्षासाठी लिजवर दिलेली आहे ? असा प्रश्न समितीने केला असता, ती जागा ८० वर्षाकरिता लिजवर दिलेली आहे, असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

आता ती रक्कम वसूल करण्यासंदर्भात विभागाने कोणते नियोजन केले आहे ? ट्राय पार्टी ॲग्रीमेंटशिवाय पैसे वसूल होणार नाहीत काय ? असे विचारणा समितीने केली असता, विभाग त्यांच्याकडे वसुलीच्या रकमेची मागणी करीत आहेत. परंतु, सध्या ट्राय पार्टी ॲग्रीमेंटचा प्रस्ताव चर्चेत आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

या केसमध्ये ड्युज असताना ओसी देण्याची चूक एमएमआरडीएकडून होऊ नये. कोर्टात केस गेली तर विभागाने ॲडव्हान्समध्ये कॅव्हेट दाखल करावी. विभागाने कोणत्याही परिस्थितीत सर्व रक्कम वसूल केल्यानंतरच ओसी देण्याबाबत निर्णय घ्यावा.परिच्छेद क्र.३.५ मध्ये दर्शविलेली रक्कम सुद्धा यामध्ये ॲड होणार आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधीने होकारार्थी उत्तर दिले तसेच केवळ ४ ते ६ वर्षाचा सब्जेक्ट टू हायकोर्ट आहे, असे समितीस सांगितले.

What about the Sterlite? असा प्रश्न समितीने केला असता, स्टार लाईटकडून जवळपास ८० कोटी रुपये येणे बाकी आहेत. विभागाकडे त्यांची सीसी आणि ओसी सुद्धा प्रलंबित आहे, असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

जोपर्यंत वसुली होत नाही तोपर्यंत हा परिच्छेद प्रलंबित राहील, असे समितीने सूचित केले असता, त्यांनी पार्ट ओसी घेतलेली आहे. विभागाने ५५०० स्क्वेअर मिटरची सीसी दिलेली नाही, असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

विभागाने ५५०० स्क्वेअर मिटरची सीसी देऊ नये. कोर्टाने सांगितले तरी आपण कोर्टात वस्तुस्थिती मांडावी. कोर्ट कायद्यापेक्षा मोठे नाही. विभागाने जोपर्यंत ड्युज मिळत नाहीत तोपर्यंत सुप्रीम कोर्टात केस लढावी.कारण, कोर्टाने ऑर्डर दिली विभागोन अपिल केले पाहिजे. परंतु, विभागाने तसे न करता ती ऑर्डर फॉलो करता हे बरोबर नाही. हायकोर्टाची जस्टीफाईड ऑर्डर नसेल तर you should file the Appeal. विभागाने कोणालाही ओसी देऊ नये. विभागाने त्यांच्या विरुद्ध कोर्टात कॅव्हेट दाखल करावे, नाही तर ते कोर्टाकडून ऑर्डर आणतील आणि विभागाने नंतर सांगेल की, कोर्टाची ऑर्डर होती, त्यामुळे ओसी देण्यात आली असे होऊ नये, असे मत समितीने व्यक्त केले असता, शासनाकडून एमएमआरडीएला तसे लेखी कळविण्यात येईल, असे विभागीय सचिवांनी सांगितले. (विभागाकडून प्राप्त झालेली माहिती विवरण क्रमांक-१ मध्ये समाविष्ट करण्यात आली आहे.)

अभिप्राय व शिफारशी :-

परिच्छेद क्रमांक ३.६ "देय भाडेपट्टा अधिमूल्याची वसुली न करणे"

अभिप्राय

१२.१ मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण ही दिर्घ मुदतीचे नियोजन, नविन विकास केंद्रांना चालना देणे. मोक्याच्या प्रकल्पांची अंमलबजावणी आणि पायाभूत सुविधांच्या विकासाकरीता अर्थसहाय्य करणे ही कामे करते. महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने (मे २००८) बांद्रा-कुर्ला संकुल मुंबईतील जी ब्लॉक चा रहिवासी वापरासाठीचा चटई क्षेत्र निर्देशांक हा १.५ वरुन ३.०० वर तर व्यापारी वापरासाठी २.०० वरुन ४.०० असा बदल केला. परिणामी "जी" ब्लॉकमध्ये १३ लाख चौ.मी. चे अतिरिक्त बांधीव क्षेत्र प्राप्त झाले. हे बांधीव क्षेत्र एकदाच रहिवासी उपयोगासाठी व व्यापारी उपयोगासाठी शीघ्र सिद्धगणकाच्या अनुक्रमे १०० टक्के आणि १५० टक्के दराने देण्याचे प्राधिकरणाने ठरविले (ऑक्टोबर २००८). त्यानुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने "जी" ब्लॉक मध्ये आधीपासून असलेल्या प्राप्तकर्त्यांना या योजनेबद्दल सूचित केले(नोव्हेंबर, २००८) सदर योजनेप्रमाणे मार्च, २००९, पूर्वी मागणी पत्राबरोबर २० टक्के अधिमूल्य भरावयाचे होते (जे मार्च २०१० पर्यंत सुधारीत केले आणि पुढे मार्च २०११ पर्यंत पुन: सुधारीत केले.) आणि उर्वरीत रक्कम १० टक्के सरळ व्याजाने वार्षिक चार हप्त्यात भरावयाची होती. वार्षिक हफ्ता भरण्यास विलंब झाल्यास १४ टक्के व्याज भरावयाचे होते. बांधीव क्षेत्राच्या वापराबद्दल कोणतीही कालमर्यादा नव्हती. परंतु मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मे.रिलायन्स इंडस्ट्रीज लि. ला रु.९८४.९० कोटींना (रु.१,४७,००० प्रति चौ.मी. दराने) ६७,००० चौ.मी. इतके अतिरिक्त बांधीव क्षेत्राचे वाटप केले (मार्च २०१२). भाडे अधिमूल्याची २० टक्के रक्कम ही लगेच भरावयाची होती आणि उर्वरीत रक्कम ही चार वार्षिक हफ्त्यांमध्ये (मार्च २०१६ पर्यंत) भाडे अधिमूल्याच्या दहा टक्के सरळ व्याजाने आणि हफ्त्याची रक्कम भरण्यास विलंब झाल्यास १४ टक्के दराने दंडनीय व्याज भरावयाचे होते. त्यानुसार भाडेपट्टाधारकाने मार्च २०१६ पर्यंत रु.१,१८१.८८ कोटी (सरळ व्याजासहित) रक्कम भरणे आवश्यक होते. परंतु हफ्त्यांचा भरणा करण्याबाबत प्राप्तकर्त्याने वेळेचे बंधन पाळले नाही. सरळ व्याज (१० टक्के) आणि विलंबित व्याज (१४ टक्के) लक्षात घेता मार्च २०१६ पर्यंत प्राप्तकर्त्याने रु.१,३३९.६० कोटी भरणे आवश्यक होते. परंतू प्राप्तकर्त्याने प्रत्यक्षात मार्च २०१६ पर्यंत केवळ रु.६९६.५४ कोटी भरले. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने अखेर एक वर्ष उलटून गेल्यावर देय रक्कम, जी रु.७७०.३६ कोटी झाली होती. तिच्या मागणीसाठी सूचना जारी केली (सप्टेंबर, २०१७)

तसेच मे.स्टारलाईट सिस्टीम्स प्रा. लि. यांनी ३ भूखंडावर रहिवासी वापराकरिता ३२,०००चौ.मी. अतिरिक्त बांधीव क्षेत्र देण्याची मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे विनंती केली (मार्च २०१०). प्राधिकरणाने एकूण रु.२२९.७६ कोटीच्या भाडेपट्टा अधिमूल्यावर त्याचे वाटप केले (एप्रिल, २०१०), जे २०१० आणि २०११ च्या शीघ्र सिद्धगणकामधील जो दर जास्त असेल तो लागू होईल. हया वाटपाच्या अटीप्रमाणे रु.२९८.५६ कोटी असे सुधारित झाले. मार्च २०११ पर्यंत २० टक्के अधिमूल्य भरावयाचे होते आणि उर्वरीत वर्ष २०१२ ते २०१५ मधील प्रत्येक मार्च महिन्यात १० टक्के सरळ व्याजाने वार्षिक हफ्त्यात भरावयाचे होते. अशारीतीने भाडेपट्टाधारकाने मार्च,२०१५ पर्यंत भाडे अधिमूल्यापोटी रु.३५८.२७ कोटी (सरळ व्याज धरुन) भरणे आवश्यक होते. मात्र भाडेपट्टाधारकाने हफ्ते भरण्याच्या नियत तारखा पाळल्या नव्हत्या. सरळ व्याज (१० टक्के) आणि दंडनीय व्याज (१४ टक्के) हे घटक लक्षात घेता, मार्च २०१५ पर्यंत भाडेपट्टाधारकाने रु.४३२.९७ कोटी भरावयाचे होते. तथापि, भाडेपट्टाधारकाने मार्च २०१५ पर्यंत केवळ रु.३६६.३८ कोटी भरले. शिवाय सुरुवातीला मार्च आणि मे २०११ मध्ये प्रदान केल्यानंतर भाडेपट्टाधारकाने हफ्ते भरण्याच्या वेळा पाळल्या नाहीत आणि २६,५०० चौ.मी. चे अतिरिक्त बांधीव क्षेत्र वापरुन मगच मागील सगळी देय रक्कम मार्च २०१५ मध्येच भरली. योजनेत नमूद केलेल्या वेळेनुसार अतिरिक्त ३२,००० चौ.मी. चे बांधीव क्षेत्रासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने देखील वसूलींसाठी आग्रह धरला नाही. अनुसूचीनुसार आणि नियत वेळेत म्हणजेच मार्च २०१५ पर्यंत भाडे अधिमूल्य वसुली करण्यात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला आलेल्या अपयशाची परिणती रु.६६.५९ कोटींची (रु.४३२.९७ कोटी - रु.३६६.३८ कोटी) वसुली झाली नाही, जी मार्च २०१७ पर्यंत रु.८५.२३ कोटी झाली असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

महाराष्ट्र शासनाने बांद्रा-कुर्ला संकुल येथील "जी" ब्लॉकमधील रहिवासी वापरासाठीचा चटई क्षेत्र निर्देशांक १.५ वरुन ३.०० तर व्यापारी वापरासाठीचा चटई क्षेत्र निर्देशांक २.०० वरुन ४.०० असा बदल केल्यामुळे तेथे अतिरिक्त बांधकाम क्षेत्र उपलब्ध झाले. हे बांधीव क्षेत्र रहिवासी उपयोगासाठी व व्यापारी उपयोगासाठी शीघ्र सिद्धगणकाच्या अनुक्रमे १०० टक्के आणि १५० टक्के दराने देण्याच्या योजनेस प्राधिकरणाने मान्यता दिली. सदर योजनेप्रमाणे मागणी पत्राबरोबर २० टक्के अधिमूल्य भरावयाचे होते

आणि उर्वरीत रक्कम १० टक्के सरळ व्याजाने वार्षिक चार हप्त्यात भरावयाची होती. वार्षिक हफ्ता भरण्यास विलंब झाल्यास दंडनिय व्याज भरावयाचे होते. बांधीव क्षेत्राच्या वापराबद्दल कोणतीही कालमर्यादा नव्हती. सदरयोजनेप्रमाणे आजपर्यंतसुमारे ६.७२ हे. रहिवासी व ४१.०८ हे. वाणिज्य बांधकाम क्षेत्राचे वाटप प्राधिकरणाने वांद्रे-कुर्लासंकुलाच्या "जी" ब्लॉक मधील वाटप ग्रहींना केले आहे. सदर योजना सध्या बंद आहे. पुर्वीच वाटप झालेल्या वाटपग्रहींपैकी बहुतांश वाटप ग्रहींनी अधिमूल्याची संपूर्ण रक्कम व्याजासह भरलेली आहे. परंतू काही वाटप ग्रहींकडून अधिमूल्याची रक्कम येणे बाकी आहे. सदरहू परिच्छेदात आक्षेपित मे. रिलायन्स इन्डस्ट्रीजसंदर्भात भाडेपट्टेदाराने ऑक्टोबर, २०१७ मध्ये रु. १०० कोटीचा भरणा अतिरिक्त बांधकाम क्षेत्रासाठी केला. त्याचप्रमाणे मे.स्टारलाईट सिस्टीम्स् प्रा. लि. सध्या अंशत: भोगवटा प्रमाणपत्र देणेसाठी काढलेले प्रमाण हे फक्त बांधकाम परवानगी देणेसाठी सोपे जावे म्हणून वापरलेली पद्धत आहे. विषयांकित भूखंडावर वाटप केलेले ३२००० चौ.मी. अतिरिक्त बांधकाम क्षेत्राचे संपूर्ण व्याजासह अधिमूल्य वसूल झाल्यानंतरच पूर्ण बांधकामास भोगवटा प्रमाणपत्र दिले जाईल असे समितीस सांगण्यात आले.

शिफारस

१२.२ मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (MMRDA) भाडेपट्टाधारकाकडून वाटप केलेल्या अतिरिक्त बांधीव क्षेत्रासाठी विहीत दरसूचीनुसार मार्च २०१७ पर्यंत देय भाडे अधिमूल्य वसूल न केल्यामुळे रु.८५५.५९ कोटीची वसूली झाली नाही असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत. सदरहू आक्षेप अत्यंत गंभीर असून MMRDA ने भाडेपट्टयावर दिलेल्या भूखंडासंदर्भात प्राप्त होणाऱ्या अधिमूल्याची वसुली वेळेत न करणे. परिणामी MMRDA चे कोट्यावधींचे झालेले नुकसान व याकडे विभागाच्या अधिकाऱ्यांचे झालेले दुर्लक्ष यासंदर्भात समितीने सदरहू विषयाची विस्तृत छाननी केली असता रिलायन्स कंपनीकडून सप्टेंबर,२०१७ पर्यंत अधिमूल्याची एकूण रु.७७०.३६ कोटी इतकी रक्कम प्रलंबित होती. रिलायन्सला MMRDA ने एकूण ६७००० चौ.मी.पैकी ३७५०० चौ.मी. चे भोगवटा प्रमाणपत्र दिलेले असून २९५०० चौ.मी.चे भोगवटा प्रमाणपत्र द्यावयाचे बाकी आहे. रिलायन्स इन्डस्ट्रीजकडून रु.७०३ कोटी मुद्दल व रु.१०८ कोटी व्याज असे एकूण रु.८११ कोटी वसुल झालेले आहेत व सप्टेंबर,२०१७ पर्यंत रु.७७० कोटी येणे बाकी होते. त्यावर व्याजाची आकारणी आता सुरु असून ऑक्टोबर,२०१७ मध्ये रिलायन्सने रु.१०३ कोटी भरलेले आहेत. उर्वरित रकमेच्या वसुलीसंदर्भात समितीने विचारणा केली असता विभागाने भोगवटा प्रमाणपत्र दिले नाही म्हणून रिलायन्सला त्यांच्या प्रिमायसेसची विक्री करता येत नाही. रिलायन्स कंपनीचे असे म्हणणे आहे की, त्यांच्याकडे प्रिमायसेस खरेदी करण्यासाठी व पैसे देण्यासाठी लोक तयार आहेत. परंतु भोगवटा प्रमाणपत्र नसल्यामुळे त्याची विक्री होवू शकत नाही. विभागाने भोगवटा प्रमाणपत्र द्यावे जेणेकरुन प्रिमायसेसची विक्री करुन आलेल्या रकमेतून MMRDA कडे ताबडतोब पैसे भरण्यात येतील असेही रिलायन्स कंपनीचे म्हणणे आहे. अशा परिस्थतीत बँक, रिलायन्स कंपनी व MMRDA यांच्यामध्ये सामोपचाराने मार्ग काढून त्रिपक्षीय करार (Tri-Party Agreement) करुन बँकेच्या माध्यमातून हे पैसे भरता येवू शकतील काय, या पर्यायाचा अवलंब करण्याबाबत विभागाच्या स्तरावर विचारविनिमय सुरु असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले.

तसेच प्रकरण क्र.२ मध्ये मे.स्टारलाईट कंपनीकडून जवळजवळ रु.८० कोटी येणे बाकी असून त्यांना अद्यापही सीसी व भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आलेली नसल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. समितीने यासंदर्भात आक्षेप नोंदवित मागील परिच्छेद क्र.३.५ मध्ये विभागाने भोगवटा प्रमाणपत्र दिल्यामुळे उद्भवलेल्या अनेक कायदेशीर अडचणी व त्याचे गंभीर परिणाम पाहता थकीत रक्कम भरल्याशिवाय भोगवटा प्रमाणपत्र देण्याची चूक पुन्हा विभागाने करु नये अशी समितीची ठाम भूमिका आहे. सदरहू प्रकरणामध्ये वसुलपात्र रकमेबाबत या कपंनीचे कोणतेही आक्षेप वा दुमत नाही. केवळ रकमेची वसुली प्रलंबित आहे अशा परिस्थतीत त्रिपक्षीय करार वा अन्य कोणत्याही मार्गाने वा विचारविनिमयाने व सामोपचाराने एकत्रित बसून या प्रकरणी निर्णयाप्रत येणे शक्य असल्यास त्या पर्यायाचा देखील अवलंब करण्यास हरकत नाही. परंतु कोणत्याही परिस्थितीत थकीत रक्कम वसुल झाल्याशिवाय कोणतीही पुढील कार्यवाही MMRDA मार्फत करण्यात येवू नये व सदरहू प्रकरणी संपुर्ण वसुली करुन त्यानंतरच पुढील परवानग्याबाबतची कार्यवाही विभागाने करावी. तसेच या प्रकरणांमध्ये दोषी अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

नगरविकास विभाग

१३.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१६-१७ या वर्षाच्या सामान्य सामाजिक क्षेत्र अहवालात महालेखापालांनी खालीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले आहेत.

सल्लागार शुल्कावरील निष्फळ खर्च

परि.क्र.	स्पष्टीकरणात्मक ज्ञापने	प्राधिकरणाचे अभिप्राय	शासनाचे अभिप्राय
३.१४	मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कायदा, १९७४ च्या कलम १२ मधील तरतुदीनुसार प्राधिकरणाचे मुख्य उद्दीष्ट हे प्रादेशिक आराखडयाप्रमाणे मुंबई महानगर प्रदेशाचा विकास करणे हे असले पाहिजे. हया कारणास्तव प्राधिकरण महानगर क्षेत्रातल्या विकासाकरता एखादी योजना किंवा प्रकल्प हाती घेऊ शकते/प्रकल्पाचा आढावा घेऊ शकते. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा नियोजन विभागाकडे प्रादेशिक आराखडयाच्या अंमलबजावणी संदर्भातील जमीन वापर, नवीन विनियम आणि योजना यावर सल्ले देण्याच्या कामाची जबाबदारी होती. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने आठ रस्ते/पूल यांच्या कामाचा अंतर्भाव असणारा विस्तारीत मुंबई शहर पायाभूत सुविधा प्रकल्प योजला होता. प्राधिकरणाने सर्व आठ कामांच्या पूर्व निविदा प्रक्रियेसाठी रु.१३.७५ कोटी मध्ये सल्लागारांची नेमणूक (मार्च २०१३) केली होती. यामध्ये रु. ४९५ कोटी अंदाजित किंमतीच्या शिरगाव फाटा (रामा ४०)- पडघा – टिटवाळा – बदलापूर रस्ता (रामा ३५) या कामाचा समावेश होता. ज्यात रु. ५.०३ कोटी इतके सल्लागार शुल्क समाविष्ट होते. हया कामासाठी सल्लागाराने प्राथमिक अहवाल (इन्सेप्शन रिपोर्ट) आणि सविस्तर प्रकल्प अहवाल (डी.पी.आर) (मे/ऑगस्ट २०१३) सादर केला होता. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने सल्लागाराला आठव्या चालू देयकापर्यंत रु. ४.१५ कोटीचे प्रदान केले होते (जानेवारी २०१६).	भाष्य नाही.	सदर स्पष्टीकरणात्मक ज्ञापनाच्या अनुषंगाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या कडून प्राप्त झालेल्या अभिप्रायास शासनाची सहमती दर्शवून सदर स्पष्टीकरणात्मक ज्ञापन समंत/ तपासून घेण्यासाठी (Vetting) मा. प्रधान महालेखाकार लेखापरीक्षक-१ यांच्याकडे पाठविण्यात आली आहे.

२.	महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अभिलेखे तपासणीत (जानेवारी २०१७) उघड झाले की, सल्लागाराने प्राथमिक अहवाल व डीपीआर सादर करुन दोन वर्षापेक्षा जास्त कालावधी उलटल्यानंतर अभियांत्रिकी विभागाच्या असे लक्षात आले की (मार्च २०१६) काही ठिकाणी प्रस्तावित रस्त्याच्या बांधकामाची संरचना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विद्यमान रस्त्यांशी मिळती जुळती नव्हती आणि त्यामुळे प्रकल्प अचूक ठरावा यासाठी त्याचा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या क्षेत्रिय आराखडयात समावेश करणे गरजेचे होते. याप्रमाणे अभियांत्रिकी विभागाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या प्रारुप प्रादेशिक आराखडयात या रस्त्याचा समावेश करण्यासाठी नियोजन विभागाला प्रस्तावित केले होते (मार्च २०१६).	भाष्य नाही.	
३.	नियोजन विभागाने हया रस्त्याचे प्रस्तावित काम काढून घेण्याची अभियांत्रिकी विभागाला विनंती केली होती (एप्रिल २०१६) कारण (i) विरारमधील शिरसाट फाटा ते मुंबई ट्रान्सहार्बर लिंक मार्गे पडघा असा प्रादेशिक रस्ता सर्वसमावेश वाहतूक अभ्यास (सीटीएस) यामध्ये याआधीच प्रस्तावित होता; (ii) मल्टी मोडल कॉरीडॉर व वडोदरा जेएनपीटी स्पर रस्ता अशा स्वरुपात दोन प्रादेशिक चक्रीयमार्ग भारताच्या राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने (एनएचआय) हाती घेतले होते जे प्रस्तावित संरचनेच्या समांतर जात होते. (iii) अभियांत्रिकी विभागाने प्रस्तावित केलेल्या नविन जोडणीचे पुढील काम थांबविण्याचे निर्देश दिले.	भाष्य नाही.	
४.	मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने केलेला सर्वसमावेशक वाहतूक अभ्यास (मल्टी मोडल कॉरीडॉर सहीत) मार्च २००८ मध्ये मंजूर झाले असताना, सल्लागाराची मार्च २०१३ मध्ये नेमणूक करण्याआधी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण सीटीएस आणि मल्टी मोडल कॉरीडॉर बाबत ज्ञात होते हे दिसून येते. सुरुवातीलाच प्रस्ताव नियोजन विभागातर्फे प्रादेशिक आराखडयात समाविष्ट न केल्याने व संरचना बरोबर नसल्यने लक्षात आल्यानंतर प्रादेशिक आराखडयामध्ये रस्त्यांचा प्रस्ताव उशीराने समाविष्ट करण्याच्या अभियांत्रिकी विभागाच्या निर्णयामुळे सल्लागार शुल्कापोटी झालेला रु. ४.१५ कोटी इतका खर्च निष्फल ठरला होता.	सदर रस्ता हा सर्वसमावेशक वाहतूक अभ्यासात (CTS) मार्च २००८-०९ मध्ये समाविष्ट असून, दि १५/०३/२००८ रोजीच्या प्राधिकरणाच्या १२१ व्या बैठकीत CTS मंजूर करण्यात आले. प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दि.२८/०१/२०१३ रोजीच्या २३७ व्या बैठकीत मान्यतेने पूर्व निविदा प्रक्रीयेसाठी सल्लागाराची नियुक्ती मार्च २०१३ मध्ये करण्यात आली आहे.	

५.	उत्तरादाखल मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी सांगितले (सप्टेंबर २०१७) की एनएचएआय चे मल्टी मोडल कॉरीडोर आणित स्पर कॉरीडोर यांना नियंत्रित शिरकाव असेल आणि स्थानिक वाहतूक मोकळी करण्यासाठी उपयोगी पडू शकणार नाहीत, शिरगाव फाटा (रामा-४०) पडघा – टिटवाळा- बदलापूर मार्ग हा राष्ट्रीय महामार्ग ८, राष्ट्रीय महामार्ग २२२, राम.म.ण् ३५ आणि रा.मा. ४० मधील वाहतूकचीअदलाबदर करण्यास उपयुक्त ठरेल तसेच झपाटयाने वाढणा-या कल्याण, उल्हासनगर बदलापूर आणि अंबरनाथ सारख्या उपनगरीय भागातील वाहतूकीचा ताण कमी करण्यासाठी उपयोगी पडले. जरी हा प्रस्तावीत रस्ता काही कालावधीसाठी थांबविण्यात आला असला तरी भविष्यात तो हाती घेण्यात येईल. उत्तर केवळ हेच सिध्द करते की रस्ताचे काम हे प्राधिकरणाच्या नियोजन विभागाची मंजूरी घेतल्याशिवाय हाती घेतले होते ज्यामुळे सल्लागार शुल्कावर झालेला रु. ४.१५ कोटी इतका पूर्ण खर्च निष्फळ ठरला होता. ही बाब जुलै २०१७ मध्ये राज्य शासनाला संदर्भीत करण्यात आली. त्यांचे उत्तर नोव्हेंबर २०१७ पर्यंत प्रतिक्षत आहे.	हा प्रस्तावीत रस्ता काही कालावधीसाठी थांबविण्यात आला असला तरी भविष्यात तो हाती घेण्यात येईल व त्यावेळेस सल्लागाराने सादर केलेले सविस्तर प्रकल्प अहवाल उपयोगी पडतील. या कारणास्तव सल्लागार शुल्कावर झालेला रु. ४.१५ कोटी इतका खर्च निष्फळ ठरला असे म्हणणे योग्य वाटत नाही. सदर काम सक्षम प्राधिकाराच्या मान्यतेने हाती घेण्यात आले होते.	

कक्ष अधिकारी
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

साक्ष :-

परिच्छेद क्रमांक ३.१४ सल्लागार शुल्कावरील निष्फळ खर्च:-

१४.१ उक्त परिच्छेदाबाबत अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक २७ डिसेंबर,२०१८ रोजी नगरविकास विभागाच्या विभागीय सचिवांची साक्ष घेतली. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) ने सल्लागार नेमून हे काम करुन घेतले होते ही वस्तुस्थिती आहे. परंतु, अद्याप रस्त्याचे काम झालेले नाही. रस्त्याचे काम करावयाचे नाही असाही सदर प्राधिकरणाचा निर्णय नाही. पहिल्या टप्प्यात ते काम हाती घेण्यात आले नाही. सर्व समावेशक वाहतूक अभ्यासामध्ये (CTS) एमएमआरडीएप्राधिकरणाने जी कामे मंजूर केलेली आहेत त्यामध्ये या रस्त्याचा समावेश आहे. आपण भविष्यात त्या रस्त्याचे काम हाती घेणार आहोत. त्यामुळे सल्लागार शुल्कावर जो पैसा खर्च झालेला आहे तो उपयोगात येणारच आहे. कारण, तो रस्ता ड्रॉप करीत नाही, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

तो रस्ता केव्हा होईल याबाबत कालावधी निश्चित करण्यात आलेला नाही. एमएमआरडीए प्राधिकरणाच्या नियोजन विभागाकडून मंजुरी मिळालेली नाही. विभागाने मंजुरी शिवाय रस्त्याचा सर्व्हे करुन त्यावर ४ कोटी रुपये खर्च केलेले आहेत. तो रस्ता नंतरच्या कालखंडात उपयोगात येईल असे विभागाचे म्हणणे आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता, त्यावेळी या रस्त्याचे काम होईल असे वाटले होते. परंतु, तद्नंतरच्या काळात एमएमआरडीएने बरीच संसाधने मेट्रो प्रकल्पाकडे वळते केल्यामुळे मोठया रस्त्यांची जी कामे होती ती मागे ठेवली, असे विभागीय सचिवांनी सांगितले. यामध्ये पडघा-टिटवाळा-बदलापूर रस्त्याच्या कामाचा समावेश होता. असे समितीने निदर्शनास आणले असता, ३२ गावांपैकी १० गावातील ग्रामस्थांनी त्यास विरोध केला होता. त्यामुळे ते काम थांबले आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अंतर्गत असलेल्या नियोजन विभागाच्या मंजुरी शिवाय पुढील कार्यवाही करण्याचे कारण समितीने विचारले असता, सदर प्राधिकरणाच्या नियोजन विभागाला मंजुरी देण्याचे अधिकार नाहीत. एमएमआरडीए प्राधिकरण आणि मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या कार्यकारी समितीलाच मंजुरी देण्याचे अधिकार आहेत. नियोजन विभाग एमएमआरडीएच्या अंतर्गत आहे. त्यामुळे त्यांना मंजुरी देण्याचे अधिकार नाहीत,प्रशासकीय मान्यतेचे सर्व अधिकार प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीला आहेत, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

एमएमआरडीए हे नियोजन प्राधिकरण आहे. परंतु, सदर रस्त्याचे काम केव्हा होणार आहे, असे समितीने विचारले असता, आता लोकप्रतिनिधींकडून मागणी आलेली आहे. आम्ही पुन्हा जॉईंट मेजरमेंट करण्याचा प्रयत्न करु. लोकांबरोबर वाटाघाटी करुनभू-संपादन करता येणे शक्य आहे काय,भू-संपदानावर काही तोडगा निघतो काय हे बघू आणि त्या प्रमाणे रस्त्याचे काम करु, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगतिले.

सल्लागाराची नियुक्ती करण्यासाठी समितीने परवानगी दिली होती काय ? अशी विचारणा समितीने केली असता, मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी समिती नियुक्त करण्यात आलेली आहे. त्या समितीने दिनांक २८ जानेवारी, २०१३ रोजी मान्यता दिलेली आहे. कार्यकारी समितीच्या मान्यतेप्रमाणे सल्लागाराची नियुक्ती करण्यात आलेली आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.म्हणजे यामध्ये केवळ विलंब झालेला आहे. असे समितीने निदर्शनास आणले असता, विभागीय प्रतिनिधींनी त्यास सहमती दर्शविली.

अभिप्राय व शिफारशी :-

३.१४ "सल्लागार शुल्कावरील निष्फळ खर्च"

अभिप्राय

१५.१ मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कायदा, १९७४ च्या कलम १२ मधील तरतुदीनुसार प्राधिकरणाचे मुख्य उद्दीष्ट हे प्रादेशिक आराखडयाप्रमाणे मुंबई महानगर प्रदेशाचा विकास करणे हे असले पाहिजे. हया कारणास्तव प्राधिकरण महानगर क्षेत्रातल्या विकासाकरता एखादी योजना किंवा प्रकल्प हाती घेऊ शकते/प्रकल्पाचा आढावा घेऊ शकते. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा नियोजन विभागाकडे प्रादेशिक आराखडयाच्या अंमलबजावणी संदर्भातील जमीन वापर, नवीन विनियम आणि योजना यावर सल्ले देण्याच्या कामाची जबाबदारी होती.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने आठ रस्ते/पूल यांच्या कामाचा अंतर्भाव असणारा विस्तारीत मुंबई शहर पायाभूत सुविधा प्रकल्प योजला होता. प्राधिकरणाने सर्व आठ कामांच्या पूर्व निविदा प्रक्रियेसाठी रु.१३.७५ कोटी मध्ये सल्लागारांची नेमणूक (मार्च २०१३) केली होती. यामध्ये रु.४९५ कोटी अंदाजित किंमतीच्या शिरगाव फाटा (रामा ४०)- पडघा -टिटवाळा - बदलापूर रस्ता (रामा ३५) या कामाचा समावेश होता. ज्यात रु.५.०३ कोटी इतके सल्लागार शुल्क समाविष्ट होते. ह्या कामासाठी सल्लागाराने प्राथमिक अहवाल आणि सविस्तर प्रकल्प अहवाल (डी.पी.आर) (मे/ऑगस्ट २०१३) सादर केला होता. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने सल्लागाराला आठव्या चालू देयकापर्यंत रु.४.१५ कोटीचे प्रदान केले होते (जानेवारी २०१६). परंतु सल्लागाराने प्राथमिक अहवाल व डीपीआर सादर करुन दोन वर्षापेक्षा जास्त कालावधी उलटल्यानंतर अभियांत्रिकी विभागाच्या लक्षात आले की (मार्च २०१६), काही ठिकाणी प्रस्तावित रस्त्याच्या बांधकामाची संरचना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विद्यमान रस्त्यांशी मिळती जुळती नव्हती आणि त्यामुळे प्रकल्प अचूक ठरावा यासाठी त्याचा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या क्षेत्रिय आराखडयात समावेश करणे गरजेचे होते. याप्रमाणे अभियांत्रिकी विभागाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या प्रारुप प्रादेशिक आराखडयात या रस्त्याचा समावेश करण्यासाठी नियोजन विभागाला प्रस्तावित केले होते (मार्च २०१६). परंतु नियोजन विभागाने हया रस्त्याचे प्रस्तावित काम काढून घेण्याची अभियांत्रिकी विभागाला विनंती केली होती (एप्रिल २०१६) कारण (i) विरारमधील शिरसाट फाटा ते मुंबई ट्रान्सहार्बर लिंक मार्गे पडघा असा प्रादेशिक रस्ता सर्वसमावेश वाहतूक अभ्यास (सीटीएस) यामध्ये याआधीच प्रस्तावित होता; (ii) मल्टी मोडल कॉरीडॉर व वडोदरा जेएनपीटी स्पर रस्ता अशा स्वरुपात दोन प्रादेशिक चक्रीयमार्ग भारताच्या राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने (एनएचआय) हाती घेतले होते जे प्रस्तावित संरचनेच्या समांतर जात होते. (iii) अभियांत्रिकी विभागाने प्रस्तावित केलेल्या रस्त्याच्या मार्गामुळे शिरसाट फाटा व पडघा मधील पर्यावरण संवेदनशील क्षेत्राला बाधा निर्माण होईल. अशाप्रकारे उपरोक्त म्हणणे मान्य करुन सहाय्यक महानगर आयुक्त (विकास) यांनी नियोजन विभागाचे म्हणणे स्वीकारुन अभियांत्रिकी विभागाने प्रस्तावित केलेल्या नविन जोडणीचे पुढील काम थांबविण्याचे निर्देश दिले.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने केलेला सर्वसमावेशक वाहतूक अभ्यास (मल्टी मोडल कॉरीडॉर सहीत) मार्च,२००८ मध्ये मंजूर झालेला असताना, सल्लागाराची मार्च,२०१३ मध्ये नेमणूक करण्याआधी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण सीटीएस आणि मल्टी मोडल कॉरीडॉर बाबत ज्ञात होते हे दिसून येते. सुरुवातीलाच प्रस्ताव नियोजन विभागातर्फे प्रादेशिक आराखडयात समाविष्ट न केल्याने व संरचना बरोबर नसल्याचे लक्षात आल्यानंतर प्रादेशिक आराखडयामध्ये रस्त्यांचा प्रस्ताव उशीराने समाविष्ट करण्याच्या अभियांत्रिकी विभागाच्या निर्णयामुळे सल्लागार शुल्कापोटी झालेला रु.४.१५ कोटी इतका खर्च निष्फळ ठरला होता असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

यासंदर्भातएमएमआरडीएने सांगितले की, एनएचएआयचे मल्टी मॉडल कॉरीडोर आणि स्पर कॉरीडोर यांना नियंत्रित शिरकाव असेल आणि स्थानिक वाहतूक मोकळी करण्यासाठी उपयोगी पडू शकणार नाहीत.शिरगाव फाटा (रामा-४०) पडघा - टिटवाळा - बदलापूर मार्ग हा राष्ट्रीय महामार्ग ८, राष्ट्रीय महामार्ग २२२, रा.मा.३५ आणि रा.मा. ४० मधील वाहतूकीचीअदलाबदल करण्यास उपयुक्त ठरेल तसेच झपाटयाने वाढणा-या कल्याण, उल्हासनगर बदलापूर आणि अंबरनाथ सारख्या उपनगरीय भागातील वाहतूकीचा ताण कमी करण्यासाठी उपयोगी पडेल. जरी हा प्रस्तावीत रस्ता काही कालावधीसाठी थांबविण्यात आला असला तरी भविष्यात तो हाती घेण्यात येईल.त्यावेळेस सल्लागाराने सादर केलेले सविस्तर प्रकल्प अहवाल उपयोगी पडतील. या कारणास्तव सल्लागार शुल्कावर झालेला रु.४.१५ कोटी इतका खर्च निष्फळ ठरला असे म्हणणे योग्य वाटत नाही. तसेच सदर काम सक्षम प्राधिका-याच्या मान्यतेने हाती घेण्यात आले होते असेही मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

यांनी सांगितले. परंतु यावरुन दिसून येते की, रस्त्याचे काम हे प्राधिकरणाच्या नियोजन विभागाची मंजूरी घेतल्याशिवाय हाती घेतले होते ज्यामुळे सल्लागार शुल्कावर झालेला रु.४.१५ कोटी इतका पूर्ण खर्च निष्फळ ठरला होता.

शिफारस

१५.२ सल्लागार शुल्कावरील निष्फळ खर्च यासंदर्भात प्रादेशिक आराखड्यात प्रस्ताव समाविष्ट न करता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (MMRDA) सल्लागाराची नेमणूक केली. कालांतराने संरचनेच्या बाबींमुळे प्रस्ताव रद्द झाला. त्यामुळे सल्लागार शुल्कापोटी केलेला रु.४.१५ कोटींचा खर्च निष्फळ ठरला असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत. एमएमआरडीए ने सल्लागार नेमून हे काम करुन घेतले. परंतु अद्यापही रस्त्याचे काम झालेले नाही तसेच काम वगळले देखील नाही. फक्त पहिल्या टप्प्यात हे काम हाती घेण्यात आले नाही. सर्वसमावेशक वाहतूक अभ्यासामध्ये (CTS) एमएमआरडीए प्राधिकरणाने जी कामे मंजूर केलेली आहेत त्यामध्ये या कामाचा समावेश आहे. सदर काम सक्षम प्राधिका-याच्या मान्यतेने हाती घेण्यात आले होते. नंतरच्या काळात एमएमआरडीएने बरीच संसाधने मेट्रो प्रकल्पाकडे वळती केल्यामुळे मोठ्या रस्त्यांची जी कामे होती ती मागे ठेवण्यात आली. ज्यात पडघा-टिटवाळा-बदलापूर रस्त्यांच्या कामांचा देखील समावेश होता. त्यातच ३२ गावांपैकी १० गावांतील ग्रामस्थांनी त्यास विरोध केल्यामुळे हे काम थांबले. त्यामुळे सल्लागार शुल्कावर झालेला खर्च हा भविष्यात उपयोगात येणारच आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले असता यावर समितीने तीव्र आक्षेप नोंदवित ज्या रस्त्याचे कोणतेही नियोजन विभागाकडे अद्यापही निश्चित नाही, शिवाय विरारमधील शिरसाट फाटा ते मुंबई ट्रान्सहार्बर लिंक मार्गे पडघा असा प्रादेशिक रस्ता सर्वसमावेशक वाहतूक अभ्यास यामध्ये याआधीच प्रस्तावित होता. तसेच मल्टी मॉडल कॉरीडोर व वडोदरा जेएनपीटी स्पर रस्ता अशा स्वरुपात दोन प्रादेशिक चक्रीय मार्ग भारताच्या राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने हाती घेतले होते जे प्रस्तावित संरचनेच्या समांतर जात होते. तसेच अभियांत्रिकी विभागाने प्रस्तावित केलेल्या रस्त्याचा मार्ग हा शिरसाट फाटा व पडघा मधील पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्राला बाधा पोहचवेल या कारणास्तव नियोजन विभागाने ह्या रस्त्याचे प्रस्तावित काम काढून घेण्याची अभियांत्रिकी विभागाला केलेली विनंती मान्य करुन त्यांनी प्रस्तावित केलेल्या नवीन जोडणीचे पुढील काम थांबविण्याचे निर्देशही दिलेले असताना विभाग अशाप्रकारे सल्लागाराच्या नियुक्तीचे व झालेल्या खर्चाचे समितीसमोर समर्थन करतो व विभागाने या रस्त्याच्या पूर्वनिविदा प्रक्रियेसाठी सल्लागाराची नेमणूक करुन त्यासाठी तब्बल रु.४.१५ कोटीचे प्रदान केले व भविष्यात त्याचा निश्चित उपयोग होईल असे विभागाचे म्हणणे अतिशय अयोग्य व असमर्थनीय आहे. अशा पध्दतीने अनियोजनबध्दरित्या कामे करणे व त्यासाठी शासनाच्या कोट्यवधीच्या निधीचा अपव्यय होणे कदापि उचित नाही. सदर रस्त्याच्या कामासंदर्भात भविष्यासाठी विभागाकडे अद्यापही कोणतेही नियोजन नाही. तरीही सदर रस्त्याच्या कामाबाबत आता लोकप्रतिनिधीकडून मागणी आलेली असून पुन्हा संयुक्त मोजणी करुन स्थानिकांबरोबर भूसंपादनासंदर्भात वाटाघाटी करुन यामध्ये काही तोडगा निघतो काय, ते बघून रस्त्याचे काम करण्यात येईल असे प्रतिपादन विभाग करतो, जे निश्चितच योग्य नाही. सदरहु कामास विलंब झालेला आहे ही वस्तुस्थिती असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर मान्य केले. या सर्व बाबी विभागांतर्गत नियोजनाचा अभाव दर्शविणा-या आहेत. त्यातही गंभीर बाब म्हणजे सन २०१३ मध्ये केलेल्या या सर्वेक्षणाचा आता कितपत उपयोग होईल हा देखील प्रश्न उद्भवतो. सदरहू कार्यपध्दतीबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. सकृतदर्शनी सल्लागाराच्या नेमणुकीवर झालेला खर्च निष्फळच ठरतो. शिवाय त्यांच्या अहवालाचा कोणताही उपयोग आताच्या बदलत्या परिस्थितीत शासनाला होईल हे देखील समितीला मान्य नाही. हे संपुर्ण प्रकरण अतिशय गंभीर असून विभागाने यातील दोषी अधिकारी/कर्मचा-यांवर तात्काळ कारवाई करुन भविष्यात अशा बाबींची पुनरावृत्ती टाळावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

महसुल व वन (महसुल) विभाग

१६.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या ३१ मार्च २०१७ रोजी संपलेल्या वर्षाचा ' सामान्य सामाजिक क्षेत्र अहवालात ' महालेखापालांनी खालीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले आहेत.

अ. क्र.	परिच्छेद क्रमांक	परिच्छेद	शासनाचे स्पष्टीकरण
१.	३.१०	**सुधारित दराने भूईभाडे अदा करण्याच्या आक्षेपाची अंमलबजावणी न करणे** शासनाच्या सुधारीत धोरणानुसार नवीन दराने भूईभाडे अदा करण्याच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात जिल्हाधिकारी, मुंबई शहर व मुंबई उपनगरे अपयशी ठरल्यामुळे रू. ६०.३३ कोटी महसूल बुडाला आणि मालमत्तेचा ताबा भाडेपट्टाधाकांकडे कायम राहीला. राज्याची महसूली जमा वाढविण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने (विभाग) मुंबई शहर जिल्हा (मुंबई शहर) आणि मुंबई उपनगर जिल्हयातील धर्मादाय न्यास आणि खाजगी व्यक्तींना दिलेल्या जमिनींच्या भाडेपट्टींची मुदत संपल्यावर त्यांचे नुतनीकरण करण्यासाठी १ जानेवारी २०१२ पासून लागू होणारे एक सुधारीत धोरण प्रस्तावित केले (डिसेंबर). त्यानुसार, महाराष्ट्र शासनाने दरवर्षी जारी केलेल्या शिघ्र सिध्दगणकातील दराने खुल्या जमिनींसाठीचे भूईभाडे सुधारित करावयाचे होते आणि प्रत्येक पाच वर्षांनी त्या वेळच्या शीघ्र सिध्दगणक दरानुसार भूईभाडयात सुधारणा करावयाची होती. भाडेपट्टेवरील जमीन भोगवटा हक्क वर्ग-२ तत्वावर बदलण्याचा पर्याय स्वीकारण्याची संधी देखील जिल्हाधिकाऱ्यांनी भाडेपट्टेधारकांना दयावयाची होती. भाडेपट्टीवरील	मुंबई शहर जिल्ह्यात एकुण १३०७ मिळकती भाडेपट्ट्याने मंजूर केलेल्या असून, या पैकी सुमारे ६९१ मिळकतीचा भाडेपट्टा संपुष्टात आलेला आहे. तसेच, मुंबई उपनगर जिल्ह्यात एकुण ३५६ मिळकती भाडेपट्ट्याने मंजूर केलेल्या असून, या पैकी सुमारे १३५ मिळकतीचा भाडेपट्टा संपुष्टात आलेला आहे. शासन निर्णय क्र.एलबीएल-२५८२/२७७३९/जी-८, दिनांक १२ डिसेंबर, १९८३ अन्वये बृहन्मुंबईतील शासकीय जमिनीवरील संपुष्टात आलेल्या भाडेपट्टयाचे नुतनीकरण करण्यासंबंधीचे धोरण विहित करण्यात आले होते. सदर धोरणाची न्यायालयीन प्रकरणांमुळे अंमलबजावणी करता आली नाही. तद्नंतर शासन निर्णय क्र. एलएनडी-१०८५/ १३४२२२/ प्र.क्र.१८४/ज-२, दिनांक ५ ऑक्टोबर, १९९९ अन्वये भुईभाडे आकारण्याबाबतचे धोरण विहित केले होते. मा. मुंबई उच्च न्यायालयाने या संबंधीच्या रिट याचिकेमध्ये दि.२५/०८/२००४ रोजी दिलेल्या निर्णयानुसार सदर धोरण, शासन निर्णय, क्र.एस-३०/जमीन-२६०१/प्र.क्र.१०७/ज-२, दिनांक १५ नोव्हेंबर, २००६ अन्वये मागे घेण्यात आले. मा. मुंबई उच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेले निर्णय विचारात घेऊन तद्नंतर बृहन्मुंबईतील शासकीय जमिनीच्या भाडेपट्टयाच्या नुतनीकरणासंदर्भात संदर्भाधीन शासन निर्णय क्र.जमीन-२५०५/प्र.क्र.४०५/ज-२, दिनांक १२/१२/२०१२ अन्वये सुधारित धोरण विहित करण्यात आले आहे. या धोरणान्वये भाडेपट्टयाने धारण केलेल्या जमिनीचे मुल्य परिगणित करताना

		जमीन भोगवटा हक्कावर रुपांतरीत करण्यासाठी, महाराष्ट्र शासनाने प्रत्येक वर्षी जारी केलेल्या शीघ्र सिध्दगणकातील खुल्या जमिनींच्या दराच्या २० टक्के रूपांतरण शुल्क भाडेपट्टाधारकाकडून वसूल करावयाचे होते. मुंबई शहरात जानेवारी २०१२ रोजी भाडेपट्टीची १३०७ प्रकरणे होती. त्यापैकी ६९१ प्रकरणांचे डिसेंबर २०१२ च्या भाडेपट्टी नुतनीकरणाविषयीच्या सुधारित धोरणानुसार नुतनीकरण करावयाचे होते असे दिसून आले की, या सर्व भाडेपट्टीधारकांना जरी नोटीस जारी करण्यात आल्या होत्या तरी शासनाकडे नुतनीकरणासाठी फक्त ७२ प्रकरणे सादर (एप्रिल २०१३ ते एप्रिल २०१७ दरम्यान) केली होती. ज्यापैकी भाडेपट्टी नुतनीकरणाची केवळ नऊ प्रकरणे शासनाने मंजूर (डिसेंबर २०१३ ते मार्च २०१६ दरम्यान) केली व ६८२ प्रकरणे प्रलंबित राहिली. मुंबई उपनगर जिल्हयात भाडेपट्टीची ३५६ प्रकरणे होती. ज्यापैकी १३५ प्रकरणे भाडेपट्टी नुतनीकरणासाठी पात्र होती. असे दिसून आले की, या सर्व भाडेपट्टीधारकांना नोटीस जारी करण्यात आल्या होत्या आणि शासनाकडे भाडेपट्टी नुतनीकरणासाठी फक्त १० प्रकरणे सादर (मार्च २०१४ ते ऑक्टोबर २०१५ दरम्यान) केली गेली. त्यापैकी शासनाने भाडेपट्टी नुतनीकरणाचे फक्त एक प्रकरण जून २०१४ मध्ये मंजूर केले व नऊ प्रकरणांत भूईभाडे नुतनीकरण प्रलंबित राहीले.	मुद्रांक शुल्क विभागामार्फत दरवर्षी प्रसिध्द केल्या जाणाऱ्या वार्षिक मुल्य दर तक्त्याचा वापर करण्याचे धोरण स्विकारण्यात आले. दि.१२/१२/२०१२ चा शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर शासनाच्या या धोरणाच्या अनुषंगाने भुईभाड्याची आकारण्यात येणारी रक्कम अल्प असून ती अधिक असावी या दृष्टीने मा. मुंबई उच्च न्यायालय मुंबई येथे जनहित याचिका क्र.१०८/२०१३ दाखल झाली. तसेच सदर धोरणानुसार भुईभाड्यापोटी आकारण्यात येणारी रक्कम खुपच जास्त असल्याचे कारण देवून त्याविरुध्द मा. मुंबई उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र.९२३/२०१४, चेंबर ऑर्डर (L) क्र.७३७/२०१४ व अन्य ८ रिट याचिका दाखल झालेल्या आहेत. यानुषंगाने मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या दि.१३ जानेवारी, २०१५ च्या निर्देशानुसार याचिकाकर्त्यांशी चर्चा करण्यात आलेली आहे. दि.१२/१२/२०१२ च्या शासन निर्णयानुसार भुईभाड्याच्या रकमा या संबंधित जमिनींच्या वार्षिक दर विवरणपत्राप्रमाणे येणाऱ्या किंमतीवर निश्चित करण्यात येत असल्याने अशा भाडेपट्टयांच्या भुईभाडयात होणारी वाढ अनेक जुन्या भाडेपट्टेधारकांना जाचक ठरत असल्याबाबत मा. मुंबई उच्च न्यायालय, मुंबई येथे उक्तप्रमाणे रिट याचिका दाखल झालेल्या आहेत. दि.१२/१२/२०१२ च्या शासन निर्णयातील तरतूदींप्रमाणे नुतनीकरण झालेल्या भाडेपट्टयांची अल्प संख्या विचारात घेता शासनाचे दि.१२/१२/२०१२ अन्वये निश्चित केलेले धोरण अधिक लोकमान्य करण्याच्या दृष्टीने उक्त धोरणात काही सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने शासनाने दि.१२/१२/२०१२ रोजीच्या धोरणातील निवासी प्रयोजनासाठी आकारण्यात येणाऱ्या भुईभाड्याच्या दरात दि.०५/०५/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारणा करुन भूईभाड्याचे दर काही संवर्गासाठी कमी केले आहेत. सदर

		भूईभाडे नुतनीकरणाच्या सुधारित धोरणानुसार भूईभाडयाचे नुतनीकरण केलेल्या १६ प्रकरणांच्या लेखापरिक्ष चाचणीत (नोव्हेंबर २०१६, मे २०१७ आणि जून २०१७) असे आढळून आले की या भाडेपट्टींचे पुढील ३० वर्षासाठी नुतनीकरण करण्याचे आदेश मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांना दिले होते. लेखापरिक्षणात मात्र असे आढळून आले की, भाडेपट्टयाचे जरी नुतनीकरण झाले होते व सुधारीत भूईभाडे निश्चित करण्यात आले होते तरी मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यांनी सुधारित धोरणानुसार भाडेपट्टी भाडे वसूल केले नव्हते, परिणामी, सुधारीत भूईभाडे अदा न करताच या भाडेपट्टीधारकांनी जमिनीचा ताबा कायम ठेवला होता. जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी उत्तरात सांगितले (नोव्हेंबर २०१६ व मे २०१७) की कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे ज्या भाडेपट्टीधारकांना भाडेपट्टया डिसेंबर २०१२ पर्यंत संपुष्टात आल्या होत्या त्यांची सुनावणी घेता आली नव्हती. अशाप्रकारे, शासनाच्या सुधारित धोरणानुसार भूईभाडे अदा करण्याच्या आदेशाची वेळेत अंमलबजावणी करण्यात आणि महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ५३ अंतर्गत कारवाई सूरू करण्यात दोन्ही जिल्हाधिकाऱ्यांना अपयश आल्याने, जानेवारी २०१२ पासून पाच वर्षांपेक्षा जास्त	दि.०५/०५/२०१८ रोजीचा शासन निर्णय देखील उक्त नमूद याचिकेतील याचिकाकर्त्यांनी आव्हानित केला असून सदर यांचिका अद्यापि मा. मुंबई उच्च न्यायालय येथे प्रलंबित आहेत. प्रसंगत: नमूद करण्यात येते की, शासन शुध्दीपत्र क्र.जमीन २५०५/प्र.क्र.४०५/ज-२, दि.२०/०८/२०१६ अन्वये बृहन्मुंबईमधील शासकीय मिळकतींच्या भाडेपट्टा नुतनीकरणाचे अधिकार संबंधित जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आलेले आहेत. शासन निर्णय, दि.१२.१२.१२ आणि दि.०५.०५.२०१८ मा. मुंबई उच्च न्यायालयात आव्हानित करण्यात आल्याने सुधारीत दराने भूईभाडे आकारुन मुंबई शहर जिल्ह्यातील शासकीय मिळकतींवरील संपुष्टात आलेल्या भाडेपट्ट्यांचे नुतनीकरण करण्यास विलंब झालेला आहे. शासन निर्णय दि.०५.०५.२०१८ अन्वये सुधारित तरतुदी पारित केल्यानंतर जिल्हाधिकारी, मुंबई शहर कार्यालयामार्फत भाडेपट्टा संपुष्टात आलेल्या मिळकतींच्या नुतनीकरणाच्या अनुषंगाने दि.२४.१०.२०१८ रोजी जाहीर सुनावणी आयोजित केली होती. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत ६ महिन्याच्या कालावधीमध्ये १५० एवढ्या वैयक्तिक सुनावण्या घेतल्या आहेत. मुंबई शहरातील आतापर्यंत ५१ प्रकरणांचे भाडेपट्टा नुतनीकरण झाले असून एकुण रु.३२,४९,३८,६४०/- एवढा महसूल प्राप्त झाला आहे. सुधारीत दराने भूईभाडे आकारुन शासकीय मिळकतींवरील संपुष्टात आलेल्या भाडेपट्ट्यांचे नुतनीकरण करण्यास मुंबई उपनगर जिल्हयामध्ये ~~खालील कारणांमुळे विलंब झालेला~~ आहे:-

		काळात रू.६०.३३ कोटी महसूल बूडाला व त्यामुळे अतिरिक्त महसूल संकलनाचे शासनाचे उद्दीष्ट असफल ठरले. तसेच , भाडेपट्टीचा कालावधी संपुष्टात येऊनही जुन्याच दराने भूईभाडे अदा करून भाडेपट्टीधारकाने मालमत्तेचा ताबा स्वत:जवळ राखला. ही बाब ऑगस्ट २०१७ मध्ये राज्य शासनाला संदर्भीत करण्यात आली, त्यांचे उत्तर नोव्हेंबर २०१७ पर्यंत प्रतिक्षित आहे.	(i) शासन निर्णय दि.१२/१२/२०१२ व दिनांक ०५/०५/२०१८ मा. मुंबई उच्च न्यायालयात आव्हानित करण्यात आल्याने, (ii) पूर्वीची थकीत भाडेपट्टयाची रक्कम शासनजमा न केल्याने, (iii)शर्तभंगाच्या अनुषंगाने सुनावणी सुरू असल्याने, (iv) विविध कार्यालयाकडून अहवाल अप्राप्त असल्याने. मुंबई उपनगर जिल्हयामध्ये १५ प्रकरणांमध्ये भाडेपट्टा जमिनीचे रुपांतर भोगवटादार वर्ग २ मध्ये करण्यात आलेले असून त्याद्वारे शासनास रक्कम रू. ५३,०२,१९,४९५/- (रूपये त्रेपन्न कोटी दोन लाख एकोणविस हजार मात्र) इतका महसूल प्राप्त झालेला आहे. तसेच ०५ प्रकरणात भाडेपट्टयाचे नुतनीकरण करण्यात आले असून त्याद्वारे शासनास रक्कम रू. ३,२२,८५,४०३/- (रूपये तीन कोटी बावीस हजार पंच्यांशी हजार चारशे तीन मात्र) महसूल प्राप्त झालेला आहे. **महालेखापाल यांनी उल्लेख केलेल्या मुंबई शहर जिल्ह्यातील ७ प्रकरणांची माहिती पुढिलप्रमाणे आहे:-** **अ.क्र.१ हाजी ईस्माईल हाजी अलाना चॅरीटेबल ट्रस्ट** माटुंगा महसूल विभागातील भूकर क्र.३५८ या मिळकतीचे नुतनीकरण करण्याच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी मुंबई शहर यांच्याकडे दि.२६/१२/२०१८ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. सदर सुनावणीमध्ये संबंधीतांनी शासन निर्णय दि.०५/०५/२०१८ नुसार धर्मदाय प्रयोजनासाठी ०.५% प्रमाणे भूईभाडे आकारण्याची विनंती केली असून त्यानुसार सुधारीत मागणी नोटीस देऊन येणारी भूईभाडयाची रक्कम जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत वसूल करण्यात येत आहे.

अ.क्र.२ मक्की उस्मान दरवेश आणि इतर ३

माझगाव विभागातील ५४२,१/५४२ ते ८७/५४२, या मिळकतीचे नुतनीकरण करण्याच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी मुंबई शहर यांच्याकडे दि.२६/१२/२०१८ रोजी सुनावणी घेण्यात आली होती.सदर सुनावणीस भाडेपट्टाधारक गैरहजर होते.तरी पुढिल कार्यवाही नियमानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाकडून करण्यात येत आहे.

अ.क्र.३ मे. जे.के. केमिकल्स लि.

सॉल्ट विभागातील ८५,१/८५ या मिळकतीच्या नुतनीकरण करण्याच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी मुंबई शहर यांच्याकडे दि.२/१/२०१९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली आहे.

अ.क्र.४ श्री. शक्ती मिल्स लि.

लोअर परेल विभागातील भू.क्र ६५ ही मिळकत शासन जमा करण्यात आली असल्याने वसुलीचा प्रश्न उद्भवत नाही. सद्यस्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

अ.क्र.५ शेठ रनछोडदास आणि त्यांची पत्नी दानीबाई

माझगाव विभागातील भूकर ३०२, या मिळकतीच्या नुतनीकरण करण्याच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी मुंबई शहर यांच्याकडे दि.२६/१२/२०१८ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. सदर मिळकतीच्या नुतनीकरण बाबत कायदेशीर बाबी तपासुन निर्णय घेण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी कार्यालयाकडून करण्यात येत आहे.

अ.क्र.६ ॲंकवर्थ लेप्रसी हॉस्पिटल वडाळा

माटुंगा विभागातील भू.क्र. ३० या मिळकतीचे भाडेपट्टेधारक ॲंकवर्थ

			लेप्रसी हॉस्पिटल यांची जिल्हाधिकारी मुंबई शहर यांच्याकडे दि.२६/१२/२०१८ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. सदर सुनावणीकरीता ॲक्वर्थ कुष्ठरोग रूग्णालय यांच्यातर्फे हजर असलेल्या प्रतिनिधीनीं नाममात्र दराने नुतनीकरण करण्याची मागणी केली असुन मागणी नोटीसीच्या अनुषंगाने भूईभाडयाची रक्कम वसूल करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी कार्यालयाकडून करण्यात येत आहे. **<u>अ.क्र.७ बॉम्बे झवेरीयन कार्पोरेशन लि.</u>** माहिम विभागातील सी.एस.नं.२११६ ही मिळकत कब्जेहक्काने भोगवटदार वर्ग- २ या सत्ताप्रकाराने रुपांतरीत करण्यास विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग यांनी दिनांक २७/१२/२०१८ रोजीच्या पत्रान्वये मान्यता दिली आहे. सबब रुपांतरण शुल्क वसुल करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत सुरु आहे. **<u>महालेखापाल यांनी उल्लेख केलेल्या मुंबई उपनगर जिल्ह्यातील ९ प्रकरणांची माहिती पुढिलप्रमाणे आहे:-</u>** **<u>अ.क्र.८ उर्मिला प्रेम शेठ-</u>** या प्रकरणामध्ये मौजे वांद्रे, तालुका अंधेरी येथील प्लॉट क्र.२२० मधील ५७१४ चौ.वार (४७७७.६८ चौ.मी.) येथील भाडेपट्टयाने दिलेली शासकीय जमीन आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये शर्तभंग आढळून आलेला आहे. शर्तभंगाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्याकडे सुनावणीची कार्यवाही सुरू असून दिनांक ०९/०१/२०१९ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये भाडेपट्टेदार यांनी लेखी युक्तीवादासाठी वेळ मागितल्यामुळे, पुढील सुनावणी दि. २४/०१/२०१९ रोजी ठेवण्यात आली आहे. सुनावणीअंती शर्तभंगाबाबत नियमानुसार आदेश

			पारीत करून उचित कार्यवाही जिल्हाधिकारी स्तरावर करण्यात येणार आहे. **<u>अ.क्र.९ आर्च बिशप ऑफ बॉम्बे-</u>** या प्रकरणामध्ये मौजे वांद्रे, तालुका अंधेरी येथील प्लॉट नं.२३३ न.भू.क्र. बी-७३० ते ७३५ मधील १८०४ चौ.मी. भाडेपट्टयाने दिलेली शासकीय जमीन आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये शर्तभंग आढळून आल्याने, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर कार्यालयात वेळोवेळी सुनावण्या आयोजित करण्यात आल्या मात्र, सुनावण्याअंती शर्तभंग झाल्याचे निष्पन्न न झाल्याने, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दिनांक २१/०४/२०१६ रोजीच्या आदेशान्वये शर्तभंगाबाबत देण्यात आलेली नोटीस रद्द केली आहे. सदर प्रकरणात भाडेपट्टा रक्कम आकारणीबाबत जिल्हाधिकारी यांनी भाडेपट्टेदार यांना दिलेल्या मागणीपत्रमध्ये चुकीची आकडेवारी असल्याचे आढळून आल्याने, सुधारीत भाडेपट्टा रक्कम आकारणीबाबत तसेच शासकीय रक्कम थकबाकी व इतर अनुषंगिक मुद्दयांची पडताळणी करून सुधारीत भाडेपट्टयाची रक्कम, भाडेपट्टेदार यांना जिल्हाधिकारी कार्यालयाच्या दि.०५/०१/२०१९ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेली आहे. सुधारित भाडेपट्टयाची रक्कम वसूल केल्यानंतर, भाडेपट्टा नुतनीकरणाचे आदेश पारित करण्यात येणार आहेत. **<u>अ.क्र. १० साहिल लॅण्ड डेव्हलपर्स अॅण्ड बिल्डर्स-</u>** या प्रकरणामध्ये, मौजे वांद्रे ता.अंधेरी प्लॉट नं. २०० न.भू.क्र. बी/८६८ मधील क्षेत्र १८१५ चौ.वार भाडेपट्टयाने दिलेली शासकीय जमीन आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये शर्तभंग झाल्याचे आढळून आलेले आहे. त्यानुसार शर्तभंगाबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात दिनांक २९/०९२०१७,१६/११/२०१७, ०१/०३/२०१८,

			०४/०५/२०१८, १३/०७/२०१८ रोजी सुनावण्या आयोजित करण्यांत आल्या होत्या. सुनावणी अंती प्रकरण आदेशासाठी बंद करण्यात आलेले आहे. आदेश पारीत झाल्यानंतर त्यानुसार भाडेपट्टा नुतनीकरणाची कार्यवाही करण्यात येईल. **अ.क्र.११ चिल्ड्रेन एड सोसायटी-** चिल्ड्रेन एड सोसायटीला भाडेपट्टयाने दिलेल्या जमिनीवर मोठया प्रमाणात अतिक्रमणे झाल्याचे व शासन / जिल्हाधिकारी यांच्या परवानगीशिवाय पोटभाडेकरू ठेवून शर्तभंग केल्याचे निदर्शनास आले आहे. या प्रकरणामध्ये जिल्हाधिकारी कार्यालयात दिनांक ०५/०३/२०१५, १६/०४/२०१५,०७/०५/२०१५, ०४/०६/२०१५, २६/०६/२०५, २५/०८/२०१५, ०९/०९/२०१६, ११/११/२०१६, २४/११/२०१६, ०६/०१/२०१७, २१/०१/२०१७, २२/०६/२०१७ रोजी सुनावण्या होऊन, दि. १६/०८/२०१७ रोजी जिल्हाधिकारी यांनी आदेश पारीत केले होते. सदर आदेशानुसार २ महिन्यांच्या आत जमिनीवरील अतिक्रमण निष्कासित करून जमीन मोकळी करणेबाबत व तसे न केल्यास, अतिक्रमित जमीन शर्तभंगाखाली शासनजमा करण्याबाबत आदेशित केले होते. दि. १६/०८/२०१७ रोजीच्या आदेशानुषंगाने भाडेपट्टेदार यांनी कार्यवाही न केल्यामुळे जिल्हाधिकारी यांनी दि. ०३/०३/२०१८ रोजी आदेश पारीत करुन भाडेपट्टेदार यांना प्रदान केलेल्या जमिनीपैकी अतिक्रमणाखालील ९८,३४१.२ चौ.मी. जमीन शर्तभंगाखाली शासनजमा करुन मिळकत पत्रिकेवर भाडेपट्टेदार संस्थेच्या नावाची नोंद कमी करून त्याजागी **"महाराष्ट्र शासन"** अशी नोंद दाखल करणेबाबत आदेशित केले होते. जिल्हाधिकारी यांच्या दि. १६/०८/२०१७ व दि. ०३/०३/२०१८

			रोजीच्या आदेशाविरुध्द अतिक्रमणधारकांनी विविध न्यायालयात अपिल दाखल करून सदर आदेशास स्थगिती मिळविली होती. अपर आयुक्त, कोकण यांच्याकडे दाखल झालेल्या अपिलावर त्यांनी दि. ०२/०५/२०१८ रोजी आदेश पारीत करून अपिलार्थी अतिक्रमणदारांचे अपिल फेटाळून लावले व जिल्हाधिकारी यांचे दि. १६/०८/२०१७ व दि.०३/०३/२०१८ रोजीचे आदेश कायम केले. अपर आयुक्तांच्या आदेशाविरुध्द मा. मंत्री (महसूल) यांचेसमोर फेरतपासणी अर्ज दाखल झाला असून त्यामध्ये मा. मंत्री (महसूल) यांनी दि. २४/०५/२०१८ रोजीच्या आदेशान्वये अपर आयुक्त, कोकण विभाग यांच्या दि. ०२/०५/२०१८ रोजीच्या आदेशास स्थगिती दिलेली आहे. तसेच एका अतिक्रमणदाराने मा. मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट याचिकेमध्ये मा. मुंबई उच्च न्यायालयाने दि. २५/०९/२०१८ रोजी पारीत केलेल्या आदेशान्वये सदर याचिका निकाली काढून याचंकिाकर्त्यास अपर आयुक्त, कोंकण विभाग यांचेकडे अपिल दाखल करणेस आदेशीत केले होते. त्यानुसार याचिकाकर्त्याने अपर आयुक्त, कोंकण विभाग यांचेकडे दाखल केलेल्या अपिलावर त्यांनी दि.०४/१२/२०१८ रोजी आदेश पारीत करून अपिल अर्ज फेटाळून जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे दि.१६/०८/२०१७ रोजीचे आदेश कायम केले आहेत. प्रस्तूत प्रकरणी जिल्हाधिकारी यांनी दि.१६/८/२०१७ व दि.०३/०३/२०१८ रोजी पारीत केलेल्या आदेशावरील अपिले न्याप्रविष्ठ असल्याने तसेच अतिक्रमीत जागेसह सर्व जागेच्या भाडेपट्टयाचे नुतनीकरण करून देणेची संस्थेची विनंती असल्याने सद्यस्थितीत भाडेपट्टा नुतनीकरणाची कार्यवाही होऊ शकली नाही.

			भाडेपट्टेदार यांना शासकीय जमीन **विनाआकार** भाडेपट्टयाने मंजूर केलेली आहे. या जमिनीपासून भाडेपट्टदार यांचेकडून कोणताही भाडेपट्टा शासनास प्राप्त होत नाही. शासन निर्णय, दि. ०५/०५/२०१८ मधील तरतुदीनुसार शासनाने **सवलतीच्या दराने अथवा नाममात्र दराने भाडेपट्टयाने प्रदान** केलेल्या शासकीय जमिनीच्या **भाडेपट्टयाचे नुतनीकरण करताना असा भाडेपट्टा सवलतीच्या दराने अथवा नाममात्र दराने पुढे चालू ठेवण्यासाठी प्रकरणनिहाय निर्णय घेण्याचे अधिकार शासनास** आहेत. त्यामुळे जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दि.०५/०१/२०१९ रोजी विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेमार्फत शासनास पत्र पाठवून शासनाचे मार्गदर्शन मागविले आहे. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या उक्त नमूद दि. ०५/०१/२०१८ रोजीच्या पत्रावर विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अभिप्रायासह शासनास प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर, शासन निर्णय, दिनांक ०५/०५/२०१८ मधील तरतुदीनुसार प्रस्तुत प्रकरणी शासन स्तरावर गुणवत्तेवर उचित निर्णय घेण्यात येईल. **<u>अ.क्र.१२ चेंबूर शॉपकिपर्स वेल्फेअर सोसायटी -</u>** मौजे वाढवली, ता. कुर्ला, स.नं. ११२ व ११४ मधील १,५६२ चौ.मी. शासकीय जमीन अतिक्रमण नियमानुकूल करून, चेंबूर शॉपकिपर्स वेल्फेअर सोसायटीला भाडेपट्टयाने दिलेली आहे. भाडेपट्टेदार सोसायटीच्या ताब्यातील क्षेत्रापेक्षा जास्त क्षेत्रावर अतिक्रमण केल्याचे व गाळयांचे एकत्रिकरण/हस्तांतरण व थकीत भाडेपट्टा अशा प्रकारचा शर्तभंग आढळून आलेला आहे. सदर शर्तभंगाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात दिनांक

			२०/०२/२०१५, ०८/०५/२०१५, ०७/०१/२०१७, २२/०६/२०१७ रोजी सुनावण्या झालेल्या आहेत. तथापि, जिल्हाधिकारी यांच्या बदलीमुळे अंतिम आदेश पारीत होऊ शकले नव्हते. भाडेपट्टेदार संस्थेस प्रदान केलेली जमीन सलग नसून दोन भागांमध्ये आहे. सुनावणी दरम्यान भाडेपट्टा वेगळा करून मिळणेबाबत २० दुकानदारांनी विनंती केली आहे. तसेच संस्थेने त्यांना मंजूर केलेल्या जमिनीपेक्षा जास्त क्षेत्रावर अतिक्रमण केलेले आहे. यानुषंगाने जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दि. ०५/०१/२०१९ रोजीच्या पत्रान्वये विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्यामार्फत शासनाच्या आदेशार्थ प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर प्रस्तावानुषंगाने विभागीय आयुक्तांकडून शासनास अहवाल प्राप्त झाल्यानंतर शासन स्तरावर गुणवत्तेवर उचित निर्णय घेण्यात येईल. **अ.क्र.१३ माधव कंटेनर्स ट्रान्सपोर्ट प्रा.लि.-** मौ. माहूल, ता. कुर्ला, स.क्र. ७२, न.भू.क्र. १ येथील सदर माधव कंटेनर्स ट्रान्सपोर्ट प्रा.लि. यांना भाडेपट्टयाने दिलेली १२७३.२ चौ.मी. शासकीय जमीन जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दिनांक २४/१२/२०१८ रोजीच्या आदेशान्वये **"शासनजमा"** केलेली आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणामध्ये आता भाडेपट्टा नुतनीकरण करण्याची आवश्यकता नाही. **अ.क्र.१४ कुर्ला बेने इस्त्रायल प्रेअर हॉल-** या प्रकरणातील शासकीय जमीन मौ. कुर्ला येथील असून नुतनीकरण करावयाचे क्षेत्र १४४५.८ चौ.मी. आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये जिल्हाधिकारी यांच्याकडे दिनांक २१/०८/२०१४ रोजी सुनावणी झाली होती. तथापि, जिल्हाधिकारी यांच्या बदलीमुळे अंतिम आदेश पारीत होऊ शकलेले नाहीत.

त्यामुळे पुन्हा दिनांक १६/०९/२०१७ रोजी सुनावणी घेण्यात आली. तथापि, जिल्हाधिकारी यांच्या बदलीमुळे अंतिम आदेश पारीत होऊ शकलेले नाहीत. आता जिल्हाधिकारी यांच्याकडे पुढील सुनावणी दि.१५/०१/२०१९ रोजी आयोजित केलेली आहे. सुनावणीअंती शर्तभंगाबाबत आदेश पारीत केल्यानंतर नुतनीकरणाची कार्यवाही करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या स्तरावर होईल.

अ.क्र.१५ बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी -

बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी या संस्थेस मौ. गुंडगाव, ता. बोरीवली येथील स.नं. १८८ (पै) ३३ एकर ३५ गुंठे जमीन प्रती वर्ष रु.१/- इतक्या भाडेपट्टयाने "फिल्ड रिसर्च सेंटर" साठी मंजूर केलेली आहे. भाडेपट्ट्याने दिलेल्या शासकीय जमीनीचा भाडेपट्टा दि.०४/०६/२०१४ रोजी संपुष्टात आला आहे. जिल्हाधिकारी यांचा १७/१२/२०१४ रोजीचा प्रस्ताव विचारात घेऊन, शासन पत्र, दि.१५/५/२०१८ अन्वये भाडेपट्ट्याचा कालावधी दि. ४/६/२०१४ पासून पुढील ३० वर्षासाठी वाढवून त्याप्रमाणे संस्थेबरोबर करारनामा करण्याबाबत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी भाडेपट्ट्याचा कालावधी दि.४/६/२०१४ पासून दि.३/६/२०४४ पर्यंत शासन यथावकाश निश्चित करेल अशी वार्षिक भाडेपट्टयाची रक्कम आकारण्याच्या अटीवर पुढील ३० वर्षाच्या कालावधीसाठी अटी/शर्तीवर सदर भाडेपट्टयाचे नुतनीकरण त्यांच्या दि.३१/५/२०१८ रोजीच्या आदेशान्वये करण्यात आलेले आहे. त्याच प्रमाणे दि.३१/७/२०१८ **रोजी भाडेपट्टेदार संस्थेसमवेत करारनामा देखील करण्यात आलेला आहे.**

तसेच, शासन निर्णय,दि. ०५/०५/२०१८ मधील तरतुदीनुसार सदरहू

			जमिनीच्या भाडेपट्टयाचा दर निश्चित करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरू असून, संबंधित धारिका दिनांक १४/१२/२०१८ रोजी वित्त विभागाच्या सहमतीसाठी पाठविण्यात आली आहे. वित्त विभागाची सहमती प्राप्त झाल्यानंतर, भाडेपट्टयाच्या सुधारित दराबाबत शासन मान्यतेने उचित निर्णय घेण्यात येईल. **<u>अ.क्र.१६ जाँव दुमिंग रोझी</u>** - प्रस्तुत प्रकरणी शर्तभंगाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या स्तरावर दि.१७/०३/२०११ पासुन ते दि. १२/०१/२०१८ रोजीपर्यंत जवळ-जवळ २१ सुनावण्या झाल्या आहेत. शर्तभंगाचे अनुषंगाने भाडेपट्टयाने दिलेली मौ. मालवणी, ता. बोरीवली येथील स.नं.९९, न.भू.क्र. २७३६ मधील २५७ चौ.वार (२१४.८ **चौ.मी.**) **जमीन** जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दिनांक ०१/०१/२०१९ रोजीच्या आदेशान्वये शासन जमा केलेली आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणामध्ये भाडेपट्ट्याचे नुतनीकरण करण्याची आवश्यकता नाही.

(सुनिल कोठेकर)
अवर सचिव

****

साक्ष :-

परिच्छेद क्र.३.१० सुधारित दराने भूईभाडे अदा करण्याच्या आक्षेपाची अंमलबजावणी न करणे :-

१७.१ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात दिनांक १६ जानेवारी, २०१९ रोजी समितीने विभागीय सचिवांची साक्ष घेतली. विभागाला रिट याचिकांच्या पार्श्वभूमीवर जास्त कारवाई करता आली नाही. मुंबई शहरातील आतापर्यंत ५१ प्रकरणांचे भाडेपट्टा नूतनीकरण झाल्याचे आणि इतर प्रकरणांमध्ये सुनावणी सुरु असल्याचे लेखी उत्तरातविभागाने नमूद केले आहे. आता न्यायालयात प्रकरण प्रलंबित आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, दिनांक १२.१२.२०१२ रोजीच्या शासनाच्या धोरणाच्या अनुषंगाने मा.मुंबई उच्च न्यायालयात दोन्ही बाजूने याचिका दाखल करण्यात आलेल्या आहेत. काही याचिकांमध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, आपण दिनांक १२.१२.२०१२ रोजीच्या धोरणानुसार नूतनीकरणानंतर जी भाडेवाढ करतो ती भाडेवाढ खूप जाचक आहे, जास्त आहे. तसेच, दुसरी याचिका ते भाडे खूप कमी आहे, ते वाढविले पाहिजे अशीही आहे. न्यायालयाने सांगितले होते की, शासनाने दोन्ही पक्षाबरोबर चर्चा करावी आणि यातून मध्यम मार्ग काढता येतो काय हे बघावे. शासनाने दोन्ही पक्षाबरोबर चर्चा केलेली आहे. त्यानंतर शासनाने दिनांक ५.५.२०१८ रोजी च्या शासन निर्णयान्वये धोरणात सुधारणा सुद्धा केली आहे. त्यामध्ये भाडेपट्टीधारकांना काही प्रमाणात सवलत दिलेली आहे. काही संवर्गाकरिता भाडे कमी केले. परंतु, त्या विरुद्ध देखील याचिका दाखल झालेली आहे. म्हणजे आपण कोणतेहीधोरण तयार केले तर त्याला मुंबईमध्ये न्यायालयीन पातळीवर आवाहन दिले जाते असे दिसते, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

दिनांक ०५ मे, २०१८ च्या शासन निर्णयाला स्थगिती आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता, उक्त शासन निर्णयाला स्थगिती नसल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले. दिनांक ०५ मे, २०१८ च्या शासन निर्णयाला स्थगिती नसेल तर अशा प्रकारच्या पी.आय.एल. होत असतात. यासाठी स्थगिती नसेल तर ६९१ मिळकती प्रकरणांचे भाडेपट्टी नुतनीकरण वेगाने केले पाहिजे. असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागाला समितीसमोर सादर करायचे आहे की, दिनांक १२ डिसेंबर, २०१२ आणि दिनांक ०५ मे, २०१८ ची योजना या दोन्ही योजनांना स्थगिती नाही. मात्र, न्यायालयासमोर एखादी बाब न्यायालयीन वादामध्ये असते तेव्हा त्याची अंमलबजावणी करण्याची टेंडन्सी कमी होते. कारण लोकांना वाटते की, न्यायालय काहीतरी निर्णय देईल आणि त्यानंतर हे सुधारेल. त्यामुळे लोक जास्त उत्साहाने त्याची अंमलबजावणी करीत नाहीत, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

लोक त्याची अंमलबजावणी करीत नसले तरी जोपर्यंत शासनाच्या आदेशाला स्थगिती नाही तोपर्यंत शासनाने त्याची अंमलबजावणी केली पाहिजे.भुईभाडे कमी किंवा जास्त हे ठरविण्याचा अधिकार न्यायालयाला आहे काय ? समजा एखादी प्रॉपर्टी कोणाला भाडेपट्टीवर दिली आहे तर त्याची भाडेपट्टीरक्कम काय असू शकते या संदर्भात भाडे नियंत्रण कायदा आहे. शासन किंवा विभाग जर जमीन मालक असतील तर ज्या गोष्टी खाजगी मालकाला लागू होतात त्याच आपल्याला लागू होतात. आपण त्यावर काही अधिक भाडे लावले नाही तर त्यापेक्षा कमी लावलेले आहे. सार्वजनिक न्यास संस्थांना नाममात्र दराने जमीन देतो किंवा पब्लीक इंटरेस्टसाठी आपण हे करतो हे सर्व मान्य आहे. त्यामुळे थर्ड पार्टी इंटरेस्ट जिथे जनरेट होतो ते सरकारचे साधे काम आहे. यासाठी कायदा ही अस्तित्वात असेल ते माहिती नाही. ९० टक्के प्रकरणांमध्ये थर्ड पार्टी इंटरेस्ट तयार केला आहे. ज्या ज्या ठिकाणी थर्ड पार्टी इंटरेस्ट तयार झाले तिथे घरमालकाला दुसरा कायदा आहे. खाजगी घरमालकाला असलेला अधिकार सरकारला का नाही ? समिती म्हणते ते योग्य आहे की, दिनांक १२ डिसेंबर, २०१२ आणि दिनांक ०५ मे, २०१८ या दोन्ही योजनांना न्यायालयाने स्थगिती दिलेली नाही. समितीचा दोन गोष्टींवर भर आहे की, थर्ड पार्टी इंटरेस्ट जर तयार झाले तर विभाग त्याचे अधिकार का वापरत नाही ? आपण ते सेटल करायला बघतो कारण मध्यस्थासाठी बरेच लोक येतात. आता थर्ड पार्टी इंटरेस्ट, फोर्थ पार्टी इंटरेस्ट असे ऑनगोईंग पण तयार केले जातात. यासाठी काहीतरी बंधन घाला किंवा याच्या माध्यमातून सरकारला महसूल मिळेल याचा काहीतरी निर्णय करा शर्तभंगाची सुनावणी मोठया प्रमाणात केली आहे. लोकलेखा समितीमध्ये याचे काही सकारात्मक निकाल पण लागले आणि त्यातून सरकारला मोठया प्रमाणात महसूल मिळाला. पण हे प्रकरणनिहाय अभ्यास करुन करता येणार नाही. मग कोणाला अपिल झोनमध्ये जायचे असेल किंवा अपिलेट ॲथॉरिटी ठरवायची असेल तर माननीय राज्यमंत्री, माननीय सचिव किंवा इतर पातळीवर ठरवा. पण विभागाने या संदर्भात कायदा करण्याची आवश्यकता आहे किंवा अस्तित्वात असलेल्या कायद्याचा लाभ घेतला पाहिजे. आपण या कायद्याचा लाभ का घेत नाहीत ? अशी विचारणा समितीने केली असता, सर्वप्रथम विभागाला समितीसमोर हे सादर करायचे आहे की, दिनांक १२, डिसेंबर, २०१२ च्या पॉलिसीमध्ये विभागाने स्पष्ट केलेले आहे की, कोणतीही भाडेवाढ करीत असताना संबंधित भाडेकरुला सुनावणी देण्याची आवश्यकता आहे. कारण त्याचे म्हणणे ऐकून घेतल्याशिवाय नुतनीकरणाच्या अनुषंगाने भाडेवाढ करण्यासंदर्भात कोणत्याही प्रकारचे आदेश पारित करु नये. साधे नुतनीकरण असले तरी त्याला सुनावणी देण्याची आवश्यकता आहे. कारण दिनांक १२ डिसेंबर, २०१२ च्या धोरणामध्ये अशा प्रकारची स्पष्टता आहे. दुसरा मुद्दा असा आहे की, बहुतांश प्रकरणांमध्ये काहीना काही शर्तभंग सापडतात. त्या शर्तभंगाच्या संदर्भात कारवाई करण्यासाठी

नॅचरल जस्टीस म्हणून आपल्याला त्यांना सुनावणी देऊन त्या अनुषंगाने कारवाई करावी लागते. शर्तभंगामध्ये थर्ड पार्टी इंटरेस्ट तयार करण्याचा पण समावेश आहे. ज्यामध्ये थर्ड पार्टी इंटरेस्ट तयार केला आहे अशा गोष्टींचाही त्यामध्ये समावेश आणि काही ठिकाणी वापरामध्ये विनापरवाना बदल केलेल्या गोष्टींचाही समावेश आहे. अशा प्रकरणामध्ये आपल्याला त्यांना सुनावणी द्यावीच लागते. सुनावणी देताना अडजॉर्नमेंटच्या बऱ्याच गोष्टी असतात. मुंबईमध्ये वकील उभे करणे, त्यांच्या माध्यमातून सविस्तर युतीवाद करणे अशा प्रकारच्या गोष्टी सहजरित्या होत असतात. त्यामुळे प्रत्येक गोष्ट निश्चित करण्यासाठी थोडा वेळ लागतो. विभागाने दिलेले उत्तर जर बघितले तर असे दिसून येते की, बऱ्याच प्रकरणांमध्येसुनावणी दिली, नंतर स्थगित केले, काही प्रकरणांमध्ये पक्षकार वेळ मागून घेतात, काही प्रकरणांमध्ये दुसरा पक्ष सांगतो की, उत्तर देण्यासाठी आम्हाला वेळ पाहिजे. त्यासाठी वेळ द्यावा लागतो म्हणून जास्त वेळ लागतो. यामध्ये कारवाई थांबलेली नाही. दिनांक१२ डिसेंबर, २०१२ आणि दिनांक ०५ मे, २०१८ च्या योजनेची अंमलबजावणी सुरु आहे मात्र अंमलबजावणीमधील कार्यपद्धतीमुळे त्यासाठी कालावधी लागत आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

मग त्याचा एक वेगळा सेल निर्माण करा. महसूल विभागाच्या अंतर्गत त्या अधिकाऱ्यांना अधिकार आहे तर वेगळा माणूस आणा नाहीतर त्याच अधिकाऱ्यांना स्पेसिफिक म्हणजे आठवडयातील एक किंवा दोन दिवस असा वेळ निश्चित करुन त्या दिवशी दुसरे कोणतेही काम न करता या सर्व सुनावणी पूर्ण केल्या पाहिजे. कारण पुन्हा १० ते २० वर्ष याचे नुतनीकरण होणार नाही. ज्या अधिकाऱ्यांना सुनावणीचा अधिकार दिलेला आहे त्यांची वेळ निश्चित करा. असे मत समितीने व्यक्त केले असता, कामाचे प्रमाण पाहता आणि काम सत्वर व्हावे या दृष्टीकोनातून शासनाने दिनांक २० ऑगस्ट, २०१६ च्या आदेशान्वये जिल्हाधिकाऱ्यांना अधिकार दिलेले आहेत, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

पण त्याठिकाणी कामाला वेग नाही म्हणून हा महालेखाकारांचा परिच्छेद आहे. या विषयामध्ये ज्या ज्या ठिकाणी शर्तभंगाची कारवाई केली तिथे मोठया प्रमाणात पैसे मिळाले आहेत. जिथे नुतनीकरण केले तिथे ३२ कोटी रुपये मिळाले आहेत. या दृष्टीने १३०७ प्रकरणांवर कारवाई केली तर किती रुपये मिळतील ? मुंबईमध्ये भाडेपट्टी देण्यासाठी काही अडचण असेल असे समितीला वाटत नाही. या दृष्टीने विभागाच्या कार्यप्रणालीला कसे दुरुस्त करता येईल हे पाहा. न्यायालयामध्ये प्रकरण सुरु असताना दिनांक १२ डिसेंबर, २०१२ च्या शासन निर्णयातील नियमाला शिथिल केले आहे. न्यायालयाने सांगितले की, 'आपण चर्चा करा आणि निर्णय घ्या.' दिनांक ०५ मे, २०१८ रोजी च्या सुधारीत धोरणाला सुद्धा लोकांनी आवाहन केले.

एका घराचे भाडे काय असावे त्यासाठी भाडे नियंत्रण कायद्यामध्ये एक प्रोफॉर्मा आहे. सरकार म्हणून आपण तो प्रोफॉर्मा वापरु शकतो. एखाद्या खाजगी मालकाने कोणती जागा भाडेपट्टीवर दिली असेल तर ती जागा कमी-जास्त आहे काय या संदर्भात तो त्याच्याबरोबर निगोशिएशनला बसू शकतो. ते नियमामध्ये असेल कारण एक प्रकरण नसल्यामुळे निगोशिएशन देण्याचा अधिकार सरकारला नाही. त्यामुळे यासाठी कायदा आणि त्यातील नियम पाहिजे. भाडे नियंत्रण कायद्यामध्ये भाडे ठरवण्याच्या शेड्युलप्रमाणे केले तर निगोशिएशन करा असे म्हणण्याचे किंवा सुनावणी देण्याचे अधिकार न्यायालयाला नाहीत. व्यावसायिक, औद्यिगिक,निवासी किंवा सार्वजनिक न्यासासाठी असेल तरी हेच निश्चित आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता, आपले मुळ लिज ॲग्रीमेंट हा एक करार आहे. करार संपल्यानंतर आपण त्यामध्ये कोणताही बदल करताना अशी अपेक्षा आहे की, एका पक्षाने बदल केल्यानंतर दुसऱ्या पक्षाला कळवले पाहिजे. करार पुढे सुरु ठेवण्यास तरतूद आहे मात्र त्यामध्ये काही तरतुदी बदलायच्या असतील तर एका पक्षाने दुसऱ्या पक्षाला आपली इच्छा सांगितली पाहिजे की, 'आम्हाला यामध्ये काही बदल करायचे आहेत.' त्यामुळे दिनांक १२ डिसेंबर, २०१२ च्या योजनेमध्ये शासनाने स्पेसिफिक तरतूद केलेली आहे की, नुतनीकरण करताना दुसऱ्या पक्षाला त्यांचे आता आणि यापूर्वी भाडे किती होते याची कल्पना दिली पाहिजे. नंतर त्यांचे म्हणणे ऐकून घेऊन भाडे निश्चित केले पाहिजे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

तो शासन निर्णय बदली करा. कारण समितीचे असे मत आहे की, दिनांक १२ डिसेंबर, २०१२ च्या शासन निर्णयाप्रमाणे ते जेव्हा कराराचा भंग करतात किंवा थर्ड पार्टी इंटरेस्ट तयार करतात तेव्हा विभागाला सूचना देतात काय ? तर ते सूचना देत नाहीत आणि आपआपली ॲक्टिविटी करतात. त्यामुळे याचा असा मार्ग आहे की, जमीन मालकाने जमीन मालकासारखेच वागले पाहिजे. असे केले तरच हे सर्व मार्गी लागेल नाहीतर चॅरिटेबल इन्स्टिटयुट सारखेच सुरु राहिल.यामध्ये प्रकरणांचे एक उदाहरण बघितले आहे. दोन प्रकरणामध्ये विभागाने शर्तभंगाची कारवाई प्रस्तावित केली आणि ती पुन्हा मागे पण घेतली आहे. त्या ठिकाणी सुनावणी झाल्यामुळे शर्तभंग झाला नाही हे विभागाच्या लक्षात आले. सुनावणी न करता सलग करा पण समितीच्या मते ते योग्य होणार नाही. दुसरा मुद्दा असा आहे की, कितीही पैसे देऊन आदेशानुसार प्रकरण बंद करण्यात येते किंवा जिल्हाधिकाऱ्यांची बदली होते पुन्हा काही दिवसाने प्रकरण सुरु होते आणि आदेशानुसार प्रकरण बंद आणि जिल्हाधिकाऱ्यांची बदली अशाप्रकारे काय सुरु आहे ?१० ते १२ प्रकरणांपैकी २ प्रकरणांमध्ये शर्तभंग झाला नाही असे आढळले.न्यायालय यासाठीच आहे त्यामुळे 'माझा शर्तभंग नाही' म्हणून त्यांनी न्यायालयात जायचे. त्यासाठी जर सरसकट सुनावणीचा कायदा लावला तर हे प्रकरण निकाली लागणारच नाही.या

प्रकरणांची सुनावणी किती कालावधीत व्हावी यासाठी मर्यादा लावली पाहिजे. नोटीस काढूनही लोक सुनावणीसाठी उपस्थित राहत नाहीत. सन २०११ पासून सुनावणी झाली, सन २०१८ पर्यंत सुनावणी सुरु आहे. एक ते दोन महिन्यामध्ये आता १५ प्रकरणांचा निर्णय होणार आहे. न्यायालयामध्ये पुढे हे अवमानित झाले नाही पाहिजे हे समितीला मान्य आहे. त्यांना एवढया संधी नाही दिल्या पाहिजे. कारण हे प्रकरण पूर्ण होऊन शासनाला महसूल मिळाला पाहिजे, ही महालेखाकारांची मूळ चिंता आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, विभाग समितीच्या मताशी सहमत आहे की, सुनावणी घेताना कुठेतरी मर्यादा पाहिजे. आपण त्यांना किती प्रमाणात ॲडजॉर्नमेंट दिली पाहिजे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

तीन ते चार वेळा संधी द्या किंवा ६ महिन्याची मर्यादा ठेवा. सन २०११ पासून तीन-तीन जिल्हाधिकारी बदलतात आणि विभाग काही निर्णयच घेत नाही. संबंधित अधिकारी तिथे नियुक्त आहेत त्यांनी सुनावणीअंती निर्णय द्यावा. असे मत समितीने व्यक्त केले असता, यामध्ये नैसर्गिक न्यायाचे मूळ तत्व असे आहे की, त्यांनी आदेश पारित केला पाहिजे. पूर्वीच्या अधिकाऱ्यांनी सुनावणी घेऊन आताच्या अधिकाऱ्यांनी आदेशपारित करणे हे नैसर्गिक न्याय तत्त्वाच्या विरोधात ठरेल, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सर्व डिसपोजल व लोकलेखा समितीच्या अहवालाला एक वर्षाच्या आत निर्णय करा असे समितीने म्हटले होते. फक्त माननीय मंत्र्यांना काही मर्यादा नाही पण आपण स्वत: तो निर्णय घेतलेला आहे की, सचिव स्तरावर एक वर्षाच्या आत निर्णय होईल पण जिल्हाधिकारी स्तरावर १० वर्ष निर्णय घेतला जात नाही. मग पैसे कसे वसुल होणार आहेत. अशी विचारणा समितीने केली असता, या प्रकरणामध्ये शासन स्तरावरुन पण वारंवार समज दिलेली आहे की, या प्रकरणामध्ये भाडेपट्टयाचे नुतनीकरण केले पाहिजे. विभागाने दोन्ही जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांना साक्षीसाठी उपस्थित राहण्यासाठी सांगितले होते. कारण त्यांनाही थेट समितीच्या भावना समजतील. त्यांच्या स्तरावरील प्रलंबित प्रकरणामध्ये ते अधिकारी प्रयत्नपूर्वक काम करतील असे विभागीय सचिवांनी सांगितले.

नुतनीकरणापूर्वी शर्तभंग आड आला तर आपण एक सुनावणी देतो. जिल्हाधिकारी स्तरावर निवडणुकीसारखी काही कामे असतात तर त्यासाठी असे केले आहे की, मुंबई उपनगरमध्ये अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांच्या पातळीवर हिअरिंगडेलिगेट केलेल्या आहेत. काही प्रकरण जिल्हाधिकारी आणि काही प्रकरण अतिरिक्त जिल्हाधिकारी स्वत: ऐकतात. आपण बघितले की, ९ प्रकरणांपैकी ७ प्रकरणांमध्ये सुनावणी पूर्ण करुन त्यावर निर्णय सुद्धा दिलेला आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

भोगवटादार १ पासून भोगवटादार २ असे रुपांतर केल्यामुळे वसुली जास्त आहे. पण नुतनीकरणाच्या प्रकरणात वेग खूप कमी आहे. असे समितीने निदर्शनास आणले असता, एकूण १३५ प्रकरणांचा कालावधी पूर्ण झालेला आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले. भोगवटादार १ पासून भोगवटादार २ असे रुपांतर केल्यामुळे १३५ प्रकरणांपैकी १५ प्रकरण पूर्ण केली आहेत आणि फक्त ५ प्रकरणात नुतनीकरण केलेले आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता, ५ प्रकरणांमध्ये नुतनीकरण केलेले आहे. १४ प्रकरणांवर विभागाच्या पातळीवर कारवाई सुरु आहे. त्या १४ प्रकरणांमध्ये शर्तभंग झालेला आहे किंवा नाही याबाबतीतील अहवाल विभागाकडे आलेला आहे. २९ प्रकरणांचे नुतनीकरण सुरु आहे परंतु संबंधितांना सुनावणीसाठी बोलवले आहे पण ते पात्र झालेले नाहीत त्यांना शेवटची संधी दिलेली आहे. त्यांनी उच्च न्यायालयात आधीच याचिका दाखल केलेली आहे. याबाबतीत लवकरात लवकर निर्णय घेत आहोत, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

यामध्ये अजून एक सांगायचे आहे की, या प्रकरणात उच्च न्यायालयाचा विषय आहे त्यामुळे यात मोठया प्रमाणावर राजस्व गुंतलेले आहे. या दृष्टीने महालेखाकारांच्या भरोश्यावर सर्व प्रकरण सोडू नका. काही स्पेसिफिक कॉन्सिल लावले तर विभागाला ही सर्व वसुली लवकर करता येईल. याबाबत शासनाने विचार करणे आवश्यक आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता, दिनांक १२ डिसेंबर, २०१२ आणि दिनांक ०५ मे, २०१८ ची योजनेच्या संदर्भात न्यायालयीन आवाहन आहेत. मात्र दिनांक १२ डिसेंबर, २०१२ च्या योजनेला जे आवाहन आहे त्यासंदर्भात महालेखाकारांना स्वत: उभे राहण्यास विनंती केली होती. त्या अनुषंगाने त्यांनी न्यायालयात स्वत: शासनाची बाजू मांडलेली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखालीच दिनांक ०५ मे, २०१८ ची योजना सुधारीत केली होती. याचा अर्थ या प्रकरणांमध्ये महालेखाकारांची मदत घेत आहोत, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

त्यांचे आवाहन आपल्या अधिकारावर आहे काय किंवा भाडेवाढीच्या संदर्भात विभागाने जी कार्यपद्धती अवलंबविली आहे त्याबाबात आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, भाडेवाढ जास्त आहे असा त्यांचा मुद्दा आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले. पुन्हा समितीचा तोचप्रश्न आहे की,भाडेवाढ जास्त आहे का कमी आहे हे ठरविण्याचा अधिकार न्यायालयाला नाही. एखादी जागा भाडयाने द्यायची आहे त्यासाठी भाडे कायदा अस्तित्वात आहे आणि त्यामध्ये भाडे ठरवण्याचे शेडयुल पण आहे. रेडी रेकनर, त्या जागेची डेन्सिटी काय आहे, त्या जागेची कमतरता काय आहे ? अशा प्रकारचा नियम आणि कायदा

अस्तित्वात आहे तर मग न्यायालयाला त्यामध्ये काय अधिकार आहे? समितीचे असे मत आहे की, भाडेपट्टीधारकाकडून भाडे वसुल करण्याची सुरुवात करा. न्यायालयाचा निर्णय जर शासनाच्या बाजूने आला नाहीतर ते पैसे जमा ठेवून त्यांना परत देण्याची व्यवस्था करा. भाडेपट्टीधारक जर सुनावणी मागत असतील तर ते काम लवकर करा किंवा अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांना ते काम द्या.यासाठी एक टीम ठरवा किंवा मग जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अधिकाऱ्यांना त्यासाठी काही दिवस ठरवून द्या.यासाठी काहीतरी कालर्यादा ठरवा. असे समितीने सूचित केले असता, याबाबत काही उपाययोजना करून वेग वाढवता येईल हे जिल्हाधिकाऱ्यांनी समितीला अवगत करावे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

There should be a mandatory rule saying that it should completed within a year. ज्याप्रमाणे मंत्रालयीन स्तरावर विभागाने नियम लागू करून घेतले आहेत, त्याप्रमाणे जिल्हाधिकारी स्तरावर सदर सर्व नुतनीकरण एका ठरावीक कालावधीमध्ये पूर्ण झाले पाहिजेत. सुनावणी घेऊन सदर बाबतीतील कार्यवाही पूर्ण झाली पाहिजे. याबाबतीत शासन स्तरावर काही नियम करता येत नाहीत का? अशी विचारणा समितीने केली. तसेच, सदर बाबीच्या अनुषंगाने एक मुद्दा सांगू इच्छितो की, विभाग सुनावणी घेतो त्यासाठी भाडेपट्टीधारक येत नाहीत, अनुपस्थित असतात. यासाठी सुधारित धोरणामध्ये अशी तरतूद पाहिजे की, तीन वेळा सुनावणीची संधी देण्यात येईल सदर तीनही सुनावणीसाठी संबंधित उपस्थित राहिला नाही तर एकतर्फी निर्णय घेण्यात येईल. सदर प्रकारची तरतूद जर धोरणातच असेल तर त्याचा आपल्याला आधार राहील. अशी तरतूद नसल्यास कितीही वेळा संधी देऊन सुनावणी घेतली तरी संबंधित अनुपस्थित राहू शकतात. अशा परिस्थितीत आपण एकतर्फी निर्णय घेतला तर संबंधित माननीय न्यायालयात जातात. त्यामुळे विभागाने धोरणातच तशा प्रकारची तरतूद अंतर्भूत केली तर आपल्याला तीन वेळा सुनावणी घेऊन तीनही वेळा संबंधित उपस्थित राहिला नाही तर एकतर्फी निर्णय घेऊन मोकळे होता येईल. असे मत महालेखाकारांनी समितीच्या माध्यामातून व्यक्त केले, तसेच, सदर बाबीची एकूण कालमर्यादा कमीत कमी एक वर्षाची करण्यात यावी. नाहीतर अशी प्रकरणे आठ-आठ, दहा-दहा वर्षापर्यंत चालूच असलेली दिसत आहेत. It should be applicable to whole of Maharashtra and not only for Mumbai. असे मत समितीने व्यक्त केले असता, समितीने ज्या दोन सूचना केलेल्या आहेत त्यांचा विचार करून शासनाकडून आदेश प्राप्त करून घेण्यात येतील आणि त्याप्रमाणे क्षेत्रिय अधिकारी यांना कळविण्यात येईल. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

आता जवळपास १५ ते १६ प्रकरणांचा आढावा घेत आहोत. याबाबत सुरूवातीलाच समितीला दोन तीन बाबी विचारावयाच्या आहेत. सदर जमिनी शासनाकडे जमा करण्यात आल्या आहेत याचा अर्थ ताबा मिळाला आहे काय ? काही लोकांनी सदर जमिनी शासनाकडे जमा केल्या आहेत असा उल्लेख केलेला आहे. आता त्यांच्याकडे सदर जमिनीचा ताबा आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, माधव कंटेनर्स ट्रान्सपोर्ट प्रा.लि. ची जमीन शासनाकडे जमा केलेली आहे. तसेच त्या जागेचा ताबा देखील घेण्यात आलेला आहे आणि तशी नोंद मालमत्ता पत्रकावर घेण्यात आलेली आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. सदर जागा कोणत्या ठिकाणी आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, सदर जागा ही माहूल या ठिकाणी आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

आतापर्यंत अशा प्रकारच्या जमिनी लीजवर दिल्या जात होत्या. पण आता अशा जमिनी शासनाकडे जमा केल्या जात आहेत. शासनाने अशा जमिनीवर ताबडतोब ताबा घेतला पाहिजे आणि त्या सर्व जमिनीचे गुगल्स फोटो शासनाच्या रेकॉर्डला ठेवले पाहिजे. ज्या दिवशी जमीन शासनाकडे जमा केली त्याच दिवशी त्या जमिनीच्या फोटो घेण्यात यावे. अन्यथा तेथील लोक त्या जमिनीवर अतिक्रमण करण्यास तयार राहतील.अशा प्रकारच्या जमिनीच्या संरक्षणाची जबाबदारी कोणाची आहे? अशी विचारणा समितीने केली असता, सदर प्रकरणामध्ये आपण ज्या जमिनी शासनाकडे जमा करतो त्यातील बहुतांश जमिनी या इनकम्बर्ड आहेत. सदर जमिनी या १०० वर्षांपूर्वी लीजवर देण्यात आलेल्या आहेत. प्रत्येक ठिकाणी इमारती बांधण्यात आलेल्या आहेत. आपण जरी शासनाकडे जमा करून घेत असलो तरी त्या ठिकाणी प्रत्यक्षात भाडेकरू राहतात. आपण जमीन मालकाकडून ताबा काढून घेण्याचे आदेश करीत असतो. सदर ठिकाणी बांधकाम करण्यात आलेले आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

महालेखापाल यांनी उल्लेख केलेली मुंबई शहर जिल्ह्यातील प्रकरणे :-

हाजी इस्माईल हाजी अलाना चॅरिटेबल ट्रस्ट -

हाजी इस्माईल हाजी अलाना चॅरिटेबल ट्रस्टयांचेकडून दिनांक ५.५.२०१८ रोजीच्या शासननिर्णयानुसार भुईभाड्याची आकारणी केली आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, होय २ कोटी ८८ लाख रुपयांची मागणी सादर करण्यात आली होती. सदर सुनावणी दिनांक २६/१२/२०१८ रोजी घेण्यात आली होती. संबंधिताने असे सादरीकरण केले की, दिनांक ५.५.२०१८ च्या नवीन धोरणाप्रमाणे देण्यात आलेली जागा धर्मादाय कामांसाठी वापरण्यात येत असेल तर २ टक्क्यांऐवजी ०.५

टक्के कर लावण्यात यावा, अशी विनंती केलेली आहे. सदर प्रकरणी जमिनीचा वापर कोणत्या कारणांसाठी होतो आहे याची तपासणी करून अंतिम आदेश देण्यात येतील, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

मक्की उस्मान दरवेश आणि इतर ३ -

मक्की उस्मान दरवेश आणि इतर ३ बाबत माहिती देण्यास समितीने सूचित केले असता, सदर प्रकरणी ११ कोटी ७९ लाख रुपयांची मागणी सादर करण्यात आलेली आहे. सदर प्रकरणाची सुनावणी दिनांक २६/१२/२०१८ रोजी ठेवण्यात आलेली होती, परंतु सदर सुनावणीला संबंधित अनुपस्थित होते. अनुपस्थित असल्यामुळे आदेश काढण्यात येणार होते पण संबंधित व्यक्ती नंतर उपस्थित झाला आणि आठ दिवसांमध्ये पैसे भरण्याची हमी संबंधिताने दिलेली आहे. संबंधिताचे म्हणणे ऐकून आदेश पारित करण्यात येतील आणि सदर रक्कम संबंधिताकडून वसूल करण्यात येईल, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

मे.जे.के.केमिकल्स लि. -

जे.के.केमिकल्स प्रकरणाबाबत दिनांक २/१/२०१९ रोजी सुनावणी झालेली आहे त्याबाबत माहिती देण्यात यावी, असे समितीने सूचित केले असता, सदर प्रकरणातील जमीन सोसायट्यांना वर्ग करावी असे शासनातर्फे सांगण्यात आलेले आहे. सदर जमीन २० सोसायट्यांना मंजूर करण्यात आलेली आहे. जे.के. केमिकल्सने विकासक नेमून २० सोसायट्यांना सदर जमीन देण्यासाठी शासनाने परवानगी दिलेली आहे. सदर आदेश १९८४ साली पारित करण्यात आले होते. बांधकाम पूर्ण करण्यासाठी तीन वर्षांची मुदत देण्यात आली होती. बांधकाम पूर्ण झाल्यानंतर ज्या दिवशी OC मिळेल त्या दिवसापासून संबंधित सोसायट्यांनी लीज कर भरावा असे सांगण्यात आले होते. सदर प्रकरणी संबंधित २० सोसायट्यांची सुनावणी लावण्यात आलेली आहे. संबंधित सोसायट्यांकडून ७८ लाख रुपयांची रक्कम जमा करण्यात आलेली आहे. यापुढे भाडेपट्टयाचे नुतनीकरण हे सोसायट्यांच्या नावे करण्यात येणार आहे. सदर प्रकरणी जे.के.केमिकलचा संबंध राहणार नाही. सदर प्रकरणी दोन महिन्यांच्या आत कार्यवाही पूर्ण करण्यात येईल, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

श्री.शक्ती मिल्स लि. -

श्री.शक्ती मिल्स लि. ची मालमत्ता शासन जमा करण्यात आलेली आहे, त्यामुळे वसूलीचा प्रश्न उद्‌भवत नाही तसेच सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याचे लेखी उत्तरात नमूद करण्यात आलेले आहे, असे समितीने निदर्शनास आणले असता, सदर प्रकरणी देण्यात आलेली जमीन ज्या उद्देशासाठी देण्यात आली होती तो उद्देश संपलेला आहे. माननीय महसूल मंत्री महोदय यांच्या दिनांक ११/०८/२०१४ च्या आदेशान्वये सदर जमीन शासन जमा करण्यात आलेली आहे. तशा प्रकरणी नोंद मालमत्ता पत्रकावर देखील घेण्यात आलेली आहे, परंतु सदर जमिनीवर ताबा असणाऱ्या व्यक्तीने माननीय उच्च न्यायालयाकडे अपील दाखल केले होते. माननीय उच्च न्यायालयाने सदर प्रकरणी असे सांगितले होते की, लीज संपुष्टात आलेली असल्यामुळे आपण विशिष्ट कारणासाठी दिवाणी न्यायालयाकडे अपील सादर करावे. सदर प्रकरणी दिनांक २१ रोजी सुनावणी होणार आहे. सदर प्रकरणी शासनाकडून विशेष वकीलाची नेमणूक करण्यात आलेली आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सदर प्रकरणी शासनाची काय भूमिका आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, ज्या उद्देशासाठी सदर जमीन देण्यात आली होती, त्या उद्देशासाठी सदर जमिनीचा वापर होत नाही. त्यामुळे सदर लीज नुतनीकरण करावयाची नसून दुसऱ्या उद्देशासाठी सदर जमीन वापरावयाची आहे अशी शासनाची भूमिका आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सदर जमिनीची सद्य:स्थिती काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, सदर जमीन मोकळी असून त्या ठिकाणी सुरक्षा भिंत बांधण्यात आलेली आहे. सदर जमिनीकरिता सुरक्षारक्षक नेमलेले आहेत पण ते खाजगी सुरक्षारक्षक आहेत, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सदर सुरक्षा ही शक्ती मिलकडून लावण्यात आलेली आहे सदर सुरक्षा ही विभागाकडून लावण्यात आलेली नाही, असे समितीने स्पष्ट केले असता, विभागीय प्रतिनिधींनी त्यास सहमती दर्शविली.

सदर जमीन किती आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, सदर जमीन पावणे सहा एकर इतकी आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सदर प्रकरणी लवकर निर्णय घेण्यात आला पाहिजे, असे मत समितीने व्यक्त केले असता, माननीय उच्च न्यायालयाने संबंधिताचे अपील फेटाळले आहे, सध्या शहरी दिवाणी न्यायालयामध्ये प्रकरण दाखल आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

माननीय उच्च न्यायालयाने प्रकरण फेटाळल्यानंतर शहरी दिवाणी न्यायालयात प्रकरण दाखल आहे त्यास फार महत्त्व नाही, असे मत समितीने व्यक्त केले असता, ज्यावेळी लीज संपुष्टात आणली जाते त्यावेळी विशेष कारणांसाठी शहरी दिवाणी न्यायालयात अपील करता येऊ शकते, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

संबंधिताने अपील केले असेल तर त्यांना तसे करू द्या. ताबा घेण्यासाठी काय अडचण आहे ? शहरी दिवाणी न्यायालयाकडून सदर प्रकरणी स्थगिती आदेश देण्यात आलेला आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, सदर प्रकरणी शासनाने ताबा घेतला आहे असे सांगण्यात येते परंतु तशा प्रकारची कागदपत्रे मिळत नाहीत. प्रत्यक्षात ताबा घेऊन सदर जमीन शासनाच्या ताब्यात घेण्यात येईल. मालमत्ता पत्रकावर शासनाच्या नावाची नोंद घेण्यात आलेली आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

मालमत्ता पत्रकावर नाव नोंदविण्यात आले म्हणजे जमीन शासनाची झाली असे समिती मान्य करीत नाही, असे समितीने मत व्यक्त केले असता, प्रत्यक्ष ताबा मिळणे महत्त्वाचे आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले तसेच, जिल्हाधिकारी यांनी सांगितल्याप्रमाणे प्रत्यक्ष ताबा घेतला होता की नाही याची शहानिशा करण्यात येईल आणि पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केले.

सदर जमीन शासनाच्या ताब्यात आली पाहिजे. ज्या उद्देशासाठी जमीन देण्यात आली होती तो उद्देश संपलेला आहे. शक्ती मिल बंद झालेली असल्यामुळे सदर जमीन शासनाच्या नावे करण्यात आलेली आहे पण प्रत्यक्ष ताबा घेण्यात आला पाहिजे. यादृष्टीने कार्यवाही करण्यात यावी, असे समितीने विभागास सूचित केले.

शेठ रनछोडदास आणि त्यांची पत्नी दानीबाई-

शेठ रनछोडदास आणि त्यांची पत्नी दानीबाई या प्रकरणाची काय परिस्थिती आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, सदर प्रकरणातील जागा ही छोटी आहे. जवळपास १९१ चौरस मीटरची जागा आहे. शेठ रनछोडदास आणि त्यांची पत्नी यांच्या नावाने सदर जमीन होती. सदर प्रकरणी सुनावणी घेण्यात आलेली आहे. सदर प्रकरणामध्ये जो मूळ मालक आहे त्याचे कोणी वारस सापडत नव्हते पण विभागाकडे असलेल्या अभिलेखांमध्ये सदर व्यक्तींची नावे असल्यामुळे वर्तमानपत्रात भाडेपट्टाधारकाच्या नावाने नोटिस प्रसिद्ध केली होती. सदर प्रकरणी एक व्यक्ती उपस्थित झाली होती आणि तिचे म्हणणे असे होते की, तिच्याकडे इच्छापत्राचा पुरावा आहे. सदर व्यक्तीने या प्रकरणामध्ये आपली तयारी दाखविलेली आहे. याबाबत दिनांक २६/१२/२०१८ रोजी सुनावणी झालेली आहे. आठ दिवसांच्या आत आदेश पारित करून वसुली करण्यात येईल आणि नुतनीकरणाची प्रक्रिया पूर्ण होईल, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

ॲंकवर्थ लेप्रसी हॉस्पिटल, वडाळा -

ॲंकवर्थ लेप्रसी हॉस्पिटल, वडाळा यांनी म्हटले आहे की, नाममात्र दराने नुतनीकरण करण्यात यावे, विभागाने लेखी उत्तरात असे स्पष्ट केले आहे की मागणी नोटिसप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल, असे समितीने निदर्शनास आणले असता, ॲंकवर्थ लेप्रसी हॉस्पिटल हे मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यात आलेले आहे. सदर ठिकाणी १७ एकर जमीन आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

महानगरपालिकेकडे सदर दवाखान्याचा ताबा आला आहे म्हणजे त्यांची मालकी झाली आहे काय ? ताबा म्हणजे सदर दवाखाना चालविण्यासाठी देण्यात आलेला असेल, असे मत समितीने व्यक्त केले असता, महानगरपालिकेला सदर दवाखाना चालविण्यासाठी देण्यात आलेला आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

नियमाप्रमाणे आपली रक्कम संबंधिताकडून वसूल करावी लागणार आहे अन्यथा सदर रक्कम महानगरपालिकेकडून भरणा करण्यात येईल, असे मत समितीने व्यक्त केले असता, सदर प्रकरणी २१ कोटी रुपयांची मागणी सादर करण्यात आलेली आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

नाममात्र दराने सदर जमीन देण्यात यावी याबाबत विभागाची काय भूमिका आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, दवाखान्याच्या वापरासाठी २ टक्के दर आकारण्यात येतो त्यामुळे १२/१२/२०१२ च्या धोरणाप्रमाणे नाममात्र दराची कोणतीही तरतूद नाही, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सदर प्रकरणी नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी, असे समितीने सूचित केले असता, नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

बॉम्बे झवेरीयन कार्पोरेशन लि. -

बॉम्बे झवेरीयन कार्पोरेशन लि. याबाबत माहिती देण्यात यावी, असे समितीने सूचित केले असता, सदर प्रकरणी बॉम्बे झवेरियन कॉर्पोरेशनची जमीन होती त्यांनी वर्ग दोनची मागणी केली होती त्याप्रमाणे विभागीय आयुक्त यांच्याकडे प्रस्ताव पाठविण्यात आला होता, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

वर्ग दोनचे वर्ग एक करण्याची मागणी करण्यात आलेली आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता, १२/१२/२०१२ च्या धोरणानुसार लीजमध्ये वर्ग दोन करण्याची मागणी संबंधितांनी केलेली आहे. त्याप्रमाणे ५९ कोटी रुपयांची मागणी आदेश पारित करण्यात आलेले आहेत. सदर रक्कम भरणा करण्यासाठी संबंधित तयार असल्यामुळे रक्कम वसूल होईल, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

महालेखापाल यांनी उल्लेख केलेली मुंबई उपनगर जिल्ह्यातील प्रकरणे :-

उर्मिला प्रेम शेठ -

मुंबई उपनगर येथीलउर्मिला प्रेम शेठ या प्रकरणाबाबत माहिती देण्यात यावी, असे समितीने सूचित केले असता,सदर प्रकरणाची सुनावणी दिनांक९/१/२०१९ ला ठेवण्यात आली होती. संबंधितांनी १५ दिवसांच्या कालावधीची मागणी केल्यामुळे दिनांक २४/१/२०१९ ला परत सदर प्रकरणाची सुनावणी ठेवण्यात आलेली आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

आर्च बिशप ऑफ बॉम्बे -

आर्च बिशप ऑफ बॉम्बे या प्रकरणाबाबत माहिती देण्यात यावी, असे समितीने सूचित केले असता, सदर प्रकरणी मूळ शर्तभंग झालेला नसल्यामुळे नोटिस मागे घेण्यात आलेली आहे. सुधारित भाडेपट्ट्याच्या अनुषंगाने संबंधितांकडे १ कोटी २३ लक्ष रुपयांची मागणी सादर करण्यात आलेली आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

साहिल लँड डेव्हलपर्स अँड बिल्डर्स -

साहिल लँड डेव्हलपर्स अँड बिल्डर्सया प्रकरणाबाबत माहिती देण्यात यावी, असे समितीने सूचित केले असता, सदर प्रकरणी सुनावणी घेऊन अंतिम निर्णय पारित करण्यात आलेला आहे. ५२ लक्ष ७१ हजार ६७५ रुपये एवढ्या रकमेची मागणी सादर करण्यात आलेली आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सदर प्रकरणी आदेश कधी पारित करण्यात आलेला आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, सदर प्रकरणी पारित करण्यात आलेला आदेश दिनांक १४/१२/२०१८ रोजीचा आहे आणि सुनावणी माहे डिसेंबरच्या अंतिम आठवड्यामध्ये पूर्ण करण्यात आलेली आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सदर प्रकरणी किती रकमेची वसुली करण्यात आलेली आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, सदर प्रकरणी रक्कम जमा करण्यासाठी एक महिन्याचा अवधी देण्यात आलेला आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सदर प्रकरणी वसुलीची रक्कम किती आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, सदर प्रकरणी ५२ लक्ष ७१ हजार ६७५ रुपयेची वसुली करण्यात येणार आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

चिल्ड्रेन एड सोसायटी-

चिल्ड्रेन एड सोसायटीच्या जागेचा ताबा शासनाने घेतला आहे असे लेखी उत्तरात नमूद केले असल्याचे समितीने निदर्शनास आणले असता, चिल्ड्रेन एड सोसायटीमध्ये २ लक्ष ३० हजार चौरस मीटर जागा भाडेपट्टीने दिली होती. त्यातील ९८३४१.२ चौरस मीटर जागेवर शर्तभंग आढळून आलेला होता. सन २०१७ आणि २०१८ च्या आदेशान्वये सदर जागा शासनास निहित करण्यात आलेली होती. सदर जागेचा ताबा घेण्याबाबत सुद्धा निर्णय घेण्यात आलेला होता. जिल्हाधिकारी यांच्या आदेशाविरुद्ध संबंधित संस्था ज्यांच्याविरुद्ध सदर आदेश पारित करण्यात आलेले होते त्यातील तीनही जणांनी वेगवेगळ्या न्यायालयात प्रकरण दाखल केलेली आहेत. त्यापैकी एका व्यक्तीने माननीय न्यायालयात प्रकरण दाखल केलेले आहे. माननीय उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये सदर प्रकरण अतिरिक्त विभागीय आयुक्त यांच्याकडे वर्ग करण्यात आले आहे. अतिरिक्त विभागीय आयुक्त यांनी नुकतेच दिनांक ०४/१२/२०१८ रोजी जिल्हाधिकारी यांनी जो आदेश पारित केला होता त्याला अपील केले आहे. जिल्हाधिकारी यांनी सन २०१७ आणि २०१८ मध्ये जो मूळ आदेश पारित केला होता त्या अन्वये सदर जमीन शासनास निहित करण्यात आलेली आहे. सदर प्रकरणाला माननीय महसूल मंत्र्यांनी स्थगिती दिलेली आहे. पुढील कार्यवाही करणे बाकी आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सदर प्रकरणातील जेवढी जमीन होती तेथे अतिक्रमण झालेले आहे, जी जागा शिल्लक असेल त्यावर देखील अतिक्रमण होईल. असे मत समितीने व्यक्त केले असता, सदर ९८ हजार चौरस मीटर जागेवर संबंधित संस्थेने अतिक्रमण केलेले आहे. सदर अतिक्रमण म्हणजे झोपडपट्टी अशा प्रकारचे नसून ज्या संस्थेला शासनाने जागा दिली होती त्या संस्थेन शासनाची परवानगी न घेता दुसऱ्या व्यक्तीला परस्पर भाडेपट्टीवर दिलेली आहे. उर्वरित सर्व जागा संबंधित संस्थेच्या ताब्यात आहे. जिल्हाधिकारी यांचा आदेश केवळ ९८ हजार चौरस मीटर जागेसाठीच देण्यात आलेला आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

ज्या दुसऱ्या व्यक्तीला भाडेपट्टीवर जमीन देण्यात आलेली आहे त्याबाबत काय कार्यवाही करणार आहात ? अशी विचारणा समितीने केली असता, संबंधित दुसऱ्या व्यक्तीने सदर ठिकाणी बॉटलिंग प्लँट टाकलेला आहे. झोपडपट्टीच्या स्वरूपात सदर ठिकाणी अतिक्रमण करण्यात आलेले नाही. माननीय उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये अतिरिक्त विभागीय आयुक्त यांनी आपला निर्णय दिलेला आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सदर प्रकरणी माननीय न्यायालयाची काहीही अडचण नसून अडचण ही माननीय मंत्री महोदयांची आहे. सदर प्रकरणी माननीय मंत्री महोदयांनी स्थगिती आदेश दिलेला म्हणजे त्यांची अडचण आहे असे आपले म्हणणे आहे. माननीय मंत्री महोदयांच्या स्थगिती आदेशामुळे आपल्याला पुढील कार्यवाही करता येत नाही कारण माननीय मंत्री महोदयांकडून स्थगिती मिळविलेला अर्जदार व माननीय अतिरिक्त विभागीय आयुक्त यांनी ज्या प्रकरणी निर्णय दिला तो अर्जदार हे दोनही अर्जदार वेगवेगळे आहेत.जी जागा शासन जमा करून घेतली आहे ती जागा आज रोजी आपल्या ताब्यात आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, आज रोजी सदर जागा विभागाच्या ताब्यात नाही. ती केवळ मालमत्ता पत्रकावर शासनाच्या नावे जमा करण्यात आलेली आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

चेंबूर शॉपकिपर्स वेल्फेअर सोसायटी -

चेंबूर शॉपकिपर्स वेल्फेअर सोसायटीबाबत माहिती देण्यात यावी, असे समितीने सूचित केले असता, चेंबूर शॉपकिपर्स वेल्फेअर सोसायटीमध्ये एकूण ५० जण होते त्यातील २० लोकांनी निवेदन सादर केलेले आहे की, आम्ही भाडेपट्टा भरण्यासाठी तयार आहोत. उपविभाग निर्माण करून आम्हाला भाडेपट्टा ठरवून देण्यात यावा, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

भाडेपट्टा वेगळा तयार करता येईल काय ? आपण सोसायटीला जागा दिलेली आहे. सोसायटीने २० लोकांना गाळे वाटप केलेले असतील, असे मत समितीने व्यक्त केले असता, सोसायटीने ५० लोकांना गाळे वाटप केलेले आहेत, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सदर ५० लोकांपैकी २० लोकांनी निवेदन सादर केलेले आहे. उर्वरित लोकांबाबत काय परिस्थिती आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, सदर २० लोकांबाबत निर्णय झाल्यानंतर उर्वरित लोकांकडून सक्तीने वसुली करण्यात येईल. प्रश्न केवळ नुतनीकरणाचा नसून विभागाने जेवढी जागा त्यांना दिली होती त्यापेक्षा जास्तीच्या जागेवर त्यांनी ताबा घेतलेला आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सदर प्रकरणी जास्तीच्या जागेवर अतिक्रमण करण्यात आलेले आहे त्याबाबत काय परिस्थिती आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, अतिक्रमण नियमानुकूल करण्याच्या दृष्टिकोनातून प्रस्ताव नुकताच माननीय विभागीय आयुक्तांच्या मार्फत पाठविण्यात आलेला आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

माधव कंटेनर्स ट्रान्सपोर्ट प्रा.लि. -

माधव कंटेनर्स ट्रान्सपोर्ट प्रा.लि.बाबत यापूर्वी चर्चा झालेली आहे. या जमिनीचा पूर्ण ताबा मिळालेला आहे पण अतिक्रण होऊ नये यासाठी संरक्षण भिंत बांधने आवश्यक आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता, याबाबत समितीने सांगितले की जागेचा ताबा घेतल्यानंतर पुढे अतिक्रमण होऊ नये. आमच्याकडून काढण्यात येणाऱ्या प्रत्येक आदेशाची प्रतिलिपी उपजिल्हाधिकारी, अतिक्रमण आणि निष्कासन यांना पाठविण्यात येते आणि सदर जागेवर अतिक्रमण होऊ देऊ नये यासाठी सूचना देण्यात येतात. काही जागा अतिसंवेदनशील असतात आणि अशा जागांवर अतिक्रमण होण्याचा धोका अधिक असतो. DPDC च्या निधीतून सदर जागांना सुरक्षा कुंपण घालण्यात येते, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

जी जागा विभाग ताब्यात घेत आहे त्यांना विशेष करून सुरक्षा कुंपण घालण्यासाठी प्रस्तावित करण्यात यावे असे समितीने मत व्यक्त केले असता, त्यास विभागीय प्रतिनिधींनी सहमती दर्शविली.

संरक्षण भिंत बांधल्यांनतर संरक्षणाची यंत्रणा सुद्धा लावणे आवश्यक आहे नाहीतर संरक्षक भिंत तोडून पुन्हा अतिक्रमण केले जाऊ शकते. उपनगरामध्ये मोठ्या किमतीच्या जागा आहेत. अतिक्रमणाबाबत पोलीस मदत करीत नाहीत किंवा महानगरपालिका म्हणते की सदर जागा जिल्हाधिकारी यांची आहे. असे प्रकार घडू नयेत यासाठी काहीतरी यंत्रणा उभी करणे गरजेचे आहे. सदर प्रकरणी काही खाजगी सुरक्षा यंत्रणा उभी करता येईल काय याचा विचार करण्यात यावा, असेमतसमितीनेव्यक्तकेलेअसता, ज्या जागा ताब्यात घेण्यात आलेल्या आहेत, MMRDA, Metro किंवा महानगरपालिका यांना जर DP अंतर्गत आरक्षणासाठी एखादा प्रकल्प उभारण्यासाठी जर तात्पुरती किंवा कायमस्वरूपी जागा आवश्यक असेल तर शासनाने दिलेल्या आदेशान्वये संबंधितांना ॲडव्हान्स ताबा देखील देण्यात येतो. महानगरपालिकेला या जागेची आवश्यकता आहे की, नाही हे विचारुन घेऊ. आवश्यकता असेल तर ती जागा निगम प्राधिकरणाला हस्तांतरित करण्यात येईल, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

कुर्ला बेने इस्त्रायल प्रेअर हॉल. -

कुर्ला बेने इस्त्रायल प्रेअर हॉल या प्रकरणाबाबत माहिती देण्यात यावी, असे समितीने सूचित केले असता, यासंदर्भात लिखित सबमिशन देण्यासाठी ३० तारीख दिलेली आहे. त्याच दिवशी सदर आदेश काढण्यात येतील, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी -

बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचा करारनामा करण्यात आलेला आहे. भाडेपट्टयाचे दर निश्चित करण्याची कार्यवाही शासन स्तरावर करण्यात यावी, असे समितीने सूचित केले असता, दिनांक ५/५/२०१८ च्या धोरणामध्ये अशी तरतूद केली आहे की, पूर्वी ज्या संस्थाना सवलतीच्या दराने भाडे तत्त्वावर जमीन दिली होती त्यांना नुतणीकरणानंतर देखील सवलत पाहिजे असेल तर त्या प्रकरणाचा निर्णय जिल्हाधिकारी स्तरावर न करता ते प्रकरणे जिल्हाधिकारी शासनाकडे पाठवितात. त्यानंतर सदर प्रकरणी शासन स्तरावर निर्णय घेतला जातो. सदर प्रकरणी जिल्हाधिकारी यांनी शासनाकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर प्रकरण वित्त विभागाकडे पाठविण्यात आलेले आहे. सदर प्रकरणी वित्त विभागाने सहमती दर्शवली तर त्यांना यापुढेही नाममात्र दराने भाडे सुरु राहणार आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

अशा प्रकारचे धोरण ठरविण्याचे कारण काय आहे? अशी विचारणा समितीने केली असता, अशा प्रकारचे धोरण मुद्दाम ठरविलेले आहे. काही प्रकरणामध्ये परिस्थिती बदलते. त्यामुळे सदर प्रकरणी सवलत सुरु ठेवायची की नाही त्यावेळीच शासन निर्णय घेईल, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

जाँव दुमिंग रोझी -

जाँव दुमिंग रोझीप्रकरणी जागेचा ताबा घेण्यात आलेला आहे असे विभागानेलेखी उत्तरात नमूद केले असल्याचे समितीला निदर्शनास आणले असता, सदर जागा शासनास निहित करण्यात आलेली आहे. येत्या १८ तारखेला जागेचा ताबा घेण्यासाठी पथक पाठविण्यात येणार आहे. सदर जमीन सुद्धा इनकम्बर्ड जमीन आहे. ज्या मूळ व्यक्तीला सदर जमीन देण्यात आली होती त्याने परस्पर ती इतर लोकांना अनेकवेळा हस्तांतरित केलेली आहे. त्यामुळे सदर ठिकाणी दुसऱ्याच व्यक्ती राहात आहेत. मालमत्ता पत्रकावर महाराष्ट्र शासनाचे नाव नोंदविण्यात आलेले आहे केवळ ताबा घेणे शिल्लक राहिले आहे ते काम करणार आहोत. सदर जमीन अनेकवेळा हस्तांतरित झालेली असल्यामुळे इतर व्यक्ती त्या ठिकाणी राहतात. संबंधित लोकांनी एक निवेदन दिलेले आहे. मूळ भाडेपट्टीधारक म्हणून आमचा विचार करण्यात यावा अशी मागणी सदर निवेदनात करण्यात आलेली आहे. सदर प्रकरणी नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सदर जागा शासन जमा केलेली आहे पण अद्याप ताबा मिळालेला नाही, असे मत समितीने व्यक्त केले असता, मालमत्ता पत्रकावर नाव नोंदविण्यात आले आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

शर्तभंगाच्या अनुषंगाने आपण सदर अतिक्रमण धरणार आहात का? अतिक्रमणाच्या नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी, असे समितीने सूचित केले. तसेच, १६ प्रकरणांवर पुढील महिन्यात कारवाई करुन समितीला अहवाल सादर करावा, असे समितीने विभागास निदेश दिले.

अभिप्राय व शिफारशी :-

परिच्छेद क्रमांक ३.१०" सुधारित दराने भूईभाडे अदा करण्याच्या आदेशाची अंमलबजावणी न करणे"

अभिप्राय

१८.१ राज्याची महसूली जमा वाढविण्यासाठी विभागाने मुंबई शहर जिल्हा(मुंबई शहर) आणि मुंबई उपनगर जिल्ह्यातील धर्मादाय न्यास आणि खाजगी व्यक्तींना दिलेल्या जमिनींच्या भाडेपट्टींची मुदत संपल्यावर त्यांचे नुतनीकरण करण्यासाठी एक सुधारित धोरण प्रस्तावित केले आहे(डिसेंबर २०१२). त्यानुसार, महाराष्ट्र शासनाने दरवर्षी जारी केलेल्या शीघ्र सिद्धगणकातील दराने खुल्या जमिनींसाठीचे भूईभाडे सुधारित करावयाचे होते आणि प्रत्येक पाच वर्षांनी त्या वेळच्या शीघ्र सिध्दगणक दरानुसार भूईभाड्यात सुधारणा करावयाची होती. भाडेपट्टीवरील जमीन भोगवटा हक्कवर्ग-२ तत्वावर बदलण्याचा पर्याय स्वीकारण्याची संधी देखील जिल्हाधिकाऱ्यांनी भाडेपट्टाधारकांना द्यावयाची होती. भाडेपट्टीवरील जमीन भोगवटा हक्कावर रूपांतरीत करण्यासाठी, महाराष्ट्र शासनाने प्रत्येक वर्षी जारी केलेल्या शीघ्र सिध्दगणकातील खुल्या जमिनींच्या दराच्या २० टक्के रूपांतरण शुल्क भाडेपट्टाधारकाकडुन वसूल करावयाचे होते. मुंबई शहरात जानेवारी २०१२ रोजी भाडेपट्टीची १३०७ प्रकरणे होती. ज्यापैकी ६९४ प्रकरणांचे डिसेंबर २०१२ च्या भाडेपट्टी नुतनीकरणाविषयीच्या सुधारित धोरणानुसार नुतनीकरण करावयाचे होते. परंतु या सर्व भाडेपट्टेधारकांना जरी नोटीस जारी करण्यात आल्या होत्या तरी शासनाकडे नुतनीकरणासाठी फक्त ७२ प्रकरणे सादर (एप्रिल २०१३ ते एप्रिल २०१७ दरम्यान) केली होती ज्यापैकी भाडेपट्टी नुतनीकरणाची केवळ नऊ प्रकरणे शासनाने मंजुर (डिसेंबर २०१३ ते मार्च २०१६ दरम्यान) केली व ६८२ प्रकरणे प्रलंबित राहिली.

मुंबई उपनगर जिल्ह्यात भाडेपट्टीची ३५६ प्रकरणे होती, ज्यापैकी १३५ प्रकरणे भाडेपट्टी नुतनीकरणासाठी पात्र होती. परंतु या सर्व भाडेपट्टेधारकांना नोटीस जारी करण्यात आल्या होत्या आणि शासनाकडे भाडेपट्टी नुतनीकरणासाठी फक्त १० प्रकरणे सादर (मार्च २०१४ ते ऑक्टोबर २०१५ दरम्यान) केली गेली. त्यापैकी शासनाने भाडेपट्टी नुतनीकरणाचे फक्त एक प्रकरण जून २०१४ मध्ये मंजुर केले व नऊ प्रकरणांत भूईभाडे नुतनीकरण प्रलंबित राहिले.

भूईभाडे नुतनीकरणाच्या सुधारित धोरणानुसार भुईभाड्याचे नुतनीकरण केलेल्या १६ प्रकरणांत या भाडेपट्टींचे पुढील ३० वर्षांसाठी नूतनीकरण करण्याचे आदेश मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी दिले होते. ज्यात भाडेपट्टींचे जरी नुतनीकरण झाले होते व सुधारित भूईभाडे निश्चित करण्यात आले होते तरी मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांनी सुधारित धोरणानुसार भाडेपट्टी भाडे वसूल केले नव्हते, परिणामी सुधारित भूईभाडे अदा न करताच या भाडेपट्टीधारकांनी जमिनीचा ताबा कायम ठेवला होता.

अशाप्रकारे शासनाच्या सुधारित धोरणानुसार भूईभाडे अदा करण्याच्या आदेशाची वेळेत अंमलबजावणी करण्यात आणि महाराष्ट्र जमीन महसूल संहिता,१९६६ च्या कलम ५३ अंतर्गत कारवाई सूरू करण्यात दोन्ही जिल्हाधिकाऱ्यांना अपयश आल्याने, जानेवारी २०१२ पासून पाच वर्षांपेक्षा जास्त काळात रू.६०.३३ कोटी महसूल बुडाला व त्यामुळे अतिरिक्त महसूल संकलनाचे शासनाचे उद्दीष्ट असफल ठरले. तसेच भाडेपट्टीचा कालावधी संपुष्टात येऊनही जुन्याच दराने भूईभाडे अदा करून भाडेपट्टीधारकाने मालमत्तेचा ताबा स्वत:जवळ राखला असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

मुंबई शहरात एकुण १३०७ मिळकती भाडेपट्ट्याने मंजूर केलेल्या असून, या पैकी सुमारे ६९१ मिळकतीचा भाडेपट्टा संपुष्टात आलेला आहे.दिनांक१२डिसेंबर, १९८३ च्या शासन निणर्यान्वये बृहन्मुंबईतील शासकीय जमिनीवरील संपुष्टात आलेल्या भाडेपट्टयाचे नुतनीकरण करण्यासंबंधीचे धोरण विहित करण्यात आले होते. सदर धोरणाची न्यायालयीन प्रकरणांमुळे अंमलबजावणी करता आली नाही. तद्नंतर दिनांक ५ ऑक्टोबर, १९९९ रोजीच्या शासन निर्णयान्वये भुईभाडे आकारण्याबाबतचे धोरण विहित केले होते. मा. मुंबई उच्च न्यायालयाने या संबंधीच्या रिट याचिकेमध्ये दि. २५ ०८ २००४ रोजी दिलेल्या निर्णयानुसार सदरधोरण दिनांक १५ नोव्हेंबर, २००६ रोजीच्या शासन निर्णयान्वये मागे घेण्यात आले.

मा. उच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेले निर्णय विचारात घेऊन तद्नंतर बृहन्मुंबईतील शासकीय जमिनीच्या भाडेपट्टयाच्या नुतनीकरणासंदर्भात दिनांक १२.१२.२०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारित धोरण विहित करण्यात आले. या धोरणान्वये भाडेपट्टयाने धारण केलेल्या जमिनीचे मुल्य परिगणित करताना मुद्रांक शुल्क विभागामार्फत दरवर्षी प्रसिध्द केल्या जाणाऱ्या वार्षिक मुल्य दर तक्त्याचा वापर करण्याचे धोरण स्विकारण्यात आले.

दि. १२ १२ २०१२ चा शासननिर्णय निर्गमित झाल्यानंतर शासनाच्या या धोरणाच्या अनुषंगाने भूईभाड्याची आकारण्यात येणारी रक्कम अल्प असून ती अधिक असावी याद्दष्टीने तसेच सदर धोरणानुसार भूईभाड्यापोटी आकारण्यात येणारी रक्कम

खुपच जास्त आहे. अशा दोन्ही विरोधी आशयाच्या अनेक याचिका मा. उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल झाल्या. यानुषंगाने याचिकाकर्ते व शासन यांनी एकत्रितरित्या विचार परामर्श करुन समन्वयातून मार्ग काढावा अशा मा. उच्चन्यायालयाच्या दि. १३ जानेवारी, २०१५च्या निर्देशानुसार याचिकाकर्त्यांशी चर्चा करण्यात आलेली आहे.

दि. १२. १२. २०१२ च्या शासननिर्णयानुसार भूई भाड्याच्या रकमा यासंबंधित जमिनींच्या वार्षिक दर विवरणपत्राप्रमाणे येणाऱ्या किंमतीवर निश्चित करण्यात येत असल्याने अशा भाडेपट्टयांच्या भूईभाडयात होणारी वाढ अनेक जुन्या भाडेपट्टेधारकांना जाचक ठरत असल्याबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका दाखल झालेल्या आहेत. दि. १२. १२. २०१२ च्याशासन निर्णयातील तरतूदींप्रमाणे नुतनीकरण झालेल्या भाडेपट्टयांची अल्प संख्या विचारात घेता शासनाने निश्चित केलेले धोरण अधिक लोक मान्य करण्याच्या दृष्टीने उक्त धोरणात काही सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने शासनाने या धोरणातील निवासी प्रयोजनासाठी आकारण्यात येणाऱ्या भूईभाड्याच्या दरात दि.०५.०५.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारणा करुन भूईभाड्याचे दरकाही संवर्गांसाठी कमी केले. परंतु सदर दि.०५.०५.२०१८ रोजीचा शासन निर्णय देखिल उक्त नमूद याचिकेतील याचिकाकर्त्यांनी आव्हानित केला असून सदर याचिका अद्यापि मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे प्रलंबित आहेत. शासनाने दि.२०.०८.२०१६ अन्वये बृहन्मुंबईमधील शासकीय मिळकतींच्या भाडेपट्टानुतनीकरणाचे अधिकार संबंधित जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आलेले आहेत. त्यामुळे ही प्रकरणे आता जिल्हाधिकाऱ्यांच्या स्तरावरुन हाताळण्यात येत आहेत.

उक्त पार्श्वभूमी पाहता सुधारीत दराने भूईभाडे आकारुन बृहन्मुंबईतील शासकीय मिळकतींवरील संपुष्टात आलेल्या भाडेपट्ट्यांचे नुतनीकरण करण्यास विलंब झालेला आहे. तसेच भाडेपट्टा संपुष्टात आलेल्या मिळकतींच्या नुतनीकरणाच्या अनुषंगाने दि.२४.१०.२०१८ रोजी जाहीर सुनावणी आयोजित केली होती. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत ६ महिन्याच्या कालावधीमध्ये १५० एवढ्या वैयक्तिक सुनावण्या घेतल्या आहेत. त्याअनुषंगाने मुंबई शहरातील आतापर्यंत ५१ प्रकरणांचे भाडेपट्टा नुतनीकरण झाले असून एकुण रु.३२,४९,३८,६४०/- एवढा महसूल शासनास प्राप्त झाला आहे. तसेच मुंबई उपनगर जिल्ह्यामध्ये १५ प्रकरणांमध्ये भाडेपट्टा जमिनीचे रुपांतर भोगवटादार वर्ग - २ मध्ये करण्यात आलेले असून त्याद्वारे शासनास रक्कम रु.५३,०२,१९,४९५/- इतका महसूल प्राप्त झालेला आहे. तसेच ०५ प्रकरणांत भाडेपट्टयाचे नुतनीकरण करण्यात आले असून त्याद्वारे शासनास रक्कम रु.३,२२,८५,४०३/- महसूल प्राप्त झाला असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले.

त्याचप्रमाणे महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदात आक्षेपित केलेल्या प्रकरणासंदर्भात मुंबई शहरातील ७ व मुंबई उपनगरातील ९ अशा एकूण १६ प्रकरणांबाबतच्या कारवाईसंदर्भातील प्रकरणनिहाय तपशिल विभागाने त्यांच्या लेखी उत्तरात व समितीच्या साक्षीदरम्यान विस्तृतरित्या नमूद केला. ज्यामध्ये काही प्रकरणांत सुनावणी प्रस्तावित असून वा सुनावणी घेण्यात आली असून त्यापुढील कार्यवाही विभागाकडून सुरु आहे. तर काही प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहे. तर काही प्रकरणांत निर्णय झाले असून त्याच्या अंमलबजावणीची प्रक्रिया सुरु आहे. तर काही प्रकरणात सुधारीत भाडेपट्टयाची निश्चिती करुन त्यानंतर भाडेपट्टा नुतनीकरणाची कार्यवाही सुरु असल्याचे समितीला दिसून आले. तसेच काही प्रकरणात शर्तभंगाखाली जमीन शासनजमा करुन मिळकत पत्रिकेवर महाराष्ट्र शासन अशी नोंद करणेबाबत आदेश झालेले आहेत. काही प्रकरणात शासन अपिले न्यायप्रविष्ठ आहेत व काही प्रकरणात जमीन शासनजमा केलेली असल्यामुळे त्यात आता भाडेपट्टयांचे नुतनीकरण करण्याची आवश्यकता नाही असे समितीच्या निदर्शनास आले. तसेच प्रलंबित प्रकरणांमध्ये जिल्हाधिकाऱ्यांच्या स्तरावर सुनावणी घेण्याचे देखील काम सुरु असून सर्वच प्रकरणांमध्ये प्रकरणनिहाय कारवाई शासनस्तरावरुन सुरु असल्याचे समितीस सांगण्यात आले.

शिफारस

१८.२ शासनाच्या सुधारीत धोरणानुसार नवीन दराने भूईभाडे अदा करण्याच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात जिल्हाधिकारी, मुंबई शहर व मुंबई उपनगरे अपयशी ठरल्यामुळे रु.६०.३३ कोटी महसूल बुडाला आणि मालमत्तेचा ताबा भाडेपट्टाधारकाकडे कायम राहिला असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत. सुधारीत दराने भूईभाडे आकारुन शासकीय मिळकतीवरील संपुष्टात आलेल्या भाडेपट्टयांचे नुतनीकरण करण्यास मुंबई व मुंबई उपनगरेमध्ये १) शासन निर्णय दि.१२/१२/२०१२ व दि. ०५/०५/२०१८ मा. मुंबई उच्च न्यायालयात आव्हानित करण्यात आल्याने, २) पूर्वीची थकीत भाडेपट्टयाची रक्कम शासन जमा न केल्याने, ३) शर्तभंगाच्या अनुषंगाने सुनावणी सुरु असल्याने, ४) विविध कार्यालयाकडून अहवाल अप्राप्त असल्याने या कारणास्तव विलंब झाल्याचे समितीसमोर सांगण्यात आले.

महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदात नोंदविलेले आक्षेप हे शासकीय मालमत्तेचे जतन व त्याअनुषंगाने शासनास प्राप्त होणाऱ्या महसूलासंदर्भात अत्यंत महत्वाचे असून विभागाने ते अतिशय गांभीर्याने हाताळणे आवश्यक आहे. राज्यात भाडेपट्टयांने दिलेल्या शासनाच्या जमिनी संदर्भात महालेखाकारांनी याअगोदरच एक विशेष अहवाल सभागृहास सादर करुन त्याची लोकलेखा समितीने विस्तृत छाननी करुन भाडेपट्टयावरील शासकीय जमिनीसंदर्भात संपुर्ण राज्यासाठी सर्वसमावेशक व अद्ययावत असे धोरण तयार करण्यासाठी अत्यंत महत्वपूर्ण शिफारशी व उपाययोजना याअगोदरच करुन त्या सभागृहाला सादर देखील केल्या आहेत व त्याची अंमलबजावणी राज्यात सुरु झालेली असून त्याअनुषंगाने शासनास मोठ्या प्रमाणात महसूल प्राप्ती देखील होत आहे. शासनाच्या मालकीच्या जमिनींवर त्रयस्थपक्षांचे हक्क प्रस्थापित होवू नयेत अथवा विहित अटी शर्तींचे उल्लंघन होवू नये तसेच ज्या प्रयोजनासाठी जमिनीचे प्रदान करण्यात आले आहे त्याच्या व्यतिरिक्त जमिनीचा वापर होत असल्यास त्यावर आळा घालण्याच्या अनुषंगाने या सर्व बाबींवर शासनाचे सर्वसाधारण नियंत्रण व वचक असणे अत्यंत आवश्यक आहे व त्यामुळे या सर्व आक्षेपित बाबी विभागाने गांभीर्याने घेणे अभिप्रेत आहे.

सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी मुंबई शहरे व मुंबई उपनगरे संदर्भात नमुन्यादाखल काही प्रकरणांची छाननी केली असता सुधारीत दराने भूईभाडे अदा करण्याच्या आदेशाची अंमलबजावणी न झाल्याबाबत आक्षेप नोंदविलेले आहेत. परंतु महालेखाकारांनी आक्षेपित न केलेली प्रकरणे देखील समितीला दुर्लक्षित करता येणार नाहीत. राज्यासाठी अत्यंत धोरणात्मक व सर्वसमावेशक असा निर्णय होण्यासाठी व त्याची अंमलबजावणी राज्यभर एकसमानरित्या व प्रभावीरित्या करण्यासाठी ही बाब महालेखाकारांच्या आक्षेपात नमूद प्रकरणांपुरती मर्यादित ठेवणे योग्य होणार नाही. सन २०१२ पर्यंत मुंबई शहरात १३०७ व मुंबई उपनगरात ३५६ भाडेपट्टीची प्रकरणे होती. ज्यापैकी जवळजवळ ८५० प्रकरणे भाडेपट्टी नुतनीकरणासाठी प्रलंबित होती. त्याअनुषंगाने शासनाने दि.१२.१२.२०१२ रोजी भाडेपट्टी नुतनीकरणाविषयीच्या सुधारीत धोरणाच्याआधारे ही प्रकरणे निकाली काढून सुधारीत दराने भूईभाडे वसुल करणे आवश्यक होते. परंतु शासन निर्णय दि.१२.१२.२०१२ व दि.०५.०५.२०१८ यांना मा.उच्च न्यायालयात आव्हानीत करण्यात आल्याने, पुर्वीची थकीत भाडेपट्टीची रक्कम शासनजमा न केल्याने, शर्तभंगाच्या अनुषंगाने सुनावणी सुरु असल्याने तसेच विविध कार्यालयांकडून जमिनींची अद्ययावत माहिती संदर्भातील अहवाल अप्राप्त असल्याने अशा अनेक कारणास्तव ही प्रकरणे प्रलंबित असून त्यास विलंब होत असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. या सर्व पार्श्वभूमीवर अनेक जमिनींच्या भाडेपट्टयांचे नुतनीकरण देखील प्रलंबित आहे. त्यामुळे सुधारीत दराने भूईभाडे विभागाला मिळणे अपेक्षित असताना त्याची अद्यापही अंमलबजावणी झाली नाही. केवळ न्यायालयात याचिका दाखल केल्यास विभाग जर निर्णयाची अंमलबजावणी थांबवित असेल तर कोट्यावधीच्या जमिनी ताब्यात असणारे भाडेपट्टेधारकांकडे शासनस्तरावरील कार्यवाही थांबविण्यासाठी ही प्रकरणे न्यायप्रविष्ठ करुन ठेवणे हा पर्याय अत्यंत उपयुक्त व सोईस्कर ठरेल. प्रकरण न्यायप्रविष्ठ झाले तर त्यासंदर्भात वेगाने कार्यवाही करण्याची विभागातील अधिकारी/कर्मचाऱ्यांची प्रवृत्ती व भूमिका योग्य नाही, जी बाब शासनाच्या निश्चितच आर्थिक हिताची नाही. जोपर्यंत न्यायालयाची यात स्थगिती मिळत नाही तोपर्यंत शासनस्तरावरील कार्यवाही थांबविण्याची कोणतीही आवश्यकता नाही. निर्णयाच्या अंमलबजावणीतील विलंबामुळे अनेक ठिकाणी भाडेपट्टेधारकांकडून अशा प्रकरणांमध्ये पळवाटा शोधण्याचे पुर्ण प्रयत्न होतात किंवा त्रयस्थ हितसंबंध निर्माण करण्यात येतात व अंतिमत: शासनस्तरावर कोणतेही पर्याय शिल्लक राहत नाहीत. त्यामुळे अशा सर्व कार्यवाह्या शासनस्तरावरुन शीघ्रगतीने होणे अत्यावश्यक आहे. या प्रलंबित प्रकरणांमध्ये सुनावणी घेण्याचे काम मोठ्या प्रमाणात सुरु आहे. प्रत्येक प्रकरणात सुनावणी घेवून निर्णय घेण्याबाबतची शासनस्तरावरुन करावयाची कार्यवाही पाहता या प्रकरणांची व्याप्ती फार मोठी आहे. त्यातही निर्णयांच्या विरुध्द वरिष्ठ प्राधिकाऱ्यांकडे अपिल दाखल करणे व अंतिमत: ही प्रकरणे मा.मंत्री महोदयांच्या स्तरावर प्रलंबित राहणे या सर्व बाबी अत्यंत वेळखाऊ तर आहेच. परंतु अप्रत्यक्षरित्या भाडेपट्टेधारकास कारवाई पुढे ढकलण्यास फायदा व दिलासा देणाऱ्या आहेत. अनेक प्रकरणांमध्ये सुनावणीसाठी पुढील तारखा मागण्याची देखील प्रवृत्ती मोठ्या प्रमाणात दिसून येते. त्यामुळे देखील कारवाई वा अंमलबजावणीस अमर्याद विलंब होतो. याहीउपर सुनावणी घेण्याचे अधिकार ज्या अधिकाऱ्यांकडे आहेत त्यांचेकडे अगोदरच कामाचा कार्यभार हा मोठ्या प्रमाणात असल्यामुळे ही सुनावणीची अतिरिक्त कामे मुदतीत व विनाविलंब पार पाडणे या अधिकाऱ्यांना शक्य होत नाही. अतिशय कालबध्द रितीने या सुनावण्या पार पडत नाहीत व यासंबंधीचे अंतिम निर्णय हे कमीतकमी वेळेत घेतले जात नाहीत तोपर्यंत ही प्रकरणे निकाली निघण्यास अनेक अडचणी शासनस्तरावरुन येवू शकतात. ज्याचा अप्रत्यक्षरित्या लाभ हा भाडेपट्टेधारकालाच होणार आहे. उपरोक्त सर्व अडचणी पाहता मुंबई शहरे व मुंबई उपनगरे मध्ये भाडेपट्टीची प्रलंबित असणारी सर्व प्रकरणे तात्काळ निकाली

काढण्यासाठी कालबध्द नियोजन विभागाने करावे. ज्यात अधिकाऱ्यांच्या स्तरावरील कार्यवाहीसाठी निश्चित मुदत व कालमर्यादा विहित करण्यात यावी, सुनावणीच्या तारखा वाढवून घेण्यासाठी देखील अंतिम कालमर्यादा निश्चित करण्यात यावी, ज्या अधिकाऱ्यांकडे सुनावणीची जबाबदारी देण्यात आली आहे त्यांनी आठवड्यातील विशिष्ट दिवस नेमून ही प्रलंबित प्रकरणे कालबध्द पध्दतीने निकाली काढावीत, भाडेपट्टा संदर्भात करावयाच्या कराराच्या प्रारुपास कालबध्द पध्दतीने मान्यता व भाडेपट्टेधारकाची सहमती घ्यावी व तो करार नोंदणीकृत करुन तातडीने अंमलात आणण्यात यावा, सुनावणीची नोटीस काढल्यानंतर त्यास भाडेपट्टेदार अनुपस्थित राहिल्यास त्यासाठी देखील अंतिम कालमर्यादा विहित करण्यात यावी व याअनुषंगाने मार्गदर्शक तत्वे विहित करण्यात यावीत. सचिव स्तरावर ही प्रकरणे निकाली काढण्यासाठी १ वर्षाची मुदत याअगोदरच विहित करण्यात आलेली आहे. तशीच कालमर्यादा जिल्हाधिकारी स्तरावरुन प्रकरणे निकाली काढण्यासाठी देखील विहित करण्यात यावी. केवळ भाडेपट्टा नुतनीकरण व सुधारीत भाडेपट्टयाची वसुली ही प्रकरणे व शर्तभंगाची प्रकरणे वेगवेगळ्या निकषावर तपासण्याची तरतूद करण्यात यावी. शासनाच्या निर्णया विरोधातील प्रकरणे मोठ्या प्रमाणात न्यायालयात दाखल झालेली असून भविष्यात देखील शासनाच्या निर्णयाविरुध्द अनेक प्रकरणे न्यायालयात दाखल होण्याची शक्यता पाहता न्यायालयात शासनाची बाजू गुणवत्तापूर्वक मांडण्यासाठी व कोणत्याही परिस्थितीत हे निर्णय शासनाच्या विरुध्द जावू नये यासाठी ज्येष्ठ व तज्ञ वकिलांचे पॅनल तयार करुन त्यांचेमार्फत ही प्रकरणे न्यायालयात मांडण्यासंदर्भात आवश्यक जती कार्यवाही शासनस्तरावरुन करण्यात यावी. सुनावणीच्या कामांचा निपटारा लवकर होण्यासाठी अतिरिक्त अधिकारी/कर्मचाऱ्यांची आवश्यकता असल्यास ते देखील पुरविण्यात यावेत व या सर्व बाबींचा समावेश करुन त्याअनुषंगाने धोरणात आणि व्यवस्थेत सुधारणा करण्यात यावी. समितीच्या असेही निदर्शनास आले की, बहुतांश ठिकाणी अनेक प्रकरणात शर्तभंग प्रकरणी जमीन शासनजमा करुन मिळकत पत्रिकेवर महाराष्ट्र शासनाच्या नावाची नोंद करण्यात आल्याचे दिसून येते. परंतु समितीने त्याची सखोल छाननी केली असता केवळ सातबाऱ्यावर शासनाचे नाव चढविण्यात आले असून जमिनीचा अद्यापही ताबा हा भाडेपट्टाधारकांकडेच असल्याचे समितीस दिसून आले. ही बाब देखील निश्चितच समर्थनीय नाही. जमीन केवळ सातबाऱ्यावर शासनजमा करुन वस्तुत: ताबा भाडेपट्टाधारकांकडे राहिल्यास त्याचा काहीही उपयोग शासनास होणार नाही. त्यामुळे ज्याठिकाणी जमिनी शासनजमा करण्याचा निर्णय झालेला असेल तेथे जमीन वस्तुत: ताब्यात घेण्याची कारवाई तातडीने करण्यात यावी. तसेच या जमिनींवर अतिक्रमण होवू नये त्यादृष्टीने आवश्यकती उपाययोजना देखील शासनस्तरावरुन करण्यात यावी. अशाप्रकारे ही संपुर्ण प्रकरणे कालबध्द पध्दतीने हाताळून व न्यायालयात प्रलंबित प्रकरणे शासनाची योग्य बाजू मांडून तात्काळ निकाली काढण्याच्या अनुषंगाने प्रयत्न करण्यात यावेत व त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिशिष्ट-अ

महाराष्ट्र शासन

क्रमांक एमआरडी-३३१८/प्र.क्र. १४३/नवि-७
नगर विकास विभाग, ४ था मजला, मदाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २८ मे, २०१९.

प्रति,

उप सचिव,
महाराष्ट्र विभानमंडळ सचिवालय,
मुंबई ४०० ०३२

विषय:- भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१६-१७ सामान्य व सामाजिक क्षेत्र अहवालातील परिच्छेदासंदर्भात लोकलेखा समितीची बैठक

संदर्भ:- १) आपले पत्र क्र. ७७८६/म.वि.स./ड-१ (लोलेस) ,दि.२२ एप्रिल, २०१९ रोजीचे पत्र.

महोदय,

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये ३.५ "खाजगी विकासकाला अदेय फायदा" यांसदर्भात मागविलेली माहिती मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून प्राप्त करुन घेण्यात आली आहे. सदर माहितीची प्रत व शासनाने दिलेल्या दिनांक १९.०३.२०१९ रोजीचे निर्देशाचे पत्र या सोबत पाठविण्यात येत आहे. तसेच आपल्या दिनांक २२ एप्रिल, २०१९ रोजीच्या पत्रातील मुद्येनिहाय माहिती खालील प्रमाणे आहे:-

अ) बांद्रा कुर्ला सकुल येथील जी ब्लॉक मध्ये भाडेपट्टयांचे अधिमुल्य (Premium), विलंब शुल्क आणि थकित असलेल्या भाडेपट्टेधारक थकबाकीदारांची माहिती :-

स्पष्टीकरण :-प्राधिकरणाच्या दिनांक १२ सप्टेंबर, २०१७ रोजीच्या थकीत अधिमूल्याच्या वसूलीबद्दल व भाडेपट्टेदारांना दिलेल्या नोटीसच्या विरोधात भाडेपट्टेदारांनी मा. उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली आहे. त्याची माहिती पुढीलप्रमाणे आहे :-

अ. क्र.	ज्या भूखंडधारकांना प्राधिकरणाने दिनांक १२/०९/२०१७ रोजी नोटीस काढली आहे त्यांची नावे	मा. उच्च न्यायालयातील दावा क्र.	दि. १२/०९/२०१७ (प्राधिकरणाने नोटीस दिली आहे) पर्यंत ची थकबाकी रु. (कोटी)	भरलेले अधिमूल्य रु. (कोटी) व भरणाकेल्याचा दिनांक	आजपर्यंतची थकबाकी रु. (कोटी)
१	सी-६६ रिलायन्स इंडस्ट्रीज लि.	५८६/२०१८ WP(L)२६५४/२०१७	४३२.७८	०.००	७८९.९८

अ. क्र.	ज्या भूखंडधारकांना प्राधिकरणाने दिनांक १२/०९/२०१७ रोजी नोटीस काढली आहे त्यांची नावे	मा. उच्च न्यायालयातील दावा क्र.	दि. १२/०९/२०१७ (प्राधिकरणाने नोटीस दिली आहे) पर्यंत ची थकबाकी रु. (कोटी)	भरलेले अधिमूल्य रु. (कोटी) व भरणाकेल्याचा दिनांक	आजपर्यंतची थकबाकी रु. (कोटी)
	(रघुलीला बिल्डर्स – वन व्हीकेरी इमारत)				
२	सी-६३ इंडियन न्यूज पेपर सोसायटी	८६४/२०१८ WP(L) ३३७३/२०१७	५४.७५	०.००	९६.२७
३	सी-६४ रिलायन्स इंडस्ट्रीजलि. (कनव्हेनशन सेंटर व कमर्शियल कॉम्पलेक्स)	२४२/२०१८ WP(L)३३९५/२०१७	१३९२.३८	६४६.७७ कोटीचा भरणा दिनांक १८/०२/२०१९ रोजी केलाआहे.	१३८८.१५
४	सी-५७ आणि ५८ श्री नमन हॉटेल्स (ओबेरॉय हॉटेल)	३२०९/२०१७ WP(L)२८८०/२०१७	३२.१२	०.००	३४.८२
५	एस.एफ.-७ आणि ९ बी (जमनालाल हिराचंद फाऊंडेशन)	दावा केलेला नाही.	२३.४९	३३.६१ कोटी चा भरणा दिनांक ३१/१२/२०१८ रोजी केलाआहे.	३.९९
६	एस.एफ-६ (तालीम रिसर्च फाऊंडेशन)	दावा केलेला नाही.	३२.६१	०.००	३७.९१
मा.न्यायालयाने वरील सर्व रीट याचिका एकत्रित केल्याआहेत.					

च) समितीने यापूर्वी दिलेल्या दिनांक १५.०३.२०१९ रोजीच्या पत्रासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती व मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाची प्रत

स्पष्टीकरण:- महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे दि. १५ मार्च, २०१९ रोजीचे पत्र नगर विकास विभागाने दिनांक १९ मार्च, २०१९ रोजीच्या पत्राने (जोडपत्र-५ ब) प्राधिकरणास पुढील योग्य त्या कार्यवाहीस पाठवले आहे. तसेच, हि बाब मा. उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणण्याचे कळविले आहे. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाने त्यांच्या दिनांक १५.०३.२०१९ च्या पत्रामध्ये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या वांद्रे-कुर्ला संकुलातील वांद्रे-कुर्ला संकुलातील जी-ब्लॉकमधील इतर काही भूखंडासंदर्भात भागश: किंवा अंतिम भोगवटा प्रमाणपत्र देताना अशा प्रकारच्या अनियमिततेची पुनरावृती होणार नाही याची दक्षता घ्यावी व इतर प्रकरणी अशा प्रकारची अनियमितता झाल्याचे आढळल्यास वरिष्ठ अधिकाऱ्यांनी संबंधितावर जाबाबदारी निश्चित करुन शासनाच्या महसूलाची वसूली करण्यासाठी योग्य ती कार्यवाही करावी असे सुचवले आहे. तसेच थकीत अधिमूल्यची वसूली होत नाही तोपर्यंत विषयांकित प्रकरणात अंशत: किंवा पूर्ण भोगवटा प्रमाणपत्र देऊ नये असे आदेश प्राधिकरणास दिले आहेत. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या

आदेशप्रमाणे मा. उच्च न्यायालयात (रिट पिटीशन (एल) २१२/२०१९) मधील पुढील साक्षी दरम्यान दिनांक २७.०३.२०१९ रोजी प्राधिकरणाने त्यांच्या वकीलामार्फत सदर बाब मा. उच्च न्यायालयाच्या समोर सादर केली आहे.

मा. उच्च न्यायालयाने त्यांच्या दिनांक २७.०३.२०१९ (जोडपत्र-१३) परिच्छेद १० व ११ मध्ये याबाबतचा उल्लेख देखिल केला आहे. मात्र मा. उच्च न्यायालयाच्या दि. २७.०३.२०१९ रोजीच्या आदेशातील परिच्छेद १२ नुसार प्राधिकरणास न्यायालयाचे आदेश पाळणे बंधनकारक असून ते न पाळल्यास प्राधिकरणास मा. न्यायालयाच्या आदेशांचा पालन न केल्याबद्दल दोषी समजण्यात येईल असे आदेश दिले आहेत. तसेच आदेशामध्ये (I) सी ६६ या भूखंडावरील प्रिमायसेस विकण्यास ना हरकत दाखला देणेबाबत आदेश दिले आहेत आणि (II) रु. ५४१.१६ कोटीचा भरणा भाडेपट्टेदाराने केल्यानंतर त्याच्या प्रमाणात भोगवटा प्रमाणपत्र देण्याचे आदेशीत केले आहे.

सबब मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सदर प्रकरणी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने दिनांक २८.०३.२०१९ रोजी (जोडपत्र -१४) सी ६६ भूखंडावरील प्रिमायसेस विकण्यास ना-हरकत दाखला देणेबाबत कार्यवाही केली आहे.

क) मा. उच्च न्यायालयात भूखंड धारकाकडून दाखल याचिकेवर झालेले आदेश समितीने दिलेल्या आदेशाचा विपर्यास असेल तर एमएमआरडीएने उच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका अथवा सर्वोच्च न्यायालयात अपिल दाखल करण्याबाबत योग्य तो वैधानिक सल्ला नामवंत विधी सल्लागाराकडून घेऊन आवश्यक ती पुढील कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.

स्पष्टीकरण:- मा. उच्च न्यायालयात (रिट पिटीशन (एल) २१२/२०१९) मधील दिनांक २७.०३.२०१९ रोजीच्या सुनावणी दरम्यान, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या दिनांक १५.०३.२०१९ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या सूचना प्राधिकरणाने प्राधिकरणाच्या वकीलामार्फत मा. उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणण्यात आले आहे. परंतू मा. उच्च न्यायालयाने त्यांच्या दिनांक २७.०३.२०१९ (जोडपत्र-१३) रोजीच्या आदेशातील परिच्छेद १२ नुसार मा. न्यायालयाचे आदेश पाळणे बंधनकारक असून ते न पाळल्यास प्राधिकरणास मा. न्यायालयाच्या आदेशांचा पालन न केल्याबद्दल दोषी समजण्यात येईल. याशिवाय उक्त आदेशामध्ये (I) सी ६६ या भूखंडावरील प्रिमायसेस विकण्यास ना हरकत दाखला देणे आणि (II) रु. ५४१.१६ कोटीचा भरणा भाडेपट्टेदाराने केल्यानंतर त्याच्या प्रमाणात भोगवटा प्रमाणपत्र देण्याचे मा. न्यायालयाचे आदेश असल्याने उक्त आदेशानुसार सदर प्रकरणी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने दिनांक २८.०३.२०१९ रोजी

(जोडपत्र -१४) सी ६६ या भूखंडावरील प्रिमायसेस विकण्यास ना हरकत दाखला देणेबाबत कार्यवाही केली आहे. परंतु मा. उच्च न्यायालचे आदेश व लोकलेखा समितीच्या सुचना एकमेकांशी सुसंगत नसल्यामुळे तसेच विषयांकित प्रकरणी प्राधिकरणाची येणे असलेली संपूर्ण रक्कम वसुल न झाल्यामुळे या प्रकरणात मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका (एसएलपी) दाखल करण्याबाबतची पुढील कार्यवाही प्राधिकरणामार्फत सुरु आहे.

आपला,

सोबत : वरीलप्रमाणे

(वि. श्री. पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रारूप - पुन्हा

महाराष्ट्र शासन

क्रमांक: प्रमआयो-३३१८/प्र.क्र. ४३/नवि-७
नगर विकास विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: ११ मार्च, २०१९.

प्रति,

आयुक्त तथा प्रशासक,
नवनगर प्रदेश विकास प्राधिकरण,
सेक्टर-१, सिडको भवन,
सीबीडी (पूर्व), मुंबई-४०० ०६१.

विषय:- नवनगर विकास व महानगर नियोजन योजना सन २०१६-४० अंतर्गत मे. [illegible] क्षेत्र वाढवण्याबाबत, कलम ४.५ प्रमाणे सिडकोकडून अभिप्राय प्राप्त करून, [illegible] बाबतीत शासनाचे मार्गदर्शन.

संदर्भ:- सिडकोचे पत्र क्र. ४२७८/सीडीए/[illegible] दिनांक २५.०६.२०१९ चे पत्र.

महोदय,

[illegible]

[illegible]

[illegible]

ओडयन्स-१३

Nmw-103/19.

IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY
ORDINARY ORIGINAL CIVIL JURISDICTION

NOTICE OF MOTION NO. 103 OF 2019
IN
WRIT PETITION [LD.] NO. 212 OF 2019

Raghuleela Builders Pvt. Ltd. ..Applicant.

In the matter between

Raghuleela Builders Pvt. Ltd. ..Petitioner.

Versus

The Mumbai Metropolitan Region
Development Authority and Another. ..Respondents.

Mr. Vikram Nankani, Senior Advocate with Mr. Vibhav Krishna, Ahtesham Khatri, Shanmugham, Mayuresh Borkar, Tushar Pande, Devang Lakhotia I/b Juris Consillis for the Petitioner.

Mr. P. K. Dhakephalkar, Senior Advocate a/w Mr. Amogh Singh, Nivit Shrivastava, Sneha Patil I/b Maniar Shrivastava Associats for the Respondent.

Coram : RANJIT MORE &
SMT. BHARATI H. DANGRE, JJ.
Date : March 27, 2019.

P. C. :

1. Heard Mr. Nankani, learned senior counsel for the Petitioner/Applicant and Mr. Dhakephalkar, the learned senior counsel for the Respondents.

2. On 20th February 2019, after hearing both sides at length, we passed speaking order whereunder we admitted the writ petition and by way of interim relief following directions are given :

::: Uploaded on - 27/03/2019 ::: Downloaded on - 27/03/2019 17:59:30 :::

"[1] The Respondents are directed to provide within 10 days a computation of following :

[A] (i) the total amount paid towards the lease premium as per the acknowledgements signed by the Respondents.
(ii) balance amount to be paid by the Petitioner towards the lease premium.

[B] (i) the total amount paid towards the simple interest as per the acknowledgements signed by the Respondents.
(ii) balance amount to be paid by the Petitioner towards the simple interest as per the lease deed.

[C] (i) the total amount paid towards the penal interest as per the acknowledgements / receipts signed by the Respondents.
(ii) balance amount to be paid by the Petitioner towards the penal interest as per the RBI prime lending rate (Base rate) on 1st July of each year without charging penal interest on interest.
(iii) additional amount if penal interest is also charged on unpaid interest.

[2] The Petitioners are directed to deposit within three months thereafter the entire balance amount so communicated by the Respondents towards the lease premium (Clause [1][A](ii)), simple interest (Clause [1][B](ii)) and penal interest (Clause [1][C](ii)). This deposit however would be subject to final outcome of the petition.

